अ

जानेवारी — मार्च 1993
खंड 16, अंक 4

# अर्थसंवाद

- लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी
- 'नोबेल'चे मानकरी
- चेलिया समितीचा अहवाल
- खाजगीकरणाचा प्रयोग
- भारतातील पंचवार्षिक योजना

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 16, अंक 4 जानेवारी–मार्च 1993

■ प्रमुख संपादक
रवीन्द्र दोशी

■ सहायक संपादक
सु. गो. भानुशाली

■ सल्लागार मंडळ
विकास चित्रे
अ. रा. पडोशी
सु. दा. तुपे
दि. व्यं. जहागिरदार

■ संपादकीय पत्रव्यवहार
रवीन्द्र दोशी,
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर–416 004

## अनुक्रमणिका

287 लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी
शशिकांत गंधे

306 सामाजिक—आर्थिक विश्लेषणाच्या अधिराज्याचे संस्थापक : गॅरी बेकर
शि. ना. माने

312 अर्थशास्त्रातील 'नोबेल'ची श्रेयमालिका
रवीन्द्र दोशी

322 आर्थिक वार्ता
सु. गो. भानुशाली / सो. पं. खेर

332 खाजगीकरणाचा प्रयोग ( ग्रंथ परीक्षण )
संतोष दास्ताने

340 सोळावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
माणिकराव धोंगडे / र. पु. कुरुलकर / आनंद नाडकर्णी – अ. रा. पडोशी / श्रीनिवास खांदेवाले / रवीन्द्र दोशी / व्यं. सु. पाटणकर

371 सांख्यिकी पुरवणी - 16
भारतातील पंचवार्षिक योजना
रवीन्द्र दोशी

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ
( 1992-93 )

**अध्यक्ष**
शशिकान्त गन्धे

**कार्याध्यक्ष**
रवीन्द्र सबनीस

**कार्यवाह-खजिनदार**
व्यं. सु. पाटणकर

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**
रवीन्द्र दोशी

**सदस्य**
बाबूराव कवडे
ल. शि. पाटील
अर्जुन महाडिक
चंद्रसेन मोहिते
प्र. ब. कुलकर्णी
वि. स. कुलकर्णी
सु. गो. भानुशाली
रा. य. माहोरे
सुधा मोकाशी
अंजली कुलकर्णी
पुरुषोत्तम पाळंदे
सुहास काणे

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**

(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे इत्यादी)

**गुलाबराव पं. तायडे**
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
9, नहुष सहकारी गृहनिर्माण संस्था, गंगापूर रस्ता,
नाशिक – 422 002

■ **परिषदेचे प्रमुख कार्यालय :**

मराठी अर्थशास्त्र परिषद,
द्वारा / सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई-400 014.

■ **वर्गणी :**

**(अ) परिषदेचे सदस्य**

( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 ( एकरकमी )
( 2 ) साधारण सदस्य : रु. 80 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 80 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )

[ * परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

**(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 80 (वार्षिक)

(इ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च.

** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे नाशिकला पाठवावी.

■ **'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**

( 1 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.
( 2 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
(टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यालयीन व्यवस्थेतील बदल

दिनांक 31 **मार्च** 1993 **पर्यंत** परिषदेची सर्व कार्यालयीन व्यवस्था धुळे येथील कार्यवाहांच्या कार्यालयाकडून पाहिली जाईल.

त्यानंतर 1 **एप्रिल** 1993 **पासून** प्रा. गुलाबराव पं. तायडे, नाशिक हे कार्यवाह-खजिनदार-पदाची जबाबदारी सांभाळतील. त्यामुळे या तारखेपासून परिषदेचे कार्यालयीन कामकाज **नाशिक** येथून होईल. नव्या कार्यवाह–खजिनदारांचा पत्ता पुढीलप्रमाणे :

प्रा. गुलाबराव पं. तायडे,<br>
9, मधुष सहकारी गृहनिर्माण संस्था,<br>
गंगापूर रस्ता,<br>
**नाशिक** – 422 002.

सर्व संबंधितांनी या बदलाची नोंद घ्यावी आणि 1 एप्रिल, 1993 पासून सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार नाशिकच्या पत्त्यावर करावा.

**व्यं. सु. पाटणकर**<br>
कार्यवाह–खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक वर्गणी संपली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद'चे वार्षिक वर्गणीदार यांना आम्ही आठवण देऊ इच्छितो की, 'अर्थसंवाद'च्या जानेवारी–मार्च, 1993 या अंकाबरोबर त्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे. त्यांनी 1 एप्रिल, 1993 ते 31 मार्च, 1994 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि 'अर्थसंवाद'च्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करून घ्यावे ही विनंती. **ही वर्गणी आता नूतन कार्यवाह प्रा. तायडे यांच्या नाशिक येथील पत्त्यावर पाठवावी.**

**व्यं. सु. पाटणकर**<br>
कार्यवाह – खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

# सतरावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सतरावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर/नोव्हेंबर 1993 मध्ये सांगली येथे लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांच्या विद्यमाने आयोजित होणार आहे. धुळे येथील अर्थ-शास्त्राचे निवृत्त प्राध्यापक डॉ. व्यं. सु. पाटणकर अध्यक्षस्थानी राहतील.

अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहेत.

(1) उपभोक्त्याच्या वर्तनाचे आर्थिक सिद्धान्तन

(2) भारतातील करव्यवस्था

(3) महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 250 **शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती पाठविल्याखेरीज त्या-विषयीचा निर्णय अध्यक्षांकडून कळविला जाणार नाही.**

निबंध मराठीतच असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव आणि पत्ता हा तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

31 **ऑगस्ट**, 1993 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत.

निबंधलेखकांनी आपले निबंध डॉ. व्यं. सु. पाटणकर, 'संपदा', प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे – 424 002 या पत्त्यावर पाठवावयाचे आहेत.

**व्यं सु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार

# लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी *

शशिकांत गंधे **

या वर्षाच्या अध्यक्षपदासाठी माझी निवड केल्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. मी प्रतिष्ठित प्राध्यापक पेशातला नाही. तसेच अभ्यासक अथवा संशोधकांच्या श्रेणीतही मी बसत नाही. या पदासाठी दूरान्वयाने का होईना माझा काही अधिकार लागत असेल तर तो एवढाच की, भारतीय आर्थिक सेवेचा ( Indian Economic Service ) मी एक सुरुवातीपासूनचा सदस्य आहे आणि 25–30 वर्षे मी आर्थिक नियोजन क्षेत्रात लुडबूड करीत आलो आहे.

माझ्या अध्यक्षीय भाषणासाठी मी लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी हा विषय निवडला आहे. 1991 च्या जनगणनेची प्राथमिक आकडेवारी प्रसिद्ध झाल्यावर या प्रश्नाची तीव्रता जाणवली. आपल्या देशासाठी लोकसंख्या वाढीचा प्रश्न हा येती शंभर वर्षे तरी महत्त्वाचा असणार हे लक्षात घेऊन आपल्या आर्थिक अभिवृद्धीच्या संदर्भात त्यामुळे कोणत्या समस्या उभ्या राहतील आणि त्यांचे संभाव्य स्वरूप कोणते असेल यांचे या निमित्ताने विवेचन करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

अर्थशास्त्राच्या अभ्यासात लोकसंख्या हा महत्त्वाचा विषय आहे यात शंका नाही. लोकसंख्या वाढ आणि आर्थिक अभिवृद्धी यातील परस्पर संबंध मात्र एक अतिशय वादग्रस्त असा विषय झालेला आहे. अप्रगत देशांतील विकास योजनांच्या संदर्भात लोकसंख्या प्रवृत्तींच्या सूचितार्थाविषयी दोन ध्रुवांइतके विरुद्ध मतभेद पसरलेले आहेत.[1] बऱ्याच निराशावादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते जलद लोकसंख्या वाढ हा विकासातील एक मोठा संरोध असून त्यामुळे अप्रगत देशांतील लोकांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकली नाही. त्यांच्या मते, आर्थिक व सामाजिक विकासाच्या प्रयत्नांची निष्पत्ती इतकीच झाली की, अस्तित्वात असलेल्या जीवनमानाची पातळी सांभाळता आली, वृद्धी मात्र करता आली नाही. काही अप्रगत देशांत तर

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नाशिक येथील सोळाव्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण.

** प्र–कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली.

वाढत्या लोकसंख्येचे पालनपोषण जीवनमानाच्या घटत्या दराने होत असल्याचे आढळले. याविरुद्ध आशावादी मंडळींच्या मते वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे, नवीन उत्पादनक्षेत्रांची दालने उघडण्यात आली आहेत आणि तंत्रविज्ञानविषयक प्रगतीने उत्पादकता वाढून राष्ट्रीय उत्पन्नात पूर्वीपेक्षा वाढ झालेली आहे. त्यांच्या मते आर्थिक विकास घडवूनही जर जीवनस्तर स्थिरच राहातो किंवा घटतो तर त्याची जबाबदारी लोकसंख्या वाढीवर नसून विकसनशील देशांतील सरकारांनी अंगीकारलेल्या चुकीच्या धोरणात ती शोधावी लागेल. ही धोरणे पुरोगामी आणि प्रगतीला पोषक ठरतील अशा रीतीने आखणे शक्य आहे, असे आशावाद्यांना वाटते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या चार दशकांच्या काळात मतांचे हे ध्रुवीकरण अस्तित्वात असून त्यात फारसा बदल झालेला दिसत नाही. काहींनी वाढत्या लोकसंख्येला अणुबाँब किंवा कर्करोगाची उपमा दिली तर काहींनी वाढती लोकसंख्या ही एक महत्त्वाची आर्थिक जिंदगीची बाब आहे, आणि भार किंवा दायित्व तर मुळीच नाही असे प्रतिपादन केले [कोल, 1991]. या दोन टोकांच्या विचारसरणीचा ऊहापोह करून एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारताच्या सामाजिक व आर्थिक जीवनाशी त्यांचा संबंध लावण्याचा प्रयत्न मी या भाषणात करणार आहे. या वादग्रस्त मुद्यांच्या तपासणीकडे वळण्याआधी जागतिक व भारतातील लोकसंख्येत जे बदल होत आहेत त्याचा प्रथम आढावा घेणे आवश्यक वाटते.

## 1

## लोकसंख्या प्रस्फोट

### 1.1 जागतिक दृष्टिक्षेप

लोकसंख्येच्या इतिहासातील एका असाधारण कालखंडात आपण आज वावरत आहोत. अगणित काळापर्यंत जगाची लोकसंख्या अत्यंत धीम्या वेगाने वाढत होती. इतक्या धीम्या वेगाने की, 200 वर्षांपूर्वी जगाची लोकसंख्या 100 कोटी पर्यंत पोहोचण्यास अंदाजे एक दशलक्ष वर्षे लागली असावीत असा हिशेब होता. परंतु त्यानंतर मात्र लोकसंख्या वाढ फार झपाट्याने होऊ लागली. लोकसंख्या दुप्पट (दोनशे कोटी) होण्यास पुढील फक्त 120 वर्षे लागली. तिसरे शतक 35 वर्षांत जोडले गेले आणि चौथे त्यानंतरच्या केवळ 15 वर्षांत [केली, 1986]. जगाच्या लोकसंख्येने पाचशे कोटींची रेषा 1990 मध्ये पार केली असावी असे मानण्यात येते. लोकसंख्येच्या एका अनुदार अनुमानानुसार जगाची लोकसंख्या सन 2000 मध्ये सहाशे ते साडेसहाशे कोटी एवढी होण्याची शक्यता आहे.[2] 2025 पर्यंत जागतिक लोकसंख्या आठशे ते सव्वा आठशे कोटी होण्याची शक्यता आहे [जागतिक बँक, 1984 आणि संयुक्त राष्ट्रे, 1986]. जागतिक लोकसंख्या जलद गतीने वाढतच आहे. लोकसंख्या शास्त्रज्ञांच्या मते ही लोकसंख्या पुढच्या 100 वर्षांत वाढतच राहून एकविसाव्या शतकाच्या शेवटी 1,000 कोटी होईल आणि मग कदाचित त्या पातळीवर स्थिरावेल.

काही लोकसंख्या संशोधकांच्या मते [एस्पेनशेड आणि स्टोलनिझ, 1921] न्यून विकसित देशांतील जननशक्ती प्रस्फोट हेच या शीघ्र गतीने वाढणाऱ्या जागतिक लोकसंख्येचे मुख्य कारण आहे. एकूण जागतिक लोकसंख्या वाढीचा दर मात्र ऱ्हास पावत आहे. 1960 मध्ये हा दर 2.0 टक्के होता. तो 1990 मध्ये 1.65 वर आला आहे. पण या ऱ्हासाचे कारण विकसित देशांतील शीघ्र गतीने घटणारा अभिवृद्धी दर हेच आहे. या देशांतील हा दर चालू शतकाच्या पाचव्या दशकात 1.3 टक्के होता तो घटत जाऊन आठव्या दशकाच्या शेवटी 0.6 वर पोहोचला आहे. न्यून विकसित देशांतील (चीन वगळता) वाढीचा दर कमी तर झाला नाहीच, उलट 2.13 टक्क्यांवरून वाढून तो 2.25 टक्क्यांवर येऊन ठेपला आहे [संयुक्त राष्ट्रे, 1986].

भविष्यात होणाऱ्या जागतिक लोकसंख्या वाढीचा फार मोठा भाग, म्हणजे जवळ जवळ 90 टक्के भाग, हा आजच्या न्यून विकसित देशांशी संबंधित राहणार आहे. ही बाब खास लक्षात घ्यावयाला हवी. याचा परिणाम असा होणार आहे की, जगातील लोकसंख्येत आजच्या अप्रगत देशांच्या लोकसंख्येचे प्रमाण वाढणार आहे. 1987 मध्ये हे प्रमाण 75 टक्के होते ते 2000 मध्ये 80 होईल आणि 2025 मध्ये ते त्याहूनही अधिक असेल. चीनचा एकमेव अपवाद सोडल्यास येत्या 30-35

वर्षांत न्यून विकसित देशांतील लोकसंख्या वाढीचा दर दोन ते अडीच टक्के इतका राहणार आहे; त्यात फारशी सुधारणा होण्याची शक्यता नाही. महत्त्वाचा मुद्दा असा की, सर्वात अधिक वाढीचे दर सर्वात कमी विकसित देशांत दिसून येतात. ( या देशांत आफ्रिका खंडातील बहुतेक देश आणि दक्षिण आशियातील बराचसा भाग–बांगला देश, पाकिस्तान, भारतातील मोठा प्रदेश इत्यादी-मोडतात.) अत्यंत गरीब देशांतील लोकसंख्या सन 2000 मध्ये जागतिक लोकसंख्येच्या निम्म्याहून थोडीशी कमी, म्हणजे अंदाजे तीनशे कोटी असणार आहे.[3]

## 1.2 भारतातील लोकसंख्या वाढ

जगातील एकूण जमिनीचा 2.4 टक्के भाग भारतात आहे, परंतु जागतिक लोकसंख्येत मात्र भारताचा हिस्सा 16 टक्क्यांहून थोडा अधिक आहे. चीन नंतर भारताचा लोकसंख्येच्याबाबत दुसरा क्रमांक लागतो. भारतात लोकसंख्येची वाढती घनता (दर चौरस किलो मीटर क्षेत्रामागील लोकसंख्या) आपणास नवी नसली तरी गेल्या शंभर वर्षांच्या काळात तिच्या–मध्ये झालेल्या भरमसाठ वाढीमुळे आपला देश आता लोकसंख्या प्रस्फोटाच्या समीप आलेला आहे. 1991 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 84.4 कोटी झाली आहे.[4] शंभर वर्षांपूर्वीच्या लोकसंख्येहून ती साडेतीन पटीने अधिक आहे 1981–91 या एका दशकातच भारताची लोकसंख्या 16.1 कोटींनी वाढली आहे. म्हणजेच, पश्चिम युरोपच्या एकूण लोकसंख्ये–इतकी लोकसंख्या फक्त 10 वर्षांत भारतात वाढली. दरवर्षी आपली लोकसंख्या ऑस्ट्रेलिया किंवा श्रीलंका किंवा पूर्व जर्मनी या देशांच्या लोकसंख्येने वाढत आहे [प्रेमी, 1991].

एका तज्ज्ञ अनुमानानुसार भारताची लोकसंख्या येत्या शंभर–सव्वाशे वर्षांत वाढतच राहणार असून 2115 च्या सुमारास ती 169 कोटी एवढी होईल आणि नंतर (कदाचित) त्या पातळीवर स्थिरावेल. विरोधाभासाने, चीनची लोकसंख्या 2070 मध्ये 157 कोटी होईल आणि त्या स्तरावर स्थिरावेल. याचा साधा अर्थ असा की, एकविसाव्या शतकाच्या मध्यालाच भारताची लोकसंख्या चीनएवढी होईल आणि नंतर ती चीनपेक्षा अधिक होत राहील [नंदा, 1983]. 1981–91 या दशकात भारतात झालेली 16.1 कोटी लोकसंख्या वाढ ही चीनमध्ये याच दशकात झालेल्या वाढीइतकीच आहे [इंडियन एक्सप्रेस, दिल्ली आवृत्ती 2–6–1992]. एका संदर्भ ग्रंथात [प्रेमी, 1991] तर ती चीनच्या वाढीच्या सव्वापट असल्याचे नोंदण्यात आले आहे.

गेल्या 100 वर्षांत झालेल्या भारतातील लोक–संख्या वाढीच्या आकृतीबंधाचे तीन टप्पे करता येतील. 1881–1920 या पहिल्या टप्प्यात लोकसंख्येच्या वाढीचा वार्षिक दर एक टक्क्याहून कमी, म्हणजे दुर्लक्षणीय, मानता येईल. दुसऱ्या टप्प्यात, म्हणजे 1921–50 या कालखंडामध्ये, तिच्या वार्षिक वाढीचा दर 1 ते 2 टक्के, म्हणजे सौम्य होता. तिसऱ्या टप्प्यात मात्र (1951–91) लोकसंख्या उच्च दराने, म्हणजे प्रतिवर्षी 2.2 हून अधिक टक्क्यांनी, वाढली. 1981-91 या दशकातील लोकसंख्येचे काही चल मात्र लक्षणीय आहेत. गेल्या सात दशकांच्या तुलनेने प्रथमच दशकीय वाढीचा दर मागच्या दशकाच्या दराहून कमी झाला आहे. (24.66 पासून घसरून तो 23.50 वर आला आहे.) परिणामस्वरूप वार्षिक घातांकीय[5] लोकसंख्या दर 2.22 टक्क्यांवरून 2.11 टक्क्यांवर आला आहे. अर्थात तो अजून दोनाच्या वर आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

गेल्या चाळीस वर्षांत भारताची लोकसंख्या अडीच पटीने वाढली आहे. लोकसंख्येच्या वाढीचे प्रमुख कारण म्हणून मृत्यू दरात झालेली लक्षणीय घट हे सांगावे लागेल. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून सार्व-जनिक आरोग्यात सुधारणा घडविण्याचे विविध प्रयत्न आणि संसर्गजन्य रोगांच्या मोठ्या साथींना अटकाव करण्यात मिळालेले यश याचा हा संयुक्त परिणाम सांगता येईल. यामुळे मृत्यू दरात 33 टक्के (1911 मधील दर हजारी 42.6 पासून 1991 मध्ये 9.6 पर्यंत) घट झाली. जन्मदरात मात्र या काळात फक्त 20 टक्के इतकीच घट झाली. (1911 मध्ये 49.2 वरून 1991 मध्ये 29.9 पर्यंत.) असे दिसून येते की, 1981–91 या अलीकडच्या दशकात प्रथमच लोकसंख्या वाढ नियंत्रणात महत्त्वाचा टप्पा गाठण्यात भारताला यश मिळाले आहे. गेल्या 100 वर्षांत प्रथमच

जन्म दरात झालेली दशकीय घट (7.8 टक्के) ही मृत्यू दरात झालेल्या दशकीय घटीपेक्षा (5.4 टक्के) अधिक होती.

# 2

## लोकसंख्या वाढ – प्रतिकूल बाजू

लोकसंख्या वाढीच्या आर्थिक अभिवृद्धीवर होणाऱ्या आघाताच्या संदर्भात जो वाद निर्माण झाला आहे तो एवढ्या तीव्रतेचा आणि अधिक काळ टिक–णारा असा वाद अर्थशास्त्राच्या इतर कुठल्याच अभ्यास विषयाबाबत झाला नसावा. या वादाच्या समर्थनार्थ आणि विरोधार्थ भरपूर लिखाण झाले आहे आणि होत आहे.[6] इथे त्याचा धावता आढावा घेतला आहे.

### 2.1 अभिमत सिद्धान्त

लोकसंख्या या विषयावरील कुठलेही विवेचन हे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ रॉबर्ट माल्थस यांच्या लोकसंख्या–विषयक सिद्धान्ताच्या उल्लेखाशिवाय अपुरेच राहते. दोनशे वर्षांपूर्वी (1798) माल्थस यांचा 'लोकसंख्या–विषयक सिद्धान्तावरील निबंध' प्रसिद्ध झाला. त्यांचा सिद्धान्त हा बंधनाचा सिद्धान्त आहे आणि घटत्या प्रत्यायाच्या नियमावर तो आधारित आहे. या निबंधा–तील ज्या एका उताऱ्याचा संदर्भ वारंवार देण्यात येतो तो असा. अनिर्बंधित लोकसंख्या वाढ भूमिती श्रेढी दराने होते, तर जीवनास आवश्यक असलेल्या खाद्य पदार्थांची गणिती श्रेढी दराने होत असते. आकड्यांशी तोंडओळख असणाऱ्या कुणाच्याही लक्षात पहिल्या श्रेढीची अफाट शक्ती सहज लक्षात येईल. गंमत अशी की, ज्या देशांच्या अभ्यासाच्या आधारावर माल्थसनी आपला सिद्धान्त मांडला होता त्या देशांतील पुढील काळातील आर्थिक प्रगतीशी या सिद्धान्ताचा संबंध जवळजवळ नाही असे आढळून येते. परंतु त्यांच्या सिद्धान्ताचा पगडा न्यून विकसित देशांत मात्र आजही कायम आहे. वाढती लोकसंख्या म्हणजे वाढती श्रमशक्ती आणि पर्यायाने वाढती उत्पादनक्षमता. परंतु उत्पादन वाढ लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा कमी दराने होते. यामुळे जीवनमान घसरत जाते आणि ते जेव्हा निर्वाहस्तराच्या खाली जाते तेव्हा नैसर्गिक व कृत्रिम संरोधक प्रभावीपणे लोकसंख्या वाढीला आळा घालतात. माल्थस यांच्या सिद्धान्तावर भरपूर टीका झाली आहे. पुढील काळातील अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या टीकेचा मुख्य रोख असा की, या सिद्धान्तात उत्पादकतेतील तंत्र–विज्ञानाच्या महत्त्वाच्या भूमिकेकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले आहे. जीवनमान हे फक्त शेती उत्पादनावरच अवलंबून असते हे गृहीत धरले गेले होते आणि औद्योगिक उत्पा-दनास महत्त्व दिले गेले नव्हते. जननशक्तीचा देशातील आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या प्रक्रियेशी कुठलाच संबंध नसून ते एक पूर्णपणे स्वतंत्र चल असल्याचे समजण्यात आले होते.

रिकार्डोंचा आर्थिक विकासाचा सिद्धान्त हा माल्थस यांच्या वैचारिक पायावरच उभारलेला दिसतो. लोकसंख्या वाढीने कमी प्रतीची जमीन कसणे अनिवार्य होते, एका घटकाच्या उत्पादनात श्रमिकांचा वाटा वाढतो, वेतन खर्च वधारला जातो आणि शेवटी नफ्यात घट होते, साठे संपतात आणि शून्य अभिवृद्धी दर अस्तित्वात येतो. म्हणजेच रिकार्डोंचे आर्थिक अभिवृद्धी आणि विभजनाचे प्रतिमान हे स्थिरावस्थेच्या सिद्धा–न्ताचे रूप घेते [रिकार्डो, 1953, पुनर्मुद्रण]. जे. एस. मिल रिकार्डोंच्या स्थिरावस्था सिद्धान्ताचे समर्थन करतात. त्यांचे म्हणणे असे की, संपत्तीची वाढ असीमित नसते आणि (आर्थिक) विकासाच्या प्रगत अवस्थेच्या मार्गावरील प्रत्येक पाऊल स्थिरावस्थेच्या दिशेनेही पडत असते [मिल, 1857].

माल्थस, रिकार्डो, मिल आदींच्या अभिमत सिद्धान्तानंतरच्या शंभर वर्षांत काही नवीन लोकसंख्या सिद्धान्त मांडण्यात आले; उदाहरणार्थ, इष्टतम लोक–संख्या सिद्धान्त, निव्वळ प्रजनन सिद्धान्त, जीवशास्त्रीय सिद्धान्त वगैरे. पण त्यांचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. जाताजाता या संदर्भात तिसऱ्या दशकातील मंदीची प्रतिक्रिया म्हणून का होईना काही प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांच्या मतात जे 'घुमजाव' परिवर्तन झाले त्याचा उल्लेख करावासा वाटतो. केन्स (1937), हॅन्सन (1939) आणि हिक्स (1939) यांनी असे प्रतिपादन केले की, लोकसंख्येच्या धीम्या वाढीमुळे एकत्रित मागणीत अपुरे प्रसरण होते आणि त्यामुळे आर्थिक मंदीच्या निर्मितीस आणि ती दीर्घकाळ

टिकण्यास मदत होते. हिक्सनी तर असेही म्हटले की, गेल्या 200 वर्षांत झालेल्या भरमसाठ लोकसंख्या वाढीमुळे औद्योगिक क्रान्तीला भरपूर चालना मिळाली आणि म्हणून लोकसंख्या वाढ हे एक वरदानच होय. या अर्थशास्त्रज्ञांनी अभिमत सिद्धान्तातील लोकसंख्या वाढीच्या प्रतिकूल पुरवठा बाजूला आव्हान दिले आणि लोकसंख्येच्या अनुकूल मागणी बाजूवर जोर दिला. पण हे आव्हान फार काळ टिकले नाही. केन्सनी नंतरच्या आपल्या लिखाणात मतपरिवर्तन केलेले दिसून आले.

एवंच लोकसंख्या वाढीचे समर्थन करणारे काही अगदी तुरळक अपवाद सोडले तर संपूर्ण एकोणिसाव्या शतकात आणि विसाव्या शतकातील पहिल्या सहासात दशकांत अभिमत संप्रदायाच्या लोकसंख्या वाढीच्या प्रतिकूल विचारसरणीचाच प्रभाव टिकून असलेला दिसतो. लोकसंख्या वाढ ही आर्थिक अभिवृद्धीला घातक असल्याचे सर्वत्र मान्य झाल्याचे दिसते.

## 2.2 नवमाल्थसवाद

लोकसंख्या संक्रमण[7] सिद्धान्त विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकाच्या मध्यास प्रसिद्ध झाला आणि त्वरित मान्यता पावला. जनन दर आणि सामाजिक–आर्थिक घटकांचे परस्पर संबंध प्रस्थापित करणारा एकात्मीकृत सिद्धान्त म्हणून त्याची प्रसिद्धी झाली. या सिद्धान्तानुसार शेतीप्रधान समाजात असलेले जन्ममृत्यूचे उच्च दर देशात उद्योगीकरणाच्या वाटचालीबरोबर हळूहळू कमी होत जातात; प्रथम मृत्यू दरात जलद घट होते परंतु जन्म दर उच्च राहतो आणि त्यामुळे लोकसंख्या वाढीचा एक कालखंड त्या समाजात अनुभवाला येतो. पश्चिमी राष्ट्रांच्या आजच्या प्रगत औद्योगिक समाजाच्या उद्योगीकरणाच्या प्रारंभीच्या काळातील जनन दर आणि सामाजिक–आर्थिक घटक यांच्या अनुभवनिष्ठ परस्पर संबंधाच्या आधारावर हा सिद्धान्त उभारला गेला होता. परंतु ज्या न्यून विकसित देशांत चालू शतकाच्या सातव्या व आठव्या दशकात लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर दोन ते अडीच टक्क्यां–पर्यंत पोहोचला होता तेथे झालेल्या लोकसंख्या प्रस्फो–टाची समाधानकारक कारणमीमांसा या सिद्धान्ताद्वारे करता आली नाही. प्रगत देशांत लोकसंख्याविषयक फेरफार होण्याआधी जलद उद्योगीकरणाला सुरुवात झाली होती आणि त्यामुळे उद्योगीकरणाने लोकसंख्या–विषयक बदल घडून येतात असे मानण्यास भक्कम आधार मिळाला. आजच्या न्यून विकसित देशांतील परिस्थिती अगदी भिन्न आहे. या देशांत लोकसंख्या–विषयक फेरफार झाल्याशिवाय, वाढीचा दर कमी झाल्याशिवाय, जलद आर्थिक प्रगती होण्याची शक्यता नाही असे मानणारा मोठा समुदाय आहे. न्यून विकसित देशांतील लोकसंख्याविषयक परिस्थिती लक्षात न घेतल्याचा आरोप संक्रमणाच्या सिद्धान्तावर केला जातो. आजच्या प्रगत देशांत प्रगतीपूर्वीच्या काळातील लोकसंख्याविषयक घटकांची (जन्म–मृत्यू दर, अव–लंबन गुणोत्तर, बालमृत्यू दर, स्त्रियांचे प्रमाण वगैरे) परिस्थिती आणि आजच्या न्यून विकसित देशांतील परिस्थिती अगदी भिन्न आहे असे निष्कर्ष अनुभवनिष्ठ अभ्यासावरून काढण्यात आले आहेत [नारायण, 1984]. न्यून विकसित देशांतील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती अगदी भिन्न आहे याची जाणीव हा सिद्धान्त मांडताना ठेवण्यात आली नाही.[8] पुढे 1967 मध्ये नवमाल्थसवाद्यांनी एक नवे प्रतिमान पुढे आणले. [पॅडलॉक बंधू, 1967]. त्यांच्या वैद्यकीय चाचणी प्रतिमानानुसार चालू शतकाच्या सातव्या–आठव्या दशकात जागतिक अन्न तुटवडा इतका वाढणार होता की, जगातील दारिद्र्याने गांजलेले काही समाज नष्ट होण्याची शक्यता होती आणि म्हणून अमेरिके–सारख्या देशाने आपल्या अतिरिक्त अन्नधान्याचे वाटप करताना वैद्यकीय चाचणी प्रमेय वापरावयास हवे असे सुचविण्यात आले. जे देश किंवा समाज 'वाचण्याची शक्यता नाही' अशांना चक्क नष्ट होऊ द्यावे असा या प्रमेयाचा संदेश होता.[9]

वाचू न शकणाऱ्या या देशांच्या यादीत भारताचा समावेश होता. "जर आपण (अमेरिकेने) भारताला अन्न पुरवठा बंद केला तर आपणावर विश्वासू मित्र गमावण्याची पाळी यावयाची नाही; आणि आपणाला इजा करू शकेल असा प्रबळ शत्रूही निर्माण होणार नाही," असे विधान हे प्रतिमान रचणाऱ्यांनी केले. आज नवव्या दशकात भारत अन्न पुरवठ्याबाबत जवळपास स्वयंपूर्ण आहे हे लक्षात घेता असे सर्वनाशी प्रतिमान रचणाऱ्यांनी शेती उत्पादनातील तंत्रविज्ञा–नाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेकडे पूर्ण दुर्लक्ष केले असेच म्हणावे लागेल. अलीकडे भारतात झालेल्या हरित

क्रान्तीचे आकलन या लोकांना होऊ शकले नाही. हरित क्रान्तीमुळे अन्न तुटवड्याचे गंभीर अरिष्ट बऱ्याच न्यून विकसित देशांत टाळता आले आणि अप्रत्यक्षरित्या नवमाल्थसवाद्यांची खरडपट्टी काढली गेली.[10]

## 2.3 अभिवृद्धी मर्यादा प्रतिमान

सहाव्या व सातव्या दशकात लोकसंख्या शास्त्रज्ञ लोकसंख्या वाढीची प्रतिकूल बाजूच मांडत राहिले. घटत्या प्रत्यायाचा सिद्धान्त मुळात शेती उत्पादनाशी निगडित होता, तो आता इतर पुनःप्रापित ( renewable ) आणि अपुनःप्रापित ( non–renewable ) साधनांशी जोडण्याचा प्रयत्न झाला. या गटात दोन मुख्य प्रतिमाने होती : गतिशील जग [ फॉरेस्टर, 1971 ] आणि अभिवृद्धी मर्यादा [ क्लब ऑफ रोम, 1972 ]. खरे म्हणजे गतिशील जग प्रतिमानाचा आधार घेऊनच अभिवृद्धी मर्यादा प्रतिमान रचण्यात आले आहे. एका अतिशक्तीशाली संगणकावर हे प्रतिमान चालवून या संशोधकांनी माणसाच्या सद्य–वागणुकीचा त्याच्या भविष्यावर काय दुष्परिणाम होणार आहे याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाला उपलब्ध होणाऱ्या पर्यायांची चर्चासुद्धा या प्रतिमानात करण्यात आली आहे. त्यांचा स्थूल निष्कर्ष म्हणजे, येत्या शंभर वर्षांत जागतिक अर्थव्यवस्था संपूर्ण कोसळण्याची भीती आहे. लोकसंख्या दरात आणि आर्थिक अभिवृद्धी दरात अगदी थोड्याच काळात (एका दशकाच्या आत) आमूलाग्र बदल (घट) झाले नाहीत तर कच्च्या मालाचा आणि अन्नाचा प्रचंड तुटवडा निर्माण होऊन किंवा पर्यावरण प्रदूषणाचा अतिरेक होऊन जगाचा सर्वनाश होण्याची भीतीदायक अवस्था निर्माण होईल. लोकसंख्या वाढ आणि आर्थिक अभिवृद्धी यात समतोल राखण्यात आल्यास मानवी उन्नतीचा झरा अखंड वाहात राहील, असा आशावादही या संशोधकांनी मांडला.

जगाला पोसता येईल अशा लोकसंख्येभोवती अभिवृद्धी मर्यादा प्रतिमान घुटमळत राहाते. माणसांच्या मूलभूत गरजा भागविण्याची क्षमता भूमातेकडे आहे, पण त्यांच्या वाढत्या मागण्या पुरविणे तिला शक्य नाही असे एकंदरीत अनुमान काढता येते. वेळेवर उपाय-योजना केली नाही तर पूर्वसूचना न देता एका धडाक्याने जगाचा अंत होईल; या दिशेने हळूवार उतरण होण्याची शक्यता नाही, असे या सतरा सदस्यांच्या संशोधन गटाचे म्हणणे आहे.

'न्यूनतम गरजेपेक्षा अधिक उपभोग करा आणि कोसळून पडा' अशी मूळ विचारधारा अभिवृद्धी मर्यादा प्रतिमानामागे असावी. विसाव्या शतकातील सातव्या दशकाच्या सुरुवातीस त्या प्रतिमानाने अर्थशास्त्रज्ञ व राजकीय पुढाऱ्यांना चांगलेच घाबरवून सोडले होते. त्या दशकातील काही महत्त्वाच्या घटनांनी हे भीतीचे वातावरण अधिक गडद करण्यात हातभार लावला. या प्रतिमानाच्या प्रसारानंतर लगेचच (1972) जागतिक गव्हाच्या किमती चौपट झाल्या, कारण रशियासारखा मोठा देश खरेदी बाजारात शिरला. खनिज तेलांच्या किमती दहा पटींनी वाढल्या (1974). इटली, जपान, अमेरिकेसारख्या प्रगत देशांत रासायनिक विषबाधेच्या अनेक घटना घडल्याने पर्यावरण प्रदूषणाच्या भीतीने हे देश ग्रासले गेले. परंतु नंतरच्या काही वर्षातच या सम–स्यांवर यशस्वी मात करण्यात आली. तेलाच्या किंमत वाढीचा धक्का पचविला गेला. हरित क्रान्ती होऊन अन्नाची समस्या बऱ्याच प्रमाणात काबूत आली. योग्य योजना राबविल्यास प्रदूषणाची समस्या यशस्वीरित्या हाताळता येईल असा विश्वास निर्माण झाला. 'अधिक उपभोगा आणि कोसळून पडा' या विचारधारेने निर्माण झालेले नैराश्येचे वातावरण निवळून पुन्हा आशावादाने जय मिळविला. तंत्रविज्ञानाने होणाऱ्या आर्थिक, सामाजिक 'भरभराटी' कडे अवास्तव निराशा–वादी दृष्टीने बघणे हीच अभिवृद्धी-मर्यादा प्रतिमानाची खरी मर्यादा होय असे मानण्यात येऊ लागले. पुढील काही वर्षात अतिशय नाट्यपूर्णरित्या तंत्रविज्ञानात जी भरघोस प्रगती झाली तिचे भरघोस आकलन या संशो-धन गटाला झाले नाही, ही या प्रतिमानाची दुसरी मर्यादा. 'लांडगा आला रे आला' ची हाकाटी पुन्हा एकदा चुकीची ठरली.

सोलो [ 1973 ] यांच्या मते, मर्यादा प्रति–मानाचे लाक्षणिक निष्कर्ष सहज प्रचितीला येतील असे होते. साधनसंपत्ती मर्यादितता आणि जागतिक अर्थ–व्यवस्थेत तिचा वापर वाढत्या दराने होण्याची सार्व–त्रिक प्रवृत्ती लक्षात घेता, प्रचलित व्यवस्था कोसळून पडण्याची भीती आहे हे सांगण्यास राक्षसी शक्तीच्या

संगणकाचा वापर करण्याची गरज नव्हती.

## 2.4 लोकसंख्या वाढीचा बचत आणि नियोजनावर होणारा आघात

नवमाल्थसवादी विचारधारेपासून प्रेरणा घेऊन काही अमेरिकी लोकसंख्या शास्त्रज्ञांनी लोकसंख्या वाढीच्या बचत व नियोजनावर होणाऱ्या आघातांकडे जगाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला [ कोल आणि हूवर, 1958 ]. लोकसंख्या वाढीचे मुख्यत: तीन प्रतिकूल प्रभाव जोखण्यात आले. ते असे : (1) वाढत्या लोकसंख्येमुळे बचत वाढीला मदत मिळत नाही आणि त्यामुळे भांडवलदारांचे श्रमिकांशी असलेले गुणोत्तर घटते. (2) लोकसंख्या वाढीच्या उच्च दराचा परिणाम म्हणून अवलंबन गुणोत्तर वाढते, पर्यायाने उपभोगाचे प्रमाण वाढते आणि अंतर्गत बचत घसरते. (3) लोकसंख्येच्या जलद वाढीमुळे शिक्षण आणि आरोग्य सेवांवर होणाऱ्या सरकारी खर्चाचा बोजा वाढतो आणि पर्यायाने उत्पादक किंवा अभिवृद्धीदायक गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम होतो.

वरील प्रबंध खूपच लोकप्रिय झाला. असेही म्हणतात की, या परिकल्पनेचा अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणावर चांगलाच प्रभाव पडला. या नंतरच अमेरिकेने कुटुंबनियोजन कार्यक्रमांना आपल्या आंतरराष्ट्रीय मदत योजनेत समाविष्ट केले [ पित्री, 1973 ]. सहाव्या व सातव्या दशकातील अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी कोल आणि हूवर यांच्या प्रबंधाला अनुभवनिष्ठ संशोधनाच्या निष्कर्षांच्या आधाराने पुष्टी दिली [ झैदा, 1969 ]. घटती लोकसंख्या म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचे विभजन कमी लोकात होणे आणि दरडोई उत्पन्न वाढून श्रमिकांची गुणवत्ता वाढविण्यास पोषक स्थिती निर्माण होणे असे म्हणता येईल. सैद्धान्तिक रूपाने पाहिले तरी जननशक्ती कमी झाल्यास निदान 15 वर्षे तरी राष्ट्रीय उत्पन्न कमी होण्याचा धोका नसतो. शिवाय लोकसंख्या घट काही एकदम एकाच वर्षात होत नसते. मुलांची संख्या कमी झाल्याने खाजगी व सामाजिक उपभोगात घट होते आणि बचतीचे प्रमाण वाढून भांडवली संपत्तीचा संचय वाढतो. तसेच श्रमिकांची गुणवत्ता वाढल्याने 15–20 वर्षांनंतर होणाऱ्या श्रमघटीचे दुष्परिणाम रोखता येतात आणि राष्ट्रीय उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम टाळणे शक्य होते.

लोकसंख्या घटीने बचतीवर (आणि त्यायोगे भांडवल निर्मितीवर) होणाऱ्या इष्ट परिणामाला अवास्तव महत्त्व दिल्याचा आरोप कोल-हूवर प्रतिमानावर करण्यात आला. अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशांतील श्रमिकवर्ग बेकारी व न्यून रोजगारींच्या समस्यांनी गांजलेला असल्याने तेथे लोकसंख्या घटीचे बचतीवरील इष्ट परिणाम दिसून यावयास फार (कितीतरी दशकांचा) मोठा काल जावा लागतो. मध्यंतरीच्या कालात उपभोग खर्च वाढण्याचीच शक्यता अधिक असते. अर्धी भाकर मिळविणाऱ्या श्रमिकाला एक भाकर मिळाली तर हवीच असते, आणि एक भाकर मिळाली की दुसरीची आस निर्माण होते. सामाजिक गुंतवणुकीची तशीच परिस्थिती असते. दारिद्र्याने गांजलेल्या देशात सामाजिक सेवांचा इतका अभाव असतो की, त्यात फार मोठी वाढ करणे हेच सरकारचे प्रधान कर्तव्य ठरते. लोकसंख्या वाढीच्या भांडवल उथळीकरणावर होणाऱ्या आघाताचे परिगठन करणे कठीण आहे. हा आघात सौम्य स्वरूपाचा असावा असे पुढे मान्य झाले. तसेच सामाजिक किंवा खाजगी खर्च नेहमीच अनिष्ट असतो असेही म्हणता येणार नाही. कारण अशा खर्चाने अधिक गुणवत्ताधारक श्रमिक उत्पादन वाढीस हातभार लावू शकतो. उदाहरणार्थ, बांगला देशात मलेरिया रोगाच्या साथीवर नियंत्रण ठेवण्यात आल्याने श्रमिक अधिक सशक्त झाला आणि एकाच वर्षात भाताचे उत्पन्न 10 ते 15 टक्क्यांनी वाढले [ इस्टरली, 1967 ].

## 2.5 जागतिक बँकेचा दृष्टिकोन

न्यून विकसित देशांतील लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमात जागतिक बँकेने वेळोवेळी साहाय्य दिले आहे. त्या संस्थेचा दृष्टिकोन निराशावादी मंडळींशी मिळताजुळताच होता. निदान वर्तमान शतकाच्या सातव्या दशकापर्यंत तरी. मर्यादा प्रतिमानाच्या पाठोपाठच जागतिक बँकेचे त्यावेळचे अध्यक्ष रॉबर्ट मॅक्नमारा [ 1973 ] यांनीही वाढत्या लोकसंख्येच्या अनिष्ट आणि अपायकारी परिणामांविरुद्ध जोरदार आघाडी उघडली. त्यांनी लोकसंख्या वाढीची तुलना अणुयुद्धा–

बरोबर केली. जगातील बहुसंख्य न्यून विकसित देशांतील आर्थिक व सामाजिक प्रगतीत जलद लोकसंख्या वाढ हाच सर्वात मोठा संरोध आहे असे त्यांनी प्रभावीपणे प्रतिपादिले. वेळेवर आणि भरघोस उपाय केले नाहीत तर अणुयुद्धाइतकाच जगबुडीचा धोका अनावर लोकसंख्या वाढीच्या दबावाने निर्माण होऊ शकेल याकडे त्यांनी लक्ष वेधले. वीस वर्षांनंतर राजीव गांधी स्मृती व्याख्यानमालेचे पहिले भाषण देताना मॅक्नमारा यांनी नवी दिल्ली येथे मे 1992 मध्ये जवळपास याच आशयाचे विचार पुन्हा मांडले. लोकसंख्या नियंत्रणात भारताला जर यश आले नाही तर एकविसाव्या शतकात येथील अर्थव्यवस्था आणि सामाजिक घडी पूर्णपणे विस्कटण्याची दाट शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

## 2.6 प्रदूषणाचे अरिष्ट

जलद लोकसंख्यावाढीने पर्यावरणातील समतोल बिघडून प्रदूषणाचे धोके निर्माण होतात असे आता बहुतांश लोकांनी मान्य केले आहे. पर्यावरण संतुलन जतन करण्यासाठी आणि प्रदूषण होऊ न देण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग अधिक शहाणपणाने व्हावयास हवा, या भूमिकेला आता जागतिक मान्यता प्राप्त झालेली आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते मात्र पर्यावरण असंतुलन आणि प्रदूषणाचे दुष्परिणाम हे लोकसंख्या वाढीमुळे होत नसून साधनसंपत्ती व्यवस्थापनाची चुकीची नीती हेच त्यांचे मुख्य कारण होय. पर्यावरणविषयक समस्या हे जलद लोकसंख्या वाढत असलेल्या काही न्यून विकसित देशांचे वैशिष्ट्य आहे अशातलाही भाग नव्हे. गेली कित्येक दशके लोकसंख्या-वाढीचा ऱ्हास झालेल्या विकसित देशांतही या समस्या उद्‌भवतातच. उलट असेही पाहण्यात आले आहे की, प्रदूषणाचे काही भयंकर प्रकार अत्युच्च उत्पन्न आणि जीवनमान असलेल्या समाजाशी निगडित असतात. आंतरराष्ट्रीय पर्यावरण व विकास संस्था [1986], सायमन कान [1984] यांच्या मते साधन संपत्तीच्या विनियोगाचे नियमन करण्यासाठी आवश्यक संस्थात्मक यंत्रणेचा अभाव किंवा अपुरेपणा हे पर्यावरण असंतुलन व प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे.

## 2.7 नागरी झोपडपट्ट्या

मोठाल्या शहरातून फार झपाट्याने निर्माण होणाऱ्या आणि सतत वाढणाऱ्या झोपडपट्टी समस्येकडे लक्ष वेधून लोकसंख्याविषयक प्रतिकूल विचारांचे विवेचन आवरते घेऊ या. जलद लोकसंख्या वाढीमुळे नागरी जीवनात पूर्णपणे अनावर असणारे नवे आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. न्यून विकसित देशांत शहरांचा आकार पूर्वी कधीही व कोठेही अनुभवात नसल्याइतका वाढत आहे. जागतिक बँकेच्या [1984] अहवालात असे म्हटले आहे की, नागरी लोकसंख्येचे प्रमाण गेल्या तीस वर्षांत दोन टक्क्यांपासून 14 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. या लोकसंख्येचा वार्षिक वाढीचा दर 15 टक्क्यांहून अधिक झाला आहे. सन 2000 दरम्यान जगातील सर्वात मोठी शहरे, मेक्सिको आणि साओपावलो, ही न्यून विकसित देशांतच असणार आहेत. 1950 मध्ये जगातील सर्वात अधिक लोकसंख्येचे शहर लंडन होते. आता त्याचा क्रमांक पहिल्या 25 मोठ्या शहरातही लागण्याची शक्यता नाही. न्यून विकसित देशांत नागरी लोकसंख्या वाढीत 40 टक्के वाढ ग्रामीण भागातून होणाऱ्या श्रमिकांच्या स्थलांतरामुळे होते असे सिद्ध झाले आहे. ही स्थलांतरित लोकसंख्या बहुधा झोपडपट्ट्यांतूनच वस्ती करते. झोपडपट्टीवासियांच्या वाढत्या संख्येमुळे नागरी जीवनाच्या आणि सोयी सुविधांच्या व्यवस्थापनाचे अपूर्व व बिकट असे प्रश्न निर्माण झाले आहेत. शहरांतील राहणीमानही त्यामुळे खालावत चालले आहे, तसेच सामाजिक, सांस्कृतिक जीवन दु:सह होत आहे.

पराकोटीचे दारिद्र्य आणि रोगराईची प्रतिके असलेल्या या नागरी झोपडपट्ट्या संघटित गुन्हेगारीची— मग ती आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय स्वरूपाची असो—आगारे बनलेली आहेत.

# 3

## लोकसंख्या वाढ : अनुकूल बाजू

लोकसंख्या अभ्यासकांची एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. माल्थसचा तो सुप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाल्यानंतरच्या दीडशेहून अधिक वर्षांत साऱ्या जगा—

तील बहुतांशी अर्थशास्त्रज्ञांनी आणि सर्व राजकीय मंडळींनी असा समज करून घेतला होता की, लोकसंख्येचा लहान आकार हेच न्यून विकसित देशांतील मागासलेपणावर औषध आहे. लोकसंख्या वाढीच्या नकारात्मक बाजूचे समर्थन करणाऱ्या बऱ्याच प्रतिमानांचा उल्लेख मी वर केलाच आहे. आश्चर्यात टाकणारी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, गेल्या दोनतीन दशकांत, आणि त्यातल्या त्यात गेल्या एक दशकात, लोकसंख्या वाढीच्या जमेच्या बाजूवर बरेच संशोधन झाले आहे आणि त्यातून एक नवी सुधारित विचारसरणी पुरस्कृत करण्यात आली आहे. लोकसंख्या वाढीच्या परिणामांचे बरेच सौम्य आणि आशावादी असे मूल्यमापन आता होत आहे. या पुनःपरीक्षित भाष्यांची प्रातिनिधिकरीत्या मांडणी अमेरिकेच्या राष्ट्रीय विज्ञान अकादमीच्या नव्या अहवालात (1986) सादर करण्यात आली आहे. आठव्या दशकापासून लोकसंख्या वाढ परिणामांच्या मूल्यमापनाचा लंबक आशावादी विचाराकडे वळतो आहे असे दिसते. या विचाराचा जोरदार पुरस्कर्ता म्हणून जुलियन सायमन [ 1977, 1981, 1986 ] यांच्याकडे बोट दाखवावे लागेल. तिसऱ्या जगातील देशांत लोकसंख्या वाढीमुळे दीर्घकालात आर्थिक अभिवृद्धीस पुष्टीच मिळेल असे मत सायमन सातत्याने मांडत आहेत. त्यांचे ' The Ultimate Resource ' (1981) हे पुस्तक तर बऱ्याच न्यून विकसित देशांत आता सुप्रस्थापित झालेल्या कुटुंबनियोजन कार्यक्रमांना आव्हान देणारे आहे असे मानण्यात येते. लोकसंख्या वाढीच्या काही अनुकूल (आशावादी) बाजू खालीलप्रमाणे आहेत.

## 3.1 अनुमापी अनुकूलता

मोठ्या लोकसंख्येच्या आकाराच्या समर्थनार्थ जे युक्तीवाद नेहमी करण्यात येतात त्यात अनुमापी अनुकूलता ( economies of scale ) हा प्रमुख मानला पाहिजे. लोकसंख्येचा आकार लहान असलेल्या देशांच्या आर्थिक प्रचालनात अनुमापी अनुकूलतेचा इष्टतम बिंदू साधता येत नाही. बहुतेक तंत्रदृष्ट्या इष्टतम ठरणाऱ्या अर्थव्यवस्था मध्यम आकाराच्या व्यवसाय संस्थांनीच व्याप्त होतात. त्यांना मोठ्या व्यवसाय संस्थांशी निगडित असलेल्या अनुमापी अनुकूलतेचा लाभ मिळत नाही. शेतीसारख्या पारंपरिक उद्योगातसुद्धा अनुमापी अनुकूलतेमुळे उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते [ बोजरप, 1981 ]. मोठ्या अर्थव्यवस्थेत उत्पादनकार्यात विशेषीकरण साधता येते, पण ती सोय लहान उद्योग व्यवसायांना उपलब्ध नसते. श्रमिकांना खास विशेषीकरणाच्या क्षेत्रात प्रशिक्षण देता येते. व्यापारी प्रचालनातसुद्धा विशेषीकरण शक्य होऊ शकते. स्टिगलर [ 1961 ] म्हणतात की, परिवहन उद्योगातही विशेषीकरणाला खूप वाव आहे. सायमन [ 1981 ] यांच्या मते, अधिक लोकसंख्येमुळे प्रश्नही अधिक निर्माण होतात, पण त्याच वेळी हे प्रश्न सोडविण्यास अधिक माणसेही उपलब्ध असतात. त्यामुळे हे प्रश्न तर सुटतातच, परंतु त्याहीपेक्षा अधिक घटत्या उत्पादनमूल्याच्या आणि कमी कमतरतेच्या स्थितीचे काही विशेष लाभही त्या अर्थव्यवस्थेला प्राप्त होतात. जेथे कच्चा माल भरपूर प्रमाणात उपलब्ध असतो, भांडवली कमतरताही असाधारण प्रमाणात नसते आणि तंत्रविज्ञान विकसित झालेले असते अशा अर्थव्यवस्थेत अनुमापी अनुकूलतेचा लाभ अधिक मिळतो असे आता मान्य झाले आहे. या गोष्टी लक्षात घेतल्या तर अनुमापी अनुकूलता ही विकसित देशांना अधिक अनुकूल आहे, असा निष्कर्ष काढावा लागेल. या संबंधात अमेरिकेचे उदाहरण नेहमी देण्यात येते.

परंतु अनुमापी अनुकूलतेचे लाभ न्यून विकसित अर्थव्यवस्थांना तितक्याच प्रमाणात उपलब्ध होऊ शकतात असे अजून निर्विवादपणे सिद्ध झालेले नाही. राष्ट्रीय संशोधन परिषदेनुसार [ 1986 ] मोठ्या लोकसंख्या आकाराचे इष्ट परिणाम तिसऱ्या जगातील देशांत यंत्रांचा अधिक वापर असलेल्या उत्पादनात फारसे दिसत नाहीत. याचे कारण म्हणजे, या अर्थव्यवस्थांत केंद्रीकरणाची प्रवृत्ती फार मोठ्या प्रमाणात आढळते. म्हणजेच, निरनिराळ्या व्यवसाय संस्थांकडून विशेषीकरणावर भर देण्यात येत नाही. अद्यावत व्यवस्थापनशास्त्राचा अपुरा प्रसार हेही या मागचे कारण असू शकेल. तिसऱ्या जगातील देशांत अर्थव्यवस्था बंदिस्त नसतील तर आंतरदेशीय व्यापारामधूनही मोठ्या लोकसंख्येच्या आकाराचे लाभ मिळू शकतात. तसेच अनुमापी अनुकूलतेचा फायदा मिळण्यासाठी भांडवल श्रमिक गुणोत्तर मोठे असावे लागते. पण असे उद्योग न्यून विकसित देशात समुचित ठरत नाहीत.

## 3.2 वैयक्तिक आणि कौटुंबिक प्रेरणा

वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रेरणेवर पडणारा सुयोग्य प्रभाव हा मोठ्या लोकसंख्यांच्या समर्थनार्थ सांगितला जाणारा आणखी एक महत्त्वाचा युक्तिवाद. त्यानुसार अधिक मुले झाल्यावर पालकांचा भर अधिक परिश्रम करून उत्पन्न वाढविण्याकडे असतो. त्यामुळे राहणीमान निदान खालावण्याला तरी आळा बसू शकतो. ज्या कुटुंबातून मुलांची संख्या जास्त असते आणि प्रत्येक नव्या जन्माबरोबर उपलब्ध असलेल्या उपभोग्य वस्तूंचा दरडोई वाटा कमी होतो, अशा कुटुंबातल्या मुलांत मोठे झाल्यावर अधिक श्रम करून उत्पन्न वाढविण्याकडे मानसिक कल निर्माण होतो. हा युक्तीवाद तसा अजोड वाटतो. परंतु त्याचा प्रभाव सर्वत्र सारखाच नसतो. सामाजिक–सांस्कृतिक परिस्थिती, संस्थात्मक चौकट आणि वर्तन–रीती यांच्यावर तो बराचसा अवलंबून असतो. क्लॉसन [ 1984 ] म्हणतात की, लोकसंख्येच्या वाढत्या दबावा-मुळे चीन, बांगला देश, इंडोनेशिया आणि आफ्रिकेतील काही देशांत लोकांना अधिक श्रम करण्यास उद्युक्त केले आहे आणि शेतीसारख्या पारंपरिक धंद्यातसुद्धा सीमांतिक भूमीधारणा क्षेत्रात लक्षणीय उत्पन्न वाढ झालेली दिसून आली आहे.

## 3.3 तंत्रविज्ञानविषयक वाढ

लोकसंख्या दबावामुळे अधिक श्रम करण्यास प्रोत्साहन मिळते. तसेच व्यक्तींना आणि कुटुंबांना नवी माहिती शोधून आणि अधिक भांडवल जमवून उत्पादनाचे नवे मार्ग शोधून काढण्यास प्रेरणाही मिळते. यामुळे एका विशिष्ट वेळी ज्या सर्वांत चांगल्या व कार्य-दक्ष उत्पादनपद्धती उपलब्ध असतात त्यांचाच वापर केला जातो, या अर्थशास्त्रातील प्रमाणित गृहितांबद्दल शंका वाटू लागते. लायबेनस्टाईन [ 1971 ] यांच्या मते जितके परिश्रम करण्याची माणसाची क्षमता असते तितके परिश्रम बहुधा तो करत नाही, तसेच नवीन मार्गांचा वा माहितीचा शोध घेऊन उत्पादकता वाढ–विण्याची पूर्ण क्षमताही उपयोगात आणली जात नाही. हरित क्रान्तीसाठी ज्या अधिक प्रगत तंत्रविज्ञानाचा उपयोग करावा लागला त्यासाठी श्रमाचे एकमानही वाढवावे लागले. याचाच अर्थ असा की श्रमिकांना आरामाचा त्याग करणे भाग पडले [ बोजरप, 1965 ] आशिया खंडातील बहुतेक देशांत लोकसंख्या वाढीच्या दबावाखाली शेतीसारख्या पुरातन उद्योगात तंत्रविज्ञान आत्मसात करण्याची चळवळच सुरू झाली आणि त्यामुळे शेती उत्पादनात ऐतिहासिक अशी भर पडली. परंतु हेही तितकेच खरे की, संस्थात्मक चौकट व सर–कारी धोरणे अशा चळवळींना पोषक असावयास हवी. ज्या अर्थव्यवस्थांत भूधारण पद्धती, जलसिंचन व्यव–स्थापन, पतपुरवठा संस्था इत्यादी समाधानकारक व कार्यक्षम असतात तेथेच नवतंत्रविज्ञानाचे फायदे पूर्णपणे मिळविता येतात. बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशक औषधे आदींची वितरण व्यवस्थाही नवीन तंत्रविज्ञान आत्मसात करण्यास प्रभावी असावी लागते. जलसिंचन, रस्ते व संशोधन आणि विकास कार्यक्रमात सरकारने भरपूर गुंतवणूक करावयास हवी. हेही मान्य करावे लागेल की, नवीन तंत्रविज्ञानाचा पूर्ण लाभ मिळविण्या–साठी संस्थात्मक सुधारणांची प्रभावी मागणी बऱ्याच न्यून विकसित देशांत होत आहे [ हयामी आणि रतन, 1987 ]. त्याचवेळी मोठ्या अर्थव्यवस्थांत (उदाहरणार्थ, भारत) लोकसंख्या वाढीच्या दबावामुळे भूधारणाविषयक सुधारणा होण्याऐवजी भू–विखंडनच झालेले आढळून येते. याबाबत अधिक संशोधन करण्याची गरज आहे. ते फार मोठ्या प्रमाणात आणि अनुभवनिष्ठ सांख्यि–कीय आधारावरच झाले पाहिजे.

## 3.4 वयोमान आणि लोकसंख्या गुणवत्ता

बहुतेक सर्व विकसनशील देशांतील लोकसंख्येची वयोगटानुसार संरचना पाहिली तर त्यामध्ये तरुणांचे प्रमाण उल्लेखनीय आढळते. तरुण माणूस अभिवृत्ती, क्षमता, अभिप्रेरणा वगैरे बाबतीत वयस्कां–पेक्षा मानसिकदृष्ट्या अधिक सुसज्ज असतो असे मानतात. अशा अर्थव्यवस्थांत कमी अनुकूल क्षमता असलेल्या लोकसंख्येऐवजी अधिक क्षमतेच्या लोक–संख्येचे पुनःस्थापन जलद दराने घडते. लायबेनस्टाईन [ 1976 ] याला 'गुणवत्ता पुनःस्थापना दर' म्हणतात. गुणवत्ता पुनःस्थापना दराची कल्पना मान्य झाली तरी लोकसंख्या गुणवत्ता बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तरुण पिढी अधिक शिक्षित, प्रशिक्षित व निरोगी असेल तरच गुणवत्ता ही उत्पादन वाढीची गुरुकिल्ली

म्हणता येईल. शुल्ट्झ [1881] यांच्या मतानुसार गरीब जनतेच्या कल्याण स्तरात सुधारणा होण्यासाठी ज्या निर्णायक घटकांची आवश्यकता असते ते (अंतराळ, ऊर्जा किंवा शेतजमीन) महत्त्वाचे नसून लोकसंख्या, गुणवत्ता आणि ज्ञानसाधना हेच मुख्य घटक असतात. मानवी साधनशक्ती सुधारण्यासाठी जी गुंतवणूक समाज वा सरकार करतात आणि त्यामुळे लोकसंख्या गुणवत्तेत जी वाढ होते त्यावरच अभिवृद्धी अवलंबून असते. सक्रीय मानवी साधनसंपत्ती ही काही फक्त शिक्षित, प्रशिक्षित किंवा निरोगी लोकांनीच बनत नसते. तिच्यामध्ये उपक्रमी, नवप्रवर्तक, गतिमान आणि कल्पक लोकांचा भरणा असल्याशिवाय नवीन आर्थिक कृतिशीलता निर्माण होत नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने जी नेत्रदीपक प्रगती केली आहे तिच्यामागे जपानी लोकसंख्येची गुणवत्ता हेच मुख्य कारण होते हे लक्षात घ्यावयास हवे.

जगातील निरनिराळ्या देशांतील श्रमिकांच्या गुणवत्तेच्या स्तराची कक्षा फार रुंद आहे. त्यामुळे मानवी साधनशक्ती सर्वत्र एकसमान नसते आणि तिची प्रभावी भूमिका त्या त्या देशातील सामाजिक शिस्त, वातावरण व व्यवस्थापन पद्धतीवर अवलंबून राहाते. विकसनशील देशांत विशिष्ट कालखंडात मानव साधन–शक्तीची गुणवत्ता कितपत वाढू शकते हा विचार करण्याजोगा मुद्दा आहे. उदाहरणार्थ, भारतात लोक–संख्येच्या भरमसाठ वाढीमुळे गुणवत्ता वाढीकडे हवे तेवढे लक्ष देता येत नाही हे सत्य आहे. भारतातील उच्च शिक्षणाची सद्यःस्थिती एकंदरीने पाहता निराशा–जनकच आहे. खालावत जाणारी गुणवत्ता, दर्जाहीन प्रशिक्षण व्यवस्था आणि घसरती मानके हे आजच्या विद्यापीठीय शिक्षणाचे गुणधर्म झाल्याचे दिसते. या विद्यापीठांतून बेशिस्त, दिशाहीन आणि निम्नस्तरीय कौशल्ये मिळविलेल्या तरुणांची श्रमबाजारात मोठ्या प्रमाणावर भर टाकली जात आहे. त्यामुळे आर्थिक क्रान्ती वगैरेची आशा करणे व्यर्थच आहे. नावापुरती (ज्ञानासाठी नव्हे) पदवी मिळविण्याचे सामाजिक वेड इतके वाढले आहे की, विद्यापीठांतून अयोग्य व अपात्र विद्यार्थ्यांचाच भरणा वाढता राहून गुणी व पात्र विद्या-र्थ्यांची कुचंबणाच त्यामुळे अटळ झाली आहे. उच्च शिक्षणसंस्थांत सतत वाढ होत असूनही लोकसंख्या प्रस्फोटामुळे त्या अपुऱ्याच असतात आणि त्यामुळे गुणवत्ता हे पहिले भक्ष्य ठरते. परंतु उच्च गुणवत्ता असल्याशिवाय नवप्रवर्तन आणि नवसंशोधन शक्य नसते हे विसरून चालणार नाही. सायमन [1981] यांच्या म्हणण्या–नुसार प्रगतीचे अंतिम साधन मानवी कल्पकता, ज्ञान व चैतन्य हेच आहे. पूर्ण मुभा दिल्यास मानवी साधन–शक्तीद्वारे इतर सर्व साधनांचा अभाव भरून काढता येणे शक्य आहे. साधनसामग्रीच्या नवीन साठ्यांचा शोध आणि उत्पादनाच्या नवीन पद्धती व साधनांचा किफायतशीर वापर गुणवत्ता असलेल्या मानवशक्ती–द्वाराच होणे शक्य असते. ज्या देशांत उपक्रमशीलता, संघटनशक्ती, नवप्रवर्तने, व्यवस्थापनाच्या नव्या पद्धती, तंत्रविज्ञानाचा विकास यांच्या वाढीचा दर लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अधिक जलद असतो, त्या देशांच्या संदर्भात लोकसंख्या प्रस्फोट हा केवळ एक शब्दप्रयोगच होऊन राहातो.

## 3.5 साधनसंपत्तीचा अभाव ?

लोकसंख्या वाढीवर आळा घालण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करणारे साधनसंपत्तीचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण सांगतात. परंतु आशावाद्यांना हे कारण पटत नाही. त्यांच्या मते जगात साधनसंपत्तीची कमतरता नाही. अपुनरुत्पादनक्षम (non–reproducible) साधनसंपत्तीच्या उपलब्धीचे चुकीचे अनु–मान हाच मर्यादा प्रतिमानाचा मूलभूत दोष होता. नंतरच्या आर्थिक संशोधकांच्या मते जगात आज ज्ञात असलेल्या अपुनरुत्पादनक्षम साधनसंपत्तीच्या साठ्यांच्या 50 ते 100 पटीने अधिक साठे उपलब्ध आहेत [नारायण, 1984]. साधनसंपत्तीची परिकल्पनाच मुळी गतिशीलतेवर अवलंबून आहे. संशोधन सुविधा, तंत्रविषयक विज्ञानाची प्रगती, साधनसंपत्तीच्या पर्याय–नाच्या क्षमतेचा विकास, साधनसंपत्ती संवर्धन योजना अशा जमेच्या बाजू वर्धिष्णू असल्या तर जगात साधन–संपत्तीचा कधीही अभाव भासणार नाही. जागतिक साधनसंपत्तीबाबत आपले ज्ञान फारच तोकडे आहे. हरमन कान आणि इतर [1983] भविष्यवाद्यांच्या मते जगात इतकी अफाट साधनसंपत्ती आहे की, जगा–तील परमोच्च लोकसंख्येला (1,500 ते 2,000 कोटी) ती येत्या कितीतरी शतकांना पुरून उरेल. सागरी औष्णिक ऊर्जा संवर्धक (OTEC) द्वारे होऊ शकणारी वीज निर्मितीक्षमता संपूर्ण मानव जातीला सन 2000

मध्ये लागणाऱ्या विजेपेक्षा 200 पटींनी अधिक आहे [ राव, 1983 ]. निरनिराळ्या खनिजांचे आणि रासायनिक संपत्तीचे अगणित साठे सागरात दडून आहेत. नुसत्या अल्प खनिज गोलांचे सागरी साठे 1.7 दशलक्ष संख्येच्या घनफळाइतके ( trillion ) टन असावेत असे अनुमान राव काढातात. विनाशवादाच्या दूतांना जगातील साधनसंपत्तीचा आणि मानवाच्या शोध व संशोधन शक्तीचा आवाकाच लक्षात आलेला नाही. अन्न, ऊर्जा, आणि खनिज निर्मितीची सागरी क्षमता अक्षरशः असीमित असून ती मानवाच्या कल्याणासाठी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी जगातील सागरी वैज्ञानिक आणि तंत्रविज्ञान विशेषज्ञ व संशोधक हळूहळू स्वीकारत आहेत [ राज मोहन, 1989 ] असा दावा ही भूमिका मांडणाऱ्यांकडून केला जात आहे.

### 3.6 जागेची विपुलता

जागेची किंवा अवकाशाची कमतरता ही कल्पनाच काहींना मान्य नाही. येत्या 100 वर्षांत कृत्रिम अवकाश वसाहती निर्माण होऊन माणसाला पृथ्वीवरच नव्हे तर अवकाशातसुद्धा अत्यंत सधन जीवन जगता येणे शक्य आहे [ ओनील, 1981 ]. तसेच निकटच्या भविष्यात सागरी वसाहतींची शक्यताही नाकारता येत नाही. अवकाश आणि सागरी वसाहतींची कल्पना जरी जनसामान्यांना मान्य झाली तरी भांडवलाचा अभाव असलेल्या न्यून विकसित अतिभांडवल घन प्रकल्पांचा कितपत लाभ मिळू शकेल ही शंकाच आहे.

## 4

## अपूर्ण ज्ञानावस्था

लोकसंख्या वाढीच्या प्रतिकूल आणि अनुकूल अशा दोन्ही बाजूंचा विचार केल्यावर आपण कुठल्या निष्कर्षावर येतो ? या दोहोंपैकी कुठला युक्तीवाद वा विचारसरणी न्यून विकसित देशांना ( विशेषतः भारताला ) लागू पडण्यासारखा आहे ?

सैद्धान्तिकरित्या कुठल्याही एका विचारसरणीचा उपयोग जीवनमानाविषयीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी होऊ शकतो. गेल्या शंभर वर्षांचा इतिहास विचारात घेता असे दिसून येईल की, कुठल्याही एका बाजूचा पुरस्कार सर्वत्र लागू करता येत नाही. आजच्या न्यून विकसित देशांसाठीसुद्धा एक निश्चित अशा धोरणाचा विचार करता येणे कठीण आहे. न्यून विकसित देशांतील परिस्थिती भिन्न भिन्न प्रकारची आहे. एकंदरित लोकसंख्या वाढ आणि आर्थिक अभिवृद्धी यांच्या परस्पर संबंधावरील अनुभवनिष्ठ माहिती अपुरी आहे. यासंबंधी ज्ञान अपूर्ण आहे. उच्च दराची आर्थिक अभिवृद्धी दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत, म्हणजे जिथे लोकसंख्या वाढीचा दर अधिक आहे आणि जिथे तो कमी आहे अशा देशांत, झालेली आढळते. या उलट अवस्थाही पाहण्यात येते. लोकसंख्याविषयक सिद्धान्त व सर्वेक्षणे कुठल्याही एका निष्कर्षाशी पोहोचत नाहीत. अजून प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मोठ्या प्रमाणावर संशोधन व्हावयास हवे आणि या संशोधनात अविकसित देशांना मोठ्या संख्येने भाग घ्यावयास हवा. संयुक्त राष्ट्रांसारख्या किंवा जागतिक बँकेसारख्या संस्थेने यात पुढाकार घ्यावयास हवा.

वरील सर्व निरीक्षणे जरी खरी असली तरी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती अशी की, लोकसंख्या वाढ दर कमी किंवा अधिक झाल्यास तिचा परिणाम दरडोई उत्पन्नावर झाल्याशिवाय राहणार नाही. स्थूल मानाने असे म्हणता येईल की, ज्या अर्थव्यवस्थांत कसण्यालायक जमिनीचा आणि जलसिंचन साधनांचा खास अभाव असतो, जमिनीचे आणि इतर नैसर्गिक साधनांचे मालकी हक्क सुप्रस्थापित झालेले नसतात आणि जेथे सरकारी धोरणे श्रमिक वर्गाला फारशी प्रोत्साहनकारी नसतात तेथे लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम अधिक तीव्रतेने जाणवतात. उलट अनुमापी अनुकूलतेची शक्यता अधिक असलेल्या आणि साधनसंपत्तीचे वाटप समन्यायी व कार्यक्षम असलेल्या देशात लोकसंख्या वाढीचे प्रभाव आर्थिक अभिवृद्धीच्या प्रयत्नांना प्रेरक व पूरक असतात [ केली, 1986 ]. अर्थात असे निष्कर्ष हे फक्त दिशा निर्देशक किंवा गुणात्मक स्वरूपाचे आहेत. त्यांना संख्यात्मक अनुमानांचा ठोस आधार नाही.

अर्थशास्त्रज्ञात या विषयावर बरेच मतभेद असल्याचे दिसून आले असले तरी 1970 ते 80 या काल—

खंडातील संशोधकांचा कल मात्र लोकसंख्या वाढीच्या दरात घट झाल्यास आर्थिक अभिवृद्धी वाढते अशा विचारसरणीकडे झुकलेला दिसतो. विशेषतः न्यून विकसित देशांच्या बाबतीत हे अधिक प्रभावीपणे लागू पडते. अमेरिकेच्या राष्ट्रीय विज्ञान अकादमीने नेमलेल्या लोकसंख्या वाढ आणि आर्थिक अभिवृद्धीसंबंधीच्या एका कार्यकारी समूहाने आपल्या अहवालात [1986] त्याच गोष्टीवर भर दिला आहे. न्यून विकसित देशांच्या आर्थिक अभिवृद्धीसाठी लोकसंख्या दरात कपात करणे आवश्यक आहे अशी शिफारस या अहवालात केली गेली आहे. जागतिक बँकेचे अध्यक्ष ए. डब्ल्यू. क्लॉझनही 1984 च्या आपल्या अहवालात म्हणतात की, लोक–संख्यावाढीचे परिणाम फार भिन्न प्रकारचे असू शकतात. कारण ते संस्थात्मक, आर्थिक, सांस्कृतिक व लोकसंख्या-विषयक परिस्थितीवर अवलंबून असतात. तरी पण उपलब्ध पुराव्यांच्या आधारे असे म्हणता येईल की, न्यून विकसित देशांत लोकसंख्या वाढीचा उच्च दर विकास गती मंदावण्यास कारणीभूत असतो. या अह–वालात असेही म्हटले आहे की, दोन टक्क्यांहून अधिक लोकसंख्या वाढीचा दर विकासाला संरोधक असतो.

अनुभवनिष्ठ सांख्यिकीय पुराव्यांच्या अभावामुळे फक्त मार्ग निर्देशक गुणात्मक मूल्यांकनच शक्य आहे हे मान्य करूनही लोकसंख्या वाढीवर निर्बंध घालण्याचे जे धोरण भारतासारख्या न्युन विकसित आणि मोठ्या आकाराच्या अर्थव्यवस्थेने स्वीकारले आहे त्याच्या उपयुक्ततेविषयी शंका येण्याचे कारण नसावे असे मला वाटते. गेल्या दशकात आपल्या लोकसंख्यावाढीचा वार्षिक दर दोनाहून अधिक आहे. आपली श्रम–कार्य–क्षमता फार कमी पातळीची आहे आणि आपल्या विकास कार्यक्रमातील वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर (ICOR) सारखे वाढतच आहे. अशा परिस्थितीत लोकसंख्या वाढीवर आळा घालण्याचा विचार आपणास करावयास हवा.

## 5

## भारतातील परिस्थिती

या विभागात भारतातील लोकसंख्या, तिचा आकार आणि वाढीचा दर यांच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा विचार करण्यात आला आहे. विसाव्या शतकाच्या आठव्या दशकात भारतातील लोकसंख्येत 16.1 कोटी लोकांची भर पडली. या शत–काच्या शेवटी भारताची लोकसंख्या एक अब्ज होईल यात मुळीच शंका नाही. लोकसंख्येचा आकार मोठा आहेच, पण वाढीचा दरही 2 टक्क्यांहून अधिक आहे. मोठ्या लोकसंख्येमुळे उत्पादनात अनुमापी अनुकूलता साध्य करणे शक्य असते. परंतु त्यासाठी काही आर्थिक गृहिते कार्यान्वित व्हावयास हवीत; उदाहरणार्थ, बाजा-रांची वृद्धी, सूक्ष्म श्रमविभागणी, औद्योगिक कार्यक्षमता इत्यादी. आज प्रगत असलेल्या देशांच्या विकासाच्या काळात ही गृहिते लागू झाली होती. भारताच्या आजच्या परिस्थितीत ती लागू होणे शक्य वाटत नाही. वाढत्या लोकसंख्येला प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक अशी उत्पादन–मत्ता पुरविण्यासाठी आणि नवप्रवर्तने कार्यान्वित करण्यासाठी जे फार मोठ्या प्रमाणावर भांडवल आवश्यक असते तेच आज उपलब्ध नाही. प्रगत देशांच्या विकासाच्या प्रारंभीच्या काळात तेथील श्रमिकांच्या तुलनेत आपला श्रमिकवर्ग सर्वच बाबतीत मागे आहे. निरक्षर आणि अकुशल मजूरवर्गाचा भरणा आजही फार मोठ्या प्रमाणावर आहे. कुपोषणामुळे आपल्या श्रमिकवर्गाची कार्यक्षमता खुंटली आहे. या दोन्हींचा एकत्र प्रभाव उत्पादनशक्तीवर अवश्य पडतो. ग्रामीण समाजात दैववादाचा पगडा फारसा कमी झालेला नाही. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे एका माणसाला पुरेशा असणाऱ्या शेतीकामाची अनेकांत विभागणी होते. अपुरे उत्पन्न किंवा वेतन बऱ्याच लोकांत विभागले जाते. शिक्षणाचे स्तर फार उंचावल्याशिवाय आणि त्यामुळे भौतिक कल्याणाविषयीच्या प्रेरणा व प्रवृत्ती यामध्ये बदल झाल्याशिवाय या सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचा ग्रामीण उत्पादकतेवरील प्रभाव कमी होणे शक्य नाही. असा बदल घडून येण्यास कित्येक दशकांचा कालावधी जावा लागेल. भारतातील श्रमिकांच्या गुण–वत्तेचे परिगणन करणेच जिथे दुर्लभ वाटते तिथे असल्या परिगणनेवर आधारित विकास गतीचे अर्थमिती प्रतिमान वगैरे फुकटचे, अर्थहीन छंद वाटतात. केवळ मोठ्या आकाराच्या लोकसंख्येमुळे उत्पादनात अनुमापी अनुकूलता प्राप्त होते असे मानणे चुकीचे आहे. भांड–वली कमतरता आणि श्रमिकांची कमी प्रतीची गुणवत्ता या दोन गोष्टींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. प्रगत देशांच्या वाढीच्या काळातील आर्थिक प्रतिमानांची

नक्कल करून आपल्या देशाच्या आजच्या आर्थिक व्यवस्थेत लक्षणीय बदल घडवून आणता येईल असे म्हणणे चुकीचे आहे. भारतातील लोकसंख्याविषयक परिस्थिती भिन्न आहे. आपला आजचा लोकसंख्या वाढीचा दर प्रगत देशांतील प्रगतीपूर्वीच्या काळातील वाढीच्या दरापेक्षा अधिक आहे. ब्रिटन किंवा जपानच्या मानाने आपल्या लोकसंख्येचा आकार फार मोठा आहे. अमेरिका, कॅनडा किंवा ऑस्ट्रेलियाप्रमाणे आपल्या देशात निर्जन भूभागही नाहीत [सॅम्युएल, 1967]. फार मोठ्या प्रमाणावर भारतीय श्रमिकांचे स्थलांतर होणेही आता शक्य नाही. अंतराळ आणि सागरी वसाहती वगैरे आपल्यासाठी केवळ स्वप्नेच आहेत. लोकसंख्या घनता सारखी वाढतच आहे. (50 वर्षांपूर्वी घनता शंभराहून कमी होती ती आज 260 झाली आहे.) अॅन्सले कोलच्या (1963) म्हणण्यानुसार बंदिस्त अर्थव्यवस्थेत, जेथे आंतरराष्ट्रीय व्यापार विकसित नसतो तेथे, घनता घातक ठरते. भारताची अर्थव्यवस्था सैद्धान्तिकरित्या जरी खुली असली तरी आपला विदेशी व्यापार फारच सीमित आहे. मालाचा हीन दर्जा, निर्यातियोग्य मालाचे अपुरे अतिरिक्त उत्पादन, उत्पादनात विविधतेचा अभाव इत्यादी कारणांमुळे आपल्या विदेशी व्यापाराला मर्यादा पडल्या आहेत. लोकसंख्येच्या आकाराच्या मानाने तो नगण्यच आहे. स्वातंत्र्यानंतरच्या 30/40 वर्षांत संरक्षक उत्पादन आणि व्यापार नीती अंगीकारल्याने हा प्रश्न अधिकच बिकट झालेला आहे. अपारंपरिक व्यापार अगदीच मंद गतीने वाढतो आहे. विदेशी व्यापारातून वाढाव्याची स्थिती निर्माण होऊन देशातील अर्थव्यवस्थेस विदेशी चलनांचे पुरेसे मोठे साठे उभारण्यास फार मोठा काळ जावा लागणार आहे. आपला आंतरराष्ट्रीय व्यवहाराचा ताळेबंद सातत्याने आणि वाढत्या प्रमाणात प्रतिकूल राहिलेला आहे हे विसरून चालणार नाही. विदेशी मुदतसुद्धा दरडोई दराच्या हिशेबाने अत्यल्पच आहे.

भारतात परावलंबन दर नेहमीच उच्च राहिलेला आहे. प्रगत देशांच्या तुलनेत तो दुपटीहून अधिक आहे. याचे दुष्परिणाम बचतीवर आणि विनियोगावर होतात. शिवाय सामाजिक गुंतवणूकही अनुत्पादक वा कमी उत्पादक क्षेत्रात अधिक प्रमाणात करावी लागते. तरुण लोकांचे आधिक्य असलेली लोकसंख्या नवप्रवर्तन, धाडसी व्यापार वृत्ती, नवतंत्रविज्ञान वगैरे आर्थिक विकासाला आवश्यक असलेल्या बाबींकडे अधिक झुकलेली असते हे बऱ्याच देशांच्या बाबतीत खरे ठरले आहे. भारतातील काही प्रगत भागातही ते लागू झालेले दिसते. परंतु भारताच्या बहुतांश भागात, विशेषतः ग्रामीण अर्थव्यवस्थेत, तसे काही दिसून येत नाही; कारण दैववादाचा पगडा आणि हीन श्रमिक गुणवत्ता यात लक्षणीय अशी घट झालेली नाही. याशिवाय काही राजकीय प्रकारची बंधने (उदाहरणार्थ, संविधान अधिष्ठित राज्यव्यवस्था), सामाजिक बंधने ( उदाहरणार्थ, जाती व धर्मांची भिन्नता ), संचारातील अडथळे ( उदाहरणार्थ, भाषा बहुगुणत्व ) वगैरे संरोधांमुळे तारुण्यसुलभ उत्साहावर आणि औद्योगिक साहसावर फार प्रतिकूल परिणाम होतो. नागरी सुशिक्षित वर्गातही विशिष्ट समाजरचनेमुळे म्हणा किंवा धाडशी वृत्तीच्या अभावामुळे म्हणा पांढरपेशा चाकरमानी जीवनाचे जबरदस्त आकर्षण आढळते.

लोकसंख्या वाढीच्या उच्च दराने लोकसंख्येचा मोठा दबाव भारताच्या अर्थव्यवस्थेवर पडला आहे यात शंकाच नाही. या दबावाचा उत्पादनाला प्रोत्साहन देणारी शक्ती म्हणून उपयोग करून घेता येईल का याचाही विचार करावयास हवाच. लोकसंख्या दबावामुळे अर्थव्यवस्थेत प्रतिदबाव निर्माण होऊन जीवनमान वाढविण्याकडे किंवा पारंपरिक स्तरावर राखून ठेवण्याकडे लोकांची प्रवृत्ती वाढते असे हिर्शमन [1957] म्हणतात. भारतात ती परिस्थिती यावयास कितीतरी मोठा काळ लागेल हे वर सांगितले आहे. गेल्या दहापंधरा वर्षांत भारताचा आर्थिक विकास दर वधारला आहे (सरासरी वार्षिक 5 टक्के). परंतु तो लोकसंख्या दबावामुळे नसून लोकसंख्या दबाव असूनसुद्धा झाला आहे. लोकसंख्या दबावामुळे उत्पादकतेला उत्तेजन मिळण्यास जो मोठा काळ लागणार आहे त्या काळात लोकसंख्यावाढ अनिर्बंधित ठेवून भारतातील जनतेला दुःखात आणि दारिद्र्यात खितपत ठेवणे हा केवळ मूर्खपणाचा विचार आहे असेच म्हणावे लागेल. वाढत्या लोकसंख्येने उत्पादनात थोडीफार वाढ होऊ शकेल, परंतु त्यामुळे असलेल्या जीवनमानात फार बदल होणे शक्य नाही. उलट, आजच्या असमतोल अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागातील काही लोकांचे जीवनमान खालाव–

ण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणजे वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक लाभांचे विभजन दाट लोक–वस्तीच्या समाजात अतिशय क्षीण प्रमाणात होऊन दारिद्र्याचे प्रसरण होईल [ गंधे, 1988 ]. वाढत्या लोकसंख्येमुळे विकासास मदत तर होणार नाहीच उलट संरोधच निर्माण होतील.

लोकसंख्या वाढीमुळे श्रमिकांचा पुरवठा वाढतो हे खरे आहे. या वाढत्या श्रमशक्तीचा उपयोग उत्पादन वाढविण्यास करण्यासाठी श्रमिकांची गुणवत्ता वाढविणे हे अपरिहार्य असते. ती गुणवत्ता वाढविण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता असते आणि त्याचीच आपल्याकडे कमतरता आहे. शिवाय दैववादी वृत्ती, शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव आणि कुपोषणामुळे आलेली शारीरिक दुर्बलता या गोष्टी श्रमघन उत्पादकतेवर मोठा विपरित परिणाम करतात, हेही लक्षात ठेवावयास हवे. भारतात श्रम पुरवठ्याचे आधिक्य असल्यामुळे उपलब्ध कामाची अवांछनीय विभागणी केली जाते आणि दरडोई उत्पा–दकता घटते. एका माणसाच्या कामासाठी 3 ते 4 बेकार उपलब्ध असतात. भारतात श्रमिकांचा विकल्पी परिव्यय निर्वाहस्तराच्या खाली गेला आहे हे सत्य आहे [गंधे, 1988]. वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादनवाढ तर झाली नाहीच पण बेकारी आणि न्यून रोजगारीच्या समस्या मात्र अधिक बिकट झाल्या आहेत.

शेवटी लोकसंख्येच्या अवाढव्य आकारामुळे आणि उच्च वाढ दरामुळे भारतातील आर्थिक प्रगतीत फार मोठे अडथळे निर्माण झाले आहेत असे निःसंकोचपणे म्हणता येईल. श्रमिकांची गुणवत्ता ही भारताच्या आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. ही गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी लोक–संख्या आकारात फार मोठ्या प्रमाणावर घट करणे भाग आहे. भारतातील लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर सन 2000 पर्यंत 1.5 टक्का इतका आणि सन 2010 पर्यंत सुमारे एक टक्क्याच्या जवळ यावयास हवा. ही सकृतदर्शनी महत्त्वाकांक्षी लक्ष्ये कशी साध्य करता येतील ही या देशातील राजनीतिज्ञ, अर्थतज्ज्ञ व समाज-शास्त्रज्ञांची एकमेव चिंतेची बाब व्हावयाला हवी. ही लक्ष्ये साध्य झाली नाहीत तर भारतातील लोकांना एकविसाव्या शतकातही बऱ्या जीवनमानाची अपेक्षा करता येणार नाही हे विदारक सत्य आहे. घटती लोक-संख्या आणि श्रमिकांची वाढती गुणवत्ता आपल्या देशाची भविष्यकालीन आर्थिक प्रगती आणि स्थैर्याचे मूलमंत्र आहेत हेच या विवेचनाचे सार म्हणून सांगता येईल.

## संदर्भ टीपा

1 न्यून विकसित देश ही संज्ञा या लिखाणात वारंवार आली आहे. जगातील जवळजवळ 125 देशांना न्यून विकसित देश म्हणता येईल यात आफ्रिका व दक्षिण अमेरिका खंडातले सर्व देश, जपान वगळून संपूर्ण आशिया आणि ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड वगळून सागरी देश समूहातील इतर सर्व देश मोडतात. विकसित देशांत संपूर्ण उत्तर अमेरिका खंड, युरोपातील जवळजवळ सर्व देश, जपान, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड हे देश येतात.

2 बुखारेस्ट येथे 1974 मध्ये भरलेल्या तिसऱ्या जाग–तिक लोकसंख्या परिषदेनंतर, संयुक्त राष्ट्रांद्वारे जागतिक अर्थव्यवस्थेसंबंधी एक आर्थिक प्रतिमान तयार केले गेले होते. या प्रतिमानावर आधारित ‘ जागतिक अर्थव्यवस्थेचे भविष्य ’ नावाचे एक पुस्तक 1977 मध्ये प्रकाशित झाले होते. या पुस्तकात निरनिराळ्या आर्थिक चलांच्या अनुषंगाने सन 2000 मध्ये होणाऱ्या जागतिक लोकसंख्येची पाच पर्यायी प्रकल्पने दिली आहेत. ती अशी :

पी 1 – 663 कोटी
पी 2 – 649 कोटी
पी 3 – 625 कोटी
पी 4 – 598 कोटी
पी 5 – 585 कोटी

(पाहा : Wassily Leontief, P. Carter and Peter Petri, 1977, THE FUTURE OF THE WORLD ECONOMY, Oxford University Press, New York ).

3 चीन जरी न्यून विकसित देश असला तरीही त्या लोकसंख्या संक्रमण अनन्यसाधारण शीघ्रगतीने देशाने साध्य केले आहे. चीनच्या जनन आणि मृत्यू दरात

1950 नंतर लक्षणीय घटती प्रवृत्ती दिसून आली आहे. आज चीनचे ढोबळ जनन प्रमाण फक्त 2 ते 2.5 मुलांइतकेच आहे. म्हणजेच चीनचा निव्वळ प्रजनन दर एकाच्या जवळपास आहे. चीनसारख्या खंडप्राय देशासाठी हा दर आदर्शच म्हणावा लागेल. चीनचे हे लोकसंख्या विषयक अप्रतिमानी घटित लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रांनी चीनला वगळून न्यून विकसित देशांतील लोकसंख्या–विषयक आकडेवारी प्रसिद्ध केली आहे

4 1991 ची जनगणना जम्मू काश्मीरमध्ये घेण्यात आली नव्हती. भारताच्या या जनगणनेची जी आकडेवारी प्रकाशित करण्यात आली आहे तीत जम्मू-काश्मीरची प्रकल्पित आकडेवारी समाविष्ट आहे.

5 भारतीय जनगणनेतील आकडेवारीत 1991 मध्ये प्रथमच घातफल दर्शक वाढ दर वापरण्यात आला आहे. वार्षिक सरासरी घातफल दर्शक दरात लोक-संख्येची क्षणाक्षणाला होणारी वाढ गृहीत धरण्यात येते. त्यामुळे हा दर गणितश्रेढी दरापेक्षा अधिक उपयुक्त आणि सत्य परिस्थिती दर्शक मानला जातो. या पूर्वीच्या जनगणना आकडेवारीत गणित श्रेढी दरच वापरला गेला होता.

6 गेल्या 40 वर्षांत लोकसंख्या वाढ आणि आर्थिक अभिवृद्धी यांच्या पारस्परिक संबंधाविषयी बरेच संशोधन व लिखाण झालेले दिसून येते या बाबतीत पाश्चिमात्य संशोधकांची आणि अर्थविषयक लेख-कांची मक्तेदारी दिसते. भारतातील संशोधन व लिखाण बहुत करून लोकसंख्या वाढ आणि कुटुंब–नियोजनाचे पारस्परिक संबंध या विषयावर झालेले दिसते. (कदाचित आजच्या परिस्थितीत ते अपरिहार्य असावे.) माझ्या या लिखाणात मी जे लोकसंख्या वाढीच्या प्रतिकूल व अनुकूल प्रभावांचे विवेचन केले आहे त्याचा आधार पुढील प्रकाशने आहेत : केली [1988]; कोल [1991]; नारायण [1984]; कोल आणि हूवर [1958]; झायदन [1969]; सायमन [1981]; ईस्टरलीन [1967]; याशिवाय बोस आणि प्रेमी [1992] यांनी संपादन केलेले 23 परिषद शोध–निबंध आणि खान [1992] यांनी प्रकाशित केलेले 11 शोधनिबंध-निरनिराळ्या लेखकांचे-यांचाही बराच उपयोग झाला.

7 लोकसंख्या संक्रमण सिद्धान्ताचे जनकत्व अमेरिके–तील प्रिन्स्टन विद्यापीठाच्या लोकसंख्या संशोधन कार्यालयाकडे असल्याचे मानण्यात येते. गेली 40-50 वर्षे हे कार्यालय लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी संबंधावर संशोधन करीत आहे. दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळात या कार्यालयाचे संचालक नोटेस्टाईन होते. यांच्या संशोधक गटाने लोकसंख्या संक्रमण सिद्धान्त सिद्ध केला असे मानण्यात येते.

8 वरील कार्यालयाच्या पुढील पिढीतील तरुण संशोधक गटाने लोकसंख्या संक्रमण सिद्धान्ताचे सूक्ष्म पृथक्करण आणि क्रान्तिक चिकित्सा केल्यावर असे विधान मांडले की, युरोपातील लोकसंख्या वाढीची पुरेशी आणि पूर्णपणे समाधान–कारक अशी कारणमीमांसा या सिद्धान्ताने करता येत नाही. अर्थात तो अपूर्ण आहे. या तरुण संशोधक गटाने अत्यंत चिकाटीने आणि परिश्रमपूर्वक संशोधन करून, लोकसंख्या संक्रमण सिद्धान्तातील गृहिते ही अनुभवनिष्ठ निरीक्षणावर किंवा चाचणीवर आधारित नाहीत असे प्रतिपादन केले. अॅन्सले कोल त्यावेळी त्या कार्यालयाचे संचालक होते त्यांच्या या नवीन संशोधनावर आधारित 'युरोपातील जननक्षमतेचा ऱ्हास' नावाचा एक महाग्रंथ 1985 मध्ये प्रकाशित करण्यात आला. (या ग्रंथाचे उत्तम परीक्षण नी वि. सोवनी यांनी 'अर्थसंवाद'च्या जानेवारी–मार्च, 1990 च्या अंकात केले आहे.)

9 सहाव्या दशकात भारताची अन्न परिस्थिती अत्यंत विदारक होती यात शकाच नाही. तिसरी पंचवार्षिक योजना (1961–66) पूर्णपणे विफल ठरली होती. या योजनेच्या शेवटीशेवटी अन्नधान्य उत्पादनात 20 टक्के घट झाली होती. 1962 चे चीन युद्ध आणि 1965 चे पाकिस्तान युद्ध यामुळे देशाची आर्थिक घडी विस्कटली होती. नेहरूंच्या मृत्यूमुळे (1964) भारतातील जगन्मान्य असे एकमेव नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आणि त्यामुळे भारताच्या आंतर–राष्ट्रीय प्रतिमेला धक्का पोहोचला. अमेरिकेची

जहाजे भारतीय बंदरात उतरल्याप्रमाणे लागण्यास जरी विलंब झाला असता तरी बऱ्याच लोकांवर उपासमारीचा प्रसंग आला असता हे सत्य आहे. अमेरिकेने गव्हाच्या किमती पी. एल. 480 कार्यक्रमामुळे जमा झालेल्या भारतीय चलनात न घेता डॉलरमध्येच घेण्याचा आग्रह धरला असता तर त्यावेळी भारताला वाचविणे कठीण झाले असते. अशा परिस्थितीत पॅडलॉक बंधूंनी भारताची 'वाचविता न येण्याजोगी' वर्गात नोंद केली ती फारशी चूक म्हणता येणार नाही. परंतु इतर निराशावाद्यांप्रमाणे पॅडलॉक बंधूंनाही तंत्रविज्ञानाच्या शक्तीचे आकलन करता आले नाही. नंतरच्या एका दशकातच भारतीय शेती उत्पादनात आश्चर्यकारक बदल घडुन आले होते. हरित क्रान्ती भारतात येऊन पोहोचली होती.

10 हरित क्रान्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्या शेतीविषयक सुधारणा भारतात सातव्या दशकात घडून आल्या, त्यामुळे भारतीय शेती उत्पादनात लक्षणीय बदल झाले. सहाव्या दशकाच्या अखेरपर्यंत ज्या देशाला मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागत असे, तोच देश सातव्या दशकात अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण झाला. त्यानंतर मात्र मागे वळून पाहण्याची आवश्यकता भासली नाही. या विधानाच्या समर्थनार्थ खालील आकडेवारी देत आहे.

**अन्नधान्याचे उत्पादन**

(दशलक्ष टन)

| वर्ष | गहू | तांदूळ | एकूण तृणधान्ये | डाळ | एकूण अन्नधान्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1950-51 | 6.5 | 20.6 | 42.4 | 8.4 | 50.8 |
| 1960-61 | 11.1 | 34.6 | 67.3 | 12.8 | 80.1 |
| 1970-71 | 23.9 | 42.2 | 96.6 | 11.8 | 108.4 |
| 1980-81 | 36.3 | 53.3 | 119.10 | 10.6 | 129.0 |
| 1989-90 | 49.6 | 74.1 | 158 0 | 12.6 | 170 6 |
| 1990-91 | – | – | – | – | 176.0 |
| (प्राथमिक अंदाज) | | | | | |

संदर्भ : Agrawal, INDIA YEAR BOOK, 1991.

## संदर्भ सूची


1 Bose, A. and Premi N. K., (ed.) 1992., POPULATION TRANSITION IN SOUTH ASIA. (Collection of 23 international conference papers), B. R. Publishing Corporation, New Delhi.

2 Boserup, Ester, 1965, THE CONDITIONS OF AGRICULTURAL GROWTH, Chicago, Aldine.

3 Boserup, Ester, 1981, POPULATION AND TECHNOLOGICAL CHANGE, Chicago University Press.

4 Census of India, 1991, Series 1, PROVISIONAL POPULATION TOTALS, Published by A. R. Nanda, Registrar General & Census Commissioner of india (Paper I, II, and III)

5 Clausen, A. W., 1984, 'Population and Development' EASTERN ECONOMIST, April-June 1984.

6 Coale, A. J. and Hoower, E. M., 1958, POPULATION GROWTH AND ECONOMIC DEVELOPMENT IN LOW-INCOME COUNTRIES, Princeton University Press.

7 Coale, Ansley J., 1963, 'Population and Economic Development' in THE POPULATION DILEMMA, Princeton Hall.

8 Coale, A. J. and others, 1985, DECLINE IN FERTILITY IN EUROPE (Referred to by N. V. Sovani).

9 Coale, Ansley J., 1991., RE-EXAMINATION OF THIRTY YEARS OF RELATION BETWEEN POPULATION TRENDS AND ECONOMIC DEVELOPMENT IN LOW-INCOME COUNTRIES, International Population Conference Paper, New Delhi.

10 Easterlin, R A., 1967, 'Effects of Population Growth on the Economic Development of Developing Countries', THE ANNALS OF THE AMERICAN ACADEMY OF POLITICAL AND SOCIAL SCIENCE, Jan. 1967.

11 Espenshade, and Stolwitz, 1991, TECHNOLOGICAL PROSPECTS AND POPULATION TRENDS, AAAS Selected Symposium, American Association for the Advancement of Science, Washington, D C.

12 Forrester, J. W., 1971, WORLD DYNAMICS, Cambridge,. M.A. Wright-Allen.

13 Gandhe, S. K., 1988, INDIA'S POPULATION AND ECONOMIC GROWTH ( Mimeo ).

14 Hansen, Alvin H., 1939, 'Economic Progress and Declining Population Growth', AMERICAN ECONOMIC REVIEW, March 1939.

15 Hayami Y and Ruhan, V. W., 1984, 'The Green Revolution Inducement and Distribution', PAKISTAN DEVELOPMENT REVIEW.

16 Hicks, John R., 1939, VALUE AND CAPITAL, Claredon, Oxord.

17 Hirschman, A. O., 1958, THE STRATEGY OF ECONOMIC DEVELOPMENT, Yale.

18 Kahn, Herman, William Brown & Icon Dartel, 1983, 'Man and Ocean : Resources and Development', Indian Science Congress, Tirupati.

19 Kelley, Allen C., 1988, 'Economic Conseqences of Population Change in the Third World.' JOURNAL OF ECONOMIC LITERATURE, Vol. XXVI, Dec. 1988.

20 Keynes, John M., 1937, 'Some Economic Conseqences of a Declining Population.' EUGENICS REVIEW.

21 Khan, M. E , and Sharma, D.V.N. (Ed), 1988., SOCIO ECONOMIC DEVELOPMENT AND POPULATION CONTROL ( Collection of 11 Research Papers ), Manohar, New Delhi.

22 Leontief, W., Carter, Ann P. and Petri P., 1977, THE FUTURE OF THE WORLD ECONOMY, NY Oxford University Press.

23 Liebenstein, H., 1971, THE IMPACT OF POPULATION GROWTH ON ECONOMIC WELFARE. National Academy of Sciences, Baltimore, John Hopkins Press.

24 Liebenstein, H., 1976., POPULATION GROWTH AND SAVINGS, Leon Tabala. Dolhain, Belgium.

25 Malthus, Thomas R., 1798., AN ESSAY IN THE PRINCIPLE OF POPULATION, AS IT AFFECTS THE FUTURE IMPROVEMENT OF SOCIETY, J. Johnson, 1798, London.

26 McNamara, R. S., 1973, 'One Hundred Countriss, Two Billion People.' THE DIMENSIONS OF DEVELOPMENT, N. Y. Praeger Press.

27 Meadows, D. H., Meadows D. L, J. Randevs and W. W. Behrims, 1972, THE LIMITS TO GROWTH, Club of Rome, Pan Book, 1972, LONDON.

28 Mill, John Stuart, 1909, PRINCIPLES OF POLITICAL ECONOMY, Longmans and Green, London.

29 Nanda, A. R., 1983, PLEA FOR AN APPROPRIATE RURAL DEVELOPMENT STRATEGY IN INDIA AS THE MOST EFFECTIVE SOLUTION TO THE POPULATION PROBLM. David Owen Centre for Population Growth Studies, UK ( Mimeo ).

30 Narayana, D. L., 1984, ' Population Growth and Economic Development ', INDIAN ECONOMIC JOURNAL, University of Bombay, Vol. 32, No. 2.

31 National Academy of Sciences, 1971. RAPID POPULATION GROWTH : CONSEQUENCES AND POLICY IMPLICATIONS. John Hopkins University Press, Baltimore.

32 National Research Council, 1986, POPULATION GROWTH AND ECONOMIC DEVELOPMENT, POLICY QUESTIONS, National Academy, Press, Washington. D. C.

33 O'Neile, George K, 1981, A HOPEFUL VIEW OF HUMAN NATURE. NY Simon and Schuster.

34 Paddock W. and Paddock P., 1967, ' Femine 1975 ' ( Quoted from Narayana, D. L., 1984 ).

35 Piothrow, Phyllis T., 1973, WORLD POPULATION CRISIS : THE US RESPONSE, NY Praeger.

36 Premi, M. K., INDIA'S POPULATION : HEADING TOWARDS A BILLION, B. R. Publishing Corporation, New Delhi.

37 Raja Mohan C., 1984, ' Future of Oceans, THE HINDU, Madras, dated 26-3-1984.

38 Ramachandra Rao, B., 1983., ' Man and Ocean Resources and Development, ' Indian Science Congress, Tirupati.

39 Ricardo, D., 1953, THE PRINCIPLES OF POLITICAL ECONOMY AND TAXATION, Cambridge University Press.

40 Samuel, T. J., 1966., ' Effect of Population Growth on Economic Development of India.,' MANPOWER JOURNAL, 1965, March 1966.

41 Schultz, T. W., 1981, INVESTING IN PEOPLE. : THE ECONOMICS OF POPULATION QUALITY, Berkeley, University of California.

42 Simon, Julian, 1977, THE ECONOMICS OF POPULATION GROWTH, Princeton University Press.

43 Simon, Julian, 1981, THE ULTIMATE RESOURCE, Princeton University Press.

44 Simon Julian and Kahn, Herman, 1984, THE RESOURCEFUL EARTH : A RESPONSE TO GLOBAL 2000, NY Basil Blackwell.

45 Simon, Julian, 1986., THEORY OF POPULATION AND ECONOMIC GROWTH, NY, Basil Blackwell.

46 Solow, Robert M., 1973, ' Is the End of the World at Hand,? ' CHALLENGE, Mar-April 1973.

47 Stigler G. J., 1961, ECONOMIC PRINCIPLES IN MEASURING CHANGES IN PRODUCTIVITY, Princeton University Press.

48 UN Conference on Human Environment, Stockholm, 1972, The UN Enironment Programme.

49 United Nations, 1986, WORLD POPULATION PROSPECTS: ESTIMATES AND PROJECTIONS AS ASSESSED IN 1984, Population Studies.

50 World Bank, 1984, WORLD DEVELOPMENT REVIEW, New York, Oxford University Press.

51 Zaidan, George C., 1969, ' Population Growth and Economic Development.' FINANCE AND DEVELOPMENT.

□ □

# सामाजिक-आर्थिक विश्लेषणाच्या अधिराज्याचे संस्थापक : गॅरी बेकर


**शि. ना. माने ***


स्वीडनच्या विज्ञान अकादमीने 1992 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक 13 ऑक्टोबर 1992 रोजी जाहीर केले. शिकागो विद्यापीठातील 62 वर्षांचे गॅरी एस. बेकर या वर्षातील या पारितोषिकाचे मानकरी आहेत. लागोपाठ तिसऱ्या वर्षी अर्थशास्त्रातील अत्युच्च पारितोषिक स्वतःकडे ठेवण्याची परंपरा शिकागो विद्यापीठाने टिकविली आहे. पाठीमागील वर्षात ( 1991 ) याच विद्यापीठाच्या रोनाल्ड हॅरी कोझ याना हे पारितोषिक प्रदान करण्यात आले होते. तसेच 1990 च्या विभागून देण्यात आलेल्या पारितोषिकाच्या तीन मानकऱ्यात शिकागो विद्यापीठाचे मर्टन मिलर हे एक होते हे आपणास स्मरत असेलच.

सहेतुक मानवी व्यवहारांच्या आर्थिक विश्लेषणाचे अग्रणी म्हणून बेकर ओळखले जातात. 1957 मध्ये 'The Economics of Discrimination' हे त्यांचे खळबळजनक पुस्तक प्रसिद्ध झाले. ते त्यांच्या पीएच. डी.च्या प्रबंधावर आधारित आहे. त्यावेळी त्यांचे वय अवघे 27 वर्षे होते. त्यांच्या इतर काही पुस्तकांप्रमाणेच या पुस्तकाचेही थंडे स्वागत झाले. पारंपरिक विचारप्रणालीला धक्का देणाऱ्या किंवा तिला नाकारणाऱ्या शास्त्रज्ञांना टीका व विरोध सहन करावे लागतात. प्रसंगी पाखंडीपणाचा आरोपही सहन करावा लागतो. एक शास्त्रज्ञ म्हणून बेकर याला अपवाद नाहीत.

1957-83 या कालखंडात त्यांनी सहेतुक मानवी व्यवहारासंबंधी विपुल अर्थशास्त्रीय साहित्यसंपदा निर्माण केली. त्या काळातील त्यांच्या योगदानांचा त्रोटक स्वरूपात परिचय करून देणे उद्बोधक ठरेल.

## भेदभावाचे अर्थशास्त्र

आर्थिक विषमता हे उपरोल्लेखित पुस्तकाचे प्रतिपाद्य आहे. कृष्णवर्णीय व गौरवर्णीय, पुरूष व स्त्री हा भेद


* उपप्राचार्य, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

भाव बाजाराधिष्ठित नाही. वस्तुतः त्या व्यक्तींची सीमान्तिक उत्पादकता आणि तिने पार पाडलेल्या कामाचे तास यांच्या संबंधातील फरकामुळे तो भेदभाव निर्माण होतो. सफरचंदाच्या रुचीसारखीच भेदभावालाही स्वतःची रूची असते. विभेदकारी एकाधिकारातील उत्पादक ज्याप्रमाणे त्याच्या वस्तूचा पुरवठा मर्यादित ठेऊन अतिरिक्त नफा मिळवितो, त्याप्रमाणे बेकर यांचा विभेदकार नफा मिळवत नसतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे उपमानुमान ( analogy ) देऊन बेकर त्या भेदभावाचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करतात. गौरवर्णीयांचा एक प्रदेश आहे. कृष्णवर्णीयांचा दुसरा प्रदेश आहे. प्रत्येक प्रदेशात, अर्थातच, पूर्ण स्पर्धा अस्तित्वात आहे. उत्पादन घटकांच्या मालकांच्या उत्पन्नात संबंधित घटकांच्या दुर्मिळतेचे प्रतिबिंब पडते. अशा प्रकारे, श्रम-दुर्मिळ आणि भांडवल-विपुल गौरवर्णीयांच्या प्रदेशात तौलनिक वेतन जास्त आणि नफा अल्प असेल. याच्या उलट परिस्थिती कृष्णवर्णीयांच्या प्रदेशात असेल. खुला व्यापार आणि उत्पादन घटकांची चलनशीलता ( mobility ) या गृहितांच्या आधारे त्या दोन प्रदेशांतील श्रम व भांडवल यांच्या स्थलांतरामुळे तेथील वेतन व नफा यांचे दर समान होतील. दुसऱ्या शब्दात, सीमान्तिक उत्पादकता अल्प असलेल्या देशाकडून ती जास्त असलेल्या देशाकडे साधनांचे स्थलांतर घडून येईल. परिणाम ? जागतिक उत्पादनात वाढ होईल. प्रत्यक्षात बाजारांच्या अपूर्णता आढळतात. परंतु शिकागो संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञांची अशी धारणा आहे की, प्रदीर्घ कालात त्या अपूर्णता वितळून जातात. प्रशासकीय धोरणाने भेदभाव काही काळ दाबून ठेवता येईल. तो कायमचा निपटून काढता येणार नाही. त्यासाठी उत्पादन घटकांचे खुले स्थलांतर हाच एकमेव रामबाण उपाय आहे.

### जननक्षमता ( fertility )

मूल व मोटारगाडी यांच्यात बेकर फरक करत नाहीत. मोटारगाडीप्रमाणेच मूल ही टिकाऊ उपभोग वस्तू ( consumer durable ) आहे. 1960 मध्ये त्यांनी 'An Economic Analysis of Fertility' या मथळ्याचा निबंध सादर केला. अपत्यप्राप्तीला त्यांनी परिव्यय-उपयोगितेच्या चौकटीत बसविले. अभिमत संप्रदायातील माल्थस यांच्या लोकसंख्या सिद्धान्तापेक्षा हा दृष्टिकोन निराळा होता. अर्थशास्त्रातील परिकल्पनेचे ( hypothesis ) यश तिच्या विश्लेषणाच्या आणि पूर्वानुमानाच्या क्षमतेवर अवलंबून असते. या संदर्भात मिल्टन फ्रीडमन व बेकर यांची मते समान आहेत.

- मुलाला जन्म देणे, त्याचे पालनपोषण आणि शालेय शिक्षण ही झाली खर्चाची बाजू. त्या खर्चाची भरपाई होईपर्यंतच अपत्यप्राप्ती किफायतशीर ठरते. टिकाऊ उपभोग वस्तूप्रमाणेच अपत्याची मागणी कुटुंबाच्या उत्पन्नाबरोबर वाढते. हे उपमानुमान बेकर यांनी इतके ताणले की, काही टीकाकारांनी मूल म्हणजे 'गिफन वस्तू' आहे काय, असा प्रश्न निर्माण केला. कुटुंबाचे उत्पन्न वाढल्यानंतर मुलांची मागणी घटते या सार्वत्रिक नियमाला बेकर यांचे विश्लेषण बाध आणते. परंतु बेकर यांचे यावर उत्तर असे : अधिक चांगल्या परिस्थितीतील कुटुंबातील मुले अधिक चांगली शिक्षित / प्रशिक्षित असतात, त्या मुलांची उत्पन्नप्राप्तीची क्षमता जास्त असते आणि प्रदीर्घ कालात कुटुंबाचे उत्पन्न वाढते तसे मुलांची संख्या आणि त्यांची कमाई वाढते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्या मुलांच्या पालनपोषणाचा विकल्पी खर्च जास्त असतो.

### मनुष्यरूपी भांडवल

ॲडॅम स्मिथसारख्या अर्थशास्त्रज्ञांनी शिक्षण व प्रशिक्षणावरील खर्चाचे महत्त्व ओळखले होते. तो खर्च म्हणजे एक प्रकारची गुंतवणूक आहे असे ते मानत. हे त्यांचे आकलन अतिशय सरळ असल्यामुळे सिद्धान्ताच्या दृष्टिकोनातून त्यात अतिसरलतेचा (simplistic) दोष निर्माण होतो. 1962 च्या आसपास बेकर, शुल्ट्झ व मिन्सर यांनी मनुष्यरूपी भांडवलाच्या संकल्पनेला सैद्धान्तिक सोपानावर बसविले. विशेष म्हणजे, 1964 मध्ये बेकर यांचे 'Human Capital' हे पुस्तक प्रसिद्ध झाले, ते त्यांनी 1960 मध्ये सादर केलेल्या 'Under-investment In College Education' या निबंधाचे विस्तारित रूप होय.

आज मानवी विकास निर्देशांकापर्यंत ( Human Development Index ) विकासाच्या संकल्पनेचा

विस्तार झाला आहे. मानवी साधनसंपत्ती विकास (human resource development) ही आर्थिक विकासाची गुरुकिल्ली समजली जाते. संपत्तीच्या उत्पादनापेक्षा मानवी शक्तींचा (energies) विकास जास्त महत्त्वाचा ठरतो. या विकासवृक्षाचे बीजारोपण बेकर यानी (शुल्टझ् आणि मिन्सर यांच्या सहयोगाने) केले. आजचे शिक्षणाचे अर्थशास्त्र हे या विकासवृक्षावरील फळ आहे.

बेकर यांच्या मनुष्यरूपी विकासाच्या प्रतिमानाचा सार पुढीलप्रमाणे सांगता येईल. समजा, व्यवसाय संस्थेचा मालक 10 टक्के व्याज दराने भांडवल गुंतवणूक करतो. म्हणजे आजची रु. 100 कोटीची गुंतवणूक बरोबर एका वर्षानंतर रु. 110 कोटीची बरोबरी करते. भविष्यावरील कसरीचा दर शून्यापर्यंत घसरला तर ती गुंतवणूक समर्थनीय ठरत नाही. बेकर यांच्या मनुष्यरूपी भांडवलाची (शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्यरक्षण, अधिक चांगल्या नोकरीचा शोध, स्थलांतर इत्यादी बाबींवरील खर्च) संकल्पना या व्यवसाय संस्थेतील गुंतवणुकीशी तंतोतंत जुळणारी आहे. जोपर्यंत आजच्या शिक्षणातील गुंतवणुकीवरील कसरीचा दर पुरेशा प्रमाणात धन असतो तोपर्यंत तो समर्थनीय ठरतो.

आज भौतिक भांडवलापेक्षा मनुष्यरूपी भांडवल अधिक उत्पादक गणले जाते. विकासाच्या अर्थशास्त्रात मानवी साधनसंपत्तीच्या विकासाला पर्याय नाही. खरे तर त्याला एकच पर्याय संभवतो. तो म्हणजे मानवी साधनसंपत्तीच्या तुटीचा.

## गुन्हा व दंडनीती

1968 मध्ये Journal of Political Economy च्या एका अंकात 'Crime and Punishment : An Economic Approach' हा बेकर यांचा निबंध प्रसिद्ध झाला. त्यात त्यानी असे प्रतिपादन केले की, व्यक्तीचे बेकायदेशीर कृत्य हे व्यक्तीवादी कलनाचे (calculus) फल आहे. उदाहरणार्थ, व्यक्ती चोरी करते किंवा करदाता आयकर बुडवितो. असा बेकायदेशीर व्यवहार परिव्यय–लाभ गुणोत्तराच्या अधीन राहून करावा लागतो. कर बुडवेगिरी किंवा चोरी हा एक स्वतंत्र व्यवसाय आहे. प्रत्येक व्यवसायाप्रमाणे या व्यवसायाचीही एक आचारसंहिता असते. वस्तूच्या पुरवठ्यावर ज्याप्रमाणे तिच्या उत्पादनपरिव्ययाची मर्यादा पडते, त्याप्रमाणे गुन्हेगारी व्यवहारावर त्याच्या खर्चाची मर्यादा पडते. गुन्हेगारी किती प्रमाणात असावी ? तिची एखादी कमाल मर्यादा असू शकते काय ? यावर बेकर यांचे उत्तर असे की, गुन्हेगारीचा खर्च (धोका) आणि तिच्यापासूनचा लाभ ज्यावेळी समतोलात येतात तेथे गुन्हेगारी स्थिरावते.

बेकर यांचे गुन्ह्याचे अर्थशास्त्र पोलिस यंत्रणेला आवश्यक ती माहिती पुरविण्याचे कार्य करते. गुन्हेगारी व तिचा प्रतिबंध हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. गुन्हेगारीशास्त्रज्ञांची (Criminologists) ती एक सच्ची मदतनीसही आहे, असे म्हणावे लागते.

## विवाह

बेकर यांचे विवाहविषयीचे विश्लेषण त्यानी घडवून आणलेल्या अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांच्या 'विवाहाच्या' संदर्भातच विचारात घ्यावे लागते. 1973 व 1974 मध्ये दोन भागांत निबंध लिहून बेकर यानी विवाहाचा आर्थिक सिद्धान्त (Economic Theory of Marriage) मांडला. प्रत्येक विवाहाचा विकल्पी खर्च असतो. तो म्हणजे अविवाहित राहाणे किंवा ब्रह्मचर्य. विवाहसंस्थेमुळे अपत्यप्राप्ती होते. मुलांचे पालनपोषण केले जाते. पर्यायाने समाजाचा किंवा देशाचा योगक्षेम पार पाडण्यास मदत होते. विवाह अधिक लाभदायक आणि कमी कटकटींचा होण्यासाठी योग्य निवड व शोध करावा लागतो. भावी पती–पत्नीची निवड करण्यासाठी आवश्यक पुरेशी माहिती सहजासहजी उपलब्ध होत नाही. विवाहाच्या अनौपचारिक बाजारांच्या या अपूर्णता (imperfections) होत. त्या कमी करण्यासाठी खर्च करावा लागतो. त्यातूनच सौदा, वचने, हुंडा इत्यादी भरपाई करणाऱ्या सवलती, सहेतुक सामाजिक व्यवहारांचे एक अंग म्हणून, निर्माण होतात. जास्तीत जास्त आदर्श जोडपे शोधण्यासाठी तुलनेने जास्त शोधाशोध आणि जास्त घासाघीस करावी लागते, असा आपला सर्वसाधारण अनुभव आहे. म्हणजे जास्त खर्च (वेळ व पैसे) करावा लागतो.

बेकर विवाहाला श्रमविभागणी व विशेषीकरणाचा नियम लावतात. तो शेतात काम करतो. ती घरकाम करते. उलटे घडले तर सामाजिक लाभांश घटेल. तिचे घरकाम आणि त्याचे शेतकाम याला कोणी 'पुरुषप्रधान संस्कृती' असे उपहासाने संबोधतात. वस्तुतः येथे श्रेष्ठकनिष्ठ असा प्रश्न निर्माण करणे सयुक्तिक नाही.

बेकर यांच्या विवाहाविषयीच्या विश्लेषणाला एक सामाजिक–आर्थिक संदर्भ आहे. विशेषतः आज बहुचर्चित स्त्री–मुक्ती, महिला विकास, नोकरी–व्यवसायात समान संधी आणि राजकीय क्षेत्रातील महिलांसाठी आरक्षण अशा आधुनिकतेच्या संदर्भात बेकर यांचे विश्लेषण जास्त बोलके आहे. म्हणून बेकर यांच्या देशातीलच कुटुंबसंस्था कशी अवनत होत आहे, याविषयी विवेचन करणाऱ्या आणि Harvard Business Raview (जुलै–ऑगस्ट 1991) मध्ये सिल्विया ए. ह्युलेट यांच्या प्रसिद्ध झालेल्या एका लेखाकडे लक्ष वेधू इच्छितो. या लेखात 1989 मध्ये अमेरिकेच्या श्रम विभागाच्या एका प्रसिद्ध अहवालाचा संदर्भ दिला आहे. त्या अहवालात पुढील निष्कर्ष काढण्यात आला आहे. अलीकडील काळात अमेरिकेत नोकरी-व्यवसायात महिलांचे पुरुषांशी असलेले प्रमाण वाढत आहे कुटुंबातील मुलांना आई किंवा वडील यांच्या एकेरी छत्रावर (single parenthood) विसंबून राहावे लागत आहे. त्याचे कुटुंबसंस्थेवर आणि मुलांवर दोन दुष्परिणाम घडून येतात.

(अ) एकेरी छत्राखाली वाढलेली मुले ज्यावेळी शाळेत जातात त्यावेळी शालेय शिक्षणात ती कमी ठरतात.

(आ) ती ज्यावेळी शिक्षण पूर्ण करून बाहेर नोकरी–व्यवसायात पडतात त्यावेळी आधुनिक काळाला अनुरूप ज्ञानघन (knowledge intensive) काम करण्याची त्यांची तयारी नसते.

आगामी काही वर्षांत ही परिस्थिती तशीच पुढे चालू राहिली तर अमेरिकेला त्याची जबर किंमत मोजावी लागेल. कुटुंबसंस्थेची धालमेल वाढत जाईल. ही गडबडगोंधळाची अवस्था थोपविण्याच्या कामात बेकर यांचे विवाहाविषयीचे सामाजिक–आर्थिक विश्लेषण मार्गदर्शक ठरते. अमेरिकेतील 'श्रमिक माता' (working mothers) या दोन शब्दांतील 'माते' पेक्षा 'श्रमिक' शब्द आज आर्थिक दृष्टिकोनातून जास्त किफायतशीर ठरतो आहे. परंतु मुले मातेच्या संस्काराला वंचित आहेत. कुटुंबसंस्थेची ही घालमेल थोपविण्याच्या कामात बेकर यांचे विवाहाविषयीचे सामाजिक–आर्थिक विश्लेषण महत्त्वाचे ठरते.

## पद्धतीमीमांसा

पाठीमागील सर्व सहेतुक मानवी व्यवहारांच्या आर्थिक विश्लेषणासाठी बेकर यानी पुढील पद्धतीमीमांसेचा वापर केला आहे.

(अ) **महत्तमीकरण :** प्रत्येक व्यक्तीचा व्यवहार उपयोगितेच्या महत्तमीकरणाने प्रेरित असतो. त्यावर अर्थसंकल्पाचीच काय ती मर्यादा असते. बेकर या महत्तमीकरणाची सांगड स्वार्थाशी घालत नाहीत. उलटपक्षी, या महत्तमीकरणाचा नैसर्गिक निवडीच्या तत्त्वाशी (Principle of Natural Selection) जोडतात. ज्या वनस्पती, जे प्राणी आणि ज्या व्यक्ती त्यांच्या परिस्थितीकीशी (Ecology) चांगले समायोजन साधतात त्या अधिक काळ जगतात आणि त्या काळात अधिक चांगले जीवन जगतात. पाणथळ जमिनीत निवडुंग आणि वाळवंटात मासे हे उदाहरण नैसर्गिक तत्त्वाच्या विरोधी आहे. तेच तत्त्व व्यवसाय संस्थेला लागू पडते. त्यांचे आजारपण वाढत जाणे हे त्या तत्त्वाला नाकारण्याचे फल आहे.

(आ) **बाजाराचा समतोल :** बेकर यांच्या आर्थिक विश्लेषणाचे अधिष्ठान आहे बाजाराचा समतोल. हा समतोल वॉलरांप्रणित नसून तो मार्शलप्रणित आहे. दुसऱ्या शब्दात, बेकर यांचे अर्थशास्त्र चोरी / गुन्हेगारीला जसे वाईट मानत नाही, तसे ते आदर्श विवाहाला चांगले मानत नाही. आदर्शानुसारी अर्थशास्त्राच्या (normative economics) दालनात प्रवेश करावयाला ते नकार देते.

## दोन निष्कर्ष

आतापर्यंतच्या विवेचनात 1992 चे नोबेल पारितोषिक विजेते गॅरी बेकर यांच्या सहेतुक मानवी व्यवहारांच्या आर्थिक विश्लेषणाचा परिचय करून देणे हा प्रमुख हेतू होता. आता त्यांच्या विश्लेषणातून येणाऱ्या दोन महत्त्वाच्या निष्कर्षांचा विचार करू.

(1) गॅरी बेकर हे एक नव-अभिमत संप्रदायातील (Neo-Classical School) अर्थशास्त्रज्ञ आहेत. इतर नव-अभिमत संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञांप्रमाणे बेकर प्रत्येक मानवी घटिताचे (phenomenon) विश्लेषण समतोलाच्या संकल्पनेच्या संदर्भात करतात. समतोल व समीकरणे याना त्यानी त्यांच्या विश्लेषणाचे अधिष्ठान मानले. त्याशिवाय बाजारातील तात्कालिक स्वरुपाच्या अपूर्णता निकालात काढता येत नाहीत. आणि अर्थशास्त्रातील विश्लेषण गतीशील राहात नाही. भेदभावाचे अर्थशास्त्र, जननक्षमता, मनुष्यरूपी भांडवल, गुन्हा व दंडनीती ही त्यांची बोलकी उदाहरणे आहेत.

(2) दुसरा निष्कर्ष अधिक बोलका आहे. विशेषतः बाजारातील वर्तमान अपूर्णतांच्या संदर्भात (विरूपणे व विपथगमने) तो अधिक बोधप्रद ठरतो. आपण पाठीमागे पाहिले की भेदभाव, अपत्यप्राप्ती, मनुष्यरूपी भांडवल, विवाह, गुन्हा व दंडनीती अशा आर्थिक विश्लेषणाच्या परिघाबाहेरील मानवी व्यवहारांचे बेकर यानी आर्थिक विश्लेषण केले. अशाच एका महत्त्वाच्या मानवी व्यवहाराचा येथे आपण अधिक विचार करू. तो व्यवहार आहे बेकारप्रणीत गुन्हेगारीचा.

गुन्हेगारीचा परिव्यय (धोका) आणि तिच्यापासूनचा लाभ ज्यावेळी एकमेकाशी समान होतात त्यावेळी गुन्हेगारीवर आपोआप मर्यादा पडते, म्हणजे त्या समतोल बिंदूच्या मर्यादेत मर्यादित गुन्हेगारी अटळपणे चालू राहते. येथे दोन प्रश्न निर्माण होतात.

(अ) समतोल बिंदूच्या मर्यादेत गुन्हेगारी का चालू राहते ?

(आ) तिचे संपूर्णपणे कधी उच्चाटन होऊ शकेल ?

पहिल्या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. समाजात गुन्हेगारांची संख्या अल्प असते. तिच्यापासून अलिप्त असलेल्या व्यक्ती ती खपवून घेतात. अधिक स्पष्टीकरणासाठी कल्याणाच्या अर्थशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या 'कैद्यांच्या शृंगापत्तीच्या' (Prisoners' Dilemma) उपमानुमानाचा निर्देश करू. दोन कैद्यांनी गंभीर गुन्हा केला आहे. परंतु त्याना शासन करण्याइतपत पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. जिल्हा न्यायाधीश प्रत्येकाला वेगवेगळ्या वेळी बोलावून गुन्हा कबूल करण्याची एक संधी देतात. त्यावेळी न्यायाधीश कैद्यांच्या पुढे तीन पर्याय ठेवतात : (1) प्रत्येकाने गुन्हा कबूल करणे आणि दहा वर्षे कारावास भोगणे. (2) कोणीच गुन्हा कबूल केला नाही तर प्रत्येकाला दोन वर्षे कारावास भोगावा लागेल. (3) एकाने गुन्हा कबूल केला आणि दुसऱ्याने केला नाही तर पहिल्याची निर्दोष मुक्तता आणि दुसऱ्यास वीस वर्षे कारावास.

तिसऱ्या पर्यायानुसार प्रत्येक कैदी गुन्हा कबूल करू शकतो. कारण निर्दोष सुटकेत प्रत्येक कैदी स्वतःचा स्वार्थ सिद्ध करण्याचा प्रयत्न करणारच. परंतु त्या स्वार्थाखातर दोघांनी गुन्हा कबूल केल्यामुळे त्यांना दहा वर्षे कारावास भोगावा लागेल (पहिला पर्याय). परंतु दहा वर्षांपेक्षा कारावास कमी करण्याचा एक पर्याय शिल्लक राहतो. तो म्हणजे कोणीच गुन्हा कबूल करावयाचा नाही आणि दोन वर्षे कारावास भोगावयाचा (दुसरा पर्याय). म्हणजे गंभीर गुन्हा तर घडला आहे आणि कमीत कमी कारावास भोगण्याचा प्रयत्नही सफल झाला आहे. त्या सफलतेची किंमत मोजण्याची पाळी दोन कैदी वगळून उर्वरित समाजावर आली आहे. हा सर्व व्यवहार शून्य-बेरीज खेळाचा (Zero-sum Game) झाला आहे. एकाला श्रीमंत करण्यासाठी दुसऱ्याला गरीब करण्याचा हा प्रकार झाला. हा प्रकार थांबावयाचा असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने गुन्हा/चोरी करावयाला हवी. परंतु प्रत्येकाने चोरी करण्याचा व्यवसाय सुरू केला तर सर्व समाजाची (चोरांची) धारणा कशी होणार ? समाजाचा म्हणजे चोरांचा योगक्षेम कसा चालणार ? म्हणजे आपद्धर्म म्हणून थोड्या गुन्हेगार व्यक्तींचा / चोरांचा स्वीकार अटळ ठरतो, हे आपल्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे.

केवळ आपद्धर्म किंवा इष्टापत्ती म्हणून मर्यादित

गुन्हेगाराचा एकदा स्वीकार केल्यानंतर, प्रत्येक गुन्ह्याचा परिव्यय आणि त्यापासूनचा लाभ यांच्या बेकरप्रणीत समतोलाकडे आपणाला वळावे लागते. आणि त्या समतोलाच्या आधारे रोखे व्यवहार घोटाळा, उच्च शिक्षणातील कॅपिटेशनच्या स्वरूपातील डोईकर ( Poll Tax ), कर बुडवेगिरी, परिक्षेतील सहेतुक घोटाळे अशा आणि अन्य अनेक अपराधांचे एका नवीन दृष्टिकोनातून आर्थिक विश्लेषण करण्यास बेकर यांचे गुन्हेगारीचे अर्थशास्त्र मार्गदर्शन व मदत करते. हेही नसे थोडके !

## गॅरी एस. बेकर यांचे योगदान

### संदर्भ सूची


1 THE ECONOMICS OF DISCRIMINATION, 1957 ( 1st edn. ), 1971 ( 2nd edn. ), University of Chicago Press.

2 'Competition and Democracy', JOURNAL OF LAW AND ECONOMICS, Vol. 1, 1958.

3 'Union Restrictions on Entry' in P. D. Bradley ( ed. ), THE PUBLIC STAKE IN UNION POWER, University of Virginia Press, 1959.

4 'Underinvestment in College Education', AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 50, No. 2, 1960.

5 'An Economic Analysis of Fertility' in DEMOGRAPHIC & ECONOMIC CHANGE IN DEVELOPED COUNTRIES, 1960.

6 'Irrational Behaviour and Economic Theory', JOURNAL OF POLITICAL ECONOMY, No. 70, 1962.

7 HUMAN CAPITAL : A THEORETICAL AND EMPIRICAL ANALYSIS, 1964 ( 1st edn. ), 1975 ( 2nd edn. ), Columbia University Press.

8 'A Theory of the Allocation of Time', ECONOMIC JOURNAL, Sept. 1965.

9 HUMAN CAPITAL AND THE PERSONAL DISTRIBUTION OF INCOME : AN ANALYTICAL APPROACH, University of Michigan, 1967.

10 'Crime and Punishment : An Economic Approach', JOURNAL OF POLITICAL ECONOMY, No. 76, 1968.

11 'A Theory of Marriage, Part I' JOURNAL OF POLITICAL ECONOMY, No. 81, 1973.

12 'A Theory of Marriage, Part II', JOURNAL OF POLITICAL ECONOMY, No. 82, 1974.

13 'Altruism, Egoism & Genetic Fitness : Economics and Sociology', JOURNAL OF ECONOMIC LITERATURE, Vol. XIV, No. 3, 1976.

14 THE ECONOMIC APPROACH TO HUMAN BEHAVIOUR, University of Chicago Press, 1976.

15 Becker, G. S., Landes, E. M. & Michael, R. T., 'An Economic Analysis of Marital Instability', JOURNAL OF POLITICAL ECONOMY, No. 85, 1977.

16 Becker, G. S., & Stigler, G. J., 'De Gustibus non est Disputandum', AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 67, No. 2, 1977.

17 'A Theory of Competition Among Pressure Groups For Political Influence', QUARTERLY JOURNAL OF ECONOMICS, 1983.


□ □

# अर्थशास्त्रातील 'नोबेल'ची श्रेयमालिका

रवीन्द्र दोशी *

## पारितोषिकांची पूर्वपीठिका

प्रतिवर्षी ऑक्टोबर महिना उजाडला की जगाचे डोळे स्वीडनची राजधानी स्टॉकहोमकडे लागतात. कर्तबगारीच्या क्षेत्रात मानाचा तुरा गणल्या गेलेल्या 'नोबेल' पारितोषिकांची घोषणा व्हावयाची असते. साधारणतः ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात एकापाठोपाठ एक अशा एकूण सहा क्षेत्रातील काम--गिरीबद्दल या पारितोषिकांची घोषणा होते. ही क्षेत्रे आहेत भौतिकशास्त्र ( Physics ) रसायनशास्त्र ( Chemistry ) शरीरशास्त्र ( Physiology ) किंवा वैद्यकशास्त्र ( Medicine ), साहित्य ( Literature ), शांतता ( Peace ) आणि अर्थशास्त्र ( Economic Sciences ).

ही पारितोषिके ज्यांच्या नावाने दिली जातात ते आल्फ्रेड बर्नहार्ड नोबेल 1833 मध्ये स्टॉकहोममध्ये जन्मले. लहानपणापासून त्यांचा ओढा विज्ञानाकडे होता. रसायनशास्त्रात त्यांनी चांगलीच गती मिळविली होती, त्याचबरोबर साहित्याच्या क्षेत्रातही त्यांना रस होता. कविता करण्याचा त्यांचा छंद होता. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन आणि स्वीडिश या भाषा त्याना अवगत होत्या. पेशाने ते व्यापारी होते. घातक युद्धसाहित्याची जगभर विक्री करण्याचा त्यांचा व्यवसाय होता. त्यामधून त्यानी प्रचंड पैसा जमविला. युद्धसाहित्याची विध्वंसक क्षमता जेवढी वाढेल तेवढी जागतिक शांतता लवकर प्रस्थापित होईल अशी त्यांची तेव्हाची धारणा होती ! कदाचित याच धारणेतून त्यानी आपल्या रसायनशास्त्राच्या अभ्यासातून डायनामाईटचा शोध लावला. या शोधाने स्फोटक युद्धसाहित्याच्या निर्मिती--मध्ये मोलाची मदत झाली.

विज्ञान आणि साहित्य ही मानवी प्रगतीला पोषक असणारी अत्यंत महत्त्वपूर्ण अशी ज्ञानाची कवाडे आहेत अशी त्यांची भावना होती. ही भावना आणि

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

जागतिक शांततेची गरज यातून नोबेल यांच्या मनात जागतिक पारितोषिकांची कल्पना रुजली. 1893 मध्ये शांतता पारितोषिकाचा विचार त्यांच्या मनात पक्का झाला. 1895 मध्ये त्यांनी आपले मृत्यूपत्र तयार केले. त्यानुसार आपल्या संपत्तीपैकी 9 दशलक्ष अमेरिकी डॉलरची रक्कम पारितोषिकांसाठी प्रदान केली. या रकमेच्या व्याजातून दरवर्षी भौतिकशास्त्र, रसायन–शास्त्र, शरीरशास्त्र किंवा वैद्यकशास्त्र या तीन क्षेत्रां–तील अत्यंत महत्त्वाच्या संशोधनासाठी प्रत्येकी एक, कल्पनारम्यतेने भारलेल्या उत्तम साहित्यासाठी एक आणि जागतिक शांतता आणि सामंजस्य यासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी एक अशी पाच पारितोषिके प्रतिवर्षी देण्याची तरतूद केली. पाचही पारितोषिकांची रक्कम समान असेल हे त्या मृत्यूपत्रात स्पष्ट केले आहे. त्यामुळे एखाद्या क्षेत्राला श्रेष्ठ वा कनिष्ठ मानण्याच्या शक्यतेला वाव नव्हता. या योजने–मध्ये अर्थशास्त्रासाठीच्या पारितोषिकाची तरतूद नव्हती हे मुद्दाम ध्यानात ठेवले पाहिजे. आपले मृत्यूपत्र नोंद केल्यानंतर वर्षभरातच, म्हणजे 1896 साली, आल्फ्रेड नोबेल स्वर्गवासी झाले. त्यांच्या पश्चात पारितोषिके प्रदान करण्यासाठी मात्र 1901 साल उजाडले. पारि–तोषिकाची व्यवस्था पाहण्याचे काम 'नोबेल प्रतिष्ठान' ( Nobel Foundation ) या खाजगी विश्वस्त संस्थे–कडे आहे. ती संस्था Royal Academy of Sciences या स्टॉकहोम मधील संस्थेच्या अखत्यारीत आहे.

अर्थशास्त्रासाठीच्या नोबेल पारितोषिकाची निर्मिती 1968 मधली आहे. बँक ऑफ स्वीडन या स्वीडनमधील मध्यवर्ती बँकेने 1968 मध्ये आपली त्रिशताब्दी साजरी केली. त्याच्या स्मृत्यर्थ या बँकेने **Royal Academy of Sciences** कडे देणगीदाखल मोठी रक्कम दिली. या रकमेच्या व्याजातून या अका–दमीने **'आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मृत्यर्थ बँक ऑफ स्वीडन अर्थशास्त्र पारितोषिक'** ( Bank of Sweden Prize in Economic Sciences in Memory of Alfred Nobel ) प्रतिवर्षी द्यावयाचे. या पारितोषि–कालाच आपण नेहमीच्या भाषेत 'अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक' असे म्हणतो. बँक ऑफ स्वीडनने आपली भरीव देणगी देताना स्पष्ट केले आहे की, या पारि–तोषिकाची रक्कम इतर पाच पारितोषिकांच्या रकमे–एवढीच असेल, हे पारितोषिक प्रतिवर्षी कोणाला द्यावयाचे त्याचा निर्णय अकादमी इतर पारितोषिकां–साठीच्याच पद्धतीने करील आणि पारितोषिकाचे वितरण स्टॉकहोम येथे इतर पारितोषिकांबरोबरच होईल. अकादमीने या पारितोषिकाची जबाबदारी स्वीकारली आणि त्यानुसार 1969 मध्ये अर्थशास्त्रा–साठीच्या पहिल्या नोबेल पारितोषिकाचे वितरण झाले.

'नोबेल' पारितोषिक मिळणे म्हणजे संबंधित व्यक्तीने आपल्या आयुष्यात केलेल्या महत्त्वपूर्ण काम–गिरीचा जागतिक गौरवच असतो. त्या व्यक्तीच्या दृष्टीने हा मानाचा शिरपेच असतो. या कारणाने पारि–तोषिकाचे स्वरूपदेखील त्याला साजेसेच आहे. प्रत्येक व्यक्तीला परिश्रमपूर्वक आणि कौशल्यपूर्ण रीतीने बनविलेले प्रशस्तीपत्र, सुवर्णपदक आणि रोख रक्कम पारितोषिक म्हणून समारंभपूर्वक दिली जातात. नोबेल पारितोषिकांचा प्रारंभ 1901 मध्ये झाला तेव्हा या पारितोषिकाची रक्कम दीड लाख स्वीडिश क्रोनर (म्हणजे, सुमारे 40,000 अमेरिकी डॉलर) होती. कालौघात भावफुगवटा मोठ्या प्रमाणात झाला. त्याची भरपाई करण्यासाठी नोबेल प्रतिष्ठानने 1991 पासून 'नोबेल' मानकऱ्यांना द्यावयाची रक्कम 60 लाख स्वीडिश क्रोनर (म्हणजे, सुमारे 10 लाख अमेरिकी डॉलर अथवा आत्ताच्या विनिमय दराने जवळपास 2,60,00,000 रुपये) एवढी वाढविली आहे.

## पारितोषिकांचे व्यवस्थापन

नोबेल पारितोषिकांचे व्यवस्थापन 'नोबेल प्रतिष्ठान' ( Nobel Founnation ) करते. आल्फ्रेड नोबेल यांच्या मृत्यूनंतर त्यांची संपत्ती त्यांच्याच इच्छे–प्रमाणे एका पारितोषिक निधीमध्ये जमा करण्यात येऊन त्याच्या व्यवस्थापनासाठी 'नोबेल प्रतिष्ठान' निर्माण करण्यात आले. हे प्रतिष्ठान आपल्या माल–मत्तेची व्यवस्था पाहते आणि ज्या संस्थांच्या माध्यमा–तून पारितोषिके ठरविली जातात त्यांचे प्रशासकीय कार्य पाहते. म्हणजेच, पारितोषिकांबद्दलचा निर्णय हे प्रतिष्ठान करीत नाही. त्याची वेगळी व्यवस्था आहे. हे प्रतिष्ठान खाजगी असले तरी त्याचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष स्वीडन सरकारकडून नियुक्त केले जातात.

विविध नोबेल पारितोषिकांसंबंधीचे निर्णय करण्याची प्रक्रिया ठरलेली आहे. हे निर्णय करण्याची जबाबदारी काही संस्थांवर टाकली आहे. ती अशी :

(अ) **स्वीडनमध्ये**

(1) **दि रॉयल स्वीडिश ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस :** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि अर्थशास्त्र

(2) **कॅरोलिन्स्का इन्स्टिटयूटमधील दि नोबेल असेंब्ली :** शरीरशास्त्र अथवा वैद्यकशास्त्र

(3) **दि स्वीडिश ॲकॅडेमी :** साहित्य

(आ) **नॉर्वेमध्ये**

**दि नॉर्वेजियन नोबेल कमिटी** ( नार्वेच्या संसदेने नियुक्त केलेली पाच सदस्यांची समिती ) : जागतिक शांतता. आल्फ्रेड नोबेल यांच्याच इच्छेप्रमाणे शांतता पारितोषिकासाठी ही व्यवस्था केलेली आहे. या समितीच्या पाच सदस्यांमध्ये तीन सदस्य आंतरराष्ट्रीय कायदा, राजकीय इतिहास आणि अर्थशास्त्र या क्षेत्रातील तज्ज्ञ असतात.

स्वीडनमधील संस्था आपल्या कामासाठी विषयवार नोबेल समित्या नेमतात. निवड समितीवरील सदस्य स्वीडनच्याच वेगवेगळ्या विद्यापीठातील त्या त्या विषयातील तज्ज्ञ प्राध्यापक असतात. पारितोषिके जाहीर झाल्यानंतर समिती सदस्यांची नावेही प्रकट केली जातात. त्या समित्या नावांची शिफारस करणारे तपशीलवार अहवाल तयार करून संबंधित संस्था प्रमुखांना सादर करतात. या समित्या शंभराहून अधिक नावांचा विचार करून त्या प्रत्येक व्यक्तीसंबंधीचा तपशीलवार अहवाल मांडतात असे सामान्यतः आढळते. 1991 मधील अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकासाठी निवड करताना संबंधित समितीने 132 नावांचा विचार केलेला होता.

समितीच्या अहवालावर ती ती संस्था विचार करून अंतीम निवड करते. आणि यात नंतर कुणीही बदल करीत नाही. हे निर्णय नोबेल प्रतिष्ठानला कळविले जातात. पारितोषिकांची घोषणा होईपर्यंत सर्व कामकाज पूर्णतया गोपनीय असते; समित्यांचे अहवालही गोपनीय असतात.

'नोबेल' मानकऱ्यांना पारितोषिके प्रदान करण्याचा शानदार समारंभ सामान्यतः डिसेंबरमध्ये एकाच वेळी स्टॉकहोम (स्वीडन) आणि ऑस्लो (नॉर्वे) या राजधानीच्या शहरात होतो. ऑस्लो येथे शांतता पारितोषिकाचे तर इतर सर्व पारितोषिकांचे स्टॉकहोम येथे वितरण होते. या समारंभांना त्या त्या क्षेत्रातील पूर्वीच्या नोबेल मानकऱ्यांनाही निमंत्रित करतात. मान्यवरांच्या उपस्थितीत प्रथम संबंधित व्यक्तीच्या गौरवपत्राचे वाचन त्या विषय समितीचे अध्यक्ष वा सदस्य करतात आणि त्या व्यक्तीला पारितोषिक स्वीकारण्याची विनंती करतात. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक दिले जाते. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, शरीरशास्त्र किंवा वैद्यकशास्त्र, साहित्य आणि अर्थशास्त्र या क्रमाने मानकऱ्यांचा सन्मान केला जातो. पारितोषिक वितरणानंतर प्रत्येक मानकरी तो सन्मान स्वीकारल्याचे छोटेसे भाषण करतो.

नोबेल पारितोषिकांसंबंधी निर्णय करताना मूळ सनदेनुसारच दोन मर्यादा प्रत्येक समितीला पाळाव्या लागतात. एक म्हणजे, हे पारितोषिक कुणालाही मरणोत्तर देता येत नाही; हयात असणाऱ्या व्यक्तीलाच ते दिले जाते. त्यामुळे कित्येक कर्तबगार व्यक्ती या पारितोषिकाने विभूषित होऊ शकल्या नाहीत. दुसरी म्हणजे, एखाद्या वर्षी विशिष्ट पारितोषिकासाठी एकाहून अधिक व्यक्तींची निवड करता येते, मात्र तीनाहून अधिक व्यक्तींमध्ये ते विभागता येणार नाही.

## अर्थशास्त्रातील मानकरी

आता अर्थशास्त्रासाठी आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मृत्यर्थ दिल्या जाणाऱ्या बँक ऑफ स्वीडन पारितोषिकाच्या मानकऱ्यांचा विचार करू. 1969 ते 1992 या 23 वर्षांत एकंदर 32 अर्थशास्त्रज्ञ या पारितोषिकाचे मानकरी ठरले आहेत. त्यांचा तपशील सोबतच्या तक्त्यात दिला आहे.

## अर्थशास्त्रातील ' नोबेल 'चे मानकरी

| पारितोषिकाचे वर्ष | मानकरी आणि पारितोषिक मिळाले तेव्हाचे वय | अभ्यासक्षेत्र | पारितोषिक कशासाठी |
|---|---|---|---|
| 1969 | (1) **रॅग्नर फ्रिश,** ऑस्लो विद्यापीठ, नॉर्वे ( 74 वर्षे ) (2) **जान टिनबर्जेन,** दि नेदरलँड स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ( 66 वर्षे ) | समष्टी अर्थमिती ( Macro Econometrics ) | आर्थिक प्रक्रियांच्या विश्लेषणासाठी गतिक ( dynamic ) प्रतिमान विकसित करून त्याचा उपयोग करण्यासाठी. |
| 1970 | **पॉल ए. सॅम्युअल्सन,** मॅसॅच्युसेटस् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, अमेरिका ( 55 वर्षे ) | सर्वसाधारण समतोलाचा सिद्धान्त | स्थितिक ( static ) आणि गतिक अर्थशास्त्रीय सिद्धान्तांचा विकास करण्यासाठी केलेले शास्त्रीय कार्य आणि अर्थशास्त्रीय विश्लेषणाची पातळी उंचावण्यासाठी दिलेले सक्रिय योगदान यासाठी. |
| 1971 | **सायमन कुझनेटस्** हार्वर्ड विद्यापीठ, अमेरिका ( 70 वर्षे ) | विकासाचे अर्थशास्त्र | आर्थिक अभिवृद्धीचे अनुभवा-धिष्ठित विवरण केले ; त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेविषयी तसेच आर्थिक आणि सामाजिक संरचने-विषयी नवी आणि सखोल दृष्टी निर्माण होऊ शकली. |
| 1972 | (1) **जॉन आर. हिक्स,** ऑल सोल्स कॉलेज, ऑक्सफर्ड, इंग्लंड ( 68 वर्षे ) (2) **केनेथ जे. ॲरो,** हार्वर्ड विद्यापीठ, अमेरिका ( 51 वर्षे ) | सर्वसाधारण समतोलाचा सिद्धान्त आणि कल्याणाचे अर्थशास्त्र | सर्वसाधारण आर्थिक समतोलाचा सिद्धान्त आणि कल्याणाविषयीचा सिद्धान्त या क्षेत्रातील मार्गदर्शक योगदानाबद्दल. |
| 1973 | **वॅसिली लिऑंतिएफ,** हार्वर्ड विद्यापीठ, अमेरिका ( 67 वर्षे ) | निविष्टी–उद्‌विष्टी ( input-output ) विश्लेषण | निविष्टी–उद्‌विष्टी पद्धती विकसित करून तिचे आर्थिक समस्यांना प्रयोजन ( application ) करण्यासाठी. |

| पारितोषिकाचे वर्ष | मानकरी आणि पारितोषिक मिळाले तेव्हाचे वय | अभ्यासक्षेत्र | पारितोषिक कशासाठी |
|---|---|---|---|
| 1974 | (1) **गुन्नर मिर्दाल,** स्टॉकहोम विद्यापीठ, स्वीडन ( 76 वर्षे )<br>(2) **एफ. ए. फॉन हायेक,** फ्रीबर्ग विद्यापीठ, ऑस्ट्रिया ( 75 वर्षे ) | समष्टी अर्थशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र | पैसा आणि आर्थिक चढउतार ( fluctuations ) यांचे सिद्धान्त मांडण्यातील मूलगामी कार्य आणि आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मक घटितांच्या परस्परावलंबित्वाचे मूलगामी विश्लेषण यासाठी. |
| 1975 | (1) **लिओनिद कान्तोरोविच,** ॲकॅडेमिक सायन्सेस मॉस्को, सोव्हिएत रशिया ( 63 वर्षे )<br>(2) **जालिंग सी. कूपमन्स,** येल विद्यापीठ, अमेरिका ( 65 वर्षे ) | आदर्शवादी वाटणीचा ( Normative allocation ) सिद्धान्त | साधनसंपत्तीच्या इष्टतम वाटणीच्या सिद्धान्तासंबंधी दिलेल्या योगदानासाठी. |
| 1976 | **मिल्टन फ्रीडमन,** शिकागो विद्यापीठ, अमेरिका ( 64 वर्षे ) | समष्टी अर्थशास्त्र | उपभोगाचे विश्लेषण, पैशाचा इतिहास आणि पैशाचे अर्थशास्त्र या क्षेत्रातील महान कामगिरीबद्दल, त्याचप्रमाणे स्थिरीकरण ( stabilisation ) धोरणातील जटिलतेचे स्वरूप स्पष्ट करण्याबद्दल. |
| 1977 | (1) **बर्टिल ओहलिन,** स्टॉकहोम स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, स्वीडन ( 70 वर्षे )<br>(2) **जेम्स मीड,** केंब्रिज विद्यापीठ, इंग्लंड ( 79 वर्षे ) | आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय भांडवल स्थलांतर ( movement ) यासंबंधीच्या नवे मार्ग चोखाळणाऱ्या सिद्धान्तासाठी. |
| 1978 | **हर्बर्ट ए. सायमन** कार्नेजी-मेलॉन विद्यापीठ, अमेरिका ( 62 वर्षे ) | प्रशासन शास्त्र | आर्थिक संस्थांमधील निर्णय प्रक्रियेसंबंधीच्या मूलगामी संशोधनासाठी. |

| पारितोषिकाचे वर्ष | मानकरी आणि पारितोषिक मिळाले तेव्हाचे वय | अभ्यासक्षेत्र | पारितोषिक कशासाठी |
|---|---|---|---|
| 1979 | (1) **थिओडोर डब्ल्यू. शुल्ट्झ्,** शिकागो विद्यापीठ, अमेरिका ( 77 वर्षे )<br>(2) **डब्ल्यू. आर्थर लेविस** प्रिन्सटन विद्यापीठ, अमेरिका ( 64 वर्षे ) | विकासाचे अर्थशास्त्र | विकसनशील देशांच्या समस्यांच्या विशेष संदर्भात आर्थिक विकासाविषयीच्या मार्गदर्शक विश्लेषणासाठी. |
| 1980 | **लॉरेन्स आर. क्लाइन,** पेनसिल्व्हानिया विद्यापीठ, अमेरिका ( 60 वर्षे ) | समष्टी अर्थमिती | अर्थमितीची प्रतिमाने बनवून आर्थिक चढउतार आणि आर्थिक धोरणे यांच्या विश्लेषणातील त्यांच्या प्रयोजनासाठी. |
| 1981 | **जेम्स टोबिन,** येल विद्यापीठ, अमेरिका ( 63 वर्षे ) | समष्टी अर्थशास्त्र | वित्तीय बाजार आणि या बाजारांचे खर्चविषयक निर्णय, रोजगार, उत्पादन आणि किंमती यांच्याशी संबंध यासंबंधीच्या विश्लेषणासाठी. |
| 1982 | **जॉर्ज जे. स्टिगलर,** शिकागो विद्यापीठ, अमेरिका ( 71 वर्षे ) | औद्योगिक संघटन | औद्योगिक संरचना, बाजारांचे कार्य आणि सरकारी विनिमयाची (public regulation) कारणे व परिणाम यासंबंधीच्या मूलभूत संशोधनासाठी. |
| 1983 | **जेरार्ड डेब्रू,** कॅलिफोर्निया विद्यापीठ, अमेरिका ( 26 वर्षे ) | समतोलाचा सिद्धान्त | अर्थशास्त्रीय सिद्धान्तात नवीन विश्लेषण पद्धती समाविष्ट करण्याबद्दल तसेच सर्वसाधारण समतोलाच्या सिद्धान्ताची काटेकोर पुनर्मांडणी करण्यासाठी. |
| 1984 | **रिचर्ड स्टोन** केंब्रिज विद्यापीठ, इंग्लंड ( 71 वर्षे ) | राष्ट्रीय उत्पन्नाचे लेखांकन ( accounting ) | राष्ट्रीय हिशेबांच्या ( accounts ) पद्धतींच्या विकासामध्ये मूलभूत संशोधन केले आणि त्यायोगे अनुभवाधिष्ठित आर्थिक विश्लेषणाचे अधिष्ठान सुधारण्यात मोलाची मदत झाली यासाठी. |

| पारितोषिकाचे वर्ष | मानकरी आणि पारितोषिक मिळाले तेव्हाचे वय | अभ्यासक्षेत्र | पारितोषिक कशासाठी |
|---|---|---|---|
| 1985 | **फँको मॉदिग्लियानी,** मॅसॅच्युसेटस् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, अमेरिका ( 67 वर्षे ) | घरटी ( house-hold ) बचती विषयीची जीवन चक्र परिकल्पना ( life cycle hopothesis ) आणि व्यवसाय संस्था आणि भांडवली परिव्यय यासंबंधीचे सिद्धान्त. | बचती आणि वित्तीय बाजार या संबंधीच्या योगदानासाठी. |
| 1986 | **जेम्स. एम. बुकॅनन,** जॉर्ज मॅसन विद्यापीठ, अमेरिका | सार्वजनिक निवडीचा सिद्धान्त. | आर्थिक आणि राजकीय निर्णयांच्या सिद्धान्तात करार आणि घटनात्मक अधिष्ठानांचे विश्लेषण करण्यासाठी. |
| 1987 | **रॉबर्ट एम. सोलो,** मॅसॅच्युसेटस् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, अमेरिका | अभिवृद्धीचा सिद्धान्त. | अभिवृद्धीच्या सिद्धान्ताच्या मांडणीमध्ये केलेल्या मौलिक कार्यासाठी. |
| 1988 | **मॉरिस ॲलेस** ( Allais ), इकोल नॅशनल सुपिरिएर देस माइन्स, पॅरिस, फ्रान्स ( 77 वर्षे ) | बाजारातील समतोलाचा सिद्धान्त. | बाजार आणि साधनसंपत्तीचा कार्यदक्ष वापर या विषयीचा सिद्धान्त मांडल्याबद्दल. |
| 1989 | **ट्रिग्वे हावेल्मो** ( Haavelmo ), ऑस्लो विद्यापीठ, नॉर्वे ( 78 वर्षे ) | आर्थिक सिद्धान्त आणि अर्थमिती सिद्धान्त. | अर्थशास्त्रीय सिद्धान्ताची चाचणी (test) कशी घेता येते ते दाखवून दिल्याबद्दल. |

| पारितोषिकाचे वर्ष | मानकरी आणि पारितोषिक मिळाले तेव्हाचे वय | अभ्यासक्षेत्र | पारितोषिक कशासाठी |
|---|---|---|---|
| 1990 | (1) **हॅरी एम. मार्कोविटझ्,** सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क, अमेरिका ( 63 वर्षे ) | वित्तीय अर्थशास्त्र आणि निगम वित्तव्यवस्था यांचे सिद्धान्त. | रोखासंग्रहाच्या (Portfolio) निवडीचा सिद्धान्त मांडण्यासाठी. |
| | (2) **मर्टन एच. मिलर,** शिकागो विद्यापीठ, अमेरिका ( 67 वर्षे ) | | निगम वित्तव्यवस्थेच्या (Corporate finance) सिद्धान्ताच्या विकासातील मूलभूत योगदानासाठी. |
| | (3) **विल्यम एफ. शार्प,** स्टॅनफर्ड विद्यापीठ, अमेरिका ( 56 वर्षे ) | | वित्तीय मत्तांच्या किंमत निर्धारणाच्या सिद्धान्तात महत्त्वपूर्ण भर घातली. त्यासाठी 'भांडवली मत्ता किंमत निर्धारण प्रतिमान' ( Capital Asset Pricing Model – CAMP ) मांडले. |
| 1991 | **रोनाल्ड हॅरी कोझ,** शिकागो विद्यापीठ, अमेरिका ( 81 वर्षे ) | वित्तीय व्यवहार आणि व्यवसाय संस्था यांचे सिद्धान्त. | वित्तीय व्यवहारांचे परिव्यय ( transaction cost) आणि मालमत्तेचे हक्क ( property rights ) या संकल्पना सर्वप्रथम मांडून व्यवसाय संस्थांच्या आणि अर्थव्यवस्थांच्या कार्यप्रणालीतील त्यांचे औचित्य सुस्पष्टपणे विशद केल्याबद्दल. |
| 1992 | **गॅरी एस. बेकर,** शिकागो विद्यापीठ, अमेरिका ( 62 वर्षे ) | सहेतुक मानवी व्यवहारांचे सिद्धान्त. | सहेतुक मानवी व्यवहारांचे आर्थिक–सामाजिक विश्लेषण केल्याबद्दल. |

त्याचे अवलोकन केल्यास, पारितोषिकाच्या पहिल्याच वर्षी ते विभागून दिले गेले आहे. 32 वर्षांच्या कालखंडात सहा वेळा ते दोघात आणि एकदा तिघात विभागले गेले. कालखंडानुसार पाहिल्यास 1969 ते 1979 या अकरा वर्षांत सहा वेळा ते दोघात विभागले गेले. 1980 ते 1989 या दशकात दरवर्षी ते फक्त एकाच अर्थशास्त्रज्ञाला मिळाले. 1990 हे एकमेव वर्ष असे आहे की जेव्हा तिघांमध्ये हे पारितोषिक विभागून देण्यात आले आहे.

नोबेल पारितोषिक मरणोत्तर दिले जात नसल्यामुळे 1969 पासून पुढे हयात नसलेल्या कोणाही अर्थशास्त्रज्ञाला हे पारितोषिक मिळू शकले नाही. याच कारणाने विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या, मात्र 1969 नंतर हयात नसलेल्या, नामांकित अर्थशास्त्रज्ञांना या सन्मानापासून वंचित राहावे लागले.

'नोबेल'चा सन्मान मिळविणाऱ्या 32 अर्थशास्त्रज्ञांपैकी त्यानंतरच्या कालात फक्त पाच अर्थशास्त्रज्ञ स्वर्गवासी झाले. ते म्हणजे रॅग्नर फ्रिश, जे. आर. हिक्स, गुन्नर मिर्दाल, लिओनिद कान्तोरोविच आणि बर्टिल ओहलिन. इतर 27 अर्थशास्त्रज्ञ अजूनही आपल्या कार्यात मग्न आहेत.

वयाच्या संदर्भात विचार केल्यास, फक्त चौघांना 50 ते 60 वर्षे वयाच्या दरम्यान नोबेल पारितोषिक मिळाले. बाकी 28 जणांना ते वयाची साठी उलटल्यानंतर मिळाले. त्यातही 65 ते 70 वयोमर्यादेत 8, 60 ते 64 वयोमर्यादेत 7 तसेच 75–80 वयोमर्यादेत 6 मानकरी आढळतात. सर्वात कमी वयाला (51 वर्षे) हा सन्मान मिळविणारे के. जे. ॲरो (वर्ष 1972) आहेत, तर सर्वात जास्त वयाला (81 वर्षे) हा सन्मान रोनाल्ड कोझ (वर्ष 1991) यांना मिळाला. ॲरो यांच्या नंतर क्रमाने येतात पॉल सॅम्युअल्सन (55 वर्षे, वर्ष 1970), विल्यम शार्प (56 वर्षे, वर्ष 1990) आणि लॉरेन्स क्लाइन (60 वर्षे, वर्ष 1980).

पारितोषिकांच्या निवडीचा आणि मानकऱ्यांच्या जन्मवर्षाचा एकत्रित विचार केल्यास यामध्ये काही निश्चित प्रवृत्ती आढळतात. पहिली गोष्ट म्हणजे, 32 मानकऱ्यांमधील बहुसंख्य मानकरी 1901–20 या विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात जन्मलेले आहेत. रॅग्नर फ्रिश (1895), गुन्नर मिर्दाल (1898) आणि बर्टिल ओहलिन (1899) हे तीनच मानकरी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षांत जन्मलेले आहेत. यावरून, 1989 पर्यंतची पारितोषिके ज्या ज्या अर्थशास्त्रज्ञांना मिळाली ते सर्व 1895 ते 1920 या कालखंडात जन्मलेल्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. याला अपवाद फक्त जेरॉर्ड डेब्रू (जन्म 1921, पारितोषिक 1983) यांचाच सापडतो. परंतु यामुळे मूळ निष्कर्षाला बाधा येण्याचे कारण नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, आज जे 5 'नोबेल'चे मानकरी काळाच्या पडद्याआड झाले आहेत त्यापैकी रॅग्नर फ्रिश (जन्म 1895), गुन्नर मिर्दाल (जन्म 1898) आणि बर्टिल ओहलिन (जन्म 1899) हे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षांचे प्रतिनिधी होते. पाचवे जे. आर. हिक्स 1904 मध्ये जन्मले. दिवंगत कान्तारोविच (जन्म 1912) हे मात्र तुलनेने लवकर इहलोकी गेले. म्हणजे इथे अस्तंगत होण्याचा क्रमही सामान्यत: कालक्रमानुसारच दिसतो. तिसरी गोष्ट म्हणजे, 1990 पासूनचे मानकरी 1920 नंतर जन्मलेले आढळतात, यातही 1991 या वर्षाच्या मानकऱ्यांचा (रोनाल्ड कोझ, जन्म 1910) अपवाद आहे. जरी नेमकी प्रवृत्ती निश्चितपणे स्पष्ट झालेली नसली तरी, पुसटशी का असेना तशी कल्पना येते आहे. आता यापुढे येणारे 'नोबेल'चे मानकरी शक्य तो 1920 नंतर जन्मलेल्या पिढीतलेच असण्याची शक्यता आहे.

'नोबेल' मानकऱ्यांच्या देशनिहाय विभाजनाकडे पाहू. याठिकाणी संबंधित व्यक्ती मूळ कोणत्या देशाची आहे असा विचार केलेला नाही. त्याऐवजी पारितोषिक मिळाले तेव्हा ती व्यक्ती कोणत्या देशातील कोणत्या संस्थेत काम करीत होती हा निकष लावला आहे. त्यानुसार 32 पैकी 21 पारितोषिकधारक अमेरिकेतील होते. त्यातदेखील मॅसाच्युसेटस् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी – हार्वर्ड विद्यापीठ आणि शिकागो विद्यापीठ अग्रेसर आहेत. अर्थशास्त्रातील 'नोबेल'च्या मानकऱ्यांची निर्मिती करणाऱ्या या जगातील सर्वात मोठ्या खाणी आहेत असेच म्हणावे लागते. अमेरिकेच्या पाठोपाठचा क्रम आहे इंग्लंडचा (3 मानकरी). नॉर्वे आणि स्वीडन यांचे प्रत्येकी दोन मानकरी आहेत आणि शेवटी नेदर्लंड्स्, ऑस्ट्रिया, सोव्हिएत रशिया आणि फ्रान्स

यांना प्रत्येकी एकाच पारितोषिकावर समाधानी राहावे लागले आहे. याचा अर्थ असा की, अजून तरी 'नोबेल'च्या पातळीवर पोचू शकतील असे कर्तबगार अर्थशास्त्रज्ञ हे अमेरिका आणि पश्चिम युरोपच्या मातीतच जन्मताहेत. अतिविकसित देश आणि 'नोबेल' यांचे सरळसरळ नातेसंबंध आहेत असेच यातून ध्वनित करता येईल. तथापि, जपानसारख्या अतिविकसित देशाने मात्र आजतागायत एकही 'नोबेल' सन्मानित अर्थशास्त्रज्ञ जगाला दिलेला नाही, हेदेखील या पार्श्वभूमीवर लक्षात घ्यावयास हवे. सर्वच न्यून विकसित देश यापासून बरेच दूर आहेत हे स्पष्ट आहे. त्याचे एक संभाव्य कारण म्हणजे, विकसनशील देशांतील अर्थशास्त्रज्ञांना निकडीची गरज म्हणून विकासाच्या कामांच्या आखणीकडे आणि विश्लेषणाकडे बरेच लक्ष द्यावे लागते. त्यामुळे मूलभूत सैद्धान्तिक विश्लेषणासाठी त्यांच्याकडे वेळेचा आणि विचाराचा प्रकर्षाने अभाव जाणवतो.

शेवटी, या सर्व पारितोषिकप्राप्त अर्थशास्त्रज्ञांनी कोणत्या विषयात केलेल्या संशोधनाबद्दल त्यांना हा गौरव झाला ? विषयक्षेत्राकडे नजर टाकल्यास त्यामध्ये बरीच विविधता आढळते. आर्थिक व्यवहारांच्या विविध अंगांचे सैद्धान्तिक विश्लेषण करण्याचे कार्य सर्वच अर्थशास्त्रज्ञांनी केले. आणि ते करताना विचारांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न होता. त्यासाठी त्यांचे कार्य गौरविले गेले. यामध्ये समष्टी पातळीवरील अर्थसिद्धान्तांचा भाग सर्वाधिक आहे. त्यातील काही मांडणी अर्थमितीच्या क्षेत्रातील तर काही सर्वसाधारण समतोलाच्या सिद्धान्तातील आहे. विकासाच्या अर्थशास्त्रातील सैद्धान्तिक विश्लेषणाबद्दल चौघांना आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रासंबंधीच्या सिद्धान्तनाबद्दल तिघांना सन्मानित करण्यात आले. कल्याणाच्या अर्थशास्त्राचे क्षेत्र चौघांनी चोखाळले. वित्तीय बाजारासंबंधीची मीमांसा पाच अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणात झालेली आहे, व्यवसाय संस्थेशी संबंधित संशोधनात व्यवसाय संस्थेचा सिद्धान्त, बाजारातील समतोल आणि आर्थिक संस्थांमधील निर्णय प्रक्रिया यांचा समावेश करता येईल. राष्ट्रीय उत्पन्नासंबंधी फक्त एकाच मान्यवरांचे लिखाण मान्यता पावले. सामाजिक–आर्थिक व्यवहारांना अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाच्या चौकटीत बसविण्याचा एक प्रयत्न 1992 च्या पारितोषिकासाठी मान्यता पावला आहे. विषयाची विविधता आहे. त्यामुळे अर्थशास्त्र एक शास्त्र म्हणून विविध अंगांनी समृद्ध होत गेले आहे.

जाताजाता औत्सुक्याची बाब म्हणून दोन गोष्टींचा उल्लेख करता येईल. नोबेल पारितोषिकाने दोनदा सन्मानित झालेल्या मोजक्याच व्यक्ती इतर क्षेत्रात आहेत. अर्थशास्त्रात हा सन्मान अजून कोणालाही मिळालेला नाही. दुसरे, एकाच घरातील नातेसंबंध असलेल्या दोन व्यक्तींना कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात 'नोबेल' मिळाल्याची थोडी उदाहरणे आहेत. त्यामध्ये अर्थशास्त्रज्ञांची दोन उदाहरणे सापडतात. मात्र दुसऱ्या व्यक्तीचे क्षेत्र अर्थशास्त्र नाही. गुन्नर मिर्दाल यांच्या पत्नी अल्वा मिर्दाल याना 1982 चे शांतता पारितोषिक मिळाले आणि जान टिनबर्जेन यांचे बंधू निकोलस टिनबर्जेन 1973 च्या वैद्यकशास्त्रातील पारितोषिकाचे मानकरी होते. अशा प्रकारचे योगायोग क्वचितच आढळणे स्वाभाविक आहे.

## संदर्भ सूची


1 Kapila, Rituraj & Abha (eds.), CONCISE ENCYCLOPAEDIA OF NOBEL LAUREATES, Academic Foundation, Delhi, 1992.

2 THE NOBEL PRIZES, 1991, Almqvist & Wiksell International, Stockholm, Sweden, 1992.

3 Lindbeck Assar (ed.), NOBEL LECTURES IN ECONOMIC SCIENCES (1969-1980), World Scientific, Bangalore, 1992.

4 Maler, Karl–Goran (ed.) NOBEL LECTURES IN ECONOMIC SCIENCES (1981 – 1990), World Scientific, Bangalore, 1992.


□ □

# आर्थिकवार्ता

संकलन :

**सु. गो. भानुशाली ***

## 1

### मॅस्ट्रिच करार

डिसेंबर 1991 मध्ये युरोपीय आर्थिक समाजाच्या बारा घटक राष्ट्रांची नेदरलँडमधील मॅस्ट्रिच शहरी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयदृष्टचा महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी तसेच एकात्मिक युरोप प्रस्थापित करण्याचा मार्ग सुकर करण्यासाठी एक बैठक झाली. या शिखर परिषदेत मान्य करण्यात आलेल्या ठरावांना 'मॅस्ट्रिच करार' या नावाने संबोधले जाते. युरोपीय आर्थिक समुदायाच्या बारा घटक राष्ट्रांनी या करारात कोणताही बदल न करता मान्यता देऊन त्याची अमलबजावणी करावयाची आहे.

मॅस्ट्रिच करारातील प्रमुख ठराव असे आहेत.

(1) 1999 पर्यंत सर्वसाधारण युरोपीय चलनाचा वापर सुरू करावा.

(2) स्थैर्य निर्माण करण्याकरिता आर्थिक समुदायाची स्वतंत्र मध्यवर्ती बँक स्थापन करणे.

(3) सध्या अस्तित्वात असलेल्या समन्वयीत परराष्ट्र धोरणाऐवजी एकत्रित परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणाची निर्मिती करणे.

(4) स्वतंत्र संरक्षण धोरणाचा विकास करून पाश्चिमात्य युरोपीय प्राधिकरणामार्फत त्याची अमलबजावणी करणे. उत्तर अटलांटिक करार संघटना युरोपच्या संरक्षणाचा प्रमुख आधार असेल.

(5) आरोग्य, संशोधन, ग्राहक संरक्षण आणि संस्कृती या बाबतीत आर्थिक समुदायाचे कायदे तयार करता यावेत म्हणून युरोपीय संसदेला ज्यादा अधिकार देणे.

* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर आणि सहायक संपादक, 'अर्थसंवाद'.

(6) पारपत्राच्या बाबतीत समान धोरण राहील, पण परदेशवास आणि राजकीय आश्रय या बाबी स्वतंत्रपणे हाताळल्या जातील.

(7) आर्थिक समुदायातील नागरिकांना प्रत्येक सभासद देशात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्याचे स्वातंत्र्य आणि मतदानाचे अधिकार प्रदान करणारी 'युरोपीय नागरिकत्वाची' प्रणाली निर्माण करणे.

मॅस्ट्रिच करारामुळे युरोपीय चलन संघामध्ये युरोपीय मध्यवर्ती बँक आणि युरोपीय मध्यवर्ती बँकप्रणाली निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेले चलनविषयक, वित्तीय आणि आर्थिक धोरणांचे पद्धतशीरपणे एकात्मीकरण करणे शक्य झाले आहे.

1 जानेवारी 1993 पासून युरोपीय चलन एकक ( European Currency Unit–ECU ) अमलात आणले असून त्याचे मूल्य स्थिर राखण्यासाठी आवश्यक असणारे चलनविषयक धोरण आखण्यास युरोपीय चलन संघाने सुरवात केली आहे.

□ □

## 2

## कर सुधारणा समितीचा अहवाल

या समितीची रचना पुढीलप्रमाणे होती.

(1) डॉ. राजा. चे. चेलिया – अध्यक्ष
(2) श्री. एस. व्ही. अय्यर – सभासद
(3) डॉ. अमरेश बागची – सभासद
(4) श्री. व्ही. राजारामन – सभासद
(5) श्री. व्ही. यु. एरडी – सभासद सचिव

### समितीची कार्यकक्षा

(1) प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची लवचिकता सुधारण्याचे मार्ग सूचित करणे आणि एकूण कर उत्पन्नातील तसेच एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील करांचा हिस्सा वाढविण्याचे मार्ग सुचविणे.

(2) मुख्यत्वे वस्तूंवरील आणि व्यक्तींवरील करांच्या दरात आवश्यक सुधारणा सुचवून करपद्धतीचा पाया विस्तृत करण्यासंबंधी आणि ही पद्धती उचित करण्यासाठी शिफारशी करणे.

(3) प्रत्यक्ष कर पद्धतीतील असंबद्धता काढून टाकून त्यातील समन्याय ( equity ) सुधारण्यासाठी आणि आर्थिक प्रेरणा कायम ठेवण्यासाठी या पद्धतीचे सुसूत्रीकरण सुचविणे.

(4) करांचे नवे मार्ग सुचविणे.

(5) प्रत्यक्ष कर भरण्याचे आणि कर प्रस्तावांची अमलबजावणी सुधारण्याचे मार्ग सुचविणे.

(6) करातील अनावश्यक असलेल्या वजावटी काढूनटाकणे, कर दरातील अपस्करण ( dispersion ) व बहुविधता कमी करण्याच्या दृष्टीने सीमाशुल्क ( customs duties ) दरांचे सुलभीकरण व सुसूत्रीकरण सुचविणे.

(7) अर्थव्यवस्थेची स्पर्धात्मकता वाढविण्याच्या उद्देशाने तसेच राजकोषीय समायोजनाकरिता (adjustment) ज्यादा साधने गोळा करण्यासाठी प्रशुल्क ( tariff ) दरात घट सुचविणे.

(8) कर जास्त भरले जावेत आणि त्यांचे प्रशासन सुधारावे म्हणून अबकारी कराच्या ( exice duty ) संरचनेचे सुसूत्रीकरण आणि सुलभीकरण सुचविणे.

(9) मॉडव्हॅट ( MODVAT ) पद्धती विस्तृत करण्याची शक्यता तपासणे.

(10) वरील मुद्यांशी संबंधित अथवा त्यांच्याशी अनुषंगिक असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी शिफारशी करणे.

### करसुधारणेची निर्देशक तत्त्वे

समितीने शिफारस केलेल्या सुधारणा पुढील निर्देशक तत्त्वावर आधारित आहेत.

(1) नागरिकांसाठी, विशेषतः संभाव्य कर–दात्यांसाठी, करपद्धती आणि करभार न्याय्य असावेत.

(2) आपला पूर्वानुभव आणि करपद्धतीवर परिणाम करणारी एकूण परिस्थिती विचारात घेता, विस्तृत पाया आणि माफक दर असलेली पद्धती श्रेयस्कर होय.

(3) करपद्धती प्रगतशील (progressive) असावी असे असले तरी बेहिशेबी उत्पन्न आणि मत्ता निर्माण करण्यास प्रोत्साहन देण्याइतकी ती प्रगतशील असणे योग्य नाही.

(4) आर्थिक दृष्टिकोनातून करपद्धती तर्कसंगत असणे आवश्यक आहे. यासाठी एकदा प्रस्थापित झालेली कर संरचना देशाच्या आर्थिक परिस्थितीत आमूलाग्र रूपांतरण झाल्याखेरीज बदलू नये. कर संरचनेत दरवर्षी बदल केल्यास त्यातील तर्कसंगती बिघडते आणि त्यात गुंतागुंती निर्माण होतात.

(5) करपद्धती शक्य तेवढी सोपी असावी. सरकारसाठी वाजवी व कार्यक्षम पद्धतीने महसूल गोळा करणे, राष्ट्रीय उत्पन्नाचे पुनर्वाटप करणे आणि काही उपक्रम कमी करणे यापुरतीच करव्यवस्थेची उद्दिष्टे सीमित असावीत. सोप्या करपद्धतीत करांचे मोजके दर असतील, तसेच मोजक्या सवलती आणि वजाती (deductions) असतील. कर अधिकाऱ्यांना कायद्याचा अर्थ लावण्याचे स्वेच्छाधीन अधिकार (discretionary powers) किमान असतील.

(6) कर प्रशासनात आधुनिकता आणून तिच्या अमलबजावणीत लक्षणीय सुधारणा घडविणे.

(7) सुचविलेली कर सुधारणा पूर्णपणे अथवा जास्तीत जास्त महसूल तटस्थ असली पाहिजे. तरीसुद्धा एकूण करपद्धती जास्त प्रमाणात उत्पन्न लवचिक झाली पाहिजे.

## शिफारशी

या तत्त्वांचा आधार घेऊन समितीने पुढीलप्रमाणे करविषयक आणि प्रशासकीय शिफारशी केल्या आहेत.

**आयकर**

कर भरण्यासंबंधी आणि प्रशासकीय कारणांसाठी एक दर असलेली आयकरपद्धती सर्वात सोपी होय. तथापि, व्यावहारिक दृष्टिकोनातून विविध करदात्यां–साठी खालील कर दरांची यादी समितीने सुचविलेली आहे.

(1) व्यक्ती म्हणून करदात्यांसाठी करपात्र वार्षिक उत्पन्नाची किमान मर्यादा 28,000 रुपयांची असावी. त्यापुढील उत्पन्नावरील कराची आकारणी खालील दराने करावी.

28,000 ते 50,000 रुपये : 20 टक्के
50,000 ते 2,00,000 रुपये : 27·5 टक्के
दोन लक्ष रुपयांपेक्षा जास्त : 40 टक्के

(2) 'निर्देशित हिंदु अविभक्त कुटुंब' आणि 'अनिर्देशित हिंदु अविभक्त कुटुंब' यामधील फरक तसाच असावा. 12,000 ते 1,00,000 रुपयांपर्यंतच्या, उत्पन्न असलेल्या 'अनिर्देशित हिंदु अविभक्त कुटुंबा–वरील कराचा दर सध्याचाच असावा. 1,00,000 रुपयांवरील उत्पन्नासाठी तो 40 टक्के असावा.

(3) स्थानिक प्राधिकरणासाठी आयकराचा दर सरसकट 30 टक्के असावा.

(4) आंतर्देशीय कंपन्यांवरील आयकराचा दर येत्या तीन वर्षात क्रमशः कमी करीत अधिभारासह 40 टक्क्यांवर आणावा.

5) पतीपत्नी या दोघांचे, तसे पाहता कुटुंबा–तील सर्व प्रौढ व्यक्तींचे, उत्पन्न आयकराच्या मोजणी–साठी एकत्रित करणे जरुरीचे असले तरी ते शक्य नसल्यामुळे कुटुंबातील मत्तेचे विभाजन निश्चित कर–ण्यासाठी पतीपत्नीचे उत्पन्न एकत्रित करण्यातील आयकर कायद्यातील खबरदारीच्या उपायांची अमल–बजावणी चालू ठेवणे आवश्यक आहे.

(6) आयकर कायद्याखाली देण्यात येणाऱ्या खालील वजावटी काढून टाकण्यात याव्यात :

(अ) सूचीबद्ध (listed) साहाय्य रोख्यांवरील व्याज;

(आ) निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पैशातून सूचीबद्ध योजनांमध्ये केलेल्या गुंतवणुकींवर शासनाकडून मिळणारे व्याज;

(इ) विनिर्दिष्ट साधनांपासून मिळणारे उत्पन्न.

(7) भविष्यनिर्वाह निधी, राष्ट्रीय बचतपत्रे या बाबतीत असलेली कर वजावटीची पद्धत सुरू असावी, पण त्याची मर्यादा कमाल 10,000 रुपयांपर्यंत कमी करावी. भविष्य निर्वाह निधी, जीवन विम्याचे हप्ते आणि घरबांधणीसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते यापुरतीच आयकराची सवलत मर्यादित करावी. जीवनधारा, जीवन अक्षय, आयुर्विमा महामंडळाची वार्षिकी योजना, भाग खरेदीशी निगडित असलेल्या बचत योजना यावरील कर सवलत रद्द करावी.

(8) राष्ट्रीय बचत योजनेतील गुंतवणुकीची कमाल मर्यादा 40,000 रुपयांवरून वाढवून 50,000 रुपये करावी.

(9) मान्यताप्राप्त संस्था अथवा संघ यानाच दिलेल्या देणग्या करमुक्त असाव्यात. इतर देणग्यांवरील कर सवलत कमी करून 50 टक्क्यांवर आणावी.

(10) वेतनेतर लाभाच्या मूल्यांकनासंदर्भात शासन, खाजगी तसेच सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभामधील तफावत काढून टाकण्यात यावी. विनामूल्य अथवा सवलतीच्या दराने पुरविलेल्या राहण्याच्या घराचे मूल्य वेतनाच्या वीस टक्के एवढे धरण्यात यावे. 'वेतन' या संज्ञेखाली देण्यात येणारी वार्षिक रक्कम 36,000 रुपयांपेक्षा कमी असल्यास, वेतनेतर लाभाचे मूल्य शून्य धरण्यात यावे. घरभाडे भत्त्यावर आयकर कायद्यात दिलेली वजावट काढून टाकावी. मात्र त्याना दिलेल्या भाड्यावर वजावट देण्यात यावी. मालकाने कर्मचाऱ्यांना राहण्याचे घर पुरविण्यावरील प्रत्यक्ष खर्च कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या 20 टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास त्यावर 30 टक्के दराने वेतनेतर लाभावरील कर आकारण्यात यावा. रजेच्या कालातील प्रवास खर्चाच्या, निवृत्तीच्या वेळी गावी जाण्याच्या प्रवास खर्चाच्या आणि यासारख्या खर्चाच्या 80 टक्के रकमेवर आयकर आकारावा. विधानसभा, विधानपरिषद आणि संसद सदस्यांना दिल्या जाणाऱ्या भत्त्यांवर कर आकारावा. कर्मचाऱ्याला दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याज दरात 12 टक्क्यां- पेक्षा कमी दराने केलेला आकार वेतनेतर लाभ म्हणून गणण्यात यावा. परंतु या कर्जातून घर अथवा उत्पन्न देणारी जिंदगी निर्माण केली असल्यास व्याजाच्या दरा- तील सूट कर आकारणीच्या वेळेस विचारात घेऊ नये.

(11) भांडवली लाभ मोजण्यासाठी 1 एप्रिल 1974 पूर्वी घेतलेली मत्ता 1 एप्रिल 1974 रोजी हस्तगत करण्यात आली आहे असे मानावे. या जिंद- गीचा हस्तगत करण्याचा परिव्यय मोजण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांकाच्या 75 टक्के इतकी परिव्यय वृद्धी विचारात घ्यावी. व्यक्तीला भांडवली लाभासाठी 27·5 टक्के आणि व्यवसाय संस्थांना 40 टक्के दराने कर आकारावा. भागीदारी संस्थांच्या बाबतीत भांडवली लाभ भागीदारांच्या भांडवलाच्या हिश्श्यांच्या प्रमाणात वाटावा. भांडवली तोटा याच पद्धतीने विचारात घ्यावा.

(12) मत्तेच्या वार्षिक मूल्याच्या एकपंचमांश इतकी रक्कम मत्तेच्या दुरुस्तीचा आणि भाडे गोळा करण्याचा खर्च याकरिता वैधानिक प्रमाणित वजावट म्हणून मान्य करावी.

(13) **भागीदारी संस्था :** सर्व भागीदारी संस्था समान लेखल्या जाव्यात. त्यावरील सध्याचा स्वतंत्र कर रद्द करावा. भागीदारांना दिलेले व्याज, वेतन, बोनस, अडत यावरील खर्चासाठी भागीदारी संस्थेला उत्पन्नाची गणती करताना वजावट द्यावी. सर्व संघ, संस्था यावर व्यवसाय संस्थांप्रमाणेच कर आकारणी करावी. अशा संस्थांकडे भरणा झालेल्या पैशावर मुळात कापलेल्या करावर वजावट देऊ नये, मात्र अशा संस्थांना ही रक्कम भागीदारांमध्ये, त्यांच्या नफ्यातील हिश्श्याच्या प्रमाणात, वाटण्यास मुभा असावी. भागी- दारांना संस्थेकडून मिळालेल्या आणि इतर उत्पन्ना- वरील कर भागीदार संस्थेने आगाऊ भरावा. भागी- दारी संस्थेने आपल्या भागीदाराला दिलेले व्याज, वेतन, बोनस, अडत अथवा मोबदला यांची रक्कम, त्याचा नफ्यातील हिस्सा तसेच कापलेला कर या सर्वांची विगत दर्शविणारे प्रमाणपत्र भागीदाराला द्यावे. संस्थेने कर विवरणपत्र मुदतीनंतर भरल्यास तिच्या उत्पन्नाच्या अर्धा टक्का, पण दोनशे रुपयांपेक्षा

कमी नसेल इतका, दंड आकारावा आणि व्यक्ती कर-दात्यांना द्याव्या लागणाऱ्या कमाल करदराने कर आकारणी करावी. संस्थेमध्ये बेनामी भागीदार असल्याचे सिद्ध झाल्यास संस्थेच्या उत्पन्नावर कमाल दराने कर आकारणी करावी.

(14) **सहकारी संस्था :** सहकारी संस्थांना होणाऱ्या नफ्यावरील वजावट 20 टक्क्यांइतकीच मर्यादित असावी; 80 P या कलमाखाली मिळणारी वजावट (रु. 25,000) रद्द करण्यात यावी. या रकमेपेक्षा ज्यादा उत्पन्नावर सरसकट 30 टक्के दराने आयकर आकारण्यात यावा.

(15) **व्यापारी संस्था :** लहान प्रमाणावर व्यापार करणाऱ्या, परंतु करपात्र उत्पन्नाइतके उत्पन्न मिळविणाऱ्या व्यापारी संस्थांना राष्ट्रीय करव्यवस्थेला हातभार लावता यावा म्हणून दोन सोप्या योजनांची शिफारस करण्यात आली आहे.

**(अ) संभाव्य कर योजना :** तीन ते पाच लक्ष रुपयांपर्यंत वार्षिक उलाढाल असणाऱ्या व्यापाऱ्यांनी आणि उत्पादकांनी कर विवरणपत्र न भरता एक हजार रुपये कर भरावा. अशा व्यापाऱ्यांचे अथवा उत्पादकांचे इतर उत्पन्न स्वतंत्रपणे विचारात घेण्यात यावे. दलाली-पासून 25,000 रुपयांपेक्षा जास्त असणाऱ्या उत्पन्नावर आणि इतर मार्गांनी 10,000 रुपयांपेक्षा जास्त असणाऱ्या उत्पन्नावर 20 टक्के दराने कर आकारावा. मात्र अशा उत्पन्नावर मुळात कापलेल्या कराचा परतावा देण्यात येऊ नये. तसेच आयकर कायद्यातील विविध कलमांन्वये बचतीवर देण्यात येणारी वजावट या करदात्यांना मिळणार नाही. कराची ही रक्कम 15 मार्चपूर्वी एकरकमी भरणे बंधनकारक राहील.

**(आ) अंदाजित उत्पन्न योजना :** पाच लक्ष रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असणारे तसेच 25,000 रुपयांपेक्षा जास्त दलालीचे उत्पन्न आणि व्याज, लाभांश यासारख्या मार्गांनी 10,000 रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणारे व्यापारी आणि उत्पादक या योजनेखाली येतात. या योजनेनुसार कर आकारणी पुढील-प्रमाणे करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 1 | उत्पादक व व्यापारी व्यवहार | उलाढालीच्या 8 टक्के |
| 2 | दलाली | उत्पन्नाच्या 50 टक्के |
| 3 | वाहतूक अथवा बांधकामाची कंत्राटे | उत्पन्नाच्या 10 टक्के |
| 4 | व्याज, लाभांश, भाडे, निर्यात प्रोत्साहन योजना यापासूनचे उत्पन्न | उत्पन्नाच्या 80 टक्के |

आयकर कायद्यातील विविध कलमांखाली बचतीवर उपलब्ध असलेली वजावट मिळण्यास हे करदाते पात्र ठरतील. या योजनेखाली येणाऱ्या करदात्यांना कराची रक्कम आगाऊ भरावी लागेल. करदात्यांनी आपल्या उत्पन्नाचे एक साधे विवरणपत्र नजिकच्या आयकर कार्यालयात दाखल करावे. कंत्राटदारांच्या बाबतीत कंत्राटाच्या मूल्याच्या 10 टक्के आणि ट्रक मालकाच्या बाबतीत आंतरराज्य परवाना असलेल्या प्रत्येक ट्रकचे मासिक उत्पन्न 4,000 रुपये आणि राज्यापुरता परवाना असलेल्या ट्रकचे मासिक उत्पन्न 3,000 रुपये धरून आकारणी करावी.

(16) **व्यवसाय संस्था :** व्यवसाय संस्थांच्या उत्पन्नावरील कराचा दर 40 टक्क्यांपर्यंत कमी करावा. संयंत्र व यंत्रसामग्रीवरील घसाऱ्याची मर्यादा मूल्याच्या 25 टक्के इतकी असावी. कंपन्यांचे समायोजन ( adjustments ), आपसातील व्यवस्था आणि पुनर्निर्माण यावर भांडवली लाभ अथवा देणगी कर आकारू नये. यासारख्या आणि संयुक्तीकरणाच्या ( combination ) प्रक्रियेतून भागधारकांना मिळणाऱ्या भागाला अथवा मत्तेला आयकर कायद्याचे 2(22) कलम लागू होणार नाही.

(17) **विदेशी व्यवसाय संस्थांच्या भारतीय शाखा :** भारतीय व्यवसाय संस्थांवर अधिभार धरून आकारल्या जाणाऱ्या आयकराचा सध्याचा दर (51·75 टक्के) आणि विदेशी व्यवसाय संस्थांच्या भारतीय शाखांवर आकारल्या जाणाऱ्या आयकराचा सध्याचा दर (65 टक्के) यामध्ये बरीच तफावत आहे. या समितीने भारतीय व्यवसाय संस्थांवरील कराचा दर 40 टक्क्यांपर्यंत कमी करण्याची सूचना केली आहे.

त्यामुळे ही तफावत आणखी वाढते. समितीची सूचना अशी आहे की, या दोन प्रकारच्या संस्थांवरील कराच्या दरात 7·5 ते 10 टक्क्यांपेक्षा जास्त तफावत असू नये.

विदेशी भांडवल आणि तंत्रविज्ञान यांचा ओघ वाढविण्याच्या दृष्टीने तांत्रिक सेवा पुरविल्याबद्दलचे शुल्क आणि विदेशी तंत्रज्ञांना दिलेल्या वेतनावरील आकारला जाणारा दुहेरी कर रद्द करावा. तसेच विदेशी चलनाच्या स्वरूपात दिले जाणारे मानधन, शुल्क यांचे करनिर्धारणासाठी रुपयात केले जाणारे रूपांतर निश्चित करण्यासाठी प्रत्यक्षात ज्या दिवशी विदेशी चलन खरेदी केले त्या दिवसाचा विनिमय दर विचारात घ्यावा. अनिवासी लोकांना प्रत्यक्ष विदेशी चलन दिले असल्यास करनिर्धारणासाठी त्याचे रुपयातील मूल्य ज्या दिवशी त्या व्यक्तीला ती रक्कम मिळाली त्या दिवसाच्या विनिमय दराने ठरविण्यात यावे.

(18) **न्यास** : सर्व प्रकारच्या न्यासांना (Trusts), ते कोणत्याही तारखेस स्थापन झाले असले तरी, कायद्याच्या तरतुदी समान असाव्यात. न्यासाशी संबंधित असलेल्या अथवा इतर कोणत्याही व्यवसायापासून न्यासाला झालेले पाच लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त असावे.

(19) व्याजावरील कर रद्द करावा. भेट देण्याची करमर्यादा 30,000 रुपयांपर्यंत वाढवावी.

**(आ) संपत्ती कर**

अनुत्पादक म्हणून गणल्या जाणाऱ्या संपत्तीखेरीज इतर संपत्तीवरील कर रद्द करावा. अशा करासाठी निव्वळ संपत्ती कराची नवी योजना सुचविली आहे ती अशी.

नगरपालिका अथवा लष्कर हद्दीपासून 25 किलोमीटरपर्यंत असलेली राहण्याची घरे, नागरी जमीन, भाड्याने दिल्या न जाणाऱ्या मोटारी, मौल्यवान धातू आणि जडजवाहीर, व्यापारी उपयोगाशिवाय इतर कारणांसाठी वापरल्या जाणाऱ्या क्रीडा नौका, बोटी व विमाने यांचे मूल्य 15 लक्ष रुपयांपेक्षा जास्त असल्यास त्यावर एक टक्का दराने कर बसवावा.

लहान मुलांच्या मालकीच्या संपत्तीचे मूल्य त्यांच्या पालकांच्या संपत्तीच्या मूल्यात जमा करून कर आकारणी करावी. एक लक्ष रुपयांपेक्षा जास्त करपात्र उत्पन्न असणाऱ्या आयकर दात्यांनाही निव्वळ संपत्तीचे विवरण पत्र भरावे लागेल. खाजगी व सरकारी कंपन्यांच्या मालकीच्या निर्देशित संपत्तीवरही हा कर भरावा लागेल. अशी भरलेली कराची रक्कम आयकर निश्चितीसाठी खर्च म्हणून मान्य करण्यात येणार नाही.

**(इ) कर प्रशासनातील सुधारणा**

कार्यांची परस्पर व्याप्ती, नेमून दिलेल्या कामाच्या अमलबजावणीवरील वास्तव नियंत्रणाची वानवा, हाताने करावयाच्या अकार्यक्षम पद्धती, क्लिष्ट आणि अपुरी मार्गदर्शक तत्त्वे, कायद्यासंबंधीच्या वादातील आयकर विभागाच्या प्रतिनिधित्वाची अपुरी सोय, अपुरी माहिती संपर्क यंत्रणा आणि कर प्रशासनाची प्रतिमा मलिन करणाऱ्या अपुऱ्या सोयी यासारख्या अनेक त्रुटी आज आयकर प्रशासनात दिसून येतात. याबाबतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी समितीने खालील शिफारशी केल्या आहेत.

(1) प्रत्यक्ष आणि संभाव्य करदात्यांची ओळख असणे जरुरीचे आहे. त्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्याच्या कायम खाते क्रमांकाच्या (PAN) ऐवजी प्रत्येक प्रत्यक्ष व संभाव्य करदात्याला 'करदाता ओळख क्रमांक' (Taxpayer Identification Number – TIN) देण्यात यावा. हे कार्य अखिल भारतीय पातळीवर करण्यात येऊन त्याची नोंद अखिल भारतीय संगणक प्रणालीवर करण्यात यावी. त्यामुळे एकाच करदात्याला दोन क्रमांक मिळणे, एखाद्याला क्रमांक मुळीच न मिळणे आणि बेनामी करदाते यासारख्या समस्या सुटतील. प्रत्येक व्यक्ती वा संस्थेला असा 'कओक' (TIN) मिळाल्यावर प्रत्येक आर्थिक व्यवहारात या क्रमांकाची नोंद करण्याची सक्ती करण्यात यावी. त्यामुळे प्रत्येकाची करदाता माहिती नोंदवही (Taxpayer Master File – TMF) तयार होईल. या नोंदवहीचा उपयोग करप्रशासनाच्या नियंत्रणाचे साधन म्हणून करता येईल.

(2) आयकर कायद्याच्या विविध कलमांखाली

लागणारे लेखापरीक्षा अहवाल वेगवेगळे मागविण्यापेक्षा एकच सर्वसमावेशक लेखापरीक्षा अहवाल मागविण्यात यावा.

(3) करदात्यांकडून येणे असलेला अपेक्षित कर आणि प्रत्यक्षात वसूल झालेला कर आणि तत्सम माहिती हवी तेव्हा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कर हिशेब माहिती पद्धती विकसित करण्यात यावी.

(4) अखिल भारतीय पातळीवर संगणक–प्रणाली विकसित करून देशातील सर्व प्रकारच्या सर्व करदात्यांची माहिती त्यात संग्रहित करावी आणि त्यात नियमितपणे भर टाकून ही माहिती अद्ययावत करावी. आयकर विभागाची स्वतःची अशी अखिल भारतीय पातळीवरील संगणकप्रणाली विकसित होईपर्यंत भार–तीय नियोजन मंडळाच्या राष्ट्रीय माहिती संगणक जाळ्याचा ( National Informatic Computer Network ) उपयोग करून घ्यावा.

(5) कर विवरण पत्राच्या सध्याच्या चार प्रकारच्या नमुन्यांऐवजी एकूण सात प्रकारचे नमुने असावेत. पहिल्या तीन प्रकारचे नमुने सर्वसाधारण कर-दात्यांसाठी असावेत. त्यांच्या प्रती डाकघर, आयकर स्वीकारणाऱ्या बँका आणि सर्व आयकर कार्यालयांमध्ये उपलब्ध असाव्यात. शिवाय या विवरणपत्राचे नमुने दर पंधरा दिवसांनी स्थानिक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करावेत म्हणजे संबंधितांना त्याचा उपयोग करता येईल.

(6) आयकर खात्यातील करनिर्धारण अधि–काऱ्यांना करप्रणाली ज्या तत्त्वावर आधारित आहे ती तत्त्वे, सामाजिक न्याय, करनिर्धारणातील बारकावे आणि करदात्यांची सुविधा पाहता यावी या संबंधात प्रशिक्षण द्यावे.

(7) एकाच आयकर अधिकाऱ्याकडे कर–निर्धारण, कर गोळा करणे, वसुली, छाननी कर–निर्धारण, अपिले, दंड निर्धारण ही आणि यासारखी विविध स्वरूपाची कामे देण्याऐवजी कार्यात्मक विभा–गणी करावी.

**अप्रत्यक्ष कर**

करांचे उच्च दर, लोकांचा सल्ला न घेता आणि त्यांना चर्चा करण्यास वाव न देता कर कायद्यात गुप्त–पणे केलेले बदल, विविध दबावगटांच्या मताला बळी पडून करात दिलेल्या सूटी, सवलती व वजाती, कर–वसुलीची अवास्तव लक्ष्ये यासारख्या कारणांमुळे लोकां-च्यात कर चुकविण्याची प्रवृत्ती निर्माण होते आणि कराचे उत्पन्न हवे त्या प्रमाणात वाढत नाही. म्हणून समितीने खालील शिफारशी केल्या आहेत.

**(अ) केंद्रीय अबकारी कर** (Central excise duty)

जास्तीत जास्त वस्तू आणि सेवा वर्धित मूल्य कर ( VAT ) पद्धतीखाली आणाव्यात. ही पद्धती सोपी करण्यासाठी कराचे दर 10 टक्के, 15 टक्के आणि 20 टक्के असे दोन किंवा तीनच असावेत. अना-वश्यक उपभोग्य वस्तूंवरील कराचा दर जास्त असावा. आयुर्वेदिक आणि तत्सम देशी औषध पद्धती, प्लॅस्टिक–च्या वस्तू, तयार कपडे यावर केंद्रीय अबकारी कर लागू करावा. मात्र त्यासाठी सोपी निर्धारण पद्धती ( SAP ) असावी. अखेरीस वापर करणाऱ्याला देण्यात येणारी निविष्टींवरील कराची सूट रद्द करून मूल्यानुसार ( ad valorem ) किमान दहा टक्के दराने शुल्क आकारावे. हे शुल्क आकारण्यासाठी बीजक मूल्य ( invoice value ) गृहीत धरावे. इतर वस्तूंसाठी वर्धित मूल्य कर ठरविताना कमाल किरकोळ किंमत पाया म्हणून विचारात घ्यावी. साखर, आम्ल, वायू आणि कॉस्टिक सोडा यासारख्या वस्तूंवर कराची आकारणी करण्यासाठी प्रशुल्क ( tariff ) मूल्य पायाभूत धरावे.

लघुउद्योगांत उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तू–वरील केंद्रीय अबकारी कराचे दर खालीलप्रमाणे असावेत.

(1) 15 लक्ष रुपयांपर्यंतच्या उलाढालीवर कर नसावा.

(2) 15 ते 25 लक्ष रुपयांपर्यंतच्या उलढालीवर सोप्या निर्धारणपद्धतीखाली येणाऱ्या उद्योगांना दोन टक्के आणि इतर उद्योगांना नियमित दरा–पेक्षा दहा टक्के कमी अथवा मूल्यानुसार, परंतु पाच टक्क्यांपेक्षा कमी नसलेला, कराचा दर असावा.

(3) 25 ते 75 लक्ष रुपये उलाढाल असणाऱ्या लघुउद्योगांना नियमित दरापेक्षा 10 टक्के कमी असलेला, परंतु 5 टक्क्यांपेक्षा कमी नसलेला, मुल्यानुसार कराचा दर असावा.

(4) 75 लक्ष रुपयांपेक्षा जास्त रकमेची उलाढाल असणाऱ्या लघुउद्योगांना नेहमीच्या दराने कर आकारणी करण्यात यावी.

केंद्रीय अबकारी कराची आकारणी करण्यासाठी विक्री कर अथवा आयकरासाठी ग्राहृच धरण्यात आलेली उत्पादनाची आकडेवारी मान्य करावी. कराची रक्कम दर तिमाहीत अदा करावी. सोप्या निर्धारण पद्धतीखाली ( SAP ) मोडणाऱ्या उत्पादकांना अबकारी अनुज्ञप्तीची ( licence ) जरुरी नसावी. भाववाढीचा विचार करून कराचे दर दरवर्षी सुधारावेत.

खालील सेवांवर (टेलिफोन सेवा वगळून) व्यवहाराच्या रकमेच्या 10 टक्के दराने कर आकारावा. राहत्या घरातील टेलिफोन सेवेवर प्रतिवर्षी 1,000 रुपये कर बसवावा.

(1) जाहिरात सेवा
(2) भाग दलालांच्या सेवा
(3) मोटारगाड्यांचा विमा उतरण्याची सेवा.
(4) राहती मत्ता, वैयक्तिक अपघात तसेच जडजवाहिराचा विमा उतरण्याची सेवा.

**(आ) आयात शुल्क ( import duty )**

आयात शुल्कांमध्ये खालील सुधारणा कराव्यात.

(1) आयात शुल्काच्या सर्वसाधारण पातळीत घट करावी.

(2) आयात शुल्काच्या दरातील विविधता कमी करावी.

(3) आयात शुल्क पद्धतीचे सुलभीकरण ( simplification ) करावे.

(4) आयात शुल्कात असलेल्या असंख्य सुटी आणि सवलती बंद करून आयात शुल्क पद्धतीचे सुसूत्रीकरण करावे.

(5) सूचना प्रसारित करून आयात शुल्काच्या प्रभावी दरात बदल करण्याची प्रथा बंद करावी.

येत्या चार वर्षात आयात शुल्काची पातळी साधारणपणे 50 टक्क्यांनी कमी करावी. त्यामुळे संरक्षित आयात शुल्काचा आयात-भारांकित दर 45 टक्के इतका राहील. आयात शुल्काचा दर 1998-99 पर्यंत 25 टक्क्यांच्या पातळीपर्यंत कमी करावा.

करपद्धती सोपी करण्यासाठी पहिले पाऊल म्हणून सीमा शुल्काच्या बाबतीत मूळ आणि साहाय्यकारी दर एकाच संरक्षक दरात समाविष्ट करावे. सुलभीकरणातील दुसरे पाऊल म्हणजे करातील विविधता कमी करणे. आयातीत वस्तूंच्या अंतिम वापरावरून दिल्या जाणाऱ्या सुटीमुळे एकाच वस्तूवर कराचे विविध दर निर्माण होतात. म्हणून अशी सूट (exemption) कमी करीत जाऊन अखेरीस पूर्णपणे काढून टाकण्याची आवश्यकता आहे.

सीमा शुल्काचा कमाल दर 120 टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. मूलाधार धातू, औद्योगिक रसायने आणि यंत्रसामग्री यावर सध्या असलेला सीमा शुल्काचा 80 ते 120 टक्क्यांचा दर 10 टक्क्यांनी कमी करावा. तसेच ज्या वस्तूंवर सीमा शुल्क 80 टक्क्यांपेक्षा जास्त दराने आकारले जात आहे ते दर कमी करावेत. भांडवली वस्तूंवरील सीमा शुल्काचा दर 1995-96 पर्यंत 55 टक्के इतका खाली आणावा. 1995-96 पर्यंत सर्वसाधारण कराचा दर किमान 50 टक्के आणि कमाल 80 टक्के इतका खाली आणून 1998-99 पर्यंत हे दर अनुक्रमे 25 आणि 50 टक्के इतके कमी करण्यात यावेत.

**(इ) अप्रत्यक्ष कर प्रशासनातील सुधारणा**

अप्रत्यक्ष कर प्रशासनात समितीला खालील त्रुटी आढळल्या.

(1) केंद्रीय अबकारी कर कायदा व नियमात कार्यपद्धती फार गुंतागुंतीची आहे.

(2) प्रशासन पद्धतीत बदल केल्यावर त्याला अनुलक्षून कार्यपद्धतीत बदल केले जात नाहीत.

(3) अहवाल सादर करण्याच्या आणि देख–रेखीच्या (supervision) वापरात असलेल्या पद्धती कालबाह्य झाल्या आहेत.

(4) तपासणीच्या सुविधा अपुऱ्या आहेत.

(5) अधिकाऱ्यांचे, विशेषतः विशेष कार्य पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांचे, प्रशिक्षण अपुरे आहे. त्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका अयोग्य जागी होत आहेत.

(6) कार्यक्षेत्रात पूर्ण पुर्वतयारी न करता करांचे दर आणि करनिर्धारणाच्या पद्धती वारंवार बदलल्या जात आहेत.

(7) केंद्रीय अबकारी कर विभागात सीमा शुल्क बाबी जाणणारे तज्ज्ञ नाहीत.

(8) सीमा शुल्क आणि केंद्रीय अबकारी कर प्रयोगशाळांतील तपासणीच्या सुविधा अपुऱ्या आहेत.

(9) लेखापरीक्षणाच्या दडपणामुळे ज्यादा कर आकारणी केली जाते.

(10) न्यायासनाच्या पातळीवर अपिले निकालात काढण्यात अक्षम्य दिरंगाई होते.

(11) एका बाजूला वाढत्या कागदपत्रांची हाताळणी अशक्य होत आहे, तर दुसऱ्या बाजूला कर-व्यवस्थेतील संगणकीकरणाची जबाबदारी टाळली जात आहे.

या त्रुटींचे निराकरण करण्यासाठी समितीने पुढील शिफारशी केल्या आहेत.

(1) करविभागाने नवीन जबाबदारी अंगावर घेतल्यावर त्याला अनुलक्षून प्रशिक्षण अभ्यासक्रम, लेखा परीक्षण पद्धती, कर चुकविण्याविरुद्धचे उपाय, संगण–काची मृदु सामग्री (software), तपासणी पद्धती यात दरवर्षी सुधारणा कराव्यात.

(2) तपासणीची पद्धती अधिक कार्यक्षम करावी. तसेच तपासणीचे वेळापत्रक तंतोतंत पाळले जाईल याची दक्षता घ्यावी.

(3) कर विभागात उपलब्ध असलेल्या निविष्टी-उद्‌विष्टींच्या आधुनिक सुविधा पूर्णपणे वापरून नवीन व्यवस्थापन निविष्टी–उद्‌विष्टी पद्धती विकसित करावी.

(4) सीमाशुल्क आणि केंद्रीय अबकारी कर विभागातील अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या गरजा विचारात घेऊन उचित प्रशिक्षण धोरण ठरवावे आणि त्याप्रमाणे विस्तवार प्रशिक्षण कार्यक्रम आणि प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम विकसित करावा.

(5) कार्यपद्धतीत करावयाचे बदल मसुद्याच्या स्वरूपात प्रकाशित करून त्यावर प्रतिक्रिया मागवाव्यात आणि त्या विचारात घेऊन पक्की कार्यपद्धती तयार करावी. ही कार्यपद्धती अमलात आणावयाच्या दिवशीच प्रकाशित करावी म्हणजे कायदेशीर बाबी उपस्थित होणार नाहीत.

(6) मूल्यनिर्णेत्यांची सर्व रिक्त पदे तातडतोब भरावीत. ही भरती विभागीय पातळीवर असावी. त्यांच्या बदल्या त्या विभागापुरत्याच मर्यादित असाव्यात.

□ □

## 3

## भारताचा परदेशी कर्जबोजा

**( संकलन : सी. पं. खेर, धारवाड )**

भारताचे विदेशी कर्ज 1991 डिसेंबर अखेर 6,606 कोटी डॉलर, म्हणजे (1 डॉलर = 25·7731 रुपये धरल्याने) 1,70,257 कोटी रुपये, होते असे या बाबतीत समायोजन आणि मेळ बसवून रिझर्व्ह बँकेच्या धोरण गट आणि कार्य गट समितीने जाहीर केले आहे. मार्च 1991 अखेर ते 6,313·4 कोटी डॉलर, म्हणजे 1,21,998 कोटी रुपये, होते. या नऊ महिन्यातील

वाढीच्या 89·3 टक्के वाढ ही रुपयाच्या अवमूल्यनाने झाली आहे. म्हणून विदेशी कर्ज रुपयापेक्षा त्या त्या चलनात जोखणे योग्य ठरावे. यात पुढील कर्जांचा समावेश नाही.

| तपशील | कोटी रुपये |
|---|---|
| (1) रूबल / रुपया उभयपक्षी कर्जे | 3,194 |
| (2) रुपयात पुरवठा करणाऱ्यांचे कर्ज | 56 |
| (3) अनिवासी भारतीयांचे कर्जरोखे | 915 |
| (4) सहा महिन्याहून कमी मुदतीची कर्जे | 7,109 |
| एकूण | 11,274 |

जगाच्या तुलनेत भारताचा कर्जबोजा सौम्य आहे.

विदेशी कर्जाचे प्रमाण भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या 25 टक्के होते. पाकिस्तान 52·1 टक्के आणि सर्व सौम्य कर्जबाजारी कमी उत्पन्न गटाचे मिळून 39·7 टक्के होते. एकूण कर्जसेवेचे (म्हणजे व्याज आणि फेडावयाचा हप्ता) प्रमाण वस्तू आणि सेवा यांच्या निर्यातीच्या 26·8 टक्के पडते. व्याजाचे देणे एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या 1·4 टक्के होते. व्याज आणि निर्यात यांचे सर्व देशांचे मिळून सरासरी प्रमाण 8·8 टक्के होते, तर कर्जसेवा वस्तू आणि सेवा यांच्या निर्यातीच्या 19·8 टक्के होती. देशाची निर्यात वाढविणे हाच यावर उपाय दिसतो.

(संदर्भ : REPORTS OF POLICY GROUP AND TASK FORCE ON EXTERNAL DEBT STATISTICS OF INDIA, Reserve Bank of India, 1992).

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक यांना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील व कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून व परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या / अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद'चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य व अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील व परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट, मनिऑर्डर इत्यादी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत व ते धुळे येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद'च्या अंकात दिली जातील.

**व्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार

*ग्रंथ परीक्षण*

# खाजगीकरणाचा प्रयोग

Savas, E. S., PRIVATISATION : THE KEY TO BETTER GOVERNMENT, Tata McGraw-Hill Publishing Company Ltd., New Delhi, 1989, Pp. ix + 308, Rs. 63.

**संतोष दास्ताने ***

गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रशासन, अर्थकारण, सरकारी धोरण यांच्या संदर्भात 'खाजगीकरण' हा परवलीचा शब्द बनला आहे. समाजवादी अर्थव्यवस्था, भांडवलशाही आर्थिक संरचना आणि प्रगतशील अर्थ-व्यवस्था या सर्वांनी खाजगीकरणाचा विचार केला आहे आणि कमीजास्त प्रमाणात त्याचा अवलंब केला आहे. या बाबतीत विविध दृष्टिकोनांमधून सतत लेखन प्रसिद्ध होत आहे. या कार्यक्रमाबद्दल अनुकूल आणि प्रतिकूल असे लेखन केले जात आहे. या सर्वांमध्ये एक निराळा प्रयत्न म्हणून सव्हास यांच्या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. 'खाजगीकरण' या त्यांच्या पुस्तकाच्या उपशीर्षकावरूनच पुस्तकाचे निराळेपण दिसून येते. खाजगीकरणाचा प्रयोग हा अधिक चांगल्या प्रशासनाचा एक मार्ग आहे असे ते सुचवितात. त्यांची ही भूमिका तपासण्याआधी काही प्राथमिक खुलासे आवश्यक आहेत.

पीटर ड्रकर या व्यवस्थापनतज्ज्ञाने 1969 साली आपल्या 'The Age of Discontinuity' या गाजलेल्या ग्रंथात प्रथम 'पुनर्खाजगीकरण' (re-privatisation) हा शब्द वापरला. रॉबर्ट पूल यांनी Reason Foundation वार्तापत्रांमध्ये 1976 नंतर ही संज्ञा 'खाजगीकरण' अशा सुटसुटीत स्वरूपात वापरावयाला सुरुवात केली. शब्दकोशात हा शब्द 1983 नंतर अवतरलेला आढळतो.[1] "खाजगी करणे, विशेषकरून मालकी किंवा नियंत्रण सरकारी स्वरूपातून खाजगी पातळीवर आणणे", असा अर्थ तेथे दिलेला आहे. सरकारी क्षेत्राची भूमिका टप्प्याटप्प्याने कमी करणे आणि खाजगी क्षेत्राला वाढता वाव देणे असे सर्वसाधारणपणे या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. काही अभ्यासांमध्ये मालकी बदलण्यापेक्षा सरकारी क्षेत्रावर खाजगी नियंत्रण आणि त्या क्षेत्राचे खाजगी व्यवस्थापन असा भर दिलेला दिसतो.[2] म्हणजे व्यापक अर्थाने खाजगीकरण हा मालकी, व्यवस्थापन किंवा संघटन आणि अमलबजावणी अशा तीन पातळ्यांवर ओळखला

* उपप्राचार्य आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.

जाणारा कार्यक्रम झाला. मालकी बदलली जात असताना एकतर राष्ट्रीयीकरण पूर्ण फिरविले जाईल किंवा रद्द केले जाईल, किंवा पूर्ण सरकारी मालकी ऐवजी संयुक्त मालकी आणली जाईल, किंवा एखाद्या उद्योगाची मालमत्ता खुल्या बाजारात विकून तिची मालकी बदलली जाईल. खाजगीकरणानंतर अंतिम मालकी व्यक्तीची अगर खाजगी व्यवसाय संस्थेची (महामंडळ) अगर सहकारी संस्थेची असू शकते. व्यवस्थापन बदलत असताना नव्याने सत्ताधारी कंपनी (holding company) काढून निर्णय प्रक्रियेत विकेंद्रीकरण आणि स्वायत्तता आणली जाते, किंवा भाडेपट्टी पद्धतीचा leasing) आधार घेतला जातो, किंवा एखादा सहउद्योग काढून उत्पादन प्रक्रिया चालू ठेवण्याचा परवाना दिला जातो. खाजगीकरणाची अमलबजावणी होत असताना व्यापारीकरण, नफ्याला दिले जाणारे महत्त्व, कार्यक्षमता, उत्पादकतेला प्राधान्य आणि सरतेशेवटी स्पर्धात्मक कामकाजाला महत्त्व अशा गोष्टी येतात या चर्चेत 'खाजगी' आणि 'सरकारी' या संज्ञांचा वापर सतत होत असतो. पण या संज्ञाही तितक्याशा सरळ नाहीत. त्यांचा वापरही सावधपणे केला जावा असे सव्हास यानी सुरुवातीलाच सुचविले आहे. उदाहरणार्थ, एखादे वाहन खाजगी मालकीचे आहे, एखादी इमारत किंवा बाग सरकारी मालकीची आहे असे म्हणणे सोपे आहे; परंतु एखाद्या खाजगी कंपनीची कायदेशीर मालकी लाखो भागधारकांच्या हातात असते. तेव्हा ती सार्वजनिक मालकीची खाजगी कंपनी असेच म्हणावे लागेल. तसेच हॉटेल, उपाहारगृह याना तरी खाजगी कोणत्या अर्थाने म्हणावे? आम जनतेला वापर वा उपयोग खुला असणारी ती खाजगी मालकीची संस्था आहे असे म्हणता येईल. (3) सार्वजनिक मालकी, व्यापक मालकी (खाजगी), व्यापक मालकी (सरकारी) व्यापक वापर (सार्वजनिक) अशा अनेक छटा यातून निर्माण होतात. त्यामुळे खाजगी आणि सरकारी जनिक असे अलवचिक वर्गीकरण करून भागणार नाही.

खाजगीकरणाची मागणी विविध पातळ्यांवर होत असते. अशा मागणीमागच्या भूमिकाही भिन्नस्तरीय असतात. उदाहरणार्थ, सरकारच्या प्रशासनाची गुणवत्ता सुधारावी अशा व्यावहारिक कारणांसाठी खाजगीकरणाचा पुरस्कार केला जातो. उलट, सरकारचा हस्तक्षेप कमी होऊन खुलेपणा असावा, स्वातंत्र्य असावे अशा विचारप्रणालीमधूनही खाजगीकरणाच्या बाजूने मत दिले जाते. सध्या देशातील खर्चापैकी सरकारी खर्चाचा वाटा वेगाने वाढत आहे. अशा सरकारने आपला खर्च अधिक कार्यक्षम पद्धतीने करावा यासाठी खाजगीकरणाचा उपयोग होईल अशी भूमिकाही घेतली जाते. व्यक्तीचे विचार, आचार, सवयी, आवडीनिवडी या सर्वांना अधिक खुला वाव मिळेल अशा लोकप्रिय अर्थानेही खाजगीकरणाची बाजू उचलून धरली जाते.[4] जसजशी प्रगती होत जाते तसतसा एक प्रकारचा अंतर्गत विरोध निर्माण होत जातो. एका टोकाला सरकारी खर्च, सरकारी क्षेत्रातील रोजगार, सरकारचे उत्पन्न, सरकारचे वस्तू व सेवांचे उत्पादन या गोष्टी वाढत जाताना दिसतात. कायदा, सुव्यवस्था, शाळा, ग्रंथालये, पोहण्याचे तलाव, घरे, संरक्षण, सुरक्षिततेचे उपाय, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक वितरण व्यवस्था, लोकप्रशासन, करवसुली, निवडणुका, न्यायव्यवस्था, प्रदूषण नियंत्रण, संशोधन–विकास अशा डझनावारी मार्गांनी सरकारचा कार्यभाग आधुनिक अर्थव्यवस्थेत वाढत असतो. परंतु असे असतानाही या ना त्या स्वरूपात खाजगीकरण मात्र असावे असा विरोधी विचार बळावत चाललेला आहे. सव्हास यानी विचारातील हा संघर्ष मोठ्या ताकदीने आपल्या पुस्तकात उभा केला आहे.

खाजगीकरणाचा विचार विस्ताराने मांडत असताना त्यानी केवळ एकांगी वृत्तीने पाहिले नाही. त्यानी खाजगीकरणाच्या निरनिराळ्या प्रयोगांची केवळ वृत्तवजा कोरडी चर्चा करण्यातही वेळ दवडलेला नाही. विचारांमधील मूलभूत बैठक, विविध संज्ञांच्या व्याख्या, विविध संस्थांची बदलती भूमिका याबाबत त्यानी शास्त्रशुद्ध विवेचन केले आहे. उदाहरणार्थ, वस्तूची मालकी ही संकल्पना मांडत असताना नवे वर्गीकरण करण्याची गरज कशी आहे हे त्यानी स्पष्ट केले आहे. हवा, समुद्रातील मासे या व्यापक उपयोगाच्या वस्तू आहेत. मात्र ती हवा सिलिंडरमधून विकली जात असेल तर ती खाजगी वस्तू होते. मासे ही नैसर्गिक संपत्ती आहे. परंतु मासे पकडून एखाद्याने पैसे कमविले तर ती खाजगी वस्तू होते. समुद्रातील दीपस्तंभ ही सामूहिक वस्तू आहे. खाजगी वस्तूबाबत ती खरेदी करणारा आणि वापरणारा निराळा दाखविता

येतो. सार्वजनिक वस्तूबाबत असे वगळण्याचे तत्त्व लावता येत नाही. बदलत्या तंत्रविज्ञानानेही असे वर्गीकरण बदलणे अटळ ठरविले आहे. उदाहरणार्थ, बागा, रस्ते, क्रीडांगणे स्वच्छ ठेवण्यासाठी भारी शक्तीची यंत्रसामग्री उपलब्ध झाली आहे. त्यामुळे स्वच्छता राखणे ही खाजगी जबाबदारी न राहता सार्वजनिक (म्हणजे सार्वजनिक वस्तू) बनत आहे. नव्या तंत्रविज्ञानाने कदाचित याच्या उलटही घडत आहे. अग्निशमन सेवा सार्वजनिक आहे हे खरे; परंतु घरे, कार्यालये, संस्था, नाट्यगृहे यांमधील अग्निशामक उपकरणे, धूर व अग्नीची पूर्वसूचना देणारी इलेक्ट्रॉनिक यंत्रे यांच्या शोधांमुळे ही गरज भागविण्याचे काम सार्वजनिक पातळीवरून बऱ्याच प्रमाणात खाजगी पातळीवर आले आहे. या सर्वांचा इत्यर्थ असा की, जेव्हा खाजगीकरणाची मागणी होत असते तेव्हा बदलत्या स्वरूपाच्या वस्तू आणि सेवांची खाजगी मालकीने वा पद्धतीने उपलब्धता वाढविणे असा गतिमान अर्थ घेणे भाग पडते. कोणताही एक रोखठोक असा ताठर निकष लावून भागणार नाही.

जी गोष्ट वस्तूचे स्वरूप आणि मालकीबाबत ती गोष्ट वस्तूचे उत्पादन आणि विक्री याबाबत. पारंपरिक अर्थशास्त्र तर याबाबत अतिसोपी भूमिका घेते. जो उत्पादक तोच विक्रेता अशा विचारातून कितीतरी आर्थिक सिद्धान्त मांडलेले असतात. परंतु उत्पादक, विक्रीचा संयोजक, वितरक, विक्रेता अशा कितीतरी वेगवेगळ्या व्यक्ती आणि संस्था यात गुंतलेल्या असतात. यामध्ये घाऊक आणि किरकोळ दुकाने, सरकारी यंत्रणा, निरनिराळ्या प्रकारचे बाजार, स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवा तत्त्वावरील दुकाने, करार पद्धतीचे वितरण अशा अनेक यंत्रणा येतात. यातही पुन्हा सरकारी, निमसरकारी, खाजगी संस्थांचे एकमेकाशी वेगवेगळ्या स्वरूपाचे सहकार्य चालू असते. अनुज्ञप्ती, करार, लिलाव, अडत ( commission ) अशा पद्धतीने वाटपाची व्यवस्था होत असते. थोडक्यात म्हणजे, एखाद्या बेकरीत पावाची खरेदी–विक्री होते किंवा भाजी बाजारात भाजीची खरेदी–विक्री होते इतक्या सोप्या पद्धतीने वस्तू वा सेवांची खरेदी–विक्री व्यवहारात होत नाही. इंग्लंड, अमेरिकेसारख्या प्रगत देशांत कचरा गोळा करणे, रस्त्यावरील दिव्यांची देखभाल करणे, बससेवा चालविणे, रुग्णवाहिका पुरविणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे अशा सेवा सरकारी / निमसरकारी / सेवाभावी / खाजगी / सहकारी यंत्रणांमार्फत केल्या जात आहेत. यांच्यामध्ये खाजगीकरणाचे टप्प्याटप्प्याने घटते प्रमाण दाखविले जाते. वितरणातील सक्तीचा भाग कमी होऊन स्वयंस्फूर्तीचा भाग वाढतो. किंमत नियंत्रणे, अर्थसाहाय्य यांचे ओझे कमी होते आणि खुल्या, तरत्या आणि स्वयंस्फूर्त किमतींचा भाग वाढत जातो. म्हणजे मालकीवर भर देण्यापेक्षा वितरण आणि सेवापूर्तीवर भर आहे असे येथे प्रतीत होते. अशी अनेक उदाहरणे देऊन सव्हास यांनी एक गोष्ट साधली आहे. खाजगीकरणाचे आपले विवेचन त्यांनी पोथीनिष्ठ आणि सैद्धान्तिक न ठेवता बरेचसे व्यावहारिक ठेवले आहे. त्यांनी पुस्तकात सुरुवातीला विचारप्रणालीचा रेटा खाजगीकरणामागे असतो असे मांडलेले असले तरी त्यावरील त्यांचा भर तुटपुंजा आहे. मात्र व्यावहारिक आणि प्रशासकीय सोयी, सुधारणा यांच्याकडे ते जास्त लक्ष पुरवितात.

खाजगीकरणामागील उद्दिष्टे तरी कोणती हे थोडक्यात मांडणे सयुक्तिक ठरेल : (1) अर्थव्यवस्थेतील आर्थिक सेवेची कार्यक्षमता सुधारावी; (2) राजकीय निर्णयांचे राजकीयीकरण थांबवावे; (3) सरकारी उत्पन्नामध्ये वाढ व्हावी; (4) कर, सरकारी कर्जे, सरकारी खर्च यांची पातळी कमी करता यावी; (5) सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमधील श्रमिक संघांची शक्ती कमी व्हावी; (6) वस्तू आणि उत्पादन घटकांची मालकीची कक्षा वाढून एका व्यापक पायावरील भांडवलशाही अस्तित्वात यावी ही उद्दिष्टे साध्य करीत असताना उत्पादनाचे प्रमाण विस्तारत जाऊन अनुमापी अनुकूलता ( economies of scale ) मिळू शकतील आणि परिव्यय घटत जाईल असा विचार यामागे आहे. मात्र खाजगीकरण करीत असताना श्रमिकांबाबत अधिक कणखर भूमिका घेता येईल, हा विचार अतिभांडवलशाहीचा द्योतक झाला.[6] सरकारी क्षेत्राची अकार्यक्षमता केवळ श्रमिकांच्याच वर्तनामुळे आहे असे यात आग्रहाने गृहीत धरले आहे. श्रमिकांच्या अवास्तव वर्तनावर नियंत्रण ठेवल्यास सारे काही सुधारेल असा एकांगी विचार यात दिसतो. तथापि भांडवलाचे विविधीकरण, विस्तार, घनीकरण (deepening) आणि व्यवसायांचे एकीकरण घडून येण्यास खाजगीकरण निश्चित चालना देते. खाजगीकरणाचे फायदे उठवीत

असताना ते कोणत्या स्वरूपात अमलात येत आहे हा तपशील महत्त्वाचा आहे. खाजगीकरणामुळे सरकार आणि सरकारी क्षेत्राची पकड ढिली होईल, पण स्पर्धेचे फायदे मिळतीलच असे नाही. मेक्सिकोमधील अनुभव तर याच्या उलट आहे. तेथे खाजगीकरणाच्या प्रक्रियेतून मोठ्या मक्तेदाऱ्या वाढीस लागल्या. अस्थिरता, किंमतवाढ, नोकरीची अशाश्वती आणि ताणलेले औद्योगिक संबंध यांचे युग सुरू झाले. शेवटी, खाजगीकरणासारखा कोणताही कार्यक्रम राबवीत असताना त्याच्या परिणामांचे भान ठेऊन आपल्या देशाच्या संस्थात्मक आणि सामाजिक चौकटीत राहूनच कार्यक्रम राबविले पाहिजेत असे येथे समजते. सैद्धान्तिक कर्मठपणा उपयोगी नाही. इंग्लंडमध्ये हुजूर पक्षाने खाजगीकरणाचा पुरस्कार केला. थॅचर राजवटीने याला चालना दिली. उत्पादन घटकांचा अधिक कार्यक्षम वापर व्हावा, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, पर्यावरणाची जपणूक व्हावी असे याचे फायदे सांगितले गेले. जागतिक बँकेनेही मागासलेल्या आणि विकसनशील देशांना आर्थिक पुनर्रचनेचा एक मार्ग म्हणून खाजगीकरण करा आणि त्यायोगे अधिक भांडवलाचे स्वागत करा असे सुचविले आहे. फ्रान्स, चिली, मेक्सिको, न्यूझिलंड या देशांनी खाजगीकरणाचा अवलंब केला. समाजवादी देशांचे विघटन होत असताना त्यांनी वेगळ्या संस्थात्मक चौकटीत खाजगीकरणालाच अग्रक्रम दिला. यामध्ये रशिया, चीन, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया यातील नव्या आर्थिक सुधारणांचा उल्लेख करता येईल. सुरुवातीला हे खाजगीकरण कमालीचे यशस्वी होताना दिसते. पूर्वी जो नफा सरकारी क्षेत्र कमवित होते तो नफा आता खाजगी क्षेत्रामार्फत निर्माण होतो. नफ्याचा वापर खाजगी मालकीमार्फत होऊन उत्पादनाला आवश्यक ती प्रेरणा मिळत राहते. यापुढेही एका परस्परविरोधी घटनाक्रमाचा जाताजाता उल्लेख करता येईल. भागभांडवलाचे हस्तांतरण करून किंवा खुली विक्री करून सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण करता येईल. सरकारी उपक्रम ज्या भांडवल पुरवठ्याच्या फेऱ्यात अडकले असतील त्यातून ते दूर होतील. अशा उद्योगांनी एकतर स्वतःचा भरपूर नफा कमविला पाहिजे, भरपूर किंमती आकारून आपले उत्पन्न वाढविले पाहिजे किंवा अंदाजपत्रकातून या उपक्रमांना भांडवली खर्चासाठी मोठी तरतूद सतत केली पाहिजे. पण या तिन्हींवर स्वाभाविक मर्यादा आहेत. उलट, सार्वजनिक सेवा या नावाखाली तोटे आणि अकार्यक्षमता यांचे समर्थनच केले जाते. भारतातील परिस्थिती याहून फारशी निराळी नाही. एकदा खाजगी क्षेत्रात यांची मालकी गेल्यानंतर या उपक्रमांना भांडवल बाजाराचा थेट लाभ उठविता येईल. समभाग, ऋणपत्रे, रोखे, संस्थात्मक कर्ज अशांचा त्यांना फायदा उठविता येईल. भांडवल बाजार, विशेषकरून विकसनशील देशांतील भांडवल बाजार, यामुळे अधिक व्यापक, विस्तृत आणि सघन होतील. परंतु या सर्व अनुकूल घडामोडींमुळे सरकारचे काम एका अर्थाने अवघडच होत जाईल. अर्थसंकल्पीय धोरण, पैसाविषयक धोरण यांच्यामार्फत या संस्थांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याचा व्याप वाढत जाईल. खाजगीकरणाचे पाऊल सोपे आहे. परंतु वित्तीय–पैसाविषयक–अर्थसंकल्पीय धोरणांचा एकत्रित कार्यक्रम यशस्वीपणे राबविणे आणि त्यातूनही विकास, स्थैर्य, समता अशी उद्दिष्टे गाठणे हे एकूण अवघडच आहे. म्हणजे, सरकारने प्रथम आपले प्रत्यक्ष ओझे कमी केले आणि अप्रत्यक्ष ओझे वाढविले. येथे नमूद केलेल्या या त्रिपदरी धोरणाचे यश अर्थव्यवस्थेतील संस्थात्मक चौकट, पैसाकरणाचे प्रमाण आणि प्रशासनाची कार्यक्षमता यावर अवलंबून असते. हे सर्व घटक अर्थशास्त्राच्या सीमारेषेवर आहेत. म्हणजे, खाजगीकरण साधले जाईल परंतु त्यामागची सर्व उद्दिष्टे साध्य होणे मात्र अनेक जर–तर बाबींवर अवलंबून आहे.

खाजगीकरणाचा उपक्रम विविध देशात राबविला गेला हा उल्लेख वर आला आहेच. त्यातील न्यू झिलंडचा अनुभव बोलका आहे. तेथे खाजगीकरणाचा मुख्य उद्देश सरकारी कर्जाचे ओझे कमी करणे असा होता. 1985 ते 90 या दरम्यान हा कार्यक्रम राबवून राष्ट्रीय उत्पन्नाशी सरकारी कर्जाचे प्रमाण 80 टक्के होते ते 1990 च्या बेतास 53 टक्क्यांपर्यंत खाली उतरविण्यात आले. तेथे सरकारी उपक्रमांची मालकी सरकारकडे कायम ठेऊन त्यांचे निगमीकरण ( corporatization ) करण्यात आले. सरकारी खात्यांचेही सरकारी उपक्रमांत रूपांतर झाले. पोलाद, विमान वाहतूक, अधिकोषण, हॉटेल, विमा व्यवसाय अशा उपक्रमांचे खाजगी क्षेत्रात हस्तांतरण झाले. तेथील एक अनुभव असा की, भागशः खाजगीकरणापेक्षा पूर्ण खाजगीकरण अधिक यशस्वी होते असे आढळले. न्यू झिलंडमधील 'पेट्रोकॉर्प' या तेल कंपनीच्या बाबतीत हा अनुभव आला. अल्पमतातील

भागधारकांनी व्यवस्थापनावर आपली पकड कायम ठेवली आणि त्यामुळे या प्रक्रियेचे अपेक्षित फायदे दूर राहिले. शेअर बाजारातून भाग भांडवलाचे हस्तांतरण करण्यापेक्षा खुल्या बाजारात मालकीची थेट आणि अंतिम विक्री करणे अधिक श्रेयस्कर असते, असेही त्याना आढळले. दक्षिण अमेरिकेत चिलीने खाजगी-करणात बरीच आघाडी मारली आहे. वित्तीय सेवा, वाहतूक, दूरसंपर्क अशा क्षेत्रांमध्ये खाजगीकरण वेगाने घडून आले आहे. 1985 ते 89 या काळात चिलीमध्ये 24 सरकारी उपक्रमांची खुली विक्री करण्यात येऊन 1·7 अब्ज डॉलर उभारण्यात आले. आंतरराष्ट्रीय कर्जाच्या ओझ्याखाली जवळजवळ भुईसपाट झालेल्या मेक्सिकोच्या सरकारने खाजगीकरणाचा कार्यक्रम उशिरा का होईना परंतु धीटपणाने राबविला. 1988 नंतर 236 सरकारी महामंडळांची खुली विक्री करण्यात आली. नागरी विमान वाहतूक कंपन्या, तांब्याच्या खाणी यांचे खाजगीकरण पूर्ण झाले असून दूरसंचार उपक्रम, पोलाद कारखाने यांचे खाजगीकरण होण्याच्या बेतात आहे. यातून हाती आलेला निधी सुमारे 11 अब्ज डॉलर इतका आहे. मात्र हा पैसा मेक्सिको सरकार कर्जफेडीसाठी न वापरता शिक्षण आणि विका-साच्या इतर सोयींसाठी वापरत आहे. तुर्कस्तानने आपल्या 200 सरकारी क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगी-करण केले आहे. बांगला देश, पाकिस्तान यांचेही खाजगीकरणाचे कार्यक्रम वेग घेत आहेत. 150 पैकी 50 सरकारी महामंडळे पाकिस्तानात खाजगी क्षेत्रात येत आहेत. नोकरशाहीचा विरोध आणि सार्वत्रिक बेकारीची भीती यामुळे पाकिस्तानमध्ये या कार्यक्रमास तीव्र विरोध होत आहे. रेल्वे, वीजनिर्मिती, जहाज-बांधणी, दूरसंचार, या क्षेत्रांमध्ये मलेशिया सरकारने राष्ट्रीयीकरण साधले आहे.[6]

वरील अनुभवांवरून काही प्रवृत्ती स्पष्ट होतात. खाजगीकरणाने काही गोष्टी साध्य होतात तर काही होत नाहीत असा दोन्ही प्रकारचा अनुभव येतो. कोण-त्याही स्वरूपात खाजगीकरण केले तरी सरकारच्या सामाजिक जबाबदाऱ्या कमी होत नाहीत. खाजगी-करणाच्या आजपर्यंतच्या विचारामध्ये सार्वजनिक प्रशासन आणि नोकरशाही यांचा अंगभूत विचार समन्वित रीतीने करण्यात आलेला नाही. सव्हास यानीही तो तितकासा केलेला नाही. उलट, कामगार-क्षेत्राकडून होणारा विरोध ही खाजगीकरणाच्या आणि पर्यायाने विकासाच्या मार्गातील धोंड आहे असे त्यानी मानले आहे. हे मात्र एकांगी मत आहे असे म्हटल्या-शिवाय राहवत नाही. असे मानण्याचे कारण असे की, खाजगीकरणाच्या धडाकेबाज कार्यक्रमात साध्य आणि साधन यांची गल्लत होता कामा नये. खाजगीकरणाने कार्यक्षमता किंवा उत्पादकता एकदम सुधारेल असे समजता कामा नये. ते केवळ योग्य दिशेचे पाऊल आहे एवढे खरे. मात्र सरकारी क्षेत्राशी निगडित असणाऱ्या राजकीय दबावाच्या मागण्या खाजगीकरणाने कमी होतील; तसेच उत्पादन घटक किंवा अंतिम उत्पा-दनाची नासाडी खाजगीकरणाने कमी होईल.[7] न्यूयॉर्क शहरातील अन्तर्गत बस वाहतुकीचा एक अभ्यास सव्हास यानीदेखील तपशीलाने मांडला आहे.[8] सरकारी बससेवेपेक्षा खाजगी बससेवा कशी चांगल्या गुणवत्तेची आहे ते निरनिराळ्या निकर्षांनी स्पष्ट केले आहे. प्रत्येक बसचा दर मैलामागे सरासरी परिव्यय सरकारी क्षेत्रात 8.07 डॉलर येत असे; तो आता खाजगी क्षेत्रात 6.16 डॉलर येऊ लागला. दर प्रवाशा-मागे पूर्वी 1.49 डॉलर एवढा परिव्यय येत असे, तो आता खाजगीकरणानंतर 1.32 डॉलर एवढा येऊ लागला. अमेरिकेत टपाल सेवाही खाजगी क्षेत्रात अधिक कार्यक्षम आहे.[9] युनायटेड पार्सल सर्व्हिस या पर्यायी खाजगी टपालसेवेचे दर तुलनेने कमी आहेत. ती सेवा अधिक जलद आहे. खाजगी सेवेला सरकारी टपाल-सेवेपेक्षा खूपच कमी नुकसानभरपाई द्यावी लागली. कॅनडा, स्पेन या देशांमध्येही 50 टक्क्यांहून अधिक टपालसेवा खाजगी क्षेत्रात आहे. इंग्लंडमध्ये अशोधित तेल (crude oil) उत्पादन, नागरी विमान वाहतूक, मोटार गाड्यांचे उत्पादन, पोलाद उद्योग यामध्ये खाजगीकरणाचे प्रयोग यशस्वीपणे रेटण्यात आले आहेत.[10] सार्वजनिक सुरक्षितता, संरक्षण खाते, आरोग्य सेवा, घरबांधणी, नागरी विकास, सामाजिक सेवा, शिक्षण, करमणूक अशा अनेक बाबतीत खाजगीकरणाने चमत्कार दाखविले आहेत. तथापि परिव्यय, कार्यक्षमता यांच्या दृष्टिकोनातून तुलनात्मक अभ्यास पुरेशा सखोल पद्धतीने झालेले नाहीत, असेही सव्हास यानी मोकळेपणाने कबूल केले आहे.

पुस्तकाच्या शेवटच्या विभागात सव्हास यानी विविध क्षेत्रांमध्ये खाजगीकरण कसे करावे याचे टप्पे

दिले आहेत. (1) अनेक वस्तू आणि सेवा खुल्या बाजारामार्फत पुरवून सेवाभावी संस्थांना त्यात सहभागी करून घेणे. (2) कंत्राटी पद्धतीने आणि करार करून सरकारने दुसऱ्याकडून कामे करवून घेणे. (3) सरकारने आपली सेवा मोफत न देता शक्यतो रास्त सेवा खर्च लावावे; यामुळे लोक पर्यायी सेवेचा विचार करतील आणि कदाचित स्पर्धेस चालना मिळेल. (4) नियंत्रणे कमी करून स्पर्धा वाढविणे. अगदी शेवटच्या प्रकरणात सव्हास यानी त्यांच्या या सर्व कार्यक्रमात ज्या अडचणी येऊ शकतात त्यांचा निर्देश केला आहे. तो मात्र कमालीचा अपुरा आणि काहीसा एकांगी आहे. विकासाचा कोणताही कार्यक्रम प्रस्थापित सामाजिक-राजकीय चौकटीत बदल, स्थित्यंतर झाले तरच मूळ धरतो, फुलतो, बहरतो. श्रमिक, नोकरशाही यांच्यात सामाजिक बांधिलकी निर्माण करेल अशी व्यवस्था येण्यास अर्थातच वेळ लागतो. सव्हास यानी असे बदल केवळ परिव्ययात बचत करतात किंवा सेवेची गुणवत्ता वाढवितात म्हणून चटकन होतील असे भाबडेपणाने मानले आहे. विकसनशील देशांमध्येही अशा खाजगीकरणाच्या कार्यक्रमात फारशा अडचणी येणार नाहीत असे ते मानतात. पण आर्थिक बदलांच्या मुळाशी जे सामाजिक रूढी, प्रथा, विश्वास, मूल्ये, विचारप्रणाली यांचे बदल असतात ते इतक्या सहजपणे गृहीत धरून चालत नाही. सव्हास यांच्या विवेचनाची ही मर्यादा सांगता येईल.

यादृष्टीने पाहता, भारतातील खाजगीकरणाच्या प्रयोगाची जी चिकित्सा चालू आहे त्या अभ्यासांपैकी काहींनी खाजगीकरणाच्या मूल चौकटीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.[11] सरकारी क्षेत्रातील तोटा पाहता ते उद्योग खाजगी क्षेत्रामध्ये नेल्याने नफा जाऊन तोटा होऊ शकतो. पण तो काही वेळा आकडेवारीचा खेळ ठरतो, तर काही वेळेस तो एक योगायोगच ठरतो. खाजगीकरण हा एक प्रयोग न राहता तो एक कार्यप्रणाली बनली पाहिजे. सव्हास यांच्या पुस्तकाने या खाजगीकरणाच्या विचारांच्या सर्वांगीण विकासास चांगले खतपाणी मिळाले आहे असे म्हटले पाहिजे. भारताच्या संदर्भात विचार करताना, सव्हास यानी त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या चौकटीत खाजगीकरणाचा जो विस्तृत विचार मांडला आहे तो एक महत्त्वाचा मापदंड ठरणार आहे. हेच सव्हास यांच्या विवेचनाचे मोल आहे.

## संदर्भ टीपा


1 Savas, E. S., PRIVATISATION – THE KEY TO BETTER GOVERNMENT, Tata – McGraw Hill Publishing Co., New Delhi, 1989, पृ. 12.

2 Lee, Barbara and John Nellis : ENTERPRISE REFORM AND PRIVATISATION IN SOCIALIST ECONOMIES, World Bank Discussion Paper, 104, 1990, पृष्ठे 1 आणि 3.

3 Savas, पूर्वोक्त, पृ. 4.

4 तत्रैव, पृ. 5.

5 Cluttlerbuck, David GOING PRIVATE – PRIVATISATION AROUND THE WORLD, London, Mercury Books, 1991. या पुस्तकात अशी भूमिका सुरुवातीस मांडण्यात आली आहे.

6 पाहा : Sherry M. Stephenson, 'International Experiences with Privatisation' in S. R. Mohonot (ed.) PRIVATISATION - OPTIONS AND CHALLENGES. Centre for Industrial and Economic Research, New Delhi, 1991.

7 न्यूयॉर्क टाइम्सचे संपादकीय, 13 जानेवारी, 1986.

8 Savas, पूर्वोक्त, पृ. 138.

9 तत्रैव, पृ. 152.

10 तत्रैव, पृ. 168.

11 Mohnot, S. R., पूर्वोक्त, पृ. 329.


□ □

# श्रद्धांजली

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य डॉ. हरी कृष्ण परांजपे यांचे मुंबई येथे दिनांक 18 जानेवारी, 1993 रोजी हृदयविकाराने निधन झाले. ते 69 वर्षांचे होते.

गोव्यात रामनाथी येथे 1 ते 3 नोव्हेंबर, 1985 या कालात भरलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नवव्या वार्षिक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. 'भारतीय नियोजनातील दिशा बदल इष्ट आहे का ?' हा त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय होता.

डॉ. परांजपे यांनी 1947–54 या कालात मुंबईतील एलफिन्स्टन महाविद्यालय आणि सिडनहॅम महाविद्यालय येथे अर्थशास्त्राच्या अध्यापनाचे काम केले. 1954 आणि 1955 या दोन वर्षांत त्यांनी इंग्लंडमध्ये ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठात 'विकास आणि नियोजन' या विषयाचे अध्ययन केले. पूर्व युरोपातील देशांमधील नियोजनाचा त्यांनी युरोपच्या आर्थिक आयोगाच्या माध्यमातून अभ्यास केला. पोलंडच्या विज्ञान विद्यापीठाच्या निमंत्रणावरून तेथील नियोजनाचा त्यांनी अभ्यास केला.

1958 ते 70 या कालखंडात डॉ. परांजपे यांनी दिल्ली येथे Indian Institute of Public Adminisration या संस्थेत अध्यापनाचे कार्य केले आणि व्यासंगी प्राध्यापक म्हणून नावलौकिक मिळविला. 'आर्थिक धोरणे आणि प्रशासन' या विषयाचे तज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती झाली. याच कालखंडात नियोजनाच्या प्रशासनासंबंधीच्या काही समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले. त्यांच्या संस्थेने राज्यातील नियोजन अधिकाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गाचे ते प्रमुख होते. 1967–70 या कालात औद्योगिक परवाना धोरण समितीचे सदस्य म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजाविली. 1970–77 या मुदतीत ते Monopolies and Restrictive Trade Practices Commission या आयोगाचे सदस्य म्हणून काम केले. 1977–80 मध्ये रेल्वे दररचना समितीचे ते अध्यक्ष होते. वृत्तपत्र आयोगाचे सदस्य आणि युगोस्लाव्हियामध्ये सरकारी उद्योगांचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले. अलिकडे 'नॅशनल इन्शुअरन्स ॲकॅडेमी' येथे चिं. द्वा. देशमुख अध्यासनाचे काम ते पाहात होते. गेली 3 वर्षे त्यांनी 'जनता' या इंग्रजी साप्ताहिकाची संपादकीय जबाबदारी सांभाळली होती.

डॉ. परांजपे यांनी आर्थिक विषयांवर नियतकालिकांतून आणि ग्रंथरूपाने विपुल लेखन केले आहे. सरकारी उद्योग आणि नियोजन हे त्यांचे आवडीचे विषय होते. 'The Industrial Management Pool : An Administrative Experience' आणि 'The Flight of Technical Personnel' हे त्यांचे दोन लेख बरेच गाजले.

फोर्ड फौंडेशनने दिलेल्या वित्तीय साहाय्यातून या संस्थेने हाती घेतलेल्या 'विकासात्मक नियोजनातील भारताचा अनुभव' या संशोधन प्रकल्पाचे ते संचालक होते. या प्रकल्पाची पूर्वपीठिका म्हणून त्यांनी 'भारतीय नियोजन मंडळ– वर्णनात्मक अभ्यास' हे पुस्तक लिहिले. सॉलोमन ट्रोन यांच्या अहवालामुळे आणि शिफारशीमुळे भारतात नियोजन यंत्रणा स्थापन करण्याच्या शासनाच्या विचाराला बळकटी आली. पण त्यांच्या सूचनेप्रमाणे योजनेच्या अमलबजावणीचे काम मात्र नियोजन मंडळाच्या अधिकारात देण्यात आले नाही. नियोजन मंडळ मंत्रिमंडळापासून पूर्णपणे स्वतंत्र असावे आणि नियोजन मंडळाचा मंत्रिमंडळाशी घनिष्ट संबंध असावा या दोन टोकाच्या विचारांचा, प्रत्यक्ष नियोजन मंडळाची रचना करताना, कसा मेळ घालण्यात आला हे या पुस्तकात मांडले आहे.

नियोजन मंडळाच्या स्थापनेला असलेल्या जॉन मथाई यांच्या विरोधाचा उल्लेखही तळटीपेत करण्यात आला आहे. सर्वच मुख्यमंत्र्यांना राष्ट्रीय विकास मंडळाच्या स्थायी समितीवर घेण्यात आल्यामुळे राष्ट्रीय विकास मंडळ आणि स्थायी समिती यामधील फरक संपुष्टात आला आणि समितीचे स्वतंत्र अस्तित्व जवळजवळ नष्ट झाले. वेगवेगळ्या विभागांतील अस्पष्ट भेद, अधिकारीपदाबद्दल लवचिक धोरण यामुळे मंडळाच्या कार्यात विस्कळीतपणा आला. या वर्णनात्मक अभ्यासात परांजपे यांनी ठिकठिकाणी अशा केलेल्या उल्लेखांमुळे नियोजन मंडळाच्या त्रुटी स्पष्ट झाल्या आहेत. सप्टेंबर 1970 मध्ये परांजपे यांनी प्रशासन सुधारणा मंडळाच्या शिफारशींच्या अमलबजावणीमुळे पुनर्रचित नियोजन मंडळासंबंधी एक पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात प्रशासन सुधारणा मंडळाच्या अनेक शिफारशी अमलात आणूनसुद्धा ज्या विशिष्ट ध्येयाने, दृष्टिकोनाने या शिफारशी करण्यात आल्या होत्या, ते ध्येय कसे सिद्ध झाले नाही आणि तो दृष्टिकोन कसा विफल झाला हे परांजपे यांनी मांडले आहे.

असा हा चौफेर कर्तृत्व असलेला विचारवंत निगर्वी आणि मनमिळाऊ स्वभावाचा होता. डॉ. परांजपे यांना परिषदेच्या वाटचालीविषयी नेहमीच आस्था होती. त्यांच्या दुःखद निधनाने परिषदेने एक ज्येष्ठ स्नेही आणि हितचिंतक गमावला आहे.

डॉ. परांजपे यांच्या स्मृतीला मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने विनम्र आदरांजली.

**व्यं. मु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.


# मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| नी. वि. सोवनी | : | **अर्थसिद्धान्त, आणखी चिकित्सक निबंध** * (1977) : पृष्ठे 226, किंमत 20 रुपये. |
| मो. वि. भाटवडेकर | : | **शिक्षणाचे अर्थशास्त्र** (1978), पृष्ठे 157, किंमत 20 रुपये, (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, 381 क, शनिवार पेठ, पुणे 411 030.) |
| भ. स. बापट | : | **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण*** (1982), पृष्ठे 333, किंमत रु. 50 (वितरक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे 411 030) (आवृत्ती संपली) |
| नी. वि. सोवनी | : | **लाफा विचारसरणी : चार व्याख्याने,*** पृष्ठे 64, किंमत रु. 10, प्रकाशक : नी. वि. सोवनी, पुणे. |

* ही पुस्तके म. अ. परिषदेच्या धुळे येथील कार्यालयाकडून मिळू शकतील.

# सोळावे वार्षिक अधिवेशन

## सूत्रसंचालकांचे अहवाल

### चर्चासत्र पहिले

## महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे अर्थशास्त्र

**माणिकराव धोंगडे ***

### 1

#### प्रास्ताविक

फलोत्पादनात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. फार पूर्वीपासूनच महाराष्ट्रात आंबा, केळी, संत्री, मोसंबी, चिकू इत्यादी फळांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. अलिकडील काळात फळपिकांचे महत्त्व जास्त वाढले आहे आणि त्याखालील क्षेत्रातही वाढ होत आहे. नव्याने आलेली बिनबियाची द्राक्षे, डाळिंब आणि बोर या पिकांनी फार मोठी मजल मारली आहे.

महाराष्ट्र शासनाने महत्त्वाकांक्षी अशी 'फलोद्यान विकास योजना' सुरू करून फलोद्यान विस्तारास फार मोठी चालना दिली आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेत यासाठी भरघोस अशी 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेत शेतकऱ्यांना बरेच मोठे अनुदान ठेवले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात फलोद्यान व्यवसायाची वाढ शीघ्र गतीने होऊ लागली आहे.

असे असले तरी, महाराष्ट्रातील फळबाग व्यवसायासंबंधी अर्थशास्त्रीय लिखाण फारच कमी उपलब्ध आहे. या व्यवसायाचे अर्थशास्त्रीय विश्लेषण, या व्यवसायातील समस्या, नव्याने येऊ लागलेल्या समस्या विपणन व्यवस्था, फळ प्रक्रिया इत्यादी अनेक बाबींचा अभ्यास व्हावा अशी या ठिकाणी अपेक्षा आहे.

### 2

#### निबंधाचे परिशीलन

या चर्चासत्रासाठी एकूण 19 निबंध सादर झालेले आहेत. त्यांचे वर्गीकरण पाच गटात करता येईल. अर्थात येथे हे नमूद करावे लागेल की, बऱ्याच निबंधात या विषयाची अनेक उपांगे एकत्रित केली गेली

* प्राध्यापक, कृषी अर्थशास्त्र, कृषी महाविद्यालय, कोल्हापूर (निवृत्त)

आहेत. त्यामुळे हे वर्गीकरण ढोबळ मानाने करण्यात आले असून निबंधात जास्त भर दिलेल्या बाबीनुसार त्या त्या गटात समावेश केला आहे.

(1) महाराष्ट्रातील 'फलोद्यान विकास योजनेचे' स्वरूप, मूल्यमापन, ती चांगल्या रीतीने राबविण्यासाठी उपाययोजना.

(2) महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे सर्वसाधारण स्वरूप, फळपिकांखालील तुलनात्मक क्षेत्र, सर्वसाधारण आर्थिक स्वरूप, अर्थव्यवस्थेतील महत्त्व.

(3) विशिष्ट फळपिकांच्या लागवड खर्चाचे-उत्पन्नाचे आर्थिक विश्लेषण.

(4) महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायातील समस्या आणि उपाय.

(5) फळांची विपणन व्यवस्था, विक्री व्यवस्थेतील बदल, सहकारी विक्रय संस्था, फळे प्रक्रिया, प्रक्रिया संस्था, फळ निर्यात–समस्या, उपाय.

पहिल्या गटात सहा निबंध सादर झाले आहेत. महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या फलोद्यान विकास योजनेसंबंधीचे विवेचन सर्व निबंधांत काहीसे सारखेच आहे. या योजनेचे व्यष्टी पातळीवर मूल्यमापन यमुना पाटील आणि भास्कर पाटील यांनी केले आहे. त्यांनी धुळे जिल्ह्यात सन 1982–83 पासून फलोद्यान विकासासाठी राबविल्या गेलेल्या विविध योजनांचा आढावा घेऊन, नवीन योजनेतील काही दोष दाखवून उपयुक्त सूचना केल्या आहेत. समारोपात त्यांनी नमूद केले आहे की, शासकीय यंत्रणा आणि उत्पादक लाभार्थी यांच्यात खरी जाणीव, जागृती झाली तर फळबाग योजनेस इतर योजनांपेक्षा निश्चितच चांगले यश येईल. त्यांच्या मते, मनातून अनिष्ट प्रवृत्ती नष्ट झाल्या पाहिजेत. उत्पादक शेतकऱ्यांमध्ये स्वविकासाची, स्वकष्टाची जाणीव निर्माण झाली तर यशस्वी वाटचाल होऊ शकेल. रमेश कटके यांनी शिरूर तालुक्यातील एका लहान खेड्यात राबविण्यात आलेल्या फळबाग योजनेचे विश्लेषण केले आहे. योजनेपूर्वी आणि योजनेनंतर फळझाडांच्या संख्येत झालेली वाढ तसेच फलोत्पादनाचे फायदे नमूद केले आहेत.

विकास सुकाळे यांनी उस्मानाबाद जिल्ह्यात केलेल्या पाहणीच्या आधारे योजनेतील उणीवा निदर्शनास आणल्या आहेत. त्यांच्या मते योग्य फळझाडे निवडीत संतुलन नाही; चांगल्या प्रतीच्या कलमाची उपलब्धता, मार्गदर्शन, पर्यवेक्षण, अनुदान वाटप यात बऱ्याच उणीवा दिसून येतात. त्यावर त्यांनी काही सर्वसाधारण स्वरूपाचे उपाय सुचविले आहेत. पायघन आणि सूर्यवंशी यांनी बार्शी तालुक्यात केलेल्या पाहणीचे निष्कर्ष निबंधात नमूद केले आहेत. त्यांच्या मते, तालुक्यातील फळबाग क्षेत्र 1990 नंतर वाढले असले तरी हे क्षेत्र एकूण क्षेत्राच्या फक्त 1·39 टक्के एवढेच आहे. शेतकऱ्यांचे अज्ञान, दप्तर दिरंगाई, दुष्काळ, तंत्रविज्ञानाचा अभाव, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, शेतकऱ्यांचे दारिद्र्य या प्रमुख समस्या आहेत. पाणी पुरवठ्यासाठी अनुदान, शेतकऱ्यांचे प्रबोधन, हमी किमती, बाजारांची माहिती, प्रक्रिया केंद्रे, विमा योजना असे उपाय त्यांनी सुचविले आहेत. शिंदे यांनी त्यांच्या निबंधात योजनेची माहिती देऊन परभणी जिल्ह्याचा आढावा घेतला असून योजनेचे फायदे आणि ती यशस्वीरीत्या राबविण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत. अ. ल. गुजर आणि सहकाऱ्यांनी सातारा जिल्ह्यातील फलोत्पादनाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की, जिल्ह्याच्या विविध भागात निरनिराळ्या फळपिकांच्या उत्पादनास भरपूर वाव आहे. त्याचप्रमाणे शास्त्रीय शिक्षण मार्गदर्शन, फळांच्या दर्जात सुधारणा, नवीन जाती, योग्य विक्रीव्यवस्था वगैरेमुळे फळ उत्पादनात भरपूर वाढ होईल.

दुसऱ्या गटात सर्वसाधारण स्वरूपाचे निबंध आहेत. प्रकाश अतकरे यांच्या मते पावसाचा लहरीपणा, कोरडवाहू शेती, खतांचा कमी वापर, सिंचनाखाली कमी क्षेत्र अशा अनेक कारणांमुळे शेती व्यवसाय बहुसंख्य शेतकऱ्यांना परवडणारा राहिला नाही. यासाठी पीकपद्धतीत बदल, फलोत्पादन विकासाला प्राधान्य देऊन राज्यातील उपलब्ध साधनसामग्रीचा उपयोग करून कृषी आणि ग्रामीण भागाचा विकास करणे शक्य आहे. रमेश जोशी यांनी फलोत्पादन कार्यक्रमामुळे रोजगारनिर्मितीत होणारी वाढ आणि इतर फायदे नमूद करून भविष्यकाळात होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील फलोत्पादनासाठी शीतगृहे, वेष्टन उद्योग यासंबंधी विचार मांडले आहेत. त्यांच्या निबंधात

'कोल्हे समिती' अहवाल तसेच पाण्याचे नियोजन, ठिबक सिंचन या बाबींचाही उल्लेख आहे. माहोरे यांनी फलोत्पादन कार्यक्रमाच्या विविध फायद्यात, पडीत जमिनीचा उपयोग, पर्यावरण संतुलन, विदेशी चलन प्राप्ती, शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ, आरोग्यदृष्ट्या महत्त्व यांचा उल्लेख केला आहे. तसेच स्ट्रॉबेरी, आंबा, संत्री या फळपिकांच्या लागवड तंत्रासंबंधीचे निष्कर्ष दिले आहेत.

तिसऱ्या गटात विशिष्ट फळपिकांच्या लागवडीचे आर्थिक विश्लेषण केले आहे. यात एकूण तीन निबंध आहेत. ज. शा. पाटील आणि ज. फा. पाटील यांचा 'द्राक्ष शेतीचे अर्थशास्त्र' हा निबंध शास्त्रीय विश्लेषण करणारा असला तरी त्यात काही मूलभूत उणिवा आहेत. सांगली जिल्ह्यातील एका गावातील 33 द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांच्या अभ्यासावर हा आधारित आहे. द्राक्षपीक इतर पिकांपेक्षा जास्त फायदेशीर का ठरते हे नमूद करून द्राक्ष पिकासाठी लागणाऱ्या स्थिर आणि चल परिव्ययाचा अभ्यास द्राक्ष शेतीच्या आकारमानाच्या गटानुसार करण्यात आला आहे. त्यांच्या मते 41 आर ते 60 आर हे द्राक्ष लागवड क्षेत्राचे आकारमान इष्टतम होय. परिव्यय आणि उत्पन्नाचे विश्लेषण करून एक किलो द्राक्षाची एकूण प्राप्ती 8 रु. 12 पैसे आणि परिव्यय 6 रु. 11 पैसे काढलेला आहे; म्हणजेच एक किलो द्राक्षापासून निव्वळ नफा 2 रुपये मिळतो. आ. गो. पुजारी यांचा 'सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब फलोत्पादनाचे अर्थशास्त्र' हा निबंधही विश्लेषणात्मक आहे. त्यात पंढरपूर विभागातील (चार तालुके–8 गावे) 16 शेतकऱ्यांच्या सखोल अभ्यासावर आधारित निष्कर्ष दिले आहेत. डाळिंब हे पीक हलक्या जमिनीतदेखील चांगले उत्पन्न देऊ शकते. निव्वळ एकरी उत्पन्न सरासरीने 31,000 रुपयांपर्यंत मिळू शकते. वि. मा. इंगवले यांनी त्यांच्या निबंधात फलोत्पादनाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व विशद करून काजू उत्पादनावर उपयुक्त माहिती दिली आहे. तसेच कोकणातील आंबा, काजू, चिकू, सुपारी आणि नारळ या पिकांचे उत्पादन परिव्यय, उत्पन्न आणि निव्वळ नफा यांची आकडेवारी दिली आहे. तथापि, ही आकडेवारी दुसऱ्या अभ्यासावरून घेतली आहे, त्यांची स्वत:ची नाही. योग्य तो संदर्भ त्यांनी दिला आहे. त्यात काजू पीक जास्त किफायतशीर असल्याचे दिसते. कोकणात काजू उत्पादन वाढविण्यासाठी त्यांनी काही सूचनाही केल्या आहेत.

चौथ्या गटात महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायातील समस्या आणि उपाय नमूद करणारे तीन निबंध आहेत. मुसळे यांनी 'सोलापूर जिल्ह्यातील द्राक्ष बागांचा विकास आणि समस्या' या निबंधात द्राक्ष पिकाचा विकास होण्यात हवामान, पाऊस याबरोबरच महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाच्या सोलापूर शाखेने केलेल्या कार्याचा तसेच बँकांच्या कर्जपुरवठ्याचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी विक्री व्यवस्थेसाठी सहकारी तत्त्वावर स्थापन केलेल्या संस्थांचाही उल्लेख केला आहे. काही द्राक्ष उत्पादक शेतकरी तसेच द्राक्ष बागायतदार संघाचे पदाधिकारी यांच्या मुलाखतीवर आधारित काही चांगल्या सूचनाही केल्या आहेत. पाण्याच्या सोयी, द्राक्षमद्यनिर्मिती धोरण, निर्यात, वाहतूक सवलती, आंतरराष्ट्रीय बाजारात जाहिरात वगैरे गोष्टी शासनाने करणे जरुरीचे असल्याचे त्यात नमूद केले आहे. कल्याणी कुलकर्णी यांनी शेती विकासात फलोद्यान विकासावर दिला जाणारा भर कसा योग्य आहे हे सोदाहरण नमूद केले आहे. कृषी विद्यापीठातील संशोधनाने हे सिद्ध केले आहे. कोरडवाहू फळझाडांची हलक्या जमिनीवर लागवड, ग्रामीण भागात आरोग्यासाठी फळांची उपलब्धता, रोजगारनिर्मिती असे फायदे त्यांनी नमूद केले आहेत. पिकांचे योग्य नियोजन, अपारंपरिक नवीन पिकांचा समावेश, नवीन बाजार, प्रक्रिया, निर्यात, कर्मचारी प्रशिक्षण, खते, औषधांचा योग्य वापर यासंबंधी उपयुक्त सूचना त्यांनी केल्या आहेत.

सुधाकर कुलकर्णी यांनी फळबाग शेतीतील समस्यांची नैसर्गिक, तांत्रिक आणि आर्थिक अशी विभागणी करून या समस्या सोडविण्यासाठी 'फलोद्यान वसाहतींची निर्मिती' हा उपाय सुचविला आहे. औद्योगिक वसाहतींच्या धर्तीवर फलोद्यान वसाहती हा एक नवीन विचार त्यांनी मांडला आहे. या योजनेचे स्वरूप, कार्यक्षेत्र, वसाहतीची कार्ये, रचना, आर्थिक तरतूद वगैरे बाबी समाविष्ट असणारी एक रूपरेषा त्यांनी दिली आहे.

फळांची विपणन व्यवस्था, प्रक्रिया, निर्यात या

गोष्टी फलोत्पादनात महत्त्वाच्या आहेत असे उल्लेख अनेक निबंधांत आलेले आहेत. तथापि, चार निबंधांत या उपांगावर चांगला प्रकाश टाकल्याचे दिसून येते. वा. म. पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'महाराष्ट्रातील फळनिर्यात–समस्या आणि भवितव्य' या निबंधात फळांच्या पुरवठ्यातील अनिश्चितता, कमी उत्पादकता, शेतकऱ्यांचे अज्ञान, निर्यातयोग्य फळजातींचा अभाव, आवेष्टन साहित्याचा अपुरेपणा, खर्चिक वाहतूक, बाजारांच्या माहितीचा अभाव, फळे काढणीनंतरच्या व्यवस्थापनाचा अभाव, जाहिरातीकडे दुर्लक्ष, निर्यात धोरणात होणारे बदल इत्यादी अडचणी विशद केल्या आहेत. त्यावर उपाययोजनाही सुचविल्या आहेत. चांगुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आंबा निर्यातीसंबंधी चांगला अभ्यास केला आहे. आंबा निर्यातीची गेल्या काही वर्षांतील आकडेवारी, निर्यात केले जाणारे देश, आंब्याची वाणानुसार मागणी, प्रतवारी, आवेष्टन, वाहतूक यासंबंधी उपयुक्त माहिती दिली आहे. महागडी हवाई वाहतूक, सागरी वाहतुकीतील अडचणी, आवेष्टनाचा हलका दर्जा या गोष्टींचा उल्लेख केला आहे. उपाय–योजनेत हापूस व केशर या जातीच्या आंब्यांच्या लागवडीत वाढ, हवाई वाहतुकीत भाड्यात सूट आणि फळांना प्राधान्य, निर्यात देशांचा अभ्यास, शीतगृहाच्या सोयी यांचा समावेश आहे. मंगला गोगटे यांनी फळ-प्रक्रिया करणाऱ्या 'मॅफको' या संस्थेचा आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. प्रक्रिया संस्थेचे आर्थिक विश्लेषण करणारा हा एकमेव निबंध आहे. ही संस्था कोंबड्या आणि डुकराचे मांस, अतिशीत खाद्यवस्तू, आंब्याचा गर आणि 'एनर्जी' दूध यांचे उत्पादन करते. आंबागर उत्पादन देशात तसेच परदेशातही पाठविले जाते. आंबागर हा तोतापुरी तसेच हापूस आंब्यांपासून काढला जातो. उत्पादन परिव्यय आणि विक्री–मूल्य यांचे आर्थिक विश्लेषण निबंधात केले आहे. आंबागर विक्रीपासून जास्त नफा होतो असे त्यावरून दिसून येते. पुजारी आणि भ. ह. कुलकर्णी यांनी सांगोला (जि. सोलापूर) येथील पंढरीप्रसाद सहकारी फलोत्पादक संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा मागोवा घेणारा निबंध सादर केला आहे. सध्या तालुक्यात वाढत चाललेल्या फळबागांची प्रगती करणे, त्यासाठी उत्पादनपूर्व तसेच विपणन व्यवस्थेबाबत दूरदर्शी दृष्टिकोनातून प्रयत्न करणे ही भूमिका संस्था चांगल्या रीतीने पार पाडीत असल्याचे दिसून येते. फळ उत्पादक फळांची वर्गवारी, प्रतवारी करून, योग्य आवेष्टनात बांधून संस्थेकडे देतात. ती फळे योग्य बाजारात पाठवून पैशाची वसुली करून संस्था ते पैसे शेतकऱ्यांना देते. आवेष्टन साहित्याचा पुरवठा, कमी खर्चाची वाहतूक, कीटक–नाशक औषधांचा पुरवठा अगदी कमी अडत घेऊन संस्था करते. दिवसेदिवस संस्थेचे कार्य वाढत आहे. तांत्रिक मार्गदर्शनासाठी तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्रे आयोजित केली जातात, नजिकच्या काळात ही संस्था बोरापासून कँडी, डाळिंबांचा रस, शीतगृह, शीतकरण–पूर्व यंत्रणा वगैरे कामे हाती घेणार आहे.

## 3

## चर्चेसाठी मुद्दे

चर्चेमध्ये ज्या मुद्यांची अधिक चर्चा व्हावी असे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

(1) बऱ्याच निबंधांत आठव्या पंचवार्षिक योजनेत सुरू झालेल्या 'फलोद्यान विकास योजनेचे' मूल्यमापन केलेले आहे. काही व्यष्टी अभ्यासही आहेत. या योजनेची अमलबजावणी चांगल्या रीतीने होण्या–साठी आणि ही योजना अधिक फलदायी होण्यासाठी आपण काही उपयुक्त सूचना करू शकू का? त्या कोणत्या?

(2) अन्नधान्य पिकांच्या तुलनेने फळपिके ही जास्त फायदेशीर आहेत असे बऱ्याच अभ्यासात दिसून आले आहे. असे असतानाही, या फळपिकांच्या लागवडी-खालील क्षेत्र तुलनेने फार कमी आहे. हे क्षेत्र जास्त गतीने का वाढत नाही? त्यातील महत्त्वाच्या अडचणी कोणत्या? त्यावर काय उपाय करता येतील?

(3) सध्या घेतली जात असलेली फळपिके इतर कोणत्या पिकांऐवजी घेतली जातात? फळ–पिकांमुळे अन्नधान्य पिकांचे क्षेत्र कमी होत आहे का? किंवा नजीकच्या काळात या फळपिकांसाठी निविष्टींचा वापर वाढल्यामुळे अन्नधान्यांचे उत्पादन कमी होईल का? (आपले राज्य अगोदरच अन्नधान्या-बाबत तुटीचे आहे).

(4) महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसाय विका–

सातील विशेष महत्त्वाच्या समस्या कोणत्या आहेत ? त्यावर आपण कोणते ठोस उपाय सुचवू शकतो ?

(5) फळे प्रक्रिया, निर्यात आणि विपणन व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे ? 'पंढरीप्रसाद' सारख्या सहकारी संस्था कोणत्या कारणांनी यशस्वी झाल्या आहेत ? त्यांचे अनुकरण इतरत्र का होत नाही ?

(6) सुधाकर कुलकर्णी यांनी सुचविलेल्या 'फलोद्यान वसाहती' या संकल्पनेवर आपल्या काय प्रतिक्रिया आहेत ?

## 4

## चर्चेचा गोषवारा

चर्चेच्या सुरुवातीसच भानुशाली यांनी चर्चेमध्ये समाविष्ट झालेल्या निबंधांचे तुलनात्मक विश्लेषण सादर केले. एकूण चौदा वक्त्यांनी चर्चेत भाग घेतला. बऱ्याच वक्त्यांनी सध्याच्या फळबाग योजनेतील दोष–उणीवा नमूद करून त्या दूर करण्यासाठी काही सूचना केल्या. यासंबंधी एका वक्त्याने सांगितले की, फळझाडांसाठीच्या खड्ड्याचे आकारमान काय असावे, कोणत्या जातीची कलमे लावावीत याबाबतीतसुद्धा तज्ज्ञ परस्परविरोधी सूचना देतात. विशिष्ट भागात विशिष्ट फळझाडे जास्त किफायतशीर ठरतात. त्यासाठी त्यांचे आर्थिक विश्लेषण होणे जरुरीचे आहे, अन्यथा फळबागा तोट्यात जातील असाही एक विचार मांडला गेला. फळबाग योजना शेतकऱ्यांच्या हिताची असून त्यामुळे रोजगार आणि निर्यातीत वाढ होऊन आर्थिक सुबत्ता येईल असा सर्वसाधारण सूर दिसून आला. ही योजना चांगल्या रीतीने राबविण्यासाठी केलेल्या काही सूचना पुढे दिल्या आहेत.

(1) अशा योजनांमध्ये लोकांचा सहभाग असणे हे महत्वाचे ठरते. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांनाही त्यात सहभागी करून घ्यावे.

(2) सध्याची लहान धारणक्षेत्रे आणि शेतकऱ्यांचे दारिद्र्य विचारात घेता काही गोष्टी / बाबी फक्त लहान शेतकऱ्यांसाठीच राखून ठेवण्यात याव्यात.

(3) अशा प्रकारच्या चर्चेसाठी निवडक शेतकऱ्यांनाही निमंत्रित करावे.

(4) फळबाग योजना लक्ष्य अभिमुख (target oriented) नसाव्यात.

(5) फळबाग योजनेची एकात्मिक ग्रामीण विकास योजनेशी (IRDP) सांगड घालावी.

(6) अशा योजनेचे वेळोवेळी मूल्यमापन करण्यात यावे.

फळबाग योजनेमुळे फळपिकांचे क्षेत्र हळूहळू वाढत चालले आहे. अपुरा पाणी पुरवठा, सिंचनाच्या कमी सोयी, शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य, लहान धारणक्षेत्र अशा कारणांमुळे फळपिकांखालील क्षेत्र मोठ्या गतीने वाढत नाही असे दिसते.

फळबागांचे क्षेत्र वाढल्यामुळे अन्नधान्याचे क्षेत्र आणि उत्पन्नावर फारसा परिणाम होणार नाही असे मत काही वक्त्यांनी प्रदर्शित केले. या युक्तिवादात असे सांगण्यात आले की, फळपिके बऱ्याच प्रमाणात हलक्या आणि पडीत जमिनीवर घेतली जात आहेत. शिवाय तौलनिक फायद्याचे तत्त्व डोळ्यापुढे ठेऊन शेतकऱ्यांनी अन्नधान्याऐवजी फळपिके घेतली तर त्यात काही चूक नाही.

फळपिकांची विपणनव्यवस्था, निर्यात, प्रक्रिया यावर निबंधांत बराच ऊहापोह केलेला असला तरी त्याबाबत फारशी चर्चा झाली नाही. फळ प्रक्रियेबाबत एका वक्त्याने असे मत व्यक्त केले की, फळांची प्रक्रिया हा एक वेगळा उद्योग आहे. त्यासाठी उपक्रमी हवा, शेतकरी ते काम करू शकणार नाही.

चर्चेत दोन वक्त्यांनी निबंधांवरील आपल्या सर्वसाधारण प्रतिक्रिया व्यक्त करून काही उणीवा उदाहरणे देऊन विशद केल्या. त्यांचा उल्लेख करणे अगत्याचे आहे असे वाटते.

(1) निबंधांतील आकडेवारी अपूर्ण स्वरूपाची असल्याचे दिसून येते. तसेच त्यावरील विश्लेषणही

स्थितिक ( static ) स्वरूपाचे आहे. त्यामुळे निबंधांत काढलेले निष्कर्ष उपयुक्त ठरत नाहीत.

(2) फळपिकांची लागवड केल्यानंतर फळे येण्यास काही वर्षांचा कालावधी लागतो. लागवड परिव्ययाचे आर्थिक विश्लेषण करताना ही बाब तसेच फळझाडांची आयुर्मर्यादा विचारात घेणे जरुरीचे आहे. निबंधात याचा विचार केलेला दिसत नाही.

(3) फळपिकांसाठी कर्जपुरवठा कशा प्रकारे केला जातो ? त्यात अल्प मुदतीच्या आणि दीर्घ मुदतीच्या कर्जांचा वाटा यावर कोणत्याही निबंधात प्रकाश टाकलेला दिसत नाही.

(4) फळांच्या लागवडीच्या परिव्ययाचे विश्लेषण शास्त्रीय दृष्टिकोनातून केले गेले नाही. एका निबंधात दिलेली आकडेवारी आणि त्यावरून काढलेल्या निष्कर्षात काही विसंगती दिसून येते. निबंध तयार करताना अशा उणीवा राहू नयेत याची काळजी घेण्यात यावी.

या चर्चासत्रात तज्ज्ञ म्हणून फिरके, फलोद्यान अधिकारी, नाशिक यांनी फलोद्यान विकासासंबंधी उपयुक्त माहिती सादर केली.

□ □

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आजीव सदस्यांची यादी

(ऑक्टोबर–डिसेंबर 1992 अंकावरून पुढे चालू )

601 कु. संध्या रामचंद्र मुनीश्वर, कोल्हापूर
602 श्री. समीर गोवारीकर, कोल्हापूर
603 प्रा. नेताजी विश्वासराव पवार, कोल्हापूर
604 प्रा. संजय दादासाहेब ठिगळे, सांगली
605 डॉ. उल्हास फडके, भंडारा
606 डॉ. राम देशपांडे, पुणे
607 प्रा. झेड. के. आहेर, कळवण (जि. नाशिक)
608 प्रा. के. पी. चव्हाण, कळवण (जि. नाशिक)
609 प्रा. एम. व्ही. निकम, देवळा (जि. नाशिक)
610 प्रा. मुकुंद भास्कर नातू, पुणे
511 प्रा. शिवाजी काशिनाथ पाटील, चोपडा (जि. जळगांव)
612 डॉ. (सौ.) मीनाक्षी सावंत, कुडाळ (जि. सिंधुदुर्ग)

## चर्चासत्र दुसरे

# भारताचे ग्रामीण उद्योगीकरण

र. पु. कुरुलकर *

## निबंधांचे परिशीलन

या चर्चासत्रासाठी एकूण 18 निबंध सादर करण्यात आले. विश्लेषणाच्या आणि चर्चेच्या दृष्टीने या सर्व निबंधांचे पुढीलप्रमाणे विभाजन करता येईल.

(1) भारतीय पातळीवर ग्रामीण उद्योगीकरणासंबंधी चर्चा आठ निबंध लेखकांनी केली आहे. अ. ह. पाचकवडे आणि भिसे व के. का. पाटील यांनी आपल्या निबंधात ग्रामीण उद्योगीकरणाची उद्दिष्टचे स्पष्ट करून, पंचवार्षिक योजना काळात ग्रामीण उद्योगावर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची एकूण खर्चाशी तुलना केली आहे. हे प्रमाण 2·1 टक्क्यांवरून 1·5 टक्क्यांपर्यंत घटल्याचे म्हटले आहे. तसेच 1956 पासूनच्या औद्योगिक धोरणाचा आढावा घेऊन त्यांचे मूल्यमापन केले आहे. सवने यांनी आठव्या पंचवार्षिक योजनेतील ग्रामीण उद्योगीकरणाची चर्चा करून बेकारीचे वाढते प्रमाण आणि दारिद्र्य यावर प्रकाश टाकला आहे. त्यांनी आपल्या निबंधात अनेक ग्रामोद्योग आणि प्रक्रिया उद्योगांसंबंधी उत्पादन–रोजगार संबंध लवचिकतेच्या आधारे स्पष्ट केला आहे. विजय साठे यांनी ग्रामीण उद्योगीकरण आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे साधन आणि उद्दिष्ट आहे असे सांगून त्याकडे आजपर्यंत फार दुर्लक्ष झाल्याचे म्हटले आहे. नव्या आर्थिक धोरणाचा काय परिणाम होईल यासंबंधी आपले विचार त्यांनी मांडले आहेत. शाम सोवनी यांनी एक नवा मुद्दा उपस्थित केला असून त्यांच्या मते, ग्रामीण उद्योगीकरणासाठी योग्य असा संघटन प्रकार निर्माण करणे आवश्यक आहे. गांधीवादी प्रकार आणि सहकार यांना अपयश आले असून शूमाकर यांचा ' public corporation ' हा प्रकार योग्य असून त्या मार्गेच गांधीजींचे स्वप्न साकार होईल असे प्रतिपादन केले आहे.

हिंदोचा यांनी भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्टचे सांगून दारिद्र्याचा मोठा भार ग्रामीण विभागावर अस-

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

त्याचे म्हटले आहे. भारतातील निरनिराळ्या राज्यांतील ग्रामीण उद्योगांची माहिती देऊन खादी ग्रामोद्योगाच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे. तसेच ग्रामीण उद्योगात त्यांचा सहभाग आणि भांडवल–उत्पादन गुणोत्तर यासंबंधीही चर्चा केली आहे. बिराजदार यानी आपल्या निबंधात निरनिराळ्या वित्तसंस्थांची चर्चा केली असून, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर त्यांचे व्यवस्थापन अयोग्य असल्याचे म्हटले आहे. प्रशिक्षणाचा अभाव आणि योजनांविषयीचे अज्ञान ही दोन मुख्य कारणे चर्चिली आहेत. विलास कुमठेकर यानी नवी यंत्रे आणि उत्पादनपद्धती खेड्यांपर्यंत पोहचत नाहीत, दळणवळणाच्या अपुऱ्या सोयी आहेत, सहकारी क्षेत्र वाढत असले तरी त्यात अनेक दोष निर्माण झाले आहेत असे म्हटले आहे.

(2) महाराष्ट्रात, विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात, सहकारी साखर उद्योगाने ग्रामीण उद्योगीकरणाचा पाया रोवला असून, त्यायोगे आज ग्रामीण भागाचा कायापालट केल्याचे दिसते. सहकारी साखर उद्योगावर एकूण तीन निबंध सादर झाले असून हे निबंध प्रवरानगर, सातारा जिल्हा आणि सांगली जिल्ह्यासंबंधी आहेत. के. डी. जाधव यानी भारतीय तुलनेत महाराष्ट्रातील साखर उद्योगांच्या प्रगतीचा आढावा घेऊन सातारा जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांचा अभ्यास सादर केला आहे. त्यात प्रामुख्याने रोजगारनिर्मिती, उत्पादनवाढ आणि इतर सहायक उद्योगांची वाढ (दुग्ध, मद्य, वगैरे) करून आर्थिक विकास साध्य करता येतो असे प्रतिपादन केले आहे. सुमित्रा पवार यानी वसंत सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात, रोजगार आणि उत्पन्नाची चर्चा केली असून 'दत्तक खेड्याची' सूचना केली आहे. साखर कारखान्यातील नोकरवर्गाला मिळणाऱ्या सुविधांची चर्चा करून त्यांना प्रशिक्षण द्यावे अशी सूचना केली आहे. बाळकृष्ण कुलकर्णी यानी प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात आपला निबंध सादर केला असून सहकारी साखर कारखान्यांना ग्रामीण उद्योगीकरणात फार मोठे सहकार्य करता येईल असे प्रतिपादन केले आहे. यातून हस्तोद्योग, कुटिरोद्योग विकसित होऊ शकतील असे म्हटले आहे. ठाकरे यानी 10–15 खेड्यांसाठी प्राथमिक स्तरावर, 25–30 खेड्यांसाठी द्वितीय स्तरावर ग्रामीण औद्योगिक वसाहतींची स्थापना करण्याची सूचना मांडली आहे. उद्योगांची निरोगी वाढ करून खेड्यांतील गरजा खेड्यांतील उत्पादनातून पूर्ण करण्यात असे प्रतिपादन केले आहे.

(3) तिसऱ्या प्रकारातील निबंध एका विशिष्ट उद्योगावर आधारित असे आहेत. त्यात बायोगॅस संयंत्र, रेशीम उद्योग, तयार कपडे उद्योग, पादत्राणे, पूरक उद्योग, कुक्कुटपालन यांचा समावेश होतो. अर्जुन पाटील यानी आपल्या निबंधात बायोगॅस संयंत्र ग्रामीण विकासाचे एक आधुनिक साधन होऊ शकेल असे म्हटले आहे. सध्याची देशातील इंधन टंचाई, पर्यावरणाचा गंभीर प्रश्न लक्षात घेता, बायोगॅस संयंत्र त्यावर एक प्रभावी उपाय आहे असे म्हटले आहे. याशिवाय राष्ट्रीय स्तरावरील विशेषकरून ग्रामीण जनतेला मिळणारे फायदे त्यानी विशद केले आहेत. नीता चोरडिया यानी रेशीम उद्योग म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळालेले एक वरदानच होय असे म्हटले आहे त्यानी जळगाव जिल्ह्यातील रेशीम उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्यातील अनेक समस्यांचा उल्लेख केला आहे. त्यात प्रामुख्याने भांडवलपुरवठा, साठवण, कोषांचा दर, पाणीपुरवठा इत्यादी समस्या मांडल्या आहेत. प्रगतीचा वेग संथ असून प्रशिक्षणाच्या सोयी आणि कर्जपुरवठा करण्यासंबंधी सूचनाही त्यानी केल्या आहेत. रेशमास फार मोठा आंतरराष्ट्रीय बाजार उपलब्ध असल्याचेही त्यानी निदर्शनास आणून दिले आहे. रमेश कटके यांनी तयार कपडा व्यवसायावर निबंध लिहिला असून, या उद्योगास फार मोठा आंतरराष्ट्रीय बाजार उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. बाटिक आणि संकल्पन (design) याचीही त्यानी चर्चा केली आहे. कटके आणि कदम यानी पादत्राणे उद्योगाच्या समस्या आणि त्यावरील उपाय सुचविले आहेत. पादत्राणे आणि कातडीच्या अनेक उत्पादनास फार मोठा आंतरराष्ट्रीय बाजार असून, त्याचा फायदा भारताने घ्यावयास हवा असे प्रतिपादन केले आहे. त्यानी आपला निबंध नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात लिहिला आहे.

राजन तुंगारे आणि चंद्रकांत पंडित यानी कोल्हापूर जिल्ह्याच्या संदर्भात ग्रामीण उद्योगीकरणात पूरक उद्योगांचे कोणते स्थान आहे यासंबंधी सविस्तर अभ्यास केला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पूरक उद्योगांच्या प्रगतीचा आढावा घेऊन, विभागीय असमतोल

कमी करण्याचे ते एक प्रमुख साधन होय, असे मत त्यानी मांडले आहे.

ल. शि. पाटील यानी नंदुरबार शहरातील इंदिरा सहकारी महिला कुक्कटपालन संस्थेच्या संदर्भात आपला निबंध सादर केला असून, त्यात काही महत्त्वाच्या समस्यांचा ऊहापोह केला आहे. कुक्कटपालन हा एक चांगला कृषीपूरक व्यवसाय होऊ शकतो असे त्यानी प्रतिपादन केले आहे.

## चर्चेसाठी मुद्दे

भारतातील ग्रामीण उद्योगीकरणाविषयी अनेक मुद्यांवर निबंधलेखकांनी चर्चा केली आहे. तरीसुद्धा इतर काही गोष्टींबाबत चर्चा होणे आवश्यक आहे. त्या सर्वांचा येथे उल्लेख करू.

(1) ग्रामीण उद्योग म्हणजे काय ? निश्चयनाच्या दृष्टिकोनातून हा विचार केल्यास जेथे ग्रामपंचायत ( किंवा त्यापेक्षा खाली समूह ग्रामपंचायत ) आहे अशा खेड्यांचाच समावेश 'ग्रामीण' या संज्ञेत करता येईल. जेथे नगरपरिषदा आहेत त्या गावांना ग्रामीण म्हणता येणार नाही. सध्या बहुसंख्य उद्योग तालुक्याच्या गावीसुद्धा मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत (साखर कारखाने, जिनिंग–प्रेसिंग, हातमाग वगैरे). मग या सर्वांना ग्रामीण उद्योगीकरणात समाविष्ट करावे का ? अनेक निबंधांतील उद्योग या दृष्टिकोनातून 'ग्रामीण' या संज्ञेत बसत नाहीत यावर विचार व्हावा.

(2) ग्रामीण उद्योगीकरणात अनेक प्रकारचे उद्योग मोडू शकतात. शासनाने दिलेल्या अनेक व्याज आणि करविषयक सवलतींमुळे, प्रचंड गुंतवणूक असलेले उद्योग ग्रामीण भागात हेतूपूर्वक आलेले दिसतात. उदाहरणार्थ, वाळूज ( ग्रामपंचायत ) येथील बजाजचा स्कूटरचा कारखाना, चितगाव येथील व्हिडिओकॉनचा कारखाना अशी अनेक उदाहरणे जिल्ह्यात पाहावयास मिळतात. त्यामुळे ग्रामीण भागात मोठे, मध्यम, लघु आणि लघुतम हस्तोद्योग, गृहोद्योग अशा सर्व प्रकारच्या उद्योगांना वाव असल्याचे दिसते. परंतु त्यांच्या वाढीसाठी शासनाने आतापर्यंत ज्या सामाजिक संरचना करावयास हव्या होत्या त्या पुरेशा केल्या नाहीत त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण उद्योगीकरणास चालना मिळू शकली नाही. आतापर्यंत या सर्व सोयी केवळ नागरी भागातच केंद्रित केल्यामुळे ग्रामीण भाग दुर्लक्षित राहिला. या मुद्दावरही चर्चा व्हावी.

(3) ग्रामीण उद्योगीकरणाची पुढील उद्दिष्टे महत्त्वाची वाटतात :

(अ) ग्रामीण जनतेच्या रोजगारात आणि उत्पन्न पातळीत वाढ करणे.

(आ) ग्रामीण मजुरांचे आणि कुटुंबियांचे शहराकडे होणारे स्थलांतर रोखणे.

उत्पन्न आणि उपभोग या दोन चलांचा विचार केल्यास, ते नागरी भागात अधिक जास्त पातळीवर नियमित असतात असे म्हणता येईल. याउलट ग्रामीण भागात निसर्गाच्या लहरीमुळे ( अवर्षण अतिवृष्टी ) ग्रामीण जनतेच्या रोजगारात आणि उत्पन्नात सतत अस्थिरता निर्माण होते. ग्रामीण उद्योगीकरणामुळे ही अस्थिरता निश्चितच कमी होईल. एवढेच नव्हे तर, त्यांच्या कौशल्यात वाढ केल्यास उत्पादकता वाढीमुळे त्यांची उत्पन्न पातळीही वाढेल. ग्रामीण उद्योगीकरणाचे म्हणूनच हे एक प्रमुख उद्दिष्ट असावे. दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्याचे आनुषंगिक उद्दिष्ट त्यामुळे आपोआपच साध्य होईल. त्याचा वेगळा विचार करण्याची मग गरजही भासणार नाही.

(4) ग्रामीण उद्योगांची वित्तीय व्यवहार्यता तपासणे महत्त्वाचे वाटते. कोणत्याही निबंध लेखकाने या संदर्भात मांडणी केलेली दिसत नाही. बँकांच्या अनेक अहवालात 'वित्तीय व्यवहार्यतेचे' अभ्यास प्रसिद्ध झाले आहेत. स्थिर भांडवल, खेळते भांडवल, व्याज दर, परतफेडीची वार्षिक रक्कम आणि निव्वळ उत्पन्न ही माहिती व्यवसाय उद्योगाप्रमाणे असते. हे निव्वळ उत्पन्न अनेक व्यवसाय उद्योगात इतके कमी असते की, त्यावर एक कुटुंब किमान पातळीवर जगू शकेल का हा मुद्दा चर्चेचा होऊ शकेल. असे उद्योग वित्तीय दृष्टीने

व्यवहार्य असूनसुद्धा उत्पन्नपातळीच्या दृष्टीने त्या कुटुंबास सतत कमी उत्पन्नपातळीवर ठेवणारे आहेत असे दिसेल. याची चर्चा व्हावी.

(5) साखर कारखाने, मद्यार्क निर्मिती, कागद, रसायने, जिनिंग व प्रेसिंग, हातमाग, सूत गिरण्या इत्यादीं ग्रामीण उद्योगासंबंधी काही महत्त्वाची माहिती अनेक निबंधांत दिलेली नाही. उदाहरणार्थ या उद्योगांना किती स्थिर भांडवल आवश्यक आहे, त्यामुळे किती रोजगार निर्माण होऊ शकतो, भांडवल-उत्पादन कसे आहे, सरकारचे यासंबंधी काय धोरण आहे, गुणोत्तर यासंबंधी चर्चा होणे आवश्यक आहे.

(6) कृषीवर आधारित उद्योगांसंबंधी काही प्रतिमाने 'प्रादेशिक अर्थशास्त्रात' आहेत. त्यापैकी थॉम्सन यांनी मांडलेले प्रतिमान भारतीय संदर्भात उपयुक्त वाटते. त्यांचे हे प्रतिमान 'बाह्य' असून त्यात स्थानिक कच्चा माल, स्थानिक रोजगार आणि निर्यातीद्वारे उत्पन्न आणि रोजगार वृद्धी यावर भर दिला आहे. साखर उद्योग, कापूस व तेलबिया, चर्मोद्योग अशा कृषी आधारित उद्योगांत स्थानिक लोकांना किती रोजगार मिळतो हा सुद्धा चर्चेचा विषय आहे. अनेक उद्योगांत कामगारांची भरती इतर भागातून केल्याचे आढळते. त्यामुळे स्थानिक तरूण बेकार राहून विकासाची फळे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागास मिळू शकत नाहीत.

(7) **नवे आर्थिक धोरण आणि ग्रामीण उद्योगीकरण** : सन 1991 पासून भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक आमूलाग्र धोरणात्मक बदल घडून येत आहेत (औद्योगिक अनुज्ञप्ती पद्धती, खाजगीकरण, अधिकोषणा-विषयी नसिंहम समिती अहवाल). परंतु वरील धोरणांचा ग्रामीण उद्योगांवर होणारा संभाव्य गंभीर परिणाम कोणत्याही लेखात चर्चिला नाही. त्यामुळे या चर्चासत्रात त्यांचा विचार होणे अगत्याचे आहे. यासाठी काही ठळक बाबींचा येथे उल्लेख करू.

(अ) अनुज्ञप्ती धोरण जवळजवळ रद्द केल्यामुळे आता उपक्रमी मागास भागात उद्योग सुरू करतील का ? परिणामत: विभागीय असमतोल अधिकच वाढेल असे वाटते.

(आ) नर्सिहम समितीच्या अहवालाप्रमाणे, प्राधान्य क्षेत्राला एकूण पतपुरवठ्यापैकी 40 टक्के पतपुरवठा व्यापारी बँका करतात. तो क्रमाक्रमाने 10 टक्क्यांपर्यंत कमी करावा अशी एक शिफारस आहे. या शिफारशीचा गंभीर परिणाम ग्रामीण उद्योगांवर होऊ शकेल. 40 ते 50 हजार कोटी रुपयांची ही वार्षिक कर्जकपात असेल. अनेक छोटेमोठे उद्योग त्यामुळे अडचणीत येऊन बेकारीत भर पडेल.

मुक्त व्याजदर पद्धतीमुळेसुद्धा व्यापारी बँकांचे व्याजदर 30 टक्क्यांपर्यंत वाढू शकतील असे मत एन. ए. मुजुमदार यांनी व्यक्त केले आहे. एवढा व्याजदर ग्रामीण उद्योग पेलू शकतील का, हा चर्चेचा मुद्दा होऊ शकेल.

खाजगीकरणामुळे मोठ्या उद्योगांबरोबर ग्रामीण उद्योग कितपत स्पर्धा करू शकतील ?

या सर्व मुद्यांवर सदस्यांनी चर्चा करावी.

## चर्चेचा गोषवारा

भारताचे ग्रामीण उद्योगीकरण विषयावर एकूण 18 निबंध सादर करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने आठव्या योजनेतील ग्रामीण उद्योगीकरणाचा कार्यक्रम, साखर कारखान्यांचे ग्रामीण उद्योगीकरण आणि ग्रामीण विकासातील स्थान तसेच ग्रामीण उद्योगीकरणात इतर अनेक पूरक उद्योग, ग्रामोद्योग, हस्तोद्योग यांचे महत्त्व इत्यादी मुद्यांसंबंधी निबंधात मांडणी करण्यात आली. ग्रामीण उद्योगीकरणाची तीन प्रमुख उद्दिष्टे निबंधातून व्यक्त झाली.

(1) ग्रामीण उद्योगीकरणाच्या साहाय्याने ग्रामीण बेकारीचे प्रमाण कमी करणे.

(2) ग्रामीण भागातून रोजगारासाठी शहराकडे होणारे स्थलांतर रोखणे.

(3) ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे.

वरील उद्दिष्टांना अनुसरून चर्चा झाली. सुरुवातीलाच ग्रामीण उद्योगाची संकल्पना नेमकी काय आहे यावर बरीच चर्चा झाली. ग्रामीण उद्योग

आकाराने लहान असावेत असे नव्हे. कारण आज अनेक मोठे उद्योग ग्रामपंचायत हद्दीत सवलतींसाठी सुरू झाले आहेत. तसेच नगरपरिषदेच्या हद्दीत एखादा छोटा उद्योग असल्यास त्यास ग्रामीण उद्योग म्हणता येईल का ? स्थाननिश्चयाच्या दृष्टिकोनातून ग्रामीण आणि नागरी असा भेद करावा का ? यावर अनेक सदस्यांनी आपले विचार मांडले.

आठव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण उद्योगीकरणाचे स्थान यावर काही सदस्यांनी आपले विचार मांडले. आजारी साखर कारखान्यांच्या समस्या आणि त्यासंबंधीची कारणमीमांसा यावर चांगली चर्चा झाली. उसाची उपलब्धता, सिंचनक्षमता लक्षात न घेता अलीकडे सरकारने अनेक नव्या साखर कारखान्यांना परवानगी दिल्यामुळे, त्याचा गाळपावर परिणाम होऊन अनेक कारखाने तोटयात येतील अशी भीती व्यक्त करण्यात आली. महाराष्ट्रात साखर कारखान्यांनी ग्रामीण उद्योगीकरणाच्या क्षेत्रात केलेल्या कार्याची प्रशंसा अनेक वक्त्यांनी केली.

ग्रामीण उद्योगीकरणाच्या प्रक्रियेत येणारा प्रमुख अडसर म्हणून काही वक्त्यांनी ग्रामीण भागातील अपुऱ्या सामाजिक आधारभूत संरचनेविषयी मुद्दे उपस्थित केले. उत्तम रस्ते, दळणवळण, पाणीपुरवठा, इत्यादी सोईंचा अभाव असल्यामुळे उपक्रमी ग्रामीण भागात उद्योग सुरू करण्यास धजावत नाहीत. त्यांची स्पर्धात्मकताही अशा अपुऱ्या सोयींमुळे कमी होते. त्यामुळे सरकारने ग्रामीण भागात या सोयी अग्रक्रमाने निर्माण कराव्यात अशी सूचनाही केली गेली.

ग्रामीण उद्योगीकरणाचा पाया त्या त्या भागातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित असावा; उदाहरणार्थ, दक्षिण आणि पश्चिम महाराष्ट्रात उसावर आधारित साखर कारखाने यशस्वी ठरले. त्याचप्रमाणे मराठवाडा आणि विदर्भात कापूस हे प्रमुख पीक असल्यामुळे कापसावर आधारित ग्रामीण उद्योग उभारणे शक्य आहे. तसेच या प्रक्रियेत स्थानिक लोकांना अधिकाधिक रोजगार दिला जावा, तरच विकासाचा लाभ त्या भागातील लोकसंख्येस मिळेल. उपलब्ध स्थानिक साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त आणि कार्यक्षम वापर करावा असे सांगितले गेले.

चर्चासत्रात काही लहान, पूरक आणि ग्रामोद्योगावर निबंध सादर करण्यात आल्यामुळे त्या उद्योगांच्या अनेक समस्यांवर प्रकाश पडला. उदाहरणार्थ कुक्कुटपालन, चर्मोद्योग, खादी उद्योग, रेशीम उद्योग, कपडे शिलाई इत्यादी उद्योगांत रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्या तरी त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचे दिसते. त्यांपैकी बाजारव्यवस्था, विक्रीचे माध्यम, गुणवत्ता, अपुरा वित्तपुरवठा, निविष्टींचे चढते भाव व अपुरा पुरवठा इत्यादी प्रश्न महत्त्वाचे आहेत. हे प्रश्न काळजीपूर्वक सोडविल्यास ग्रामीण उद्योगीकरणास फार मोठी चालना तर मिळेलच, त्याचबरोबर ग्रामीण जनतेच्या रोजगार आणि उत्पन्नात भरीव वाढ होईल असे मत व्यक्त करण्यात आले.

काही वक्त्यांनी आणखी एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले; तो म्हणजे, जनतेत स्वदेशनिर्मित वस्तूंचा वापर करण्याची इच्छा आणि आवड निर्माण करणे. आज ग्रामीण जनतासुद्धा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना दिसते. (उदाहरणार्थ कोलगेट टूथपेस्ट, बाटाचे बूट इत्यादी). त्याऐवजी देशी आणि ग्रामीण भागातील वस्तूंचा वापर केल्यास, ग्रामीण उद्योगीकरणास फार मोठी चालना मिळू शकेल. त्यासाठी भारतीयांना आपल्या उपभोग सवयींत मोठा बदल करावा लागेल हे खरे, मात्र त्यासाठी जनमत जागृत करणे आवश्यक आहे. पुन्हा एकदा 'स्वदेशीची' चळवळ हाती घ्यावी लागेल. एका वक्त्याने डंकेल प्रस्तावाचा उल्लेख करून तो प्रस्ताव स्वीकारल्यास त्याचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर कसे गंभीर परिणाम संभवतात यासंबंधी माहिती दिली.

ग्रामीण उद्योगीकरण यशस्वी होण्यासाठी शिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालण्याची सूचना यावेळी करण्यात आली. तसेच 'ग्रामीण उपक्रमी' (rural entrepreneurs) निर्माण करण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली. त्यासाठी 'ट्रायसेम' सारख्या योजनांमधून प्रशिक्षित उपक्रमींची निर्मिती होते आहे हे ठीक आहे. तथापि यातील अनेक युवक शहरी भागाकडे वळत असल्याचे दिसते. आणि तिथेही ते स्वयं-रोजगाराऐवजी वेतनी रोजगाराकडेच अधिक लक्ष देतात. ही

परिस्थिती बदलावयास हवी. एक उपाययोजना म्हणून शहरी कारखानदारीत (मधल्या फळीत) काम करणाऱ्या ग्रामीण भागातील तंत्रज्ञांना पुन्हा ग्रामीण भागात उद्योगांच्या निमित्ताने परत आणता येण्याची शक्यता प्रयत्न करून पाहावी. यालाच उपक्रमींची 'पश्चचलन--शीलता' ( backward mobility ) म्हणतात. त्यांना स्वतंत्र व्यवसाय ग्रामीण भागात उभे करण्यासाठी सुविधा निर्माण करून देता येतील. शेवटी, ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे श्रमिकांचे स्थलांतर ( migration ) रोखण्यासाठी ग्रामीण उद्योगीकरणाची वाटचाल वेगाने होण्याची गरज प्रतिपादण्यात आली.

☐ ☐

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन फॉर्म 4, नियम 8 नुसार

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | प्रकाशन स्थळ | : | 'मराठी अर्थशास्त्र परिषद', द्वारा 'संपदा', प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे 424 002 |
| 2 | नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3 | मुद्रकाचे नाव | : | व्यंकटेश सु. पाटणकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'संपदा', प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे 424 002 |
| 4 | मुद्रण स्थळ | : | हेमंत मुद्रण, 26, प्रतिभानगर मार्केट, कोल्हापूर 416 008 |
| 5 | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. 3 प्रमाणे |
| 6 | संपादकाचे नाव | : | रवीन्द्र रा. दोशी |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर 416 004 |
| 7 | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई 400 014 |

मी, व्यंकटेश सु. पाटणकर, असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**व्यंकटेश सु. पाटणकर**
मुद्रक, प्रकाशक

चर्चासत्र तिसरे

# कल्याणाच्या अर्थशास्त्रातील आधुनिक विचार

आनंद नाडकर्णी *

सहायक

अ. रा. पडोशी **

## प्रास्ताविक

चर्चासत्राच्या आरंभी सूत्रसंचालक यानी कल्याणाच्या अर्थशास्त्रामध्ये आधुनिक काळात चर्चिल्या गेलेल्या विविध मुद्यांचा संक्षिप्त आढावा घेऊन चर्चेचे सूतोवाच केले. या संदर्भात आपल्या प्रास्ताविकात त्यांनी कल्याणाच्या अर्थशास्त्रामध्ये योगदान केलेल्या पारेटो, पिगु, इत्यादी अर्थशास्त्रज्ञांच्या मतांचा निर्देश केला.

अलीकडे 'प्रत्यक्षानुसारी (Positive) अर्थशास्त्र आणि कल्याणाचे अर्थशास्त्र' या दोहोंतील भेद पुढील–प्रमाणे सांगितला जातो. प्रत्यक्षानुसारी अर्थशास्त्रातील सिद्धान्ताचा खरेखोटेपणा त्या सिद्धान्ताचे निष्कर्ष तपासून ठरविला जातो. याउलट कल्याणाच्या अर्थ–शास्त्रातील सिद्धान्ताची ग्राह्यता त्या मागची गृहिते चूक आहेत की बरोबर हे पाहून निश्चित केली जाते. कल्याणविषयक अर्थशास्त्राच्या आधुनिक मांडणीमध्ये, सामाजिक कल्याण हे केवळ समाजातील व्यक्तींच्या कल्याणावर अवलंबून असते, इतर कशावरही नाही, हे मूलभूत गृहीतक असते. व्यक्तीसमोर जे आर्थिक पर्याय उपलब्ध असतात त्यापैकी जो पर्याय ती व्यक्ती निवडते तो पर्याय, प्राप्त परिस्थितीत, तिच्या दृष्टीने महत्तम कल्याणाचा असे मानले जाते. आता व्यक्ती–व्यक्तींच्या कल्याणविषयक वस्तुस्थितीवरून सामाजिक कल्याणाविषयी निष्कर्ष काढण्याचा प्रवास कसा करा–करावयाचा, हा प्रश्न उद्‌भवतो. या प्रश्नास पर्यायी उत्तरे देण्यात आली आहेत. यातून अनेक वाद निर्माण झाले आहेत. तेव्हा कल्याणाच्या अर्थशास्त्राची विविध गृहिते, उपरोक्त प्रश्नाला देण्यात आलेली उत्तरे आणि त्यातून उद्‌भवलेले वाद यावर साधकबाधक चर्चा होणे आवश्यक ठरते.

दुसरे असे की, कल्याणाच्या अर्थशास्त्राचा सामा-जिक कल्याणाशी प्रत्यक्ष संबंध येत असल्याने हे कल्याण

* प्राध्यापक, इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे आणि भूतपूर्व प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

** प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, गोवा विद्यापीठ, गोवा.

अधिकतम करण्यासाठी धोरणकर्त्यांनी कोणती मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घ्यावयास हवीत हा प्रश्न प्रस्तुत ठरतो. शासनाच्या एखाद्या धोरणामुळे आर्थिक बदल घडून येतो, आणि नव्या परिस्थितीत आधीच्या तुलनेने एकूण सामाजिक कल्याण वाढते की घटते याविषयीचे निकष तयार करता येतात का, यासंबंधी अर्थशास्त्रज्ञांनी काही भूमिका मांडल्या आहेत, काही तत्त्वे सांगितली आहेत. याबद्दलही चर्चा करणे उद्बोधक होईल.

एकंदरीत, आधुनिक काळात कल्याणविषयक अर्थशास्त्रामध्ये उपस्थित करण्यात आलेले पुढील अनेक मुद्दे चर्चेसाठी घेता येतील. सामाजिक कल्याणाविषयी अर्थपूर्ण निष्कर्ष काढताना आंतर–व्यक्तिविषयक (inter–personal) तुलनेची गरज असते का? असल्यास, ही तुलना शास्त्रीयदृष्ट्या ग्राह्य धरता येईल का? हिक्स–काल्दॉर निकष आणि त्यावरील चर्चा; समाजकल्याण अनुवर्त (Social Welfare Function) संकल्पना आणि तिची उपयुक्तता; ॲरो यांचे 'अशक्यता प्रमेय'; पारेटो यांची इष्टतमता संकल्पना; सामाजिक कल्याणाचे मापन करण्याच्या पद्धती आणि त्यांची उपयुक्तता; कल्याणाचे अर्थशास्त्र हा विषय निरर्थक आहे का?

## चर्चेसाठी स्वीकारलेले निबंध

अधिवेशनात सादर करण्यासाठी खालील सात सदस्यांनी सदरहू विषयाच्या कक्षेत बसतील असे निबंध पाठविले : ना. शं. अंबर्डेकर, पुष्पा इंदूरकर, बी. आर. शिरसाठ, वि. श्री. देशपांडे, श्रीराम पेडगावकर, अंजली कुलकर्णी आणि दि. व्यं. जहागिरदार. यापैकी अंबर्डेकर, अंजली कुलकर्णी आणि जहागिरदार हे अधिवेशनास उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र अंबर्डेकरांचा निबंध त्यांच्या वतीने प्र. ब. कुलकर्णी यानी सादर केल्याने एकूण पाच निबंध चर्चेसाठी सत्रात मांडण्यात आले.

आपल्या निबंधात अंबर्डेकर यानी कल्याणाच्या अर्थशास्त्रामध्ये बाह्यतांचा (externalities) विचार करणे आवश्यक असते असा मुद्दा मांडला. या परिस्थितीत पूर्ण स्पर्धा असूनही साधनसामग्रीचे अर्थव्यवस्थेतील वाटप सदोष होऊ शकते, आणि परिणामी पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत महत्तम कल्याण साधले जात नाही, या निष्कर्षाकडे निबंधलेखकाने लक्ष वेधले.

पुष्पा इंदूरकर यानी आपल्या निबंधात पारेटो यांच्या विश्लेषणातील गृहिते सांगितली, त्या विश्लेषणाचे टीकात्मक परीक्षण विशद केले, आणि भांडवलशाहीमध्ये शोषणविरहित समाज निर्माण होणे शक्य नाही, असे मत व्यक्त केले.

शिरसाठ यानी कल्याणाच्या अर्थशास्त्रात उपस्थित करण्यात आलेल्या काही मुद्यांचा थोडक्यात आढावा घेतला. अखेरीस कल्याणकारी अर्थशास्त्राच्या संदर्भात समाजवाद आणि भांडवलशाही यांची त्यानी तुलना केली, आणि व्यवस्था कोणतीही असो, नागरिकांना सरकार किती सेवा पुरविते यावर लोकांचे कल्याण अवलंबून असते, असे मत त्यानी व्यक्त केले.

देशपांडे यानी कल्याणाच्या निर्देशांकाचा उल्लेख केला, अपेक्षित आयुर्मर्यादा, बालमृत्यूदर आणि शिक्षण या तीन बाबींना समान भार देऊन कल्याणाचा संमिश्र निर्देशांक काढण्याचा प्रयत्न केला जातो असे त्यानी सांगितले. भारतातील राज्यवार माहितीचा वापर करून त्यानी त्या संदर्भात आपले निकर्ष मांडले.

पेडगावकर यानी सामाजिक कल्याणविषयक विश्लेषणाच्या संदर्भातील ॲरो यांच्या अशक्यता प्रमेयाची चर्चा केली. हे प्रमेय कल्याणवाद आणि माहितीचा तोकडेपणा यामुळे निर्माण होते, असे सांगून या प्रमेयाने कल्याणाच्या विचाराला बरीच चालना दिली, असे प्रतिपादन त्यानी केले.

## चर्चेचा गोषवारा

यानंतरच्या खुल्या चर्चेत कल्याणाच्या सैद्धान्तिक अर्थशास्त्राची अप्रस्तुतता, कल्याणविषयक निर्देशांक तयार करताना स्वीकारलेल्या गृहितांच्या मर्यादा याविषयी काही वक्त्यांनी आपली मते मांडली. कल्याणाच्या अर्थशास्त्राचे व्यक्तिकेंद्री गृहितकदेखील टीकेस पात्र ठरले. सामाजिक कल्याणाचा विचार करताना

संस्थात्मक अर्थशास्त्राचा दृष्टिकोन लक्षात घेणे आवश्यक असते असे प्रतिपादन एका वक्त्याने केले. तसेच कल्याणविषयक अर्थशास्त्राच्या संकुचित दृष्टिकोनाचे एक उदाहरण म्हणून अर्थशास्त्राच्या या शाखेने पर्यावरणवादाकडे दुर्लक्ष केले आहे, असे मत मांडण्यात आले. आणखी एक मुद्दा चर्चेसाठी आला. कल्याणाच्या अर्थशास्त्रात स्पर्धेच्या व्यवस्थेची केलेली तरफदारी कितपत योग्य आहे याविषयीचा तो मुद्दा होता. या संदर्भात स्पर्धेस अनुकूल अशा भारताच्या नवीन आर्थिक धोरणाने कल्याण साधेल काय, याविषयी काही वक्त्यांनी मतप्रदर्शन केले.

अखेरीस आपल्या प्रास्ताविकात उपस्थित केलेले मुद्दे आणि खुल्या चर्चेतील विवेचन यांचा संदर्भ देऊन सूत्रसंचालक यानी समारोप केला.

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## स्थायी निधी-देणगीदारांची नावे

| | | |
|---|---|---|
| 80 | डॉ. सौ. अंजली कुलकर्णी, नागपूर | रु. 75 |
| 81 | डॉ. श्रीराम पेडगावकर, नांदेड | रु. 75 |
| 82 | डॉ. विनायक देशपांडे, नागपूर | रु. 75 |

**व्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह – खजिनदार

## चर्चासत्र चौथे

# देशाच्या अर्थव्यवस्थेत अर्थसाहाय्य योजनेचे योगदान

श्रीनिवास खांदेवाले *

अधिवेशनाच्या चौथ्या सत्रासाठी आयल्या वेळेचा विषय 'देशाच्या अर्थव्यवस्थेत अर्थसाहाय्य योजनेचे योगदान' हा होता. या विषयाची प्रस्तावना करताना त्यांच्या विविध पैलूंची मांडणी भालचंद्र मुणगेकर, रवीन्द्र दोशी आणि राम देशपांडे यांनी केली.

मुणगेकरांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संदर्भात अर्थसाहाय्यावर बोलताना प्रतिपादन केले की, समाजात उत्पादन साधनांच्या मालकीतील विषमतेमुळे आर्थिक प्रगतीचेही विषम वाटप होते. त्या प्रक्रियेत समाजात एक अल्प उत्पन्नाचा गट तयार होतो. या गटाला बाजारातील किमतींना विलासाच्या / सुख-सोयीच्या वस्तूच काय परंतु जीवनावश्यक गरजा भागविणाऱ्या वस्तूसुद्धा विकत घेण्यासाठी पुरेसे उत्पन्न मिळत नाही. त्यात शहरी लोकसंख्येचा काही भाग आणि ग्रामीण लोकसंख्येचा बराच मोठा भाग समाविष्ट असतो. सध्या भारतात अशा लोकसंख्या गटांकरिता सार्वजनिक वितरण व्यवस्था चालू असून त्याद्वारे तांदूळ, गहू, रॉकेल आणि साखर या मुख्य जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो. बाजारभावापेक्षा वितरण व्यवस्थेतील किमत जेवढी कमी असेल तेवढे अर्थ-साहाय्य शासनाकडून उपलब्ध करून दिले जाते.

गेल्या काही वर्षात शासनाने या अर्थसाहाय्या-साठी केलेला खर्च वाढत आहे. त्याची प्रमुख कारणे अशी. शासनाने शेतकऱ्यांना देऊ केलेली प्रापण ( procurement ) किमत वाढत आहे, वाटप होणाऱ्या अन्नधान्याचे परिमाण वाढत आहे आणि वितरणासाठी करावा लागणारा परिव्ययही वाढत आहे. नवीन आर्थिक धोरणात हे सामाजिकदृष्टचा आवश्यक असलेले अर्थसाहाय्य कमी व्हावयास नको; ते पुनर्रचित करून वाढवावयास हवे. त्यासाठी वित्तीय पुरवठा व्हावा म्हणून शासनाने आपला इतर क्षेत्रांतील अनावश्यक खर्च कमी करावा आणि आवश्यकता वाटल्यास समा-जातील सधन वर्गावर अधिक कर लावावे.

* संचालक, व्यवसाय व्यवस्थापन विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

रवीन्द्र दोशी यांनी कृषी क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याचे विश्लेषण करताना स्पष्ट केले की, हे साहाय्य प्रामुख्याने राज्य सरकारद्वारा होते. त्यात अन्नधान्य, खते, वीज, जलसिंचन, पूरनियंत्रण, ग्रामीण विकास, कर्जपुरवठा इत्यादी बाबींचा समावेश होतो. अशा अर्थसाहाय्यावर सध्या प्रतिवर्षी सुमारे 15,000 कोटी रुपये इतका खर्च होतो, त्यापैकी साधारणत: 20 टक्के भाग शासनाकडे उत्पन्नाच्या रूपाने परत येतो. त्यामुळे निव्वळ अर्थसाहाय्य सुमारे 12 ते 13 हजार कोटी रुपये इतके आहे. त्यापैकी शेतीच्या निविष्टींवरच (inputs) 9 ते 10 हजार कोटी रुपये इतका खर्च होतो. प्रादेशिक दृष्टिकोनातून तर कृषी अर्थसाहाय्याचा मुख्य फायदा उत्तर प्रदेश, पंजाब, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र या राज्यांना होतो तर ओरिसा, आसाम, पश्चिम बंगाल, जम्मू–काश्मीर इत्यादी राज्यांना कमी वाटा मिळतो. अर्थसाहाय्याचा विकासाच्या दराशी सरळ सहसंबंध नाही. त्यामुळे अर्थसाहाय्य कमी करावयाचे असल्यास केवळ सर्वंकष राष्ट्रीय धोरण न अवलंबिता राज्यनिहाय भिन्न धोरण आखले जावे.

अर्थसाहाय्य कमी करावे का या प्रश्नाचा ऊहापोह करताना शासनाची तूट भरून काढण्याचे भिन्न मार्ग, निविष्टींची कार्यक्षमता वाढविण्याची आवश्यकता अर्थ-साहाय्य घटविल्यास काही क्षेत्रांवर त्याचे होणारे विपरित परिणाम इत्यादींची चर्चा करून दोशींनी चार सूचनाप्रवाह मांडले : (1) यापुढे शेतीला अर्थसाहाय्य देऊ नये. (2) अर्थसाहाय्य अजिबात कमी करू नये. (3) अर्थसाहाय्य टप्प्याटप्प्याने कमी करावे. (4) विजेवरील अर्थसाहाय्य रद्द करता येईल, खतांवरील अर्थ–साहाय्य कमी करावे परंतु इतर विशिष्ट वस्तू आणि उत्पादनांसाठी साहाय्य चालू ठेवावे.

राम देशपांडे यांनी अर्थसाहाय्याची सैद्धान्तिक भूमिका आणि मर्यादा यांची सुस्पष्ट मांडणी केली. त्यांच्या मते अर्थसाहाय्याचा प्रश्न सरकारी अर्थव्यवहाराशी संबंधित आहे. सार्वजनिक आणि खाजगी प्राधान्य वस्तू; उत्पादकांचा नफा वाढविण्याच्या दृष्टीने उत्पादन परि–व्यय कमी करण्याची आवश्यकता; प्रादेशिक असमतोल, लोकसंख्या गटांतील असमतोल आणि कालमानानुसार निर्माण होणारे असमतोल दूर करण्यासाठी आणि सामाजिक कल्याण वाढविण्यासाठी अर्थसाहाय्याशी निगडीत विशिष्ट धोरणे आखावी लागतील. अर्थ–साहाय्याची काही धोरणे अप्रत्यक्ष आणि काही प्रत्यक्ष असतात. त्यांचे परिणाम विभिन्न असतात. त्यांचे अर्थशास्त्रही वेगळे असते. सध्या भारतात अर्थसाहाय्या–बद्दल चालू असलेल्या चर्चेचे मुख्य पैलू पुढीलप्रमाणे आहेत : साहाय्याचे मापन आणि प्रादेशिक वाटप; साहाय्याचे मुख्य फायदे कोणाला होतात; अर्थसाहाय्याचे परिणाम काय होतात.

अर्थसाहाय्याची घनता आणि साहाय्यप्रेरित विकास काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी जास्त आहेत. प्रत्यक्ष अर्थसाहाय्य मिळणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र हे महत्त्वाचे राज्य आहे. अर्थसाहाय्यासंबंधी भविष्यकालीन धोरणाचा विचार करताना अर्थसाहाय्य कमी करावे का, कुठले कमी करावयाचे हे कसे ठरवावे आणि कुठल्या स्वरूपात अर्थसाहाय्य घटवावे हे मह–त्त्वाचे प्रश्न निर्माण होतात.

चर्चेच्या ओघात अर्थसाहाय्य मिळविण्याच्या बाब-तीत मागास राज्येच मागे राहिली आहेत हे निदर्शनास आणून दिले गेले. या अनुषंगाने अर्थसाहाय्याचे धोरण चुकले असे म्हटल्यास, मुळात धोरण होते का असाही प्रश्न निर्माण होतो. अर्थसाहाय्यामुळे अर्थसंकल्पात तूट निर्माण होते हे जरी खरे असले तरी, अर्थसाहा–य्याची गरज निर्माण होणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी शासनाला उत्पन्न मिळविण्याची नवी क्षेत्रे शोधावी लागतील.

विषयाच्या सविस्तर चर्चेमध्ये काही महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले. केंद्र सरकारच्या खुल्या आणि अप्रत्यक्ष अर्थसाहाय्याची रक्कम 1950 मध्ये 40 कोटी रुपये होती ती 1989–90 पर्यंत 10,667 कोटी रुपये झाली. यापैकी बरेचसे अर्थसाहाय्य अनाठायी आहे. अर्थसाहाय्य पोहोचविणारी व्यवस्था अकार्यक्षम असल्यामुळे खऱ्या गरजूंपर्यंत साहाय्य पोहोचतच नाही, ते योग्य रीतीने पोहोचणे आवश्यक आहे. त्याकरिता सयुक्तिक ( rational ) वाटप व्यवस्था आणि नियोजन पाहिजे अशी सूचना करण्यात आली.

राज्य सरकारांच्या अर्थसाहाय्याच्या बाबतीत

पुरेशी आकडेवारी उपलब्ध नसते. सध्या महाराष्ट्रात प्रत्यक्ष अर्थसाहाय्य, अनुदाने, अप्रत्यक्ष अर्थसाहाय्य आणि उद्योगांच्या मार्फत दिले जाणारे साहाय्य मिळून सुमारे 1,540 कोटी रुपयांचा खर्च होतो आणि तो एकूण महसुली खर्चाच्या जवळपास 20 ते 25 टक्के आहे. हे साहाय्य वाटताना अनेकदा राजकीय हेतूही असतात. त्यामुळे अर्थसाहाय्यातून राजकीय फायदे बरेच निर्माण होताना दिसतात आणि खरे गरजू गट वंचितच राहातात. अर्थसाहाय्य कमी करताना ते एकदम बंद करू नये. प्रथम अप्रत्यक्ष साहाय्य बंद करावे. प्रत्यक्ष साहाय्य टप्प्याटप्प्यांनी कमी करावे आणि सरकारी क्षेत्रातील उद्योगांना कात्री लावावी असा विचार मांडला गेला.

खतांसाठीच्या अर्थसाहाय्याचा ऊहापोह करताना, त्याचा फायदा मुख्यत: सधनांना झाला आहे आणि खतां-पैकी पोटॅश हे द्रव्य आयात करावे लागत असल्यामुळे त्याचा भार विदेशी चलनावर पडतो, असे प्रतिपादन कर-ण्यात आले तथापि ती एक आवश्यक अवांछितता आहे हे त्याचबरोबर सांगितले गेले. या विचाराला काट देणारा दुसरा एक विचार पुढे आला. रासायनिक खते उत्पा-दकतानाशक आहेत. त्यामुळे उत्पादनात अनिश्चितता वाढते. कीटकनाशकांचा मानवावर घातक परिणाम होतो. म्हणून खते आणि कीटकनाशक यांच्यावरील अर्थसाहाय्य कमी करावे आणि त्याऐवजी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन द्यावे.

या चर्चेच्या ओघातच असे सुचविले गेले की, अर्थसाहाय्याचा प्रश्न जरी अर्थसंकल्पातील असमतोला-तून निर्माण झाला असला तरी अर्थसाहाय्य चुकीच्या दिशेने आणि चुकीच्या लोकांकडे जावयास नको, हा मुद्दा शिल्लक राहतोच. कारण अर्थसाहाय्याची रक्कम सरकारने लोकांकडून गोळा केली नाही तर ती लोकां-कडेच राहील. आवाज उठविणारांनाच अर्थसाहाय्य मिळते. टप्प्याटप्प्याने अर्थसाहाय्य बंद करण्याच्या काळात लोकांना त्याची सवय लागून जाते, म्हणून अर्थसाहाय्याबद्दलचे धोरण काळजीपूर्वक आखत अस-ताना किमान चुकीच्या दिशेने जाणारे अर्थसाहाय्य बंद करावे.

वरील सर्व युक्तिवाद न पटणाऱ्यांची भूमिका थोडी वेगळी होती. बाजारावर आधारित अर्थव्यवस्था सर्वांचे हित साधू शकत नाही, म्हणून अर्थसाहाय्याचे प्रयोजन, भासते. असे अर्थसाहाय्य उपभोक्ते आणि उत्पादक दोघां-नाही लागते. आपल्या देशात विकासेतर खर्च सुमारे 76 टक्के असल्यामुळे अर्थसाहाय्य देण्याची गरज भासते. विकासखर्चाचे प्रमाण जर आपण 76 टक्के करू शकलो तर अनेकांना अर्थसाहाय्याची गरज भासणार नाही. अर्थ-साहाय्याची गळती थांबविण्यासाठी गरजू गट निर्धारित करून त्यानाच अर्थसाहाय्य मिळेल अशी व्यवस्था व्हावयास हवी.

या विचारावर पूर्ण समाधान न झाल्याने चर्चेने पूर्वीचाच नकारात्मक सूर चालू ठेवला. त्यातूत पुढे आलेले विचार असे. अर्थसाहाय्याने लोक कमकुवत बनतात. अर्थसाहाय्य मिळविण्यासाठी उत्पादक मुद्दाम तोटा दाखवितात. आर्थिक सबलांना अर्थसाहाय्य अधिक मिळते आणि त्यामुळे विषमता वाढते. नगदी पिकांना आणि इतर सक्षम पिकांना अर्थ-साहाय्य देण्यात येऊ नये. रासायनिक खतांचे अर्थ-साहाय्य काढून घेऊन त्यांचा वापर कमी केला पाहिजे. सामाजिक कल्याण वाढविण्याच्या दृष्टीने अनुदान आवश्यक वाटते, परंतु ते चालू ठेवणेही कठीण झाले आहे. अर्थसाहाय्य देताना ते शहरी आणि ग्रामीण मजूर आणि इतर दुर्बलांनाच मिळेल याची काळजी घ्यावयास पाहिजे. जर देशातील सधन वर्ग अर्थसाहाय्याचा बोजा उचलावयास तयार नसतील तर मग उत्पादन साधनांचे पुनर्वाटप आवश्यक होईल. श्रमिकांना अर्थसाहाय्य दिले तरी त्यामुळे त्यांची मजुरी वाढत नाही. म्हणून श्रमि-कांची सौदाशक्ती वाढेल असेही प्रयत्न झाले पाहिजेत. सद्य:स्थितीत अल्प उत्पन्नाच्या गटांचे संरक्षण करणारे राज्य ( pro-poor state ) निर्माण होताना दिसत नाही.

एका वक्त्याने तर अर्थसाहाय्य गरजू लोकांपर्यंत पोहोचत नाही, म्हणून ते बंदच करून टाकावे, असे मत मांडले. त्यांच्या मते अर्थसाहाय्य घेणारांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोनही हीनतेचा असतो. तथापि सम-न्यायाच्या भूमिकेचा पुनरुच्चार झाला. त्यानुसार अर्थ-साहाय्य निवडक असावे यावर भर दिला. काही वक्त्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या मते अर्थसाहाय्य देण्याचे निकष चुकीचे असतात. निविष्टींवरील अर्थ-

साहाय्यापैकी सुमारे 94 टक्के साहाय्य पुन्हा सरकार–कडेच परत जाते. शेतीत पर्यावरणपोषक अशा खतांचाच पुरस्कार केला पाहिजे. आरोग्य आणि शिक्षणा–वरील साहाय्याचा फायदा श्रीमंतांनाच अधिक मिळतो. म्हणून अर्थसाहाय्याच्या नियमावलीत उचित बदल करणे आवश्यक आहे. साहाय्यापैकी मोठी रक्कम खते आणि आयातीवर खर्च होते. अर्थसाहाय्य हे केवळ उत्तेजनात्मकच असले पाहिजे. अर्थसाहाय्य हे व्यसन आहे, परंतु ते तडकाफडकी बंद न करता टप्प्याटप्प्याने कमी करावे आणि ते कमी करीत असताना राजकारण आडवे येऊ नये यावर भर देण्यात आला.

या संदर्भात एकदोन वेगळ्या मुद्यांचाही उल्लेख झाला. एक म्हणजे, शेती क्षेत्रामध्ये अल्पभूधारकांना अर्थसाहाय्यानेच भांडवलपुरवठा करावा लागेल. तो परिणामकारक होण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन झाले पाहिजे. दुसरा मुद्दा म्हणजे, आदिवासी आणि गरीब शेतकऱ्यांकरिता विभेदात्मक व्याज दराच्या (Differential Interest Rates) अर्थसाहाय्य योजना अति–शय उपयुक्त आहेत, मात्र त्यांची अमलबजावणी नीट झाली पाहिजे.

चर्चेचा उपसंहार करताना सूत्रसंचालकांनी काही मुद्यांचा ऊहापोह केला. बाजार अर्थव्यवस्थेत शेती, औद्योगिक उत्पादन किंवा उपभोगाच्या क्षेत्रात ज्या ज्या ठिकाणी मागणी करणारा गट वस्तू किंवा सेवेची किंमत देऊ शकत नाही त्या त्या ठिकाणी त्या गटाला अर्थ–साहाय्य देण्याची गरज भासते. अर्थसाहाय्य दिले नाही तर मागणी कमी होण्याची शक्यता असते आणि ते परवडणारे नसते. म्हणून अर्थसाहाय्य दिले जावे हे तत्त्व मान्य केले जाते. अन्नधान्यासारख्या वस्तूंपासून अल्प उत्पन्नाच्या गटांना वंचित ठेवणे हे सामाजिक कल्या–णाच्या दृष्टीने योग्य नसते; त्याचे राजकीय परिणामही होऊ शकतात. म्हणून अशा गटांना अर्थसाहाय्य द्यावे लागते. परंतु शक्यतो अर्थसाहाय्य हे अल्पकालाकरिता, लाभार्थी स्वावलंबी होण्यासाठी आणि नियोजित पद्ध–तीने दिले जावे. जर अर्थसाहाय्य बंद करावयाचे असेल किंवा कमी करावयाचे असेल तर त्यासाठी उपाय म्हणजे उत्पादन साधनांचे पुनर्वाटप करून साधनहीन लोकांचे उत्पन्न वाढवावे आणि ज्यांना केवळ नोकऱ्याच कराव्या लागतात त्यांचे उत्पन्न योग्य त्या मात्रेत वाढ–वावे हा आहे. हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत गरजूंना अर्थसाहाय्य देणे ही एक सामाजिक गरज बनते.

अर्थसाहाय्य नसावे किंवा शक्यतो कमी असावे हे मान्यच आहे. परंतु अर्थसाहाय्य केवळ भारता–सारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेतच दिले जाते असे नव्हे, तर विकसित देशांमध्येसुद्धा मोठ्या प्रमाणावर दिले जाते. अमेरिकेत, युरोपीय देशांमध्ये ( EEC ) आणि जपानमध्ये गहू, तांदूळ, सोयाबीन, साखर इत्यादींच्या उत्पादनासाठी अर्थसाहाय्य दिले जाते. नोव्हेंबर 1992 मध्ये अमेरिकेने ब्रिटन, फ्रान्स, इटली आणि युरोपातील नऊ राष्ट्रांच्या सरकारांवर असा आरोप केला आहे की, ही सरकारे आपल्या देशातील पोलाद, इलेक्ट्रॉनिक्स, टेलिकम्युनिकेशन्स, वीजनिर्मिती संयंत्रे इत्यादी बऱ्याच उद्योगांना अर्थसाहाय्य देतात. त्यामुळे उत्पादकांचा उत्पादन परिव्यय कमी होतो आणि अमेरिकेत संबंधित वस्तूंची निर्यात करणे सोपे जाते. परिणामी, अमेरिकेतील बाजारावर विदेशी कारखानदारीचा प्रभाव वाढेल आणि खुद्द अमेरिकेतील उद्योगांना स्वतःच्या देशातील बाजार उपलब्ध होणार नाही.

थोडक्यात, सवय म्हणून किंवा अकार्यक्षमता लपविण्यासाठी अर्थसाहाय्याचा वापर होऊ नये. हे जितके सत्य आहे तितकेच हेही खरे आहे की, प्रत्येक देशातील सरकारला देशातील उद्योग चांगले चालावेत, रोजगार सातत्याने निर्माण व्हावा, अत्यल्प उत्पन्नाच्या समाजगटांचे आर्थिक जीवन सुसह्य व्हावे यासाठी काही नैतिक जबाबदारी स्वीकारावी लागते आणि त्यानुसार योग्य कारणांकरिता अर्थसाहाय्य देणे अनिवार्य बनते. मात्र अर्थसाहाय्य किती द्यावे, कोणत्या आर्थिक गटांना किती कालाकरिता द्यावे, कसे द्यावे यासंबंधीची आणि त्यांच्याशी निगडित प्रशासकीय पद्धतींची वारं–वार तपासणी होणे आवश्यक आहे.

□ □

# अर्थसंवाद
# वार्षिक अहवाल : 1991–92

रवीन्द्र दोशी *

'अर्थसंवाद'च्या 1991-92 या वर्षाचा वृत्तान्त आपणापुढे ठेवण्यात मला आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीचे हे दुसरे वर्ष होय. पहिल्या वर्षात 'अर्थसंवाद'च्या अंतरंगाचा जो आकृतीबंध स्वीकारला होता तोच 1991–92 या वर्षातही पुढे चालू ठेवण्यात आला. स्वतंत्र लेखांच्या रूपाने विविध आर्थिक विष–यांची माहिती करून देणे हा आपल्या नियतकालिकाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्याव्यतिरिक्त ग्रंथ परीक्षण आणि सांख्यिकी पुरवणी यानाही स्थान देण्यात आले. वर्षभरात 21 स्वतंत्र लेख, 1 ग्रंथ परीक्षण आणि 2 सांख्यिकी पुरवण्या यांचा समावेश या अंकात केला गेला. त्याखेरीज जानेवारी–मार्च, 1992 या अंकात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पंधराव्या वार्षिक अधि–वेशनाचे अहवालही देण्यात आले. या सर्व लेखनात 25 लेखकांचे योगदान लाभले.

याच वर्षात जुलै–सप्टेंबर, 1992 अंकापासून 'आर्थिक वार्ता' हे नवे सदर सुरू करण्यात आले. आर्थिक क्षेत्रामध्ये घडणाऱ्या ताज्या घडामोडी, थोड-क्यात का असेना, 'अर्थसंवाद'च्या वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा त्यामागे हेतू आहे. सर्वच घटनांवर पूर्ण लेख लिहून मिळणे अथवा लिहवून घेणे अशक्य असते. पूर्ण स्वतंत्र लेखांची वाट पाहात राहिल्यास कित्येक विषय आपल्या कक्षेतून कायमचेच सुटून जातील. हे घडणे बरे नव्हे. यास्तव एक मध्यम मार्ग म्हणून या सदराची योजना आपण केली आहे. ते तयार कर–ण्याची जबाबदारी सहायक संपादक सु. गो. भानुशाली यांनी उचलली असून ते ती चांगल्या प्रकारे पार पाडताहेत. या नव्या सदराची उपयुक्तता पटल्याने सर्वच वाचकांनी त्याविषयी समाधान व्यक्त केले आहे.

देशामध्ये घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनां–विषयी खास लेख देण्याचा प्रयत्न या वर्षातही चालू ठेवला. जुलै 1991 मध्ये भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. त्यासंबंधीची मीमांसा कर–

* प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

णारे तीन भाषांतरित लेख जुलै–सप्टेंबर 1991 च्या अंकात दिले. त्याचसोबत जागतिक पार्श्वभूमीचा संदर्भ म्हणून विकसनशील राष्ट्रांच्या विदेशी कर्जाच्या ओझ्या-संबंधीचा एक लेखही याच अंकामध्ये दिला.

एक समाधानाची गोष्ट म्हणजे, 1991–92 या वर्षाच्या उत्तरार्धात प्रकाशनासाठीच्या साहित्याची अडचण संपादकांना जाणविली नाही. गतवर्षी याबाब–तीत जी हातावरील पोटासारखी स्थिती होती, तसे या वर्षात घडले नाही. लेखकांनी संपादकांची अडचण काहीशी सुकर केली. सर्व लेखकांचा मी त्यासाठी मनः–पूर्वक आभारी आहे. तथापि एका बाजूने अशी सुस्थिती निर्माण होत असताना दुसऱ्या बाजूने काही बाबतीत मागच्या वर्षापेक्षा आपण दोन पाऊले मागे राहिलो हेही ध्यानात घेतले पाहिजे. मागील वर्षी एकूण 28 लेखकांचे योगदान मिळाले, तर चालू वर्षी 'आर्थिक वार्ता' चे लेखक धरून एकूण 26 लेखकांचा सहभाग लाभला. मागील वर्षी प्रत्येक अंकात 1 याप्रमाणे एकूण 4 ग्रंथ परीक्षणे छापली, तर चालू वर्षात फक्त एकच ग्रंथ परीक्षण छापता आले. या बाबतीत सुधारणा कर–ण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न करावयाला हवा. विशेषतः नव्या ग्रंथांचा परिचय करून देण्याचा आपण प्रयत्न करणे जरुरीचे आहे. हे ग्रंथ जसे इंग्रजीतील असतील तसेच ते मराठीतीलही असतील. महत्त्वाचे म्हणजे, अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी संदर्भ ग्रंथ ( कुणी त्याला पाठ्यपुस्तकही म्हणतात ! ) म्हणून लिहिलेल्या मराठी-तील पुस्तकांचे परीक्षण देण्याचा माझा मानस आहे. इंग्रजी–मराठीतील पुस्तके या कामासाठी मी सुचवीनही, वेळप्रसंगी त्यांच्या प्रती पुरवीनदेखील. मला लेखक हवे आहेत. चिकित्सक पद्धतीने परीक्षण करणारे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्यांकडून या बाबतीत प्रति-सादाची मी अपेक्षा करतो आणि त्यासाठी आपणा सर्वांना आवाहन करतो.

आणखी एक पुन्हा एकदा आपणा सर्वांसमोर मांडण्याजोगी गोष्ट आहे. 'अर्थसंवाद' जानेवारी–मार्च, 1992 अंकामधील शेवटच्या पानावर 'लेखक सूची' दिली आहे. त्यावर नजर फिरविल्यास स्वतंत्र लेख देण्यात विदर्भ आणि मराठवाड्यातील आमची मित्र–मंडळी पूर्णतया मागे राहिली आहेत. एकमेव ग्रंथ परीक्षण एवढेच विदर्भाचे साहाय्य. मराठवाडा अजून निद्रिस्तच आहे. याविषयी गेल्या वर्षीच्या अहवालातही मी खंत व्यक्त केली होती. या विलक्षण असमतोलाची जाणीवपूर्ण दखल का घेतली जात नाही, हा माझ्या–पुढील मोठा प्रश्न आहे. विदर्भ–मराठवाड्यातील ही निष्क्रियता केव्हा संपुष्टात येणार ? या बाबतीत मी अजून थोडी आशा बाळगून आहे. आपण मला इतःपर पुढे तरी निराश करणार नाही असा माझा विश्वास आहे.

संभाव्य लेखकांकडून पुरेसे सहकार्य मिळाले तर 'अर्थसंवाद'ला आकाराने मोठा करण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे मी गतवर्षीच्या अहवालात आपणास सांगितले होते. तसा प्रयत्न या वर्षात झालेला आहे. 1991–92 मध्ये छापील पानांची संख्या 1990–91 मधील 302 वरून 358 पर्यंत वाढविली. छपाईचा खर्च सातत्याने वाढत असतानाही आपण पृष्ठसंख्येत वाढ करू शकलो आहोत. त्यामुळे 'अर्थसंवाद'च्या प्रत्येक अंकाला आता 'भौतिक' वजनही प्राप्त झाले आहे.

आपले त्रैमासिक शक्य तोवर त्या त्या तिमाहीच्या काळात सदस्यांच्या आणि वर्गणीदारांच्या हाती देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न होता. गत–वर्षीच्या काही अडचणींमुळे थोडाफार उशीर व्हावयाचा. परंतु अहवाल वर्षात मात्र आम्ही काही अडचणी दूर करून त्या त्या तिमाहीत अंक देऊ शकलो. त्यामुळे, विशेषतः वार्षिक वर्गणीदारांना, 'अर्थसंवाद'च्या नियमितपणाविषयी विश्वास वाटू लागला आहे. वार्षिक वर्गणीदार वाढविण्यासाठी ही गोष्ट पोषक ठरेल असे वाटते.

'अर्थसंवाद'चे महाविद्यालयीन वार्षिक वर्गणी–दार वाढविण्यात मात्र आपण अजूनही यशस्वी झालेलो नाही, याकडे सर्वांनी पुन्हा एकदा अंतर्मुख होऊन पाहावे लागेल. महाराष्ट्रातील बऱ्याच महाविद्या–लयांच्या ग्रंथालयात 'अर्थसंवाद' अजूनही दिसत नाही. प्राध्यापकांचे प्रयत्न थिटे पडतात, हाच याचा अर्थ आहे. आपण एवढे कार्य जरी दरवर्षी आवर्जून केलेत तरी त्यामुळे 'अर्थसंवाद' ला विद्यानिष्ठ आणि आर्थिक बळकटी येईल. मी शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रासाठी अनुसरलेला मार्ग आपणास

सांगू इच्छितो. ज्या कला–वाणिज्य महाविद्यालयांतून अर्थशास्त्र हा विषय तिसऱ्या वर्षाला विशेष विषय म्हणून शिकविला जातो त्या प्रत्येक महाविद्यालयाने, विद्यापीठाच्या संलग्नतेची आवश्यक अट म्हणून, अर्थ–शास्त्र विषयावरील जी काही नियतकालिके मागविली पाहिजेत, त्यामध्ये 'अर्थसंवाद' चा समावेश केला आहे. या पद्धतीच्या मोजक्याच नियतकालिकांची यादी करून विद्यापीठाची संबंधित अभ्यास मंडळे आणि विद्वत्सभा यांच्या समोर प्रस्ताव मांडून ते संमत करून घेतले आहेत. 1991–92 या वर्षात शिवाजी विद्यापीठाने यानुसार एक परिपत्रकही सर्व महाविद्यालयांकडे प्रसृत केले आहे. त्याचा परिणामही दिसू लागला आहे. इतरही विद्यापीठात आपण हे करू शकणार नाही का? या–दृष्टीने सर्वांनी सक्रिय व्हावे ही आग्रहाची विनंती. 'अर्थसंवाद' साठी वर्षाकाठी फक्त ८० रुपये कोण–त्याही महाविद्यालयाच्या आर्थिक कुवतीपलिकडचे नाही याबद्दल दुमत नसावे. आपणच कमी पडतो हाच याचा अर्थ. प्रत्येकाने आपल्या महाविद्यालयाची जबाबदारी स्वीकारावी आणि सेतूबंधनाच्या परिषदेच्या या उपक्रमात आपला खारीचा वाटा उचलावा.

'अर्थसंवाद' ची आर्थिक बाजू ही एक सततची काळजी निर्माण करणारी बाब आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे कागद आणि मजुरीचे दर झपाट्याने वाढत आहेत. छपाईच्या कागदाची किंमत प्रत्येक सहा–माहीला प्रत्येक रीममागे साधारणतः 40 ते 50 रुपयांनी वाढते आहे असा हा वर्षभरातील अनुभव आहे. छपाईचे दरही या वर्षात साधारणतः 20 टक्क्यांनी वाढले. वर्षातील पानांची संख्याही आपण वाढविली. 1991–92 या वर्षातील छपाईसंबंधीचा थोडा तपशील मी आपणापुढे प्रथम मांडतो, म्हणजे आपणाला खर्चासंबंधीची पुसटशी का असेना कल्पना येईल. जवळपास 40 रीम छपाईचा कागद वापरला गेला. कागद आणि छपाईची मजुरी एवढाच खर्चाचा हिशेब काढला तर प्रत्येक अंकाच्या 850 प्रती छाप–ण्याचा दर अंकाचा सरासरी खर्च पुढील प्रमाणे होतो :

| | |
|---|---|
| अंक 1 ( एप्रिल–जून ) | : रु. 11.41 |
| अंक 2 ( जुलै–सप्टेंबर ) | : रु. 13.45 |
| अंक 3 ( ऑक्टो–डिसें. ) | : रु. 13.54 |
| अंक 4 ( जानेवारी–मार्च ) | : रु. 18.11 |

या चारही अंकांच्या छपाई खर्चाची वार्षिक सरासरी, दर नगामागे 14.53 रुपये होती. याखेरीज येणारे टपाल आणि कार्यालयीन खर्च आहेतच. 1990–91 या वर्षातील छपाईचा खर्च दर नगामागे 11.87 रुपये होता हे ध्यानात घेतल्यास 1991–92 मध्ये त्यात 22.41 टक्क्यांनी वाढ झाली.

'अर्थसंवाद' च्या अशा वाढत्या खर्चाची तोंड–मिळवणी करण्यासाठी जाहिराती मिळविण्याचे आपणा सर्वांनाच आवाहन केले होते. आवरण पृष्ठे 2, 3 आणि 4 यावर पूर्ण पानाच्या जाहिराती छापण्याचे आपले प्रयत्न असतात. जाहिराती मिळविण्यासाठी आपल्या वैयक्तिक ओळखी-संबंधांचा वापर करावा लागतो. चालू वर्षातील जाहिराती मिळविण्यासाठी मी स्वतः प्रयत्न केलेच. परंतु त्याखेरीज सहायक संपादक सु. गो. भानुशाली, कार्यवाह–खजिनदार व्यं. सु. पाटणकर, शशिकांत गंधे, शि. ना. माने, प्र. ब. कुलकर्णी, चारुदत्त गोखले आणि दिलीप पाटील या सर्वांचे सहकार्य लाभले. या सर्वांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. याचबरोबर काही बाबतीतले असमाधानही व्यक्त केले तर अनुचित होणार नाही असे मला वाटते. 1990–91 या वर्षात जाहिरातींच्या रूपाने आपण जवळपास 19,000 रुपये मिळविले होते. 1991–92 वर्षात त्यापेक्षा कमी ( 16,500 ) रुपये मिळविले. या जाहिराती कोल्हा–पूर, सांगली, सातारा, धुळे, जळगाव आणि गोवा याच प्रदेशातील होत्या. मुंबई–पुणे–नाशिक परिसर, मराठ–वाडा आणि विदर्भातून एकही जाहिरात मिळू शकली नाही. 'अर्थसंवाद' चे सल्लागार मंडळ आणि परि–षदेच्या कार्यकारी मंडळातील बहुतांशी सदस्य यांनी आपल्या नैतिक जबाबदारीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे असे मला खेदाने नमूद करावे लागते. या सर्वांना वेळो–वेळी समक्ष आणि निवेदनाद्वारे आवाहन केलेले होते. आपण सर्वांनी या बाबीचा गंभीरपणे विचार करावा अशी माझी विनंती आहे. मला आपले मोलाचे साहाय्य हवे आहे.

परिषदेच्या नांदेड येथील वार्षिक अधिवेशनाच्या काळातच 29 नोव्हेंबर, 1991 रोजी 'अर्थसंवाद' च्या सल्लागार मंडळाची सभा झाली. त्यामध्ये त्रैमा–सिकाच्या आर्थिक आणि साहित्यिक बाजूविषयी साधकबाधक चर्चा झाली.

'अर्थसंवाद' ची वर्षभरातील जबाबदारी पार पाडताना मला परिषदेचे अध्यक्ष ज. फा. पाटील, कार्याध्यक्ष रवीन्द्र सबनीस, कार्यवाह–खजिनदार त्र्यं. सु. पाटणकर, सहायक संपादक सु. गो. भानुशाली, 'अर्थसंवाद' च्या सल्लागार मंडळाचे सदस्य या सर्वांचे विविध प्रकारे साहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. लेखकांनी लेखांच्या रूपाने आणि जाहिरातदारांनी जाहिराती देऊन मोलाची मदत केली. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभाग, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या दोन संस्थांकडून 'अर्थसंवाद'साठी अनुदान मिळत राहिले. अंकाची छपाई सुबक आणि वेळेवर करून देण्यात 'हेमंत मुद्रण' कोल्हापूरचे मालक सुनील नसिराबादकर आणि त्यांच्या मुद्रणालयातील सर्व सहकारी यांनी मेहनत घेतली. सर्वांना धन्यवाद. 'अर्थसंवाद'च्या ज्या अनेक वाचकांनी समक्ष आणि पत्राने अंकाच्या अंतरंगाविषयी समाधान व्यक्त केले त्यांचा मी कृतज्ञ आहे.

□ □

## तुमचा पत्ता बदलला आहे काय ?

परिषदेच्या कार्यालयाकडे आपल्या ज्या पत्त्याची नोंद आहे त्यामध्ये काही बदल असल्यास तावडतोब आपला नवीन पत्ता कार्यवाहांच्या कार्यालयाकडे कळवावा. परिषदेच्या सर्व सदस्यांनी याबद्दल जागरूक राहावे ही विनंती.

**त्र्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह – खजिनदार

# सोळाव्या वार्षिक अधिवेशनाचा कार्यवृत्तांत

व्यं. सु. पाटणकर *

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक अधिवेशन नाशिक येथे दिनांक 25, 26 आणि 27 डिसेंबर 1992 या दिवशी नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संचलित के. टी. एच. एम. महाविद्यालयाच्या विद्यमाने पार पडले. अधिवेशनाच्या तारखा आणि संयोजन–व्यवस्था यामध्ये अपरिहार्य कारणांमुळे बदल करण्याचा प्रसंग गेल्या वर्षाप्रमाणे यंदाही आला. राज्यव्यापी अशा या शैक्षणिक उपक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यक पूर्व–तयारीसाठी जेमतेम दोन महिन्यांचा कालावधी उपलब्ध असतानाही नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समा–जाने ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली आणि अतिशय परिश्रमपूर्वक आणि शिस्तबद्धरीतीने यंदाचे अधिवेशन सर्वार्थाने यशस्वी आणि संस्मरणीय करून दाखविले. डॉ. शशिकांत गंधे, प्रकुलगुरु, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली हे अधिवेशनाच्या अध्यक्ष–स्थानी होते.

अधिवेशनाचा उद्घाटन सोहळा दिनांक 25 डिसेंबर, 1992 रोजी सकाळी 9·30 वाजता महा–विद्यालयाच्या सभागृहात सुरू झाला. आपल्या प्रास्ता–विकामध्ये प्राचार्य बा. कृ. डोंगरे यानी नाशिक शह–राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांची नोंद घेतली. अलीकडच्या काही दशकांमधील नाशिक जिल्ह्यातील आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रातील झपा–ट्याने होत असलेल्या स्थित्यंतरांकडेही त्यानी लक्ष वेधले आणि महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेतील शेती, कारखानदारी, व्यापार, वित्तीय संस्था या क्षेत्रातील नाशिक जिल्ह्याच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. नाशिक जिल्हा मराठा विद्या–प्रसारक समाजाने शिक्षण क्षेत्रातील केलेली वाटचाल आणि मिळविलेला नावलौकिक याची माहिती उपस्थि–तांना देऊन आपल्या संस्थेला अधिवेशनाच्या यजमान–पदाचा मान मिळाल्याबद्दल त्यानी आनंद व्यक्त केला.

अधिवेशनाचे अध्यक्ष आणि व्यासपीठावरील मान्यवर मंडळी यांचा परिचय आणि सत्काराचा कार्यक्रम

* कार्यवाह–खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.

आटोपल्यावर स्वागताध्यक्ष खासदार डॉ. वसंत पवार यांचे भाषण झाले. अर्थशास्त्र आणि अन्य सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू मनुष्य असल्याने या क्षेत्रातील विचारवंतांना सोवळेपणाने हस्तिदंती मनोऱ्यात राहून केवळ तत्त्वविवेचकाची भूमिका निभावणे योग्य ठरणार नाही असे सुचवून डॉ. पवार यांनी प्रारंभीच परिषदेच्या आजवरच्या कार्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले. देशामध्ये राजकीय अस्थैर्याचे संकट उभे असताना अर्थशास्त्राच्या जाणकारांकडून आर्थिक दुःखण्याबरोबरच राजकीय स्थैर्याच्याही उपायांबाबत मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करताना नव्या उदारमतवादी आर्थिक धोरणाची पार्श्वभूमी आणि आर्थिक क्षेत्रातील अलीकडच्या रचनात्मक सुधारणा यांचा डॉ. पवार यांनी संक्षिप्तपणे परामर्श घेतला. तोट्यात चालणारे सरकारी उपक्रम, आर्थिक साहाय्यासारखे विकासेतर खर्च, अर्थसंकल्पातील तूट, निर्यात बाजारातील तीव्र स्पर्धा, रोखे बाजारातील घोटाळे अशा काही देशाला भेडसावणाऱ्या समस्यांचा निर्देश करून आपल्या भाषणाच्या अखेरीस डॉ. पवार म्हणाले की, प्रागतिक आर्थिक धोरणे यशस्वी ठरावयाची असतील तर त्यासाठी राजकीय स्थैर्य आणि कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासन यांची नितांत आवश्यकता आहे. जनसामान्यांच्या व्यथा दूर करण्याचा परिणामकारक मार्ग त्यामधूनच सापडू शकेल.

अधिवेशनाच्या उद्‌घाटनासाठी नामदार शांताराम पोटदुखे, वित्त राज्यमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली यांना निमंत्रित करण्यात आले होते. ना. पोटदुखे यांनी आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणात अधिवेशनात होणारी चर्चा अभ्यासपूर्ण होईल आणि त्यातून अनेक उपयुक्त आणि मार्गदर्शक सूचना शासनाला मिळू शकतील असा विश्वास प्रारंभीच व्यक्त केला. आर्थिक अराजकाच्या उंबरठ्यावर असलेल्या आपल्या देशाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी केल्या गेलेल्या काही उपायांची मीमांसा करताना काही अल्पमुदतीचे आणि तात्कालिक असे स्थैर्याच्या उद्देशाने हाती घेतलेले उपाय आणि त्याचबरोबर दीर्घ मुदतीचे आणि दूरगामी परिणाम साधणारे रचनात्मक उपाय यांच्या समन्वयातून साकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाचे धागेदोरे ना. पोटदुखे यांनी विशद केले. भाववाढीच्या प्रमाणात अलीकडे आढळणारी घट, विदेशी चलनाच्या साठ्यातील उल्लेखनीय वाढ, निर्यात बाजाराचा होणारा विस्तार ही नव्या आर्थिक धोरणाच्या फलश्रुतीची प्रसादचिन्हे आहेत असे नमूद करून कृषी, धान्य वितरण, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीशी निगडित क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक वाढविण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला. ज्या क्षेत्रातील शासनाचा सहभाग कमी केल्याने सार्वजनिक हिताला बाधा येण्याचा संभव नाही अशी क्षेत्रे खाजगी गुंतवणुकीला खुली करण्याचे धोरण अधिक लाभदायक आणि व्यवहार्य ठरेल हे नव्या अर्थनीतीचे एक महत्त्वाचे अंग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दिशेने पाउले उचलताना जलसिंचनाच्या क्षेत्रात निर्माण केलेल्या क्षमतेचा पूर्ण वापर, रोजगारनिर्मितीवर भर देणारे ग्रामीण विकास कार्यक्रम आणि सार्वजनिक वितरणव्यवस्थेबाबत संघटन आणि कार्यपद्धती यामधील सुधारणा यांच्यावर विशेष लक्ष देण्याची गरज मंत्रीमहोदयांनी आग्रहाने प्रतिपादन केली.

'अर्थसंवाद'च्या प्राध्यापक नी. वि. सोवनी गौरव अंकाचे प्रकाशन हा एक छोटासा परंतु हृद्य असा कार्यक्रम यंदाच्या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण ठरला. ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पहिले कार्याध्यक्ष प्राध्यापक नी. वि. सोवनी यांच्या वयाला सप्टेंबर 1992 मध्ये पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली. हा योग साधून परिषदेची स्थापना, उभारणी आणि तिचा आजवरचा विविधांगी विकास यातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल आणि गेल्या पन्नास वर्षांच्या काळातील त्यांच्या अविरत ज्ञानोपासनेबद्दल त्यांचा उचित गौरव व्हावा, त्यांच्याविषयी कृतज्ञता आणि आदरभाव व्यक्त व्हावा यासाठी परिषदेनेच एका उपसमितीच्या माध्यमातून एक विचारपूर्वक योजना आखली आणि नेटाने यशस्वी केली. त्याचे फलस्वरूप म्हणजेच प्राध्यापक नी. वि. सोवनी गौरव अंक होय. परिषदेचे विद्यमान कार्याध्यक्ष डॉ. रवीन्द्र सबनीस यांनी 'गौरव अंका'च्या वैशिष्टपूर्ण योजनेमागील पार्श्वभूमी विस्ताराने विशद करून सांगितली. आपल्या प्रदीर्घ कृतिशील जीवनामध्ये प्राध्यापक सोवनी यांनी ज्या ज्या विषयांवर मूलगामी लेखन केले त्यातील विशेष महत्त्वाचे विषय निवडून त्यावर तज्ज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेतलेल्या लेखांचा संग्रह असे गौरव अंकाचे स्वरूप ठरविण्यात आले. अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम–

अध्यापन व ग्रंथनिर्मिती, अर्थशास्त्रीय सैद्धान्तिक विश्लेषण, आर्थिक इतिहास, समाजवादाचा आर्थिक इतिहास, नियोजन व विकास आणि नागरीकरण हे निवडण्यात आलेले महत्त्वाचे विषय होते. अर्थशास्त्राचे अभ्यासक आणि जाणकार यांच्यामधील मराठी भाषेतून होणाऱ्या चर्चाविमर्शासाठी परिषदेच्या रूपाने व्यासपीठ उभारण्याचे प्रयत्न करताना अर्थशास्त्रीय तत्त्वे आणि व्यवहार यांचे स्वरूप आणि समस्या यांचे वस्तुनिष्ठ आकलन जनसामान्यांच्याही दृष्टीने महत्त्वाचे आहे हे प्राध्यापक सोवनी, प्राध्यापक गोवर्धन पारीख यांच्यासारख्या द्रष्ट्या विचारवंतांनी ओळखले होते याचे डॉ. सबनीस यानी श्रोत्यांना स्मरण करून दिले.

अनेक अंगांनी आता बहरलेल्या परिषदेच्या कार्याचा आढावा घेताना वेळोवेळी लाभलेल्या प्राध्यापक सोवनींच्या बहुमोल मार्गदर्शनाचा आणि सल्ल्याचा डॉ. सबनीस यानी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. परिषदेचे मुखपत्र 'अर्थसंवाद' या व्यावसायिक नियतकालिकाच्या जडणघडणीबाबत प्राध्यापक सोवनींची काही ठाम मते होती. शास्त्रीय विवेचनासाठी सकस आणि परिपक्व भाषेची गरज आहे आणि त्याबाबत तडजोड धोक्याची ठरेल, ही भूमिका ते वारंवार आग्रहाने मांडीत याचा उल्लेख करून पुढे डॉ. सबनीस म्हणाले की, अर्थशास्त्र परिभाषा विकास, मराठीतील अर्थशास्त्रीय विषयांवरील प्रकाशने, परिषदेच्या विद्यमाने आयोजित होणाऱ्या व्याख्यानमाला आणि अन्य उपक्रम यांची आखणी आणि कार्यवाही यामध्ये प्राध्यापक सोवनींनी आपल्या ज्ञानाचा आणि संपन्न अनुभवाचा फायदा परिषदेला मिळवून दिला. इतकेच नव्हे तर, परिषदेची आर्थिक स्थिती सुदृढ व्हावी यासाठी शिक्षणप्रेमी व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून देणग्या आणि अनुदाने मिळवून स्वतः प्रयत्न कसे केले आणि आपल्या सहकाऱ्यांना कसे प्रवृत्त केले याचा धावता आलेख श्रोत्यांसमोर मांडून डॉ. सबनीस यानी आपले भाषण संपविले. परिषदेची प्रकाशने आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची प्रकाशने यांचे एक प्रदर्शन अधिवेशनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. त्याचेही उद्घाटन ना. पोटदुखे यानी केले. संयोजकांनी मुद्दाम लिहवून घेतलेल्या निवडक संकीर्ण लेखांच्या स्मरणिकेचे प्रकाशन नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष ॲडव्होकेट वी. जी. ठाकरे यांच्या हस्ते झाले.

डॉ. शशिकांत गंधे यानी त्यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणाला प्रारंभ केला. त्यानी निवडलेला विषय होता 'लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी'. न्यून विकसित देशांच्या संदर्भात या दोहोंतील परस्परसंबंध हा एक वादग्रस्त प्रश्न बनलेला आहे आणि त्याच्या सूचितार्थांविषयी पुढे आलेल्या दोन टोकांच्या विचारसरणींची छाननी आणि भारताच्या प्रचलित आर्थिक-सामाजिक परिस्थितीतील त्यांची समर्थकता तपासण्याचा आपला मनोदय व्यक्त करून प्रथम डॉ. गंधे यानी जागतिक आणि भारतातील लोकसंख्येतील बदलांचा आढावा घेतला. लोकसंख्यावाढीच्या दरांची विकसित आणि न्यून विकसित देशांतील प्रवृत्ती लक्षात घेता असे स्पष्ट होते की, भविष्यातील जागतिक लोकसंख्यावाढीचा फार मोठा, म्हणजे जवळपास 90 टक्के, भाग आजच्या न्यून विकसित देशांशी संबंधित राहील आणि परिणामी जागतिक लोकसंख्येतील न्यून विकसित देशांच्या लोकसंख्येचे प्रमाण वाढते राहील. भारताचा याबाबत अनुभव असा आहे की, गेल्या चाळीस वर्षांत लोकसंख्या अडीच पटीने वाढली हे जरी खरे असले तरी, जन्मदरातील दशकीय घट मृत्यूदरातील दशकीय घटीपेक्षा अधिक राहण्यात प्रथमच यश आपल्या देशाला 1981–91 या दशकात मिळाले आहे. या महत्त्वपूर्ण बदलाकडे त्यानी लक्ष वेधले.

लोकसंख्यावाढीची प्रतिकूल बाजू मांडणाऱ्या माल्थसवाद, नवमाल्थसवाद, अभिवृद्धी मर्यादा प्रतिमानांतून व्यक्त झालेल्या विचारांचा आशय आणि त्यासंबंधी टीकाकारांनी घेतलेले आक्षेप यांचे धावते परिशीलन करून डॉ. गंधे लोकसंख्यावाढीच्या अनुकूल बाजूच्या युक्तिवादांकडे वळले. अनुमापी अनुकूलता, वैयक्तिक / कौटुंबिक अभिप्रेरणांचा श्रमाच्या अधिक वापरावरील प्रभाव, मानवी साधनशक्तीतील गुंतवणुकांमुळे होणारा गुणवत्ता विकास, नवप्रवर्तन इत्यादी घटकांवर आधारलेले दृष्टिकोन लोकसंख्या वाढीच्या आर्थिक विकासावरील परिणामांविषयी आशादायक चित्र उभे करतात असे सांगून डॉ. गंधे यानी भारताच्या संदर्भात उपरोक्त भूमिका कितपत लागू पडण्यासारख्या आहेत याचे विश्लेषण केले. त्यांच्या मते, भारतातील लोकसंख्याविषयक परिस्थितीची वैशिष्ट्ये प्रथम लक्षात

घेणे जरूरीचे आहे. लोकसंख्येचे मोठे आकारमान, मोठा 'परावलंबन दर' आणि त्याचे वचत आणि विनियोग यावरील दुष्परिणाम, सामाजिक गुंतवणुकीच्या मर्यादा, कमी प्रतीची श्रम-गुणवत्ता, नवप्रवर्तन आणि तंत्र-विज्ञानाच्या क्षेत्रातील मंद वाटचाल, कुपोषण हे सर्व आपल्या आर्थिक विकासातील प्रमुख अडथळे असून लोकसंख्यावाढीच्या दरात लक्षणीय घट आणि श्रमिकांच्या गुणसंवर्धनासाठी परिणामकारक उपायांचा अवलंब हे भविष्यातील आपली आर्थिक प्रगती आणि स्थैर्य यावर निर्णायकरीत्या प्रभाव पाडणारे घटक राहतील असे सुचवून डॉ. गंधे यांनी आपले भाषण संपविले.

## चर्चासत्रे

पूर्वनियोजित विषयांवर चर्चासत्रे हा अधिवेशनाचा मुख्य भाग. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही एकूण चार चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. स्वीकारलेल्या एकूण निबंधांची संख्या 44 होती. नियुक्त करण्यात आलेल्या सूत्रसंचालकांनी आपल्या विषयावरील निबंधांचे परिशीलन करून, त्यातील प्रतिपादनाचा आशय लक्षात घेऊन, त्यांचे सोयिस्कर वर्गीकरण आणि त्यातील ठळक मुद्दे आणि निष्कर्ष यावर आधारलेले टिपण त्या त्या चर्चासत्रांच्या प्रारंभी प्रास्ताविकादाखल सादर केले. चर्चेमध्ये नेटकेपणा आणि शिस्त राखण्याच्या-दृष्टीने ही व्यवस्था उपयुक्त ठरत असल्याचा पुन्हा एकवार प्रत्यय आला. सर्व चर्चासत्रांच्या अध्यक्षस्थानी डॉ. गंधे होते.

पहिले चर्चासत्र 25 डिसेंबर 1992 रोजी दुपारी आयोजित करण्यात आले. 'महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे अर्थशास्त्र' या विषयावरील या चर्चासत्राचे सूत्रसंचालक म्हणून डॉ. मा. पं. धोंगडे यांनी काम पाहिले. स्वीकारण्यात आलेल्या 19 निबंधांपैकी 13 निबंध प्रत्यक्ष सादर करण्यात आले. यामध्ये आ. गो. पुजारी, सुधाकर कुलकर्णी, मुसळे, सौ. कल्याणी कुलकर्णी, रमेश कटके, सुकाळे, मंगल गोगटे, रमेश जोशी, रमेश चौगुले, शिंदे, ज. शां. पाटील, सूर्यवंशी इत्यादींचा समावेश होता. चर्चेमध्ये शं. तु. खोकले, बारगजे धाराशिवकर, कुरुलकर, पडोशी, गादेवार, देसरडा, रवीन्द्र दोशी, चंद्रसेन मोहिते, अनिल पाटील, कुलकर्णी, गंभीरे इत्यादींनी आपले विचार व्यक्त केले. स्थानिक फलोद्यान विकास अधिकारी डॉ. फिरके यांनीही चर्चेमध्ये सहभाग घेतला. महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे एक वैशिष्टय म्हणजे केळी आणि द्राक्षे यांची जवळपास मक्तेदारी या राज्याला लाभलेली असून बोर, डाळिंब, चिकू इत्यादी फळपिकांच्या उत्पादनवाढीला येथे मोठी अनुकूलता असून त्यांना किफायतशीर अंतर्गत आणि विदेशी बाजार मिळविता येईल आणि त्याचा ग्रामीण विकासाला महत्त्वपूर्ण हातभार लागू शकेल. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये फळबाग-विकासाचा शंभर कोटी रुपयांची तरतूद असलेला महत्त्वाकांक्षी कार्यक्रम म्हणजे त्या दिशेने टाकले जाणारे स्वागतार्ह पाऊल आहे असे सांगून डॉ. धोंगडे यांनी या चर्चासत्राचा समारोप केला.

दुसरे चर्चासत्र 26 डिसेंबर 1992 रोजी सकाळी पार पडले. 'भारतातील ग्रामीण उद्योगीकरण' हा चर्चेचा विषय होता आणि डॉ. र. पु. कुरुलकर हे सूत्रसंचालक होते. निबंधांची संख्या 19 होती. नीता चोरडिया, वाडकर, तुंगारे, ल. शि. पाटील, सुमित्रा पवार, भिसे, पाटील, शैला बिराजदार, विजय साठे यांनी निबंध सादर केले. चर्चेमध्ये शीतल पाटील, लुपे, मोकाशी, कल्याणी कुलकर्णी, कुमुद पोरे, अस्मिता कुलकर्णी, शाम सोवनी, संजय पाटील, दत्ता लिमये, पुष्पा इंदूरकर, श्रीश भांडारी, रमेश चांगुले, श्री. आ. देशपांडे, रवीन्द्र दोशी, सुलोचना नाडकर्णी, संतोष मोरे, भालचंद्र मुणगेकर इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले. अपेक्षेप्रमाणे या विषयावरील चर्चेत सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींची संख्या मोठी होती. ग्रामीण उद्योगांची व्याख्या आणि व्याप्ती, दारिद्र्यनिवारण आणि रोजगारनिर्मितीतील अशा उद्योगांचे योगदान, उपक्रमशीलता, विकासाच्या समस्या, ग्रामीण उद्योगातील उत्पादनाची विक्री, वित्तपुरवठा इत्यादी अंगांवर प्रामुख्याने चर्चा केंद्रित झाली होती. नवीन औद्योगिक धोरणाच्या संदर्भात ग्रामीण उद्योगीकरणाविषयीच्या तरतुदींचाही आढावा घेण्यात आला. डॉ. कुरुलकर यांच्या समारोपानंतर हे चर्चासत्र संपले.

'कल्याणाच्या अर्थशास्त्रातील नवे विचारप्रवाह' या विषयावरील तिसरे चर्चासत्र 26 डिसेंबर 1992 रोजी दुपारी पार पडले. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अ. रा. पडोशी.

यानी त्याना साहाय्य केले. या चर्चासत्रासाठी फक्त 7 निबंध होते. प्र. ब. कुलकर्णी, पुष्पा इंदूरकर, शिरसाट, विनायक देशपांडे, पेडगावकर यानी आपापल्या निबंधाचा सारांश सादर केला. निबंधांमध्ये सादर केलेल्या विश्लेषणाच्या अनुषंगाने डॉ. नाडकर्णी यांनी कल्याणाच्या सैद्धान्तिक अर्थशास्त्रामध्ये ज्या संकल्पनांची आणि प्रमेयांची चर्चा करण्यात आलेली आहे त्याचा विस्तृत आढावा प्रास्ताविकामध्ये घेतला. त्यामध्ये प्रत्यक्षानुसारी अर्थशास्त्रातील सिद्धान्तांची सत्यता आणि कल्याणाच्या अर्थशास्त्रातील विधानांची सत्यता पारखण्यासाठी भिन्न निकषांचा वापर, कल्याणविषयक भिन्न संकल्पना, पारेटो, रॉबिन्स, हिक्स व काल्दोर, सितोव्हस्की इत्यादींनी मांडलेले आर्थिक कल्याणाचे पर्यायी निकष, समाजकल्याण अनुवर्तीविषयीचे ॲरो, बोमॉल, सेन यांचे विश्लेषण, समाजकल्याणाच्या महत्तमनीकरणाच्या शर्ती आणि कल्याणाच्या सैद्धान्तिक अर्थशास्त्राचे उद्देश आणि मर्यादा यांचा समावेश होता. चर्चेमध्ये कल्याणी कुलकर्णी, म्हस्के, थोरूडे, नलिनी पंडित, राम देशपांडे यांनी भाग घेतला. चर्चेमध्ये उपस्थित झालेल्या काही मुद्यांचा परामर्श डॉ. नाडकर्णी यानी आपल्या समारोपाच्या भाषणात घेतला.

आयत्या वेळेच्या विषयावरील चौथे चर्चासत्र 27 डिसेंबर 1992 रोजी सकाळी आयोजित करण्यात आले. 'देशाच्या अर्थव्यवस्थेत अर्थसाहाय्य योजनेचे योगदान' या विषयावरील चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. श्री. वि. खांदेवाले यानी केले चर्चेच्या उपन्यासाची जबाबदारी डॉ. रवीन्द्र दोशी, डॉ. भालचंद्र मुणगेकर आणि विशेष निमंत्रणानुसार उपस्थित राहिलेले डॉ. राम देशपांडे यांनी सांभाळली. भालचंद्र आहेर, यशवंत रारावीकर, संध्या मुनीश्वर, अस्मिता कुलकर्णी, आनंद नाडकर्णी, देसरडा, अनिल पडोशी, वैदेही दप्तरदार, मोहिते, गोखले, विनायक देशपांडे, पाटील, आणि शशिकांत गंधे यांनी चर्चेत भाग घेतला. समारोपाच्या भाषणात डॉ. खांदेवाले यानी उद्योगक्षेत्रातील अर्थसाहाय्याची मीमांसा करून ग्रामीण भागातील उद्योगांच्या विकासासाठी अर्थसाहाय्य अपरिहार्य ठरेल, मात्र त्याची फलनिष्पत्ती काय होत आहे याचा सतत दक्षतापूर्वक आढावा घेण्याची गरज आणि त्यासाठी शासनाचे पुरेसे आणि प्रभावी नियंत्रण अर्थव्यवहारांवर असावयास हवे असा अभिप्राय व्यक्त केला.

## कार्यकारी मंडळाच्या सभा

अधिवेशनकालात परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या दोन सभा नाशिक येथे 24 आणि 26 डिसेंबर, 1992 रोजी झाल्या. अध्यक्षस्थानी डॉ. शशिकांत गंधे होते. सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आले.

(1) 28 आणि 30 नोव्हेंबर, 1991 रोजी प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड या संस्थेच्या सभागृहात झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभांच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली.

(2) कार्यवाह–खजिनदारांनी सादर केलेला 1991–92 चा वार्षिक अहवाल संमत करण्यात आला.

(3) 'अर्थसंवाद'चे प्रमुख संपादक डॉ. रवीन्द्र दोशी यानी 1991–92 च्या आपल्या अहवालातील वैशिष्टयपूर्ण बाबींकडे सदस्यांचे लक्ष वेधले. छपाईचा वाढता खर्च, विदर्भ–मराठवाड्यातून अधिक लेखन–साहाय्य मिळण्याची अपेक्षा, जाहिराती मिळविण्याबाबत अधिक नेटाने प्रयत्न होण्याची गरज, 'आर्थिक वार्ता' हे नव्याने सुरू झालेले सदर, नव्या इंग्रजी–मराठीतील अर्थशास्त्रविषयक ग्रंथांचा परिचय देण्यासंबंधीचा मनोदय या अहवालातील ठळक मुद्यांवर चर्चा झाली. जुनी अर्थशास्त्रीय पुस्तके त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तके यांचे परीक्षण 'अर्थसंवाद' मध्ये येण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावे असे सुचविण्यात आले. 'अर्थसंवाद' मधील साहित्याविषयी सूचना आणि अभिप्राय यांच्या अभ्यासासाठी नियुक्त करण्यात आलेल्या उपसमितीचे निमंत्रक डॉ. र. स. सबनीस यानी त्यासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा आढावा सभेपुढे मांडला आणि उपसमिती बरखास्त करणे भाग का पडले याची माहिती दिली.

त्यानंतर 'अर्थसंवाद'च्या 1991–92 च्या अहवालाला मान्यता देण्यात आली.

(4) लेखापालांनी 1991–92 या वर्षाच्या तपासलेल्या हिशेबाला आणि 1993–94 च्या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली.

(5) 1993–94 या वर्षासाठी प्रकाश पाठक ॲन्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल, धुळे यांची परिषदेचे लेखापाल म्हणून नियुक्ती व्हावी आणि त्यांना मेहनताना रुपये तीनशे पन्नास देण्यात यावा अशी शिफारस वार्षिक साधारण सभेला करण्याचे ठरले.

(6) प्रा. मो. स. भावे सत्कार समिती, जळगाव यांचेकडून परिषदेच्या कार्यालयाकडे आलेल्या प्रस्तावाची माहिती कार्यवाहांनी सभेला दिली. वर्षभरामध्ये 'अर्थसंवाद' मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्वोत्कृष्ट लेखाच्या लेखकास 'प्रा. मो. स. भावे पारितोषिक' देण्यात यावे असे योजनेचे स्वरूप असून त्यासाठी समितीने काही निधी परिषदेकडे सुपूर्द केलेला आहे.

सभेने सदर योजना तत्त्वतः स्वीकारण्यास मान्यता दिली आणि त्याचा तपशील ठरविण्यासाठी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह–खजिनदार आणि 'अर्थसंवाद' चे प्रमुख संपादक यांची उपसमिती नियुक्त केली.

(7) कै. पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानमालेचे (सहावे पुष्प) आयोजन एप्रिल 1993 मध्ये नागपूर वा सातारा येथे व्हावे आणि त्यासाठी कार्याध्यक्ष आणि कार्यवाहांनी संबंधितांशी संपर्क साधावा असे ठरविण्यात आले.

(8) स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रम 1993–94 या वर्षामध्ये श्रीमती ना. दा. ठा. विद्यापीठाच्या सहकार्याने मुंबई वा पुणे येथे आयोजित करण्याची शक्यता अजमावावी असे ठरविण्यात आले.

(9) मुंबई येथील 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज' मधील श्रीमती संजीवनी सावंत आणि श्री. श्रीकांत कदम यांचे बहुमोल कार्यालयीन साहाय्य परिषदेला गेली अनेक वर्षे लाभलेले आहे. त्याविषयी कृतज्ञता म्हणून बक्षीसरूपाने योग्य अशी रक्कम उभयतांना देण्यास सभेने मान्यता दिली.

## 'अर्थसंवाद' संपादन सल्लागार मंडळाची सभा

'अर्थसंवाद' च्या संपादन सल्लागार मंडळाची सभा 25 डिसेंबर, 1992 रोजी नाशिक येथे झाली. 'अर्थसंवाद' च्या 1991–92 या वर्षाच्या अहवालावर तपशीलवार चर्चा होऊन तो स्वीकारण्यात आला. 1991–92 या वर्षातील चार अंकांच्या छपाई खर्चाविषयीचा महत्त्वाचा तपशील सभेपुढे ठेवण्यात आला. अहवालवर्षात लेखनसाहित्याची चणचण भासली नाही परंतु कागद आणि छपाईच्या खर्चात मोठी वाढ झाली या परिस्थितीकडे सदस्यांचे लक्ष वेधण्यात आले. गेल्या वर्षाच्या तुलनेने यंदा जाहिरातीपासून मिळालेल्या उत्पन्नातील घट लक्षात घेऊन याबाबत सर्वांनी अधिक प्रयत्न करण्याचे ठरले. 'अर्थसंवाद' च्या जडणघडणीसंबंधी अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या उपसमितीची बरखास्ती आणि 'अर्थसंवाद' चे चालू वर्षापासून कोल्हापूरहून होणारे वितरण याची माहिती सदस्यांना देण्यात आली.

## अधिवेशनाचा समारोप

सोळाव्या अधिवेशनाचा सांगता समारंभ 27 डिसेंबर, 1992 रोजी सकाळी नाशिक जिल्हा विद्याप्रसारक समाजाचे सरचिटणीस खासदार डॉ. वसंत पवार आणि अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रथम प्राचार्य बा. कृ. डोंगरे यांनी अधिवेशनातील एकूण कामकाजाचा थोडक्यात आढावा घेतला. डॉ. पवार यांनी आपल्या संस्थेला परिषदेचे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्याची संधी लाभली याबद्दल आनंद व्यक्त केला. या प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांची उपयुक्तता केवळ प्राध्यापकांच्याच नव्हे तर एकूण समाजाच्या दृष्टीनेही मोठी आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. प्रा. सुधाकर कुलकर्णी व प्रा. बारगजे यांनी प्रतिनिधींच्या वतीने अधिवेशनाच्या उत्कृष्ट संयोजनाबद्दल संयोजकांना मनःपूर्वक धन्यवाद दिले. डॉ. शशिकांत गंधे यांनी परिषदेच्या ज्ञानप्रसाराच्या कार्यात आत्मीयतेने सहकार्याचा हात पुढे करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील या मान्यवर शैक्षणिक संस्थेचे पदाधिकारी आणि सेवकवर्ग यांच्याशी या निमित्ताने जडलेले ऋणानुबंध भविष्यात अधिक बळकट होतील असा विश्वास प्रकट केला. स्थानिक कार्यवाह प्रा. गुलाबराव तायडे यांनी अधिवेशनाच्या यशस्वितेला हातभार लावणाऱ्या सर्व व्यक्ती आणि संस्था यांचे आभार मानले. परिषदेच्या वतीने कार्यवाह–खजिनदार डॉ. व्यं. सु. पाटणकर यांनी

सर्व संबंधितांचे आभार मानले. त्यानंतर अधिवेशन समाप्त झाल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

## वार्षिक साधारण सभा

परिषदेची वार्षिक साधारण सभा 27 डिसेंबर, 1992 रोजी दुपारी के. टी. एच. एम. महाविद्यालयाच्या सभागृहात भरविण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शशिकांत गंधे होते. सभेत पुढील कामकाज पार पडले.

(1) परिषदेचे एक आधारस्तंभ, ज्येष्ठ आजीव सदस्य, परिषदेच्या जडणघडणीमध्ये मोलाची भर टाकणारे सक्रिय हितचिंतक आणि विश्वस्त मंडळाचे एक सदस्य प्रा. प्रभुराम जोशी यांचे 22 सप्टेंबर, 1992 रोजी मुंबई येथे अकाली आणि आकस्मिक निधन झाले. त्याबद्दल शोकप्रस्ताव संमत करून सभेने त्याना आदरांजली वाहिली.

(2) दिनांक 1 डिसेंबर, 1991 रोजी प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड येथे झालेल्या वार्षिक साधारण सभेच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली.

(3) कार्यवाह-खजिनदारांनी सादर केलेला परिषदेच्या 1991-92 या वर्षाचा अहवाल सभेने संमत केला.

(4) 'अर्थसंवाद'च्या प्रमुख संपादकांनी 'अर्थसंवाद'चा 1991-92 या वर्षाचा सादर केलेला अहवाल सभेने मान्य केला.

(5) परिषदेच्या लेखापालांनी तपासलेले परिषदेचे 1991-92 या वर्षाचे हिशेब आणि 1993-94 चे अंदाजपत्रक याना सभेने मान्यता दिली.

(6) 1993-94 या वर्षासाठी परिषदेचे लेखापाल म्हणून प्रकाश पाठक अॅन्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल, धुळे यांची नियुक्ती करण्यात यावी आणि त्याना या कामाबद्दल रुपये तीनशे पन्नास इतका मेहनताना देण्यात यावा, याला सभेने मंजुरी दिली.

(7) 1993-96 या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारी मंडळावरील तीन रिक्त जागांसाठी खालील सदस्यांची अविरोध निवड करण्यात आली.

1 प्रा. सुधाकर कुलकर्णी, कोल्हापूर.
2 प्रा. बन्सीभाई चौधरी, शहादा (जि. धुळे)
3 प्रा. अनिल सूर्यवंशी, बार्शी (जि. सोलापूर)

(8) 1993-96 या तीन वर्षांच्या कालावधीसाठी परिषदेचे कार्याध्यक्ष म्हणून प्रा. नलिनी पंडित, मुंबई यांची एकमताने निवड करण्यात आली.

(9) 1993-96 या तीन वर्षांच्या कालावधीसाठी परिषदेचे कार्यवाह-खजिनदार म्हणून प्रा. गुलाबराव पं. तायडे, नाशिक यांची अविरोध निवड झाली.

(10) कै. प्रा. प्रभुराम जोशी यांच्या निधनामुळे परिषदेच्या विश्वस्त मंडळावरील रिक्त जागी परिषदेचे एक आजीव सदस्य अॅडव्होकेट वासुदेव सीताराम काणे यांच्या नियुक्तीस सभेने मान्यता दिली.

(11) अर्थशास्त्रावरील मराठीतील सर्वोत्कृष्ट ग्रंथाच्या लेखकासाठी ठेवलेले 'मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक' यंदा स्पर्धेसाठी एकही प्रवेशिका सादर न झाल्याने देण्यात आलेले नाही.

(12) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या एम.ए. (अर्थशास्त्र) एप्रिल-मे 1992 च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास द्यावयाचे 'मराठी अर्थशास्त्र परिषद-पाचवे अधिवेशन पारितोषिक' पंढरीनाथ हरिभाऊ कदम, मु. पो. खराडेवाडी, ता. फलटण, जि. सातारा याना देण्यात आल्याची माहिती सभेला दिली.

(13) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासूत्रांसाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी ठेवण्यात आलेले 'कै. प्रा. म. प्र. पिंपरकर स्मृती पारितोषिक' यंदा डॉ. विनायक देशपांडे, नागपूर यांच्या 'कल्याणाच्या मापनासाठी योग्य निर्देशांकाचा प्रश्न' आणि प्रा. सौ. नीता चोरडिया, भुसावळ (जि. जळगाव) यांच्या 'रेशीम उद्योग : ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक वरदान' या निबंधांना विभागून देण्यात आले.

(14) कै. पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान-मालेसाठी (चौथे पुष्प) प्रा. देवदत्त दाभोलकर याना महनीय वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. 30 जून, 1991 रोजी मुंबई येथे झालेल्या या व्याख्यानाचा विषय 'भारतासाठी नवी विकास नीती : नवे संदर्भ, समस्या आणि पर्याय' हा होता. अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरू प्रा. राम जोशी होते.

(15) स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रम (वर्ष दुसरे, 1991–92) 7 सप्टेंबर, 1991 रोजी नागपूर येथे संपन्न झाला. 'आधुनिक काळातील म. गांधींच्या आर्थिक विचारांची सुसंगतता' या विषयावरील चर्चासत्रामध्ये 35 अभ्यासकांनी भाग घेतला. चर्चासत्राच्या पहिल्या भागात गांधीग्राम विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवेंद्रकुमार यानी डॉ. जे. सी. कुमारप्पा यांचे 'सामाजिक समता आणि पर्यावरण-संतुलनातील आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांचा सहभाग' यासंबंधी विचार मांडले. दुसऱ्या भागात श्री. पराग चोळकर यानी 'आधुनिक तंत्रविज्ञान व गांधी विचार' आणि वसंत पळशीकर यानी 'भारतातील बेरोजगार स्वरूप आणि उपाय' हे निबंध सादर केले.

(16) सभेने 1993–94 या वर्षासाठी डॉ. व्यं. सु. पाटणकर, धुळे यांची परिषदेचे आणि सतराव्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड केली.

(17) नोव्हेंबर 1993 मध्ये होणाऱ्या सतराव्या अधिवेशनासाठी लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांच्याकडून आलेले निमंत्रण सभेने स्वीकारले.

(18) सतराव्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी पुढील विषय निश्चित करण्यात आले.

(अ) उपभोक्त्याच्या वर्तनाचे आर्थिक सिद्धान्तन

(आ) भारतातील करव्यवस्था

(इ) महाराष्ट्रातील सहकारी कृषी पतपुरवठा संस्था

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि परिषदेचे अध्यक्ष तो यथावकाश जाहीर करतील.

कार्यवाह-खजिनदार डॉ. व्यं. सु. पाटणकर यानी परिषदेच्या वर्षभरातील विविध उपक्रमांमध्ये ज्या ज्या व्यक्ती आणि संस्था यांचे साहाय्य लाभले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यानंतर वार्षिक सभा समाप्त झाली.

□ □

## चुकीची दुरुस्ती

'अर्थसंवाद', ऑक्टोबर-डिसेंबर, 1992, खंड 16, अंक 3 यामध्ये नीळकंठ रथ यांचा 'सिंचन प्रकल्पाचे मूल्यमापन' हा लेख छापलेला आहे. यामध्ये पृ. 238 वर दोन सूत्रे दिली आहेत. ती छापताना चूक झाली आहे. **ती दोनही सूत्रे पुढीलप्रमाणे वाचावीत.**

$$\frac{\text{वार्षिक नक्त प्रत्याय}}{(1+i)^t} \quad \text{आणि} \quad X_k\ (1+i)^n$$

**– प्रमुख संपादक**

## सांख्यिकी पुरवणी – 16

# भारतातील पंचवार्षिक योजना : एक दृष्टिक्षेप

संकलन : रवीन्द्र दोशी*

तक्ता 1

### गुंतवणुकीसाठी आंतरक्षेत्रीय भांडवली प्रवाह (सातवी योजना)

| तपशील | सातवी योजना (1985–90) (1984–85 च्या किमतीनुसार कोटी रुपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | सरकारी क्षेत्र | खाजगी निगम क्षेत्र | घरगुती क्षेत्र | एकूण |
| 1 स्वत:ची बचत | 57,422 (17·81) | 28,779 (8·93) | 2,16,165 (67·06) | 3,02,366 (93·80) |
| 2 इतर आंतर्देशीय क्षेत्रांकडून हस्तांतरण | 78,796 (24·44) | 23,457 (7·28) | –1,02,253 (–31·72) | 0 |
| 3 भांडवलाचा अंतर्देशी प्रवाह | 18,000 (5·58) | 2,000 (0·62) | – | 20,000 (6·20) |
| गुंतवणूक | 1,54,218 (47·84) | 54,236 (16·82) | 1,13,912 (35·34) | 3,22,366 (100·00) |

टीप : कंसातील आकडे 3,22,366 या एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

तक्ता 2

## गुंतवणुकीसाठी आंतरक्षेत्रीय भांडवली प्रवाह (आठवी योजना)

| तपशील | आठवी योजना (1992–97) (1991–92 च्या किमतीनुसार कोटी रुपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | सरकारी क्षेत्र | खाजगी निगम क्षेत्र | घरगुती क्षेत्र | एकूण |
| 1 स्वतःची बचत | 68,900 (8·63) | 68,930 (8·64) | 6,05,170 (75·84) | 7,43,000 (93·11) |
| 2 इतर आंतर्देशीय क्षेत्रांकडून हस्तांतरण | 2,58,400 (32·38) | 58,770 (7·36) | –3,17,170 (–39·75) | 0 |
| 3 भांडवलाचा अंतर्देशी प्रवाह | 33,700 (4·22) | 21,300 (2·67) | – | 55,000 (6·89) |
| गुंतवणूक | 3,61,000 (45·24) | 1,49,000 (18·67) | 2,88,000 (36·09) | 7,98,000 (100·00) |

**टीप :** कंसातील आकडे 7,98,000 या एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता 3

## सातव्या आणि आठव्या योजनेची महत्त्वाची समष्टी प्रकल्पने (Projections)

| दर / गुणोत्तरे | सातवी योजना (1985–90) | सातव्या योजनेसह सात वर्षे (1985–92) | आठवी योजना (1992–97) |
|---|---|---|---|
| 1 स्थूल आंतर्देशीय उत्पादिताचा (GDP) अभिवृद्धी दर (प्रतिवर्षी टक्के) | 5·8 | 5·3 | 5·6 |
| 2 आंतर्देशीय बचत ('स्थूआंउ' शी टक्केवारी) | 20·4 | 20·7 | 21·6 |
| 3 गुंतवणूक ('स्थूआंउ' शी टक्केवारी) | 22·7 | 23·0 | 23·2 |
| 4 चालू खाते तूट ('स्थूआंउ' शी टक्केवारी) | 2·4 | 2·4 | 1·6 |
| 5 वाढीव भांडवल–उत्पादन गुणोत्तर (ICOR) | 3·9 | 4·3 | 4·1 |
| 6 अभिवृद्धी दर (वार्षिक टक्केवारी) | | | |
| (अ) वस्तूंची निर्यात | 8·1 | 8·5 | 13·6 |
| (आ) वस्तूंची आयात | 10·0 | 7·5 | 8·4 |

तक्ता 4

## आठव्या योजनेची समष्टी आकडेवारी

( 1991–92 च्या किमतीनुसार कोटी रुपये )

| तपशील | 1991–92 | 1996–97 (लक्ष्य) | आठवी योजना (एकूण) |
|---|---|---|---|
| 1 घटक परिव्ययानुसार ' स्थूआंउ ' | 5,19,716 | 6,82,473 | 30,69,138 |
| 2 बाजार किमतीनुसार ' स्थूआंउ ' | 5,82,356 | 7,64,730 | 34,39,053 |
| 3 स्थूल आंतर्देशीय बचत | 1,25,789 | 1,65,182 | 7,42,835 |
| 4 खाजगी उपभोग | 3,89,211 | 5,04,000 | 22,66,530 |
| 5 स्थूल आंतर्देशीय भांडवल निर्मिती | 1,40,348 | 1,72,292 | 7,97,698 |
| 6 विदेशी बचत | 14,559 | 7,113 | 54,863 |
| 7 वस्तूंची निर्यात | 44,292 | 83,869 | 3,30,153 |
| 8 वस्तूंची आणि बिगर–घटक सेवांची निर्यात | 55,762 | 1,02,366 | 4,07,342 |
| 9 वस्तूंची आयात | 62,345 | 93,314 | 3,99,650 |
| 10 वस्तू आणि बिगर–घटक सेवांची आयात | 72,848 | 1,12,797 | 4,77,128 |

तक्ता 5

## क्षेत्रीय अभिवृद्धी दर

| पंचवार्षिक योजना | कालखंड | चक्रवाढ वार्षिक अभिवृद्धी दर ( टक्के ) | | |
|---|---|---|---|---|
| | | कृषी क्षेत्र | औद्योगिक क्षेत्र | सेवा क्षेत्र |
| पहिली योजना | 1951–52 ते 1955–56 | 2.85 | 5.91 | 3.69 |
| दुसरी योजना | 1956–57 ते 1960–61 | 3.21 | 6.44 | 4.59 |
| तिसरी योजना | 1961–62 ते 1965–66 | –0.50 | 6.84 | 5.01 |
| वार्षिक योजना | 1966–67 ते 1968–69 | 4.18 | 3.48 | 3.77 |
| चौथी योजना | 1969–70 ते 1973–74 | 2.63 | 3.68 | 3.97 |
| पाचवी योजना | 1974–75 ते 1978–79 | 3.35 | 6.34 | 5.50 |
| वार्षिक योजना | 1979–80 | –12.77 | –3.09 | 1.84 |
| सहावी योजना | 1980–81 ते 1984–85 | 5.53 | 6.16 | 5.42 |
| सातवी योजना | 1985–86 ते 1989–90 | 3.40 | 6.52 | 7.41 |
| वार्षिक योजना | 1990–91 ते 1991–92 | 1.81 | 2.78 | 5.42 |
| आठवी योजना | 1992–93 ते 1996–97 | 3.02 | 7.11 | 6.06 |

तक्ता 6

## वास्तविक उत्पन्नातील ( real income ) अभिवृद्धी

| पंचवार्षिक योजना | अभिवृद्धीचे लक्ष्य : संदर्भ घटक | चक्रवाढ वार्षिक अभिवृद्धीचा दर ( टक्के ) योजनेचे लक्ष्य | प्रत्यक्ष | स्थूल आंतर्देशीय उत्पादित (GDP) |
|---|---|---|---|---|
| पहिली योजना | निव्वळ राष्ट्रीय उत्पादित (NNP) | 2·1 | 3·3 | 3·6 |
| दुसरी योजना | निव्वळ राष्ट्रीय उत्पादित (NNP) | 4·5 | 3·9 | 4·2 |
| तिसरी योजना | निव्वळ राष्ट्रीय उत्पादित (NNP) | 5·6 | 2·3 | 2·8 |
| वार्षिक योजना | – | – | – | 3.9 |
| चौथी योजना | निव्वळ आंतर्देशीय उत्पादित (NDP) | 5·7 | 3·2 | 3·3 |
| पाचवी योजना | 'स्थूआंउ' (GDP) | 4·4 | 4·8 | 4·8 |
| वार्षिक योजना | – | – | – | –5·2 |
| सहावी योजना | 'स्थूआंउ' (GDP) | 5·2 | 5·7 | 5·7 |
| सातवी योजना | 'स्थूआंउ' (GDP) | 5·0 | 5·8 | 5·8 |
| वार्षिक योजना | – | – | – | 3.5 |
| आठवी योजना | 'स्थूआंउ' (GDP) | 5·6 | – | – |

तक्ता 7

## स्थूल आंतर्देशीय बचतीचा दर

( 'स्थूआंउ'शी टक्केवारी )

| पंचवार्षिक योजना | घरगुती क्षेत्र वित्तीय | घरगुती क्षेत्र वस्तुरूप (Physical) | घरगुती क्षेत्र एकूण | खाजगी निगम क्षेत्र | सरकारी क्षेत्र | स्थूल आंतर्देशीय बचत |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली योजना | 1·84 | 5·74 | 5·57 | 1·01 | 1·68 | 8·28 |
| दुसरी योजना | 2·47 | 5·92 | 8·59 | 1·21 | 1·93 | 11·73 |
| तिसरी योजना | 3·21 | 5·16 | 8·37 | 1·71 | 3·13 | 13·21 |
| वार्षिक योजना | 2·53 | 7·74 | 10·27 | 1·24 | 2·18 | 13·69 |
| चौथी योजना | 3·76 | 8·08 | 11·84 | 1·55 | 2·75 | 16·14 |
| पाचवी योजना | 5·28 | 9·20 | 14·48 | 1·53 | 4·35 | 20·36 |
| वार्षिक योजना | 5·32 | 9·88 | 15·20 | 2·06 | 4·34 | 21·60 |
| सहावी योजना | 6·73 | 7·61 | 14·33 | 1·63 | 3·69 | 19·65 |
| सातवी योजना | 7·83 | 8·17 | 16·00 | 2·03 | 2·33 | 20·36 |
| वार्षिक योजना | उ.ना. | उ.ना. | 18·09 | 2·51 | 1·16 | 21·76 |
| आठवी योजना | 9·22 | 8·37 | 17·59 | 2·00 | 2·00 | 21·59 |

तक्ता 8

## वाढीव भांडवल — उत्पादन गुणोत्तर ( ICOR )

| पंचवार्षिक योजना | 'स्थूआंउ'चा वार्षिक अभिवृद्धी दर | भांडवल निर्मितीचा सरासरी दर | वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर |
|---|---|---|---|
| पहिली योजना | 3.60 | 10.66 | 2.96 |
| दुसरी योजना | 4.21 | 14.52 | 3.44 |
| तिसरी योजना | 2.77 | 15.45 | 5.57 |
| वार्षिक योजना | 3.88 | 15.91 | 4.10 |
| चौथी योजना | 3.32 | 16.89 | 5.08 |
| पाचवी योजना | 4.83 | 19.92 | 4.13 |
| वार्षिक योजना | –5.20 | 22.10 | –4.25 |
| सहावी योजना | 5.66 | 21.10 | 3.72 |
| सातवी योजना | 5.79 | 22.73 | 3.93 |
| वार्षिक योजना | 3.53 | 23.81 | 6.75 |
| आठवी योजना | 5.60 | 23.20 | 4.14 |

तक्ता 9

## विदेशी व्यापार

( 'स्थूआंउ'शी टक्केवारी )

| पंचवार्षिक योजना | निर्यात | आयात | वस्तू व्यापार शेष ( Trade balanc ) |
|---|---|---|---|
| पहिली योजना | 6·14 | 7·14 | –1·00 |
| दुसरी योजना | 4·49 | 7·63 | –3·14 |
| तिसरी योजना | 3·47 | 5·59 | –2·13 |
| वार्षिक योजना | 3·67 | 5·62 | –1·95 |
| चौथी योजना | 3·55 | 4·23 | –0·69 |
| पाचवी योजना | 3·37 | 6·10 | –0·73 |
| वार्षिक योजना | 5·42 | 8·37 | –2·95 |
| सहावी योजना | 5·00 | 8·33 | –3·34 |
| सातवी योजना | 5·21 | 8·37 | –3·16 |
| वार्षिक योजना | 6·85 | 8·91 | –2·06 |
| आठवी योजना | 9·60 | 11·62 | –2·02 |

तक्ता 10

## चालू खात्याचा ताळेबंद

( कोटी रुपये )

| पंचवार्षिक योजना | वस्तू व्यापार शेष (Trade balance) | निव्वळ सेवारूप व्यापार (Net invisibles) | चालू खात्याचा ताळेबंद (Current account balance) | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण | 'स्थूआंउ' शी टक्केवारी |
| पहिली योजना | – 509 | 481 | – 28 | दुर्लक्षणीय |
| दुसरी योजना | – 2,194 | 573 | – 1,621 | –2·26 |
| तिसरी योजना | – 2,292 | 384 | – 1,908 | –1·72 |
| वार्षिक योजना | – 1,969 | – 15 | – 1,984 | –2·02 |
| चौथी योजना | – 1,668 | 1,640 | – 28 | दुर्लक्षणीय |
| पाचवी योजना | – 3,177 | 6,225 | 3,048 | 0·65 |
| वार्षिक योजना | – 3,375 | 3,135 | – 240 | –0·16 |
| सहावी योजना | –30,456 | 19,052 | –11,404 | –1·26 |
| सातवी योजना | –54,731 | 15,844 | –38,887 | –2·36 |
| वार्षिक योजना | –23,742 | 4,554 | –19,188 | –1·70 |
| आठवी योजना | –69,497 | 14,634 | –54,863 | –1·60 |

तक्ता 11

## औद्योगिक उत्पादन

(चक्रवाढ वार्षिक अभिवृद्धीचा दर – टक्के)

| पंचवार्षिक योजना | खाणकाम आणि दगड उद्योग | वस्तुनिर्माण manufacturing | वीज | इतर |
|---|---|---|---|---|
| पहिली योजना | 2·13 | 5·75 | 6·40 | 5·39 |
| दुसरी योजना | 6·03 | 6·43 | 14·87 | 6·72 |
| तिसरी योजना | 5·29 | 7·72 | 13·42 | 8·21 |
| वार्षिक योजना | 2·24 | 2·22 | 12·01 | 2·86 |
| चौथी योजना | 1·90 | 4·12 | 8·30 | 4·35 |
| पाचवी योजना | 6·35 | 5·71 | 9·13 | 6·21 |
| वार्षिक योजना | 0·69 | –2·51 | 2·08 | –1·66 |
| सहावी योजना | 11·02 | 5·30 | 8·96 | 6·32 |
| सातवी योजना | 5·63 | 8·85 | 9·37 | 8·49 |
| वार्षिक योजना | 1·94 | 3·61 | 8·11 | 3·87 |
| आठवी योजना | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | 7·50 |

तक्ता 12

## आधारभूत संरचना ( infrastructure )

| पंचवार्षिक योजना | योजनेअखेरची फलप्राप्ती | | | |
|---|---|---|---|---|
| | कोळसा (दशलक्ष टन) | तेल (दशलक्ष टन) | वीज (अब्ज किलोवॉट) | आगगाडी (दशलक्ष टन भाडे) |
| पहिली योजना | 38.84 | 0.35 | 9.70 | 115.90 |
| दुसरी योजना | 55.70 | 0.45 | 16.90 | 156.20 |
| तिसरी योजना | 67.73 | 3.47 | 33.00 | 203.00 |
| वार्षिक योजना | 74.41 | 6.06 | 47.40 | 204.00 |
| चौथी योजना | 78.17 | 7.19 | 66.70 | 184.90 |
| पाचवी योजना | 101.95 | 11.63 | 102.50 | 223.40 |
| वार्षिक योजना | 103.95 | 11.77 | 104.60 | 217.80 |
| सहावी योजना | 147.41 | 28.99 | 156.90 | 264.83 |
| सातवी योजना | 200.89 | 34.09 | 245.10 | 334.30 |
| वार्षिक योजना | 229.30 | 30.30 | 286.70 | 363.40 |
| आठवी योजना | 308.00 | उ. ना. | 418.20 | 443.40 |

तक्ता 13

## प्रमुख पिके आणि निवडक पशुधन उत्पादितांचे उत्पादन

| प्रमुख पिके | चक्रवाढ वार्षिक अभिवृद्धीचा दर ( टक्के ) | | |
|---|---|---|---|
| | सहावी योजना | सातवी योजना | आठवी योजना |
| अन्नधान्ये | 5·80 | 3·23 | 4·01 |
| तेलबिया | 5·09 | 5·50 | 5·61 |
| कापूस | 2·15 | 6·06 | 5·92 |
| ऊस | 5·74 | 5·51 | 3·19 |
| चहा | 3·30 | 1·37 | 5·04 |
| कॉफी | 5·39 | −5·11 | 0·93 |
| रबर | 4·65 | 9·69 | 10·45 |
| दूध | 6·56 | 4·37 | 4·00 |
| अंडी | 3·06 | 7·23 | 6·00 |
| मासे | 3·65 | 5·62 | 6·60 |

तक्ता 14

## कृषी क्षेत्रातील गुंतवणूक

| पंचवार्षिक योजना | कृषीतील हिस्सा (टक्के) | | एकूण गुंतवणुकीत कृषी क्षेत्राची टक्केवारी | चक्रवाढ वार्षिक अभिवृद्धीचा दर ( टक्के ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सरकारी क्षेत्र | खाजगी क्षेत्र | | सरकारी क्षेत्र | खाजगी क्षेत्र | एकूण |
| पहिली योजना | उ.ना. | उ.ना. | 26·1 | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| दुसरी योजना | उ.ना. | उ.ना. | 18·8 | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| तिसरी योजना | 34·1 | 65·9 | 16·3 | 6·4 | 7·1 | 6·9 |
| वार्षिक योजना | 27·4 | 72·6 | 17·3 | –1·2 | 7·4 | 4·6 |
| चौथी योजना | 30·1 | 70·0 | 18·3 | 4·7 | 2·8 | 3·4 |
| पाचवी योजना | 32·7 | 67·3 | 18·2 | 11·4 | 9·6 | 10·2 |
| वार्षिक योजना | 33·9 | 66·1 | 19·5 | 4·3 | –3·0 | –0·6 |
| सहावी योजना | 38·5 | 61·5 | 15·1 | –0·3 | –3·0 | –2·0 |
| सातवी योजना | 36·7 | 63·4 | 11·9 | –5·3 | 0·7 | –1·4 |
| वार्षिक योजना | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| आठवी योजना | 34·9 | 65·1 | 18·6 | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

उ. ना. – उपलब्ध नाही.

तक्ता 15

## उपयोग करणाऱ्या उद्योगानुसार भांडवलनिर्मिती

| पंचवार्षिक योजना | एकूण भांडवलनिर्मितीत टक्केवारी | | | वास्तविक ( real ) अभिवृद्धी दर (टक्के) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कृषी | उद्योग | सेवा | कृषी | उद्योग | सेवा |
| पहिली योजना | 26·1 | 25·5 | 48·4 | 5·0 | 13·6 | 4·1 |
| दुसरी योजना | 18·8 | 31·9 | 49·4 | 1·2 | 13·1 | 7·4 |
| तिसरी योजना | 16·3 | 40·2 | 43·5 | 6·9 | 6·9 | 1·7 |
| वार्षिक योजना | 17·3 | 38·9 | 43·8 | 4·6 | –6·3 | –4·3 |
| चौथी योजना | 18·3 | 38·0 | 43·8 | 3·4 | 9·0 | 10·7 |
| पाचवी योजना | 18·2 | 41·8 | 40·0 | 10·2 | 9·3 | 3·4 |
| वार्षिक योजना | 19·5 | 42·8 | 37·8 | –0·6 | –1·0 | –6·3 |
| सहावी योजना | 15·1 | 43·7 | 41·2 | –2·0 | 4·1 | 6·4 |
| सातवी योजना | 11·7 | 45·8 | 42·5 | –0·6 | 9·5 | 5·5 |
| वार्षिक योजना | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| आठवी योजना | 18·6 | 43·9 | 37·4 | – | – | – |

तक्ता 16

## योजनेतील गुंतवणुकीत सरकारी आणि खाजगी क्षेत्रांचा हिस्सा

(आधार वर्षाच्या किमतीनुसार)

| पंचवार्षिक योजना | सरकारी क्षेत्र | | खाजगी क्षेत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रकल्पनित (Projected) | प्रत्यक्षातील | प्रकल्पनित | प्रत्यक्षातील |
| पहिली योजना | 48·39 | 32·90 | 51·61 | 67·10 |
| दुसरी योजना | 61·29 | 42·80 | 38·71 | 57·20 |
| तिसरी योजना | 59·43 | 50·31 | 40·57 | 49·69 |
| वार्षिक योजना | – | 41·76 | – | 58·24 |
| चौथी योजना | 63·70 | 40·53 | 36·30 | 59·47 |
| पाचवी योजना | 55·79 | 44·97 | 44·21 | 55·03 |
| वार्षिक योजना | – | 46·75 | – | 53·25 |
| सहावी योजना | 52·93 | 46·40 | 47·07 | 53·60 |
| सातवी योजना | 47·84 | 46·46 | 52·16 | 53·54 |
| वार्षिक योजना | – | – | – | – |
| आठवी योजना | 45·24 | – | 54·76 | – |

तक्ता 17

## योजना खर्चातील सरकारी क्षेत्राचा वित्तप्रबंध

( चालू किमतीनुसार टक्केवारी )

| पंचवार्षिक योजना | स्वतःची साधनसंपत्ती | | | आंतर्देशीय कर्ज | तुटीचा वित्त–पुरवठा | भांडवलाचा अंतर्देशी प्रवाह (Capital inflow) | योजनेची एकूण साधनसंपत्ती (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | चालू महसुलातून शिल्लक | सरकारी उपक्रमाचे योगदान | एकूण | | | | |
| पहिली | 32·5 | 5·9 | 38·4 | 35·0 | 17·0 | 9·6 | 1,960 |
| दुसरी | 22·8 | 3·6 | 26·3 | 30·8 | 20·4 | 22·5 | 4,672 |
| तिसरी | 28·8 | 5·1 | 33·9 | 24·6 | 13·2 | 28·2 | 8,577 |
| वार्षिक | 18·0 | 6·1 | 24·0 | 30·0 | 10·1 | 35·9 | 6,756 |
| चौथी | 25·0 | 8·9 | 33·9 | 40·5 | 12·7 | 12·9 | 16,160 |
| पाचवी | 49·9 | 2·2 | 52·0 | 29·7 | 3·4 | 14·8 | 39,303 |
| वार्षिक | 34·4 | 13·5 | 47·8 | 32·8 | 10·8 | 8·6 | 12,601 |
| सहावी | 19·9 | 16·8 | 36·7 | 41·4 | 14·2 | 7·7 | 1,10,821 |
| सातवी* | 2·7 | 17·0 | 19·7 | 56·3 | 15·6 | 8·3 | 1,82,278 |
| वार्षिक | –12·5 | 27·2 | 14·7 | 59·2 | 14·1 | 12·0 | 1,26,591 |
| आठवी* | 8·1 | 34·1 | 42·2 | 46·6 | 4·6 | 6·6 | 4,34,100 |

* प्रत्यक्षातील आणि प्रकल्पनित : आधार वर्षातील किमतीनुसार.

तक्ता 18

## रोजगार अभिवृद्धी आणि लवचिकता

| क्षेत्र | चक्रवाढ वार्षिक अभिवृद्धी दर (टक्के) | | | | रोजगाराची लवचिकता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1977–78 ते 1983 | 1983 ते 1987–88 | 1977–78 ते 1987-88 | 1992–97 लक्ष्य | 1977-78 ते 1983 | 1983 ते 1987-88 | 1992-97 लक्ष्य |
| कृषी | 0.91 | 0.94 | 0.92 | 1.51 | 0.49 | 0.36 | 0.50 |
| खाणकाम | 6.32 | 5.68 | 6.03 | 6.87 | 0.67 | 0.85 | 0.85 |
| वस्तुनिर्माण | 3.76 | 2.18 | 3.05 | 3.73 | 0.68 | 0.26 | 0.50 |
| बांधकाम | 7.93 | 13.00 | 10.19 | 4.74 | 1.00 | 1.00 | 1.00 |
| वीज इत्यादी | 6.00 | 3.15 | 4.71 | 4.09 | 0.74 | 0.48 | 0.50 |
| व्यापार | 3.52 | 3.83 | 3.66 | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| वाहतूक | 6.66 | 2.35 | 4.70 | 3.83 | 0.92 | 0.35 | 0.60 |
| सेवा | 4.49 | 2 06 | 3.39 | 4.19 | 0.99 | 0.42 | 0.70 |
| एकूण | 2.10 | 1.77 | 1.95 | 2.61 | 0.58 | 0.31 | 0.47 |

## संदर्भ सूची


1 Planning Commission, Note on OBJECTIVE, THRUSTS AND MACRO DIMENSIONS OF THE EIGHTH PLAN, March 1992.

2 IBA BULLETIN, ऑगस्ट 1992, Indian Banks Association, Bombay.

3 Government of India, FIVE YEAR PLANS.


□ □

# निबंधलेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप–विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून आपण नवीन अर्थ ( Interpretation ) लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम. ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा ( राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक ) सामाजिक–सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधातील वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या ' अर्थशास्त्र परिभाषा कोश ' आणि ' शासन व्यवहार कोश ' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. **महत्त्वाच्या** मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल.

# निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

## *भारताची करव्यवस्था*

### I भारतीय करव्यवस्थेसंबंधी घटनात्मक तरतुदी

भारताची राज्यघटना व्यावहारिक अर्थाने संघराज्यात्मक आहे. साहजिकच भारताची करव्यवस्थादेखील बहुस्तरीय आहे. अर्थात, या संदर्भातील घटनात्मक तरतुदी भारतीय राज्यघटनेच्या कलम 246 खाली येणाऱ्या सातव्या परिशिष्टाच्या यादी क्रमांक 1, 2 आणि 3 मध्ये देण्यात आलेल्या आहेत :

(अ) **यादी क्रमांक 1 : संघराज्य यादी** ( Union List ) : या यादीतील विभाग 82 ते 92–A आणि

97 यातून केंद्र सरकारच्या करविषयक अधिकारांचे स्पष्टीकरण मिळते. त्यामध्ये बिगर–कृषी आयकर, सीमाशुल्क ( customs ) काही अपवाद वगळता अबकारी कर, निगम कर, भांडवल कर, संपत्ती कर, देणगी कर, वारसा कर, मालमत्ता कर, रेल्वे, हवाई वाहतूक व जल वाहतूक याबाबतीत सीमा कर, रेल्वे प्रवासी वाहतूक दर व माल वाहतूक दरावरील कर, सार्वजनिक शुल्क, वर्तमानपत्रे व जाहिरातींवरील कर, आंतरराज्य खरेदी किंवा विक्रीवर कर इत्यादींचा समावेश होतो. एवढेच नव्हे तर, विभाग 97 प्रमाणे यादी 2 किंवा 3 मध्ये ज्यांचा समावेश नाही अशा सर्व करांचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे.

(आ) **यादी क्रमांक** 2 : **राज्य यादी** (State List) : या यादीत विभाग 45 ते 65 खाली घटक–राज्यांचे कर अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये, मुख्यतः शेतसारा, कृषी आयकर, जमीन उत्तराधिकार कर, जमीन व इमारतींवरील कर, खनिज हक्कांवरील कर, मद्यार्क, अफू व गांजा यासारख्या अमली पदार्थांवरील अबकारी कर, जकात (octroi), विद्युत वापर व विक्रीवरील कर, वस्तू व सेवांच्या विक्रीवरील वा खरेदीवरील कर, वर्तमान–पत्रे, रेडिओ व दूरदर्शन वगळता इतर माध्यमांतील जाहिरातींवरील कर, मोटार प्रवासी व माल वाहतुकीवरील तसेच देशांतर्गत जलवाहतुकीवरील कर, मोटार वाहनांवरील कर, जनावरे व नावांवरील कर, व्यवसाय कर, पथ–कर ( toll ), डोईकर ( capitation taxes ), करमणूक कर, काही विशिष्ट सार्वजनिक शुल्के यांचा समावेश होतो.

(इ) यादी क्रमांक तीनमध्ये कोणत्याही विशिष्ट कराचा उल्लेख नाही. याचाच अर्थ, भारतीय राज्य–घटनेतील तरतुदीप्रमाणे उर्वरित कर हक्क फक्त केंद्र सरकारलाच आहेत.

## 2 भारतीय करव्यवस्थेच्या अभ्यासाच्या दिशा

भारतीय करव्यवस्थेचा अभ्यास करताना निर्माण होणारे प्रमुख प्रश्न आणि त्याला अनुसरून अभ्यासाच्या दिशा पुढीलप्रमाणे मांडता येतील.

2·1 **कराधिकार विभागणी** : भारतीय राज्यघटनेप्रमाणे कराधिकारांची विभागणी केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यापुरतीच मर्यादित आहे. स्थानिक पातळीवरील शासनसंस्थांना ( नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, तालुका पंचायत आणि ग्रामपंचायत ) स्वायत्त असे कराधिकार नाहीत. घटक राज्यांच्या यादी–तील काही कर, स्थानिक शासनसंस्थांना शासकीय आदेश किंवा राज्य सरकारचे कायदे या माध्यमातून वापरण्यास दिले जातात. या ठिकाणी निर्माण होणारे प्रश्न खालीलप्रमाणे आहेत.

(1) कराधिकार विभागणी कोणत्या निकषांवर केली गेली ? ते निकष आजही वाजवी आणि सुसंगत आहेत का ?

(2) करविषयक शेषाधिकार केंद्र सरकारला देण्याचे समर्थन कोणते ?

(3) स्थानिक शासनसंस्थांना घटनात्मक पद्धतीने स्वायत्त कराधिकार का दिले गेले नाहीत ?

2·2 **करमहसुलाची केंद्र–राज्य वाटणी** : भारतीय करव्यवस्थेचा विचार करताना प्रकर्षाने लक्षात घ्यावी लागणारी आणखी एक बाजू म्हणजे काही महत्त्वपूर्ण केंद्रीय कर महसुलाचा काही हिस्सा घटक राज्यांमध्ये वाट–ण्याची तरतूद. या प्रकारच्या केंद्रीय करात मुख्यतः बिगरशेती उत्पन्नावरील आयकर (कलम 270), उत्पादन शुल्के (अबकारी कर) (कलम 272), तसेच कलम 268 आणि 269 खाली येणाऱ्या काही करांचा [ उदाहरणार्थ, अतिरिक्त उत्पादन शुल्क, वारसा कर, रेल्वे, विमान व जहाज कर, प्रवासी व माल वाहतुकीच्या बाबतीत सीमा कर ( terminal tax ), प्रवासी दर आणि वाहतूक दरावर कर, इत्यादी ] समावेश होतो. केंद्राने आपल्या कर महसुलात घटक राज्यांना हिस्सा देण्याची कारणे कोणती ? हा हिस्सा कसा ठरविला जातो ? त्या पद्धतीमध्ये कोणते बदल झाले ? ते कोणी आणि का केले ? अशा महसूल वाटणीचे केंद्र सरकारच्या राजकोषीय व्यवहारावर तसेच घटक

राज्यांच्या राजकोषीय व्यवहारावर काय परिणाम होतात ? निगम कर आणि सीमाशुल्क यांच्या बाबतीत घटक राज्यांना हिस्सा का देण्यात आला नाही ? तसा तो देण्याची आवश्यकता आहे का ? इत्यादी प्रश्न या ठिकाणी अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात.

2·3 **प्रत्यक्ष कर – अप्रत्यक्ष कर संरचना** : भारतीय करव्यवस्थेचा विचार करताना केंद्र सरकारच्या पातळीवर आयकर, निगम कर, संपत्ती कर, उत्तराधिकार कर (succession tax), भांडवली लाभ कर, देणगी कर, संपदा शुल्क (estate duty) हे प्रमुख प्रत्यक्ष कर आहेत. तर सीमाशुल्क (customs), अबकारी कर (excise) आणि आंतरराज्य विक्री कर हे प्रमुख अप्रत्यक्ष कर आहेत. घटक राज्यांच्या पातळीवर शेतसारा, कृषी आयकर, मालमत्ता कर (property tax) असे प्रमुख प्रत्यक्ष कर आहेत तर राज्य अबकारी कर, विक्री कर, विद्युत कर, करमणूक कर असे प्रमुख अप्रत्यक्ष कर आहेत. गेल्या 40–50 वर्षांचा इतिहास लक्षात घेता केंद्र सरकार आणि घटक राज्ये अशा दोन्ही पातळीवर एकूण कर महसुलात 80 टक्क्यांपेक्षा अधिक हिस्सा अप्रत्यक्ष करांचा आहे. साहजिकच यातून काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. अप्रत्यक्ष करांचे प्रमाण जास्त का ? हे प्रमाण प्रयत्न करूनही कमी का होत नाही ? त्यामुळे करव्यवस्थेत किती प्रमाणात परागामिता (regressivity) येते ? ही परागामिता कमी करण्याचे मार्ग कोणते ? या प्रकारच्या अप्रत्यक्ष करांचा किमत पातळीवर होणारा परिणाम कोणता ?

2·4 **विशिष्ट करांचे अभ्यास** : सैद्धान्तिकदृष्टया करांचा अभ्यास करण्याची एक साचेबंद पद्धती ठरलेली आहे. कराची व्याख्या, कराचा पाया, करदराची संरचना, विशिष्ट सवलती व कपाती, आकारणीचा परिव्यय, प्रशासन, करभार, करभाराचे संक्रमण, करांची आयलवचिकता व उद्धरणशीलता (buoyancy), करांचे बरेवाईट परिणाम (विशेषतः उत्पादन, गुंतवणूक, किमत पातळी, उत्पन्नाचे वाटप, उद्योगाचे स्थानिकीकरण, वगैरे) लक्षात घ्यावे लागतात. भारतातील आयकर, निगम कर, अबकारी कर, सीमाशुल्क, इतर प्रत्यक्ष कर, विक्री कर, राज्य अबकारी कर वगैरे करांच्या बाबतीत भरपूर अभ्यास झाले आहेत. आजही नव्या आकडेवारीच्या आधाराने तशाच प्रकारचे अभ्यास मांडणे शक्य आहे. कर बुडवणी (tax evasion) आणि कर टाळणी (tax avoidance) यांचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. स्थानिक शासनसंस्थांच्या दृष्टीने जकात (octroi) अत्यंत महत्त्वाचा आणि वादग्रस्त कर मानला जातो. त्यावरही स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची गरज आहे.

2·5 **समष्टी पातळीवरील काही अभ्यास विषय** : भारतीय करव्यवस्थेचा, राष्ट्रीय आणि घटक राज्य पातळीवर समष्टी पद्धतीनेही अभ्यास करणे शक्य आहे. त्यात मुख्यतः करपातळी व राष्ट्रीय उत्पन्न, करपातळी व गुंतवणूक, करपातळीतील बदल दर व भाव फुगवटयाचा दर, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष करपातळी व राष्ट्रीय उत्पन्न, बचत व गुंतवणूक यांच्यातील संबंध, प्रत्यक्ष करांची पातळी, दरसंरचना व काळा पैसा, अप्रत्यक्ष करांची पातळी व भाव–फुगवटयाचा दर यांच्यातील संबंध तपासून पाहणे शक्य आहे. विशेषतः गेल्या 4/5 वर्षांत भारतीय करसंरचनेत सुचविण्यात आलेल्या मूलभूत सुधारणा आणि त्यांची आवश्यकता.

वरील पद्धतीने भारतीय करव्यवस्थेचा विचार करीत असताना, अद्ययावत शास्त्रीय लिखाणाचा आढावा घेणे, विशिष्ट करांवर लिखाण करताना त्या प्रकारच्या कराबद्दलच्या स्वीकृत सैद्धान्तिक विवेचनाचा थोडक्यात आढावा घेणे, ऐतिहासिक आकडेवारीच्या आधाराने, सांख्यिकी पद्धतींचा वापर करून पुढील काळासाठी अंदाज करणे, याही प्रकारचे अभ्यास शक्य आहेत. या सर्व प्रकारच्या अभ्यासासाठी आवश्यक ती विश्वसनीय आकडेवारी अनेक स्रोतातून मिळणे शक्य आहे. त्यामध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिन, करन्सी अँन्ड फिनान्स रिपोर्ट, वित्त आयोगांचे अहवाल, अर्थसंकल्पपूर्व आर्थिक सर्वेक्षण, अर्थमंत्र्यांची अर्थसंकल्पीय भाषणे आणि त्यासोबत असणारे वित्त विधेयक, 'इंडियन इकॉनॉमिक स्टॅटिस्टिक्स – पब्लिक फिनान्स' (वार्षिक) यासारख्या स्रोतांचा वापर करणे शक्य आहे. करविषयक सैद्धान्तिक विवेचनाच्या आधारासाठी मसग्रेव्ह / मसग्रेव्ह यांच्या 'Public Finance in Theory and Practice' या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीचा चांगला उपयोग होऊ शकेल.

# महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

निबंधलेखकांनी या विषयावरील लेखन करताना एखाद्या किंवा काही पतपुरठा संस्थांची केवळ माहिती-वजा जंत्री देऊ नये. तर उपलब्ध माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या कामकाजावर आणि कामगिरीवर प्रकाश टाकावयाचा आहे. दुसऱ्या शब्दात, वर्णनात्मक निबंधापेक्षा विश्लेषणात्मक आणि चिकित्सक मीमांसा करणारा निबंध अपेक्षित आहे. त्यासाठी मुद्यांची निवड करताना पुढील तपशील मार्गदर्शक ठरेल. निबंध संपूर्ण महाराष्ट्र राज्य, एखादा जिल्हा, आंतर-जिल्हा, एखादा तालुका, एखादी मोठी संस्था आणि आंतरसंस्था अशा समष्टी आणि व्यष्टी पातळीवरून लिहिता येईल. अनुजात ( secondary ) माहितीचा उपयोग करताना सांख्यिकी पद्धतींचा अनुनय करता येईल. व्यष्टी पातळीवरील अभ्यास प्राथमिक माहिती संकलित करूनही करता येईल.

## (अ) सद्य:स्थिती

(1) या संस्था शेतकऱ्यांना केवळ सावकारी पाशातून मुक्त करणाऱ्या संस्था म्हणून काम करतात की शेती उत्पादनाला चालना देणाऱ्या संस्था म्हणूनही कार्य करताहेत ? सामाजिक न्याय आणि आर्थिक अभिवृद्धी यांच्यामध्ये मेळ घालणे त्याना शक्य झाले आहे काय ?

(2) पतपुरवठ्यासाठीची मागणी आणि पुरवठा, पतपुरवठ्यातील तफावत ( gap ).

(3) पतपुरवठ्यातील प्रादेशिक असमानता ( regional disparity ) – कर्जदारांनुसार पतपुरवठ्याचे विभाजन – कर्जाच्या कालावधीनुसार पतपुरवठ्याचे विभाजन – बदलांचे स्वरूप आणि प्रवृत्ती – कर्जाची सरासरी रक्कम, कालौघात त्यात झालेले बदल आणि बदलाचे विश्लेषण.

(4) सहकारी पतपुरवठ्यातील असमानतेची ( disparity ) तुलना व्यापारी बँकांकडून शेतीसाठी केल्या जाणाऱ्या पतपुरवठ्यातील असमानतेशी करता येईल. अशीच तुलना कर्जदारांच्या जमिनीच्या आकारमानाच्या संदर्भातही करता येईल.

(5) पतपुरवठ्यातील विविधांगी असमानता नियोजनकाळात वाढली आहे काय ? लहान शेतकरी अजूनही बिगर-संस्थात्मक ( non-institutional ) स्रोतांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे काय ? प्राथमिक संस्थांचा फायदा जास्त करून मोठ्या शेतकऱ्यांनाच मिळाला आहे काय ?

(6) प्राथमिक पतपुरवठा संस्थांच्या कर्जव्यवहारातून कर्जपुरवठ्यात निर्माण झालेली असमानता कमी करण्यासाठी व्यापारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका ( RRBs ) यानी केलेल्या पतपुरवठ्याचा काही परिणाम झाला आहे काय ? बहुसंस्था दृष्टिकोनाचा ( multi-agency approach ) प्राथमिक संस्थांच्या कामकाजावर कसा परिणाम झाला आहे ? कृषी क्षेत्राला अल्पकालीन कर्जपुरवठा करण्यात अजूनही कृषी पतपुरवठा संस्था चांगली कामगिरी करू शकतात काय ?

(7) ग्रामीण कर्जपुरवठ्याच्या क्षेत्रात अलीकडच्या काही वर्षांत बिगर-शेती क्षेत्रातील ग्रामीण कर्जपुरवठ्याकडे अधिक लक्ष देण्यात येत आहे. त्यामुळे कर्जपुरवठा ग्रामीण भागातच कृषी क्षेत्रापासून बिगर-कृषी क्षेत्राकडे संक्रमित होत आहे. याचा प्राथमिक कर्जपुरवठा संस्थांच्या कामकाजावर काही परिणाम होत आहे काय ?

(8) प्राथमिक संस्थांचे पैशाचे स्रोत – यात कालौघात झालेले बदल – या संस्थांची स्वयंनिर्वाहिता ( viability )– पतपुरवठ्याचे व्यवस्थापन ( credit management ) – कर्जवसुली – थकबाकीची समस्या – प्राथमिक संस्थांच्या कार्याचे मूल्यमापन.

## (आ) भविष्यातील वाटचाल

(1) सातव्या योजनेअखेरीस राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा 33 टक्क्यांपर्यंत खाली उतरेल अशी अपेक्षा होती. असे घडलेले असल्यास, त्यामुळे राष्ट्राच्या एकंदर पतपुरवठ्यात शेती क्षेत्राला होणारा पतपुरवठा घटण्याची शक्यता आहे काय ? तसे झाल्यास प्राथमिक सहकारी संस्थांचे कार्यही संकुचित होण्याचा संभव आहे काय ?

(2) सहकारी संस्था अधिक कार्यक्षम बनण्यासाठी त्यांचे विलिनीकरण करण्याचा मार्ग अनुसरता येईल काय ?

(3) प्राथमिक सहकारी संस्था, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि व्यापारी बँका यांच्या कृषी पतपुरवठा कार्यात पुनरुक्ती टाळून परस्पर–पूरकता कशी आणता येईल ?

(4) व्यापारी बँकांसाठी 1989 पासून 'सेवा क्षेत्र दृष्टिकोन' ( service area approach ) स्वीकारला आहे. त्याचा प्राथमिक सहकारी संस्थांवर काय परिणाम होण्याची शक्यता आहे ?

(5) आठव्या पंचवार्षिक योजनेत जिल्हा नियोजनाकडे पुन्हा कटाक्षाने लक्ष देण्यात येत आहे. तसे घडल्यास, शेती–साठीच्या संस्थात्मक कर्जपुरवठ्याचेही नियोजन केले जाण्याची शक्यता आहे. त्याचा प्राथमिक सहकारी संस्थां-वर कसा परिणाम होऊ शकेल ?

(6) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांची कामगिरी, त्या किती मोठ्या प्रमाणावर ठेवी मिळवू शकतात त्यावर अवलंबून आहे. ग्रामीण भागात सीमान्तिक बचतप्रवृत्ती ( MPS ) जास्त असूनदेखील प्राथमिक संस्थांचे आज–पर्यंतचे कार्य उत्साहवर्धक नाही. भांडवल बाजाराला उत्तेजन, खाजगीकरण वगैरे नव्या आर्थिक धोरणामुळे गुंतवणुकीची अधिक लाभदायक दालने उघडली जात आहेत. याचा प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या ठेवी गोळा करण्याच्या प्रयत्नावर काय परिणाम होण्याची शक्यता आहे ?

□ □

---

**टीप** : चर्चासत्रासाठीच्या विषयांची रूपरेषा तयार करून दिल्याबद्दल पुढील तज्ज्ञांना मनःपूर्वक धन्यवाद.

(1) **भारतातील करव्यवस्था :**
ज. फा. पाटील, प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

(2) **महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था :**
रवीन्द्र दोशी, प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

**– प्रमुख संपादक**

□ □

# अर्थसंवाद ( खंड 16 : 1992-93 )

## (अ) लेख सूची

### स्वतंत्र लेख


1 अर्थशास्त्राचे भविष्यातील स्वरूप 211–20
2 अर्थशास्त्रातील 'नोबेल'ची श्रेयमालिका 312–21
3 अभिमत अर्थशास्त्रीय सिद्धान्त आणि भारतीय अर्थशास्त्र 187–98
4 आधुनिक तंत्रविज्ञान आणि गांधी विचार 47–55
5 कल्याणाच्या अर्थशास्त्रातील पहिले मूलभूत प्रमेय 221–35
6 नागरीकरण : स्वरूप आणि काही वादप्रश्न 252–61
7 पाण्याचे नियोजन : अर्थशास्त्रीय पैलू 89–102
8 भारतातील सरकारी उपक्रम 199–210
9 भारतातील वस्त्रोद्योग 103–17
10 भारतीय वस्तुनिर्माण क्षेत्राच्या उत्पादनक्षमता वापराची प्रवृत्ती 20–38
11 भाववाढीची मुद्रावादी स्पष्टीकरणे 39–46
12 मार्क्सनंतरचे अर्थशास्त्र 175–86
14 लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी 287–305
15 सहकारी साखर कारखान्यांचा वित्तीय प्रवाह 129–43
16 सामजिक-आर्थिक विश्लेषणाच्या अधिराज्याचे संस्थापक : गॅरी बेकर 306–11
17 सिंचनप्रकल्पांचे मूल्यमापन 236–51
18 सॅम्युअलसन यांची स्राफा यांच्या विचारसरणी-वरची विदारक टीका 118–28


### ग्रंथ परीक्षण


1 खाजगीकरणाचा प्रयोग 332–37
2 दक्षिण हिंदुस्थानातील कृषी-औद्योगिक बदल 66-77
3 भाववाढीची संरचनात्मक मीमांसा 152–58


### अधिवेशन वृत्तांत


1 'अर्थसंवाद', वार्षिक अहवाल : 1991-92 359–62
2 कल्याणाच्या अर्थशास्त्रातील आधुनिक विचार 352–54
3 देशाच्या अर्थव्यवस्थेत अर्थसाहाय्य योजनेचे योगदान 355–58
4 भारतातील ग्रामीण उद्योगीकरण 346–51
5 महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे अर्थशास्त्र 340–45
6 सोळाव्या वार्षिक अधिवेशनाचा कार्यवृत्तांत 363–70


### आर्थिक वार्ता


1 56–65
2 144–51
3 322–31


### सांख्यिकी पुरवणी


1 आठवी पंचवार्षिक योजना 159–69
2 भारतीय अर्थव्यवस्था : दशवार्षिक बदल 78–85
3 भारतातील पंचवार्षिक योजना : एक दृष्टिक्षेप 371–80


### संकीर्ण


1 विचारशलाका 262–72
2 नी. वि. सोवनी : जीवन परिचय / लेखनसंपदा 273–81

# (आ) लेखक सूची

## स्वतंत्र लेख


| | | |
|---|---|---|
| 1 | कुलकर्णी, ना. श्री. | 103–17 |
| 2 | खांदेवाले, श्रीनिवास | 211–20 |
| 3 | गंधे, शशिकांत | 287–305 |
| 4 | चितळे, माधव आ. | 89–102 |
| 5 | चोळकर, पराग | 47–55 |
| 6 | जहागिरदार, दि. व्यं. | 252–61 |
| 7 | जोशी, चंद्रकांत | 129–43 |
| 8 | देशपांडे, श्रीधर आत्माराम | 199–210 |
| 9 | दोशी, रवीन्द्र | 312–21 |
| 10 | नाडकर्णी, आनंद | 221–35 |
| 11 | पळशीकर, वसंत | 1–19 |
| 12 | पेडगावकर, श्रीराम | 39–46 |
| 13 | पंडित, नलिनी | 187–98 |
| 14 | बापट, भ. ग. | 175–86 |
| 15 | बुरंगे, लक्ष्मण | 20–38 |
| 16 | माने, शि. ना. | 306–11 |
| 17 | रथ, नीळकंठ | 236–51 |
| 18 | सोवनी, नी. वि. | 118–28 |
| | | 262–71 |


## ग्रंथ परीक्षण


| | | |
|---|---|---|
| 1 | दातार, माधव | 152–58 |
| 2 | दास्ताने, संतोष | 332–37 |
| 3 | दोशी, रवीन्द्र | 66–77 |


## अधिवेशन वृत्तांत


| | | |
|---|---|---|
| 1 | कुरुलकर, र. पु. | 346–51 |
| 2 | खांदेवाले, श्रीनिवास | 355–58 |
| 3 | धोंगडे, मा. पं. | 340–45 |
| 4 | दोशी, रवीन्द्र | 359–62 |
| 5 | नाडकर्णी, आनंद / पडोशी, अ. रा. | 352–54 |
| 6 | पाटणकर, व्यं. सु. | 363–70 |


## आर्थिक वार्ता


| | |
|---|---|
| भानुशाली, सु. गो. | 56–65 |
| | 144–51 |
| | 322–31 |


## सांख्यिकी पुरवणी


| | | |
|---|---|---|
| 1 | दोशी, रवीन्द्र | 159–69 |
| | | 371–80 |
| 2 | पुजारी, आ. गो. | 78–85 |


## संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| 1 | जोगळेकर, आरती | 273–81 |
| 2 | ढेकणे, भा. रा. | 262–71 |


## अंकांचा तपशील

| अंक | तिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल–जून 1992 | 1–88 |
| 2 | जुलै–सप्टेंबर 1992 | 89–174 |
| 3 | ऑक्टोबर–डिसेंबर 1992 | 175–286 |
| 4 | जानेवारी–मार्च 1993 | 287–388 |

□ □

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची विज्ञानावरील प्रकाशने

| अनु. | पुस्तकाचे नाव | लेखक/अनुवादक | किंमत |
|---|---|---|---|
| (1) | रेडिओ दुरुस्ती | श्री. श्री. वि. सोहोनी | 52–00 |
| (2) | रेकॉर्ड प्लेअर | – ,, – | 11–50 |
| (3) | डिझेल इंजिन | प्रा. सुभाष सावरकर | 15–00 |
| (4) | अणुयुग | श्री. वि. त्र्यं. आठवले | 12–00 |
| (5) | पुस्तक बांधणी | श्री. वि. ना. लिमये | 18–00 |
| (6) | खनिज तेल व तज्जन्य रसायने | श्री. प. म. बर्वे | 16–00 |
| (7) | ध्वनिवर्धन आणि वितरण व्यवस्था | श्री. श्री. वि. सोहोनी | 22–00 |
| (8) | तेले व मेदे भाग–1 | डॉ. न. गं. मगर | 19–00 |
| (9) | वनश्री सृष्टी भाग 1 व 2 | डॉ. म. वि. आपटे | 10–00 (प्रत्येक भागास) |
| (10) | भौतिकी मानवशास्त्र | श्री. वि. श्री. कुलकर्णी | 33–00 |
| (11) | कापडावरील रासायनिक प्रक्रिया | डॉ. रा. सं. भागवत | 18–00 |
| (12) | बहुरूपी बहुगुणी कार्बन | डॉ. रा. चं. जोशी | 14–00 |
| (13) | सैद्धान्तिक मृत्तिका बलविज्ञान (श्री. तेरेगाशी लिखित "Theoretical Soil Mechanics" या पुस्तकाचा अनुवाद) | श्री. श. म. भालेराव | 42–00 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रांवर मिळतील.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद–431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे–411 004.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई–400 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाइन्स,
नागपूर–440 001.